

निर्मलकुमार फडकुले

# सुरवाचा परिमळ

# सुखाचा परिमळ

निर्मलकुमार फडकुले

सुखाचा परिमळ
निर्मलकुमार फडकुले

Sukhacha Parimal
By NirmalKumar Phadkule

प्रकाशक :
बाबूराव मैंदर्गीकर
सुविद्या प्रकाशन
३७४, उत्तर कसबा, सोलापूर - ४१३ ००७

©
निर्मलकुमार फडकुले
'विवेक'
विद्यानगर, उत्तर सदर बजार,
सोलापूर - ४१३ ००३

मुखपृष्ठ :
शिरीष घाटे

मुद्रक :
गणेश फोटो टाईप सेटर्स
३७४, उत्तर कसबा, सोलापूर - ४१३ ००७

मूल्य : रुपये १००/- फक्त

रसिकहो व मराठी साहित्य प्रेमी स्नेहजनहो ,

माझे वडील प्रा.डॉ. निर्मलकुमार फडकुले यांचे साहित्य मी ई-साहित्य प्रतिष्ठान तर्फे आपणासाठी प्रकाशित करीत आहे. २८ जुलै २०२० या त्यांच्या चौदाव्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या साहित्याचे प्रकाशन व्हावे व ते जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचवावे हा उद्देश आहे.

पेशाने मराठीचे प्राध्यापक,अत्यंत हळवे व जीवनावर मनापासून प्रेम करणारे असे माझे वडील. केवळ साहित्यिकच नव्हे तर ते प्रख्यात वक्ते देखील होते. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील गावांमध्ये त्यांनी प्रबोधनाचे कार्य केले .संत साहित्याचा त्यांचा गाढा अभ्यास होता. त्यांनी आकाशवाणी पुणे, सांगली, सोलापूर यावरून संतांच्या विविध अभंगांचे निरूपण केले आहे आजही ते आकाशवाणी वरून प्रसारित होत आहे. ते सर्व प्रसारित कार्यक्रम आपल्या भेटीस इ-साहित्य प्रतिष्ठान मार्फत आणणार आहोत. विविध शासकीय व विद्यापीठीय समित्या, अभ्यास मंडळे , बालभारती यांच्या माध्यमातून त्यांनी खूप मोलाचे कार्य केले आहे. अग्रगण्य वृत्तपत्रातून व नियतकालिकांमधून ४०-४५ वर्षांहून अधिक काळ त्यांनी लेखन केले तेही पुस्तक रूपात प्रसिद्ध झाले . त्यांची काही व्याख्याने देखील रसिकांच्या भेटीस आणणार आहोत. त्यांच्या स्वभावाचे विविध पैलू त्यांच्या साहित्यातून उलगडत जातील व खास करून जीवनाविषयक दृष्टिकोन त्यांच्या ललित लेखनातून आपणास समजेल. देश-परदेशातील असंख्य रसिकांनी त्यांच्या सर्व साहित्याची पुनर्प्रकाशनाची मागणी केली व ती आता पूर्ण होत आहे याचा मला आनंद आहे. या प्रकाशनाला ई साहित्यने केलेल्या सहकार्यासाठी त्यांचा मी आभारी आहे.

अजित नि. फडकुले, सोलापूर
ajitphadkule@hotmail.com
९४२२४६३६४२

’ सुखाचा परिमळ ’ हे प्रा. डॉ. निर्मलकुमार फडकुले लिखित पुस्तक ‘सुविद्या प्रकाशन’ यांनी प्रकाशित केले. त्या पुस्तकाचे सर्वाधिकार लेखकाचे चिरंजीव व वारस श्री अजित फडकुले यांच्याकडे आहेत.

त्यांनी ई साहित्य प्रतिष्ठानला याचे ई पुस्तक बनवून विनामूल्य वितरित करण्याचे कायदेशीर अधिकार दिले आहेत. त्यानुसार आम्ही आमच्या वाचकांना ते पुस्तक विनामूल्य देत असून त्यांनी ते आपल्या ओळखीच्या वाचकांत विनामूल्य वितरित करावे ही विनंती करत आहोत.

या परवानगीसाठी आम्ही

श्री अजित फडकुले :-9422463642

ajitphadkule@hotmail.com

यांचे आभारी आहोत.

## ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com
www.esahity.com
www.esahity.in

# सुखाचा परिमळ

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : श्री. अजित फडकुले यांना फ़ोन किंवा मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाचे चिरंजीव व वारस श्री. अजित फडकुले यांचेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (तुरुंगवास व दंड) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

## ई प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

प्रकाशन : २८ जुलै २०२०

(स्व. श्री. निर्मलकुमार फडकुले स्मृतीदिन)

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी- घेणे आवश्यकआहे.

## पुस्तकं वाचून कोणाला शहाणपण येतं का?

हो! आम्ही म्हणतो हो. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

अनुभवाहून मोठा गुरू नाही. कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. काही प्राण्यांना त्यांचे जन्मदाते थोडं शिक्षण देतात. बाकीचे प्राणी अनुभव घेत घेत शिकतात. फक्त मानवच असा प्राणी आहे ज्याला पुर्वीच्या पिढीतल्या माणसांचे अनुभवही शिकवतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

**अनुभव पुस्तक असतात आणि पुस्तक अनुभवच असते.**

**वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे**.

www.esahity.in आणि www.esahity.com

मंडळी!
वाचायला तर हवंच!
पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...
...आणि स्वतःही लिहायला हवं.

माणसांच्या मनांत

करुणा, प्रेम आणि शांती यांचे

मधुर सूर उत्कटतेनं पेरणाऱ्या

महात्म्यांच्या वत्सल हातांना

समर्पित.

## प्रास्ताविक

**मग पिकलिया सुखाचा परिमळु । का निवालिया अमृताचा कल्लोळु ।**
**तैसा कोवळा आणि सरळु । बोलु बोलिला ॥**

ज्ञानेश्वरांचा कल्पनाविलास, प्रतिमांची योजना, शब्दांची निवड हे सारंच विलक्षण प्रभावी असतं. पिकलेल्या फळाला एक रुचिर गंध येतो. त्याप्रमाणं महात्म्यांच्या वाणीला, व्यक्तित्वाला एक मधुर सुवास येत असतो. तो शतकानुशतकं दरवळत राहातो. त्यालाच सुखाचा परिमळ म्हणणं संयुक्तिक ठरतं.

काही महनीय व्यक्तित्वांचा आणि विचारांचा या लेखांतून मी वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. काळावर आपली मुद्रा उमटविणारी व्यक्तित्वं कोणत्याही सीमेत बांधली जात नाहीत. ती निःसीम आणि मुक्त असतात. बुद्ध, महावीर, बसवेश्वर, ज्ञानेश्वर, नामदेव आणि तुकाराम यांनी मानवी संस्कृतीला आकार दिला. सामर्थ्य दिलं. त्यांच्या विचारांची आणि कार्याची चिकित्सा करण्याचा मी केलेला हा अल्प प्रयत्न. कोणताही महापुरुष शब्दांच्या चौकटीत सामावला जात नाही. आणि त्याचं संपूर्ण आकलन कोणी करू शकत नाही. पण तरीही त्यांच्या साहित्याची, व्यापक कर्तृत्वाची आपल्या दृष्टिकोनातून चर्चा करताना एक आगळा आनंद अनुभवता येतो. सुखाचा परिमळ केवळ सुखवीत नाही. हे सारेच आपल्याला अंतर्मुख करतात. काही मूल्यांचं विसरलेलं भान पुन्हा पुन्हा देतात.

गेल्या दोन तीन वर्षांत मी विविध स्वरूपाचं लेखन केलं. गोमटेश्वर ते ज्ञानेश्वर असा लेखणीचा प्रवास झाला. त्यातले निवडक लेख या पुस्तकात घेतले आहेत. संत ज्ञानेश्वरांच्या संजीवन समाधीला सातशे वर्षं झाली. हे वर्ष त्या दृष्टीनं विशेष महत्वाचं. ज्ञानेश्वर आणि ज्ञानेश्वरी यांच्यावरील लेखांची संख्या या पुस्तकात त्यामुळं अधिक आहे. खरं तर कोणताच संत एखाद्या त्रोटक लेखाचा विषय नसतो. त्याच्यावर भिन्न भिन्न दृष्टिकोनातून कितीतरी लिहावं लागेल. समाज घडविणारे हे समाजपुरुष अनंत काळचे आहेत. मार्गदर्शक आहेत.

या पुस्तकाचं प्रकाशन करण्याची जबाबदारी श्री. बाबूराव मैंदर्गीकर, सुविद्या प्रकाशनचे संचालक यांनी स्नेहभावानं स्वीकारली. माझे मित्र डॉ. शे. दे. पसारकर यांनीही या संदर्भात केलेलं साहाय्य उल्लेखनीय आहे. दोघांचेही मनःपूर्वक आभार. श्री. शिरीष घाटे यांच्या कलात्मक मुखपृष्ठानं व मांडणीनं पुस्तकाचं 'दर्शन' सुखद झालं. त्यांचाही मी ऋणी आहे.

**–निर्मलकुमार फडकुले**

# अनुक्रमणिका


१ ज्ञानेश्वरांशी 'हृदयसंवाद' / १

२ आत्मकथन ज्ञानेश्वरांचे / ९

३ बांधल्या तळ्याचा फुटलासे पाट / १७

४ 'एक तरी ओवी...' / २९

५ संतकवी चोखामेळ्याचे अश्रू / ३८

६ ज्ञानेश्वरांचे व्यक्तित्व / ४४

७ संत नामदेवांच्या मराठी-पंजाबी काव्यधारा / ५३

८ ज्ञानेश्वरांच्या जीवनदृष्टीचे काही पैलू / ६०

९ तुका आकाशा एवढा / ६९

१० महात्मा बसवेश्वरांची क्रांतिकारक विचारदृष्टी / ९४

११ श्री सिद्धरामेश्वरांची भक्तिकविता / १०३

१२ कबीरांची मुलायम चादर / १०९

१३ गोमटेश्वर / ११९

१४ भ. महावीर : एक प्रकाश / १२४

१५ संतकाव्यातील सौंदर्यस्थळे / १३०

१६ पसायदानातील भावसौंदर्य / १३८

१७ धम्मपद : भ. बुद्धाची भावमूर्ती / १४३

१८ संतांचा जीवनवाद / १५१

१९ दुरिताचे तिमिर जावो / १६०

# ज्ञानेश्वरांशी 'हृदयसंवाद'

'हे ज्ञानियांच्या राजा ज्ञानेश्वरा, सातशे वर्षापूर्वी केव्हातरी चांगदेव नावाच्या एका ज्येष्ठ योग्यानं तुला एक पत्र पाठवलं होतं. पत्र लिहिण्यासाठी त्यानं हातात लेखणी घेतली मात्र, तुला आशीर्वाद लिहावा की नमस्कार हेच त्याला कळेना. कारण वयानं तू लहान होतास. पण ज्ञानाने मात्र चांगदेवापेक्षा कितीतरी मोठा होतास. अखेर या गोंधळात त्यानं तुला एकही अक्षर न लिहिता कोरं पत्र पाठवलं. त्या कोऱ्या पत्राला तू आत्मीयतेनं उत्तर पाठवलंस. मीही आज तुला एक पत्र लिहीत आहे. नमस्कार आणि आशीर्वाद असल्या उपचारात मला वेळ घालवायचा नाही. तू सदैव वंदनीय आहेस. प्रातःस्मरणीय आहेस. आळंदीला तू संजीवन समाधी घेतलीस त्या घटनेला आता सात शतकं पूर्ण होत आहेत. तुझ्या पुण्यस्मृतीला विनम्र भावानं आज सारा महाराष्ट्र कृतज्ञतेनं वंदन करीत आहे. तुझ्यासारख्या एका महान संताशी आणि श्रेष्ठ कवीशी थोडासा वाद-संवाद करण्याचा आनंद मला घ्यायचा आहे. माझा तो अधिकार नाही. पण जगात राजहंसाचं चालणं अतिदेखणं असतं म्हणून इतरांनी चालूच नये काय? या विचारानं, तुला पत्र लिहायला मी बैठक मारून बसलो आहे. 'अहो, जाहो' च्या शिष्ट भाषेत मात्र मी लिहिणार नाही. प्रिय व्यक्तीसाठी औपचारिक आदराची कृत्रिम भाषा मला तरी मान्य नाही. 'अरे कारे'च्या निःशंक आत्मीयतेच्या पातळीवर राहून तुझ्याशी मोकळेपणानं बोललो तर तू मुळीच रागावणार नाहीस याची मला खात्री आहे. राग आणि लोभ, द्वेष आणि मत्सर यांचे दुर्गंधी लेप आमच्या क्षुद्र मनावर चढलेले आहेत. तू तर वीतराग आहेस. द्वेष-मत्सराचा वारासुद्धा तुझ्या दिशेनं वाहू शकत नाही. अहंकाराची आणि तुझी ओळखही नाही. अमृतानं भरलेला अर्थ सुंदर शब्दांच्या द्रोणात ओतून त्यात आपल्या हृदयीचा सुगंध मिसळून तू आम्हाला उत्कट प्रेमानं इतकं मोलाचं सांगितलं आहेस की, आता तुझं चिंतन करताना, तुझ्याशी बोलताना शिष्टमान्य कृत्रिम, औपचारिक शब्द माझ्या तोंडी येऊ शकत नाहीत.

ज्ञानदेवा, महाराष्ट्र संस्कृतीच्या शिल्पकारा, आपल्या कवित्वाच्या कल्पवेलीवर

रसभावांची फुलं फुलवणाऱ्या कलावंता, तुझ्या रूपानं महाराष्ट्र भूमीला तेराव्या शतकात एक सुंदर स्वप्न पडलं. तुझ्यामुळं मराठी साहित्यावर आणि भाषेवर अमृताचा घन बरसला. आमच्या जीवनाचा मोगरा त्यामुळं रसरसून फुलावा ही इच्छा आहे. तुझ्या संजीवन समाधीसमोर मी कितीतरी वेळा नतमस्तक होऊन उभा राहिलो आहे. डोळे अश्रूंनी भरून येतात. उरात वेदनेची कळ उठते. मी मनोमन तुला प्रश्न विचारतो : हे तापहीन मार्तंडा, हे अलांछित चंद्रम्या, दुरिताचे तिमिर निरसून टाकण्यासाठी तुझ्या दीर्घ जीवनाची जरूर असताना पंचविशीच्या आतच तू जीविताचा निरोप का घेतलास? महापुरुषांचं मनोगत जाणून घेण्याची योग्यता आम्हा सामान्य माणसांत असत नाही हे मान्य करून सुद्धा मला प्रश्न पडतो. हे ज्ञानतपस्व्या, तुझ्यासारखे श्रेष्ठ मार्गदर्शक जगाकडे पाठ फिरवू लागले तर या मानवतेचे काय होणार? सागर आटून जावा, अमृत विटून जावे, कल्पवृक्ष वठून जावा, सूर्यप्रकाश ओसरून जावा म्हणजे जी स्थिती होईल तीच अवस्था तुझ्यासारख्या श्रेष्ठ संताच्या जाण्यानं होणार नाही काय? ही समाधी घेण्याचा निर्णय आणखी पन्नास वर्षे तू लांबवला असतास तर आजचा माणूस कदाचित अधिक सुजाण, अधिक सुसंस्कृत झाला असता. तुझ्या समाधीमुळं आमच्यासारख्या असंख्य पामरांच्या मस्तकावरचं छत्र नाहीसं झालं. तू समाधी घेतलीस आणि मराठी भाषा पोरकी झाली. मराठी साहित्याची लक्ष्मी मावळून गेली. एक विलक्षण प्रमत्त आणि प्रसन्न अशी प्रतिभेची लाट तुझ्या रूपानं उचंबळत होती ती विरून गेली. 'आनंदे भरीन तिन्ही लोक' ही प्रतिज्ञा करणाऱ्या आनंदवादी ज्ञानराजा, तुझ्या समाधीमुळं 'बांधल्या तळ्याचा फुटलासे पाट' अशी अवस्था केवळ निवृत्तिनाथांचीच नव्हे तर आमचीही झाली.

हे चेतनाचिंतामणी ज्ञानदेवा, भक्ती आणि शांती यांची बरसात करणाऱ्या ज्ञानमेघा, महाराष्ट्राच्या जीवनात चैतन्याचा दीप लावून तू जो प्रसन्न प्रकाश निर्माण केलास तो शतके उलटल्यानंतरही आम्हाला 'अमृतानुभव' देत आहे. तुझ्या आयुष्यात तुला सुखाची सावली कितपत मिळाली याबद्दल मी साशंक आहे. कर्मठ परंपरेच्या दासानुदासांनी तुझा आणि तुझ्या भावंडांचा छळ केला. निंदा, अपमान आणि उपेक्षा यांच्या तीव्र उन्हात तुम्ही भावंडं होरपळत होता. पण येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी 'अविवेकाची काजळी फेडून' विवेकदीप उजळलास आणि अवघाचि संसार सुखाचा व्हावा म्हणून आपलं जीवन समर्पित केलंस. दुःखात पिचत पडलेल्या सामान्य माणसाला वात्सल्यानं पोटाशी धरलंस, त्याची तू 'माऊली' झालास. तुझ्या

वात्सल्याच्या स्पर्शानं सर्वसाधारण माणसाच्या मनीची सुप्त असलेली तार झंकारून उठली. दरिद्री लोकांच्या आयुष्यात तुझ्या तत्त्वज्ञानानं 'सोनियाचा दिनू' उगवला. करुणेच्या महासागरा, ऐन तारुण्यात तू जगाकडं पाठ फिरवायला नको होतीस. मुक्तीच्या सिंहासनावर त्यामुळं आरूढ झाला असलास तरी सामान्य माणूस आजही अज्ञानाच्या, जातीपातींच्या, वासनाविकारांच्या साखळदंडात जखडला आहे. त्याला मुक्त करण्याची जबाबदारी तुझ्यासारख्या महामानवावरच येऊन पडते.म्हणून म्हणतो, हे ब्रह्मविद्येच्या उपासका, स्वानंदसाम्राज्यात विहार करणाऱ्या संतश्रेष्ठा, समाधीतून आता बाहेर ये. सातशे वर्षांची ही निर्विकल्प समाधी सोडून आम्हा क्षुद्रपामरांच्या दुःखपूर्ण जीवनात पुन्हा एकदा माऊलीच्या मायेनं शांतिसुखाची छाया निर्माण कर. समाधिस्थ झालेल्या ज्ञानवंता, अरे भयानक अज्ञानाच्या काट्यांकुट्यात खितपत पडलेल्या या मानवतेला तुझी फार जरूर आहे. स्तनपान करीत असलेल्या बालकाला आईनं बाजूला सारावं त्याप्रमाणं तू जगाला दूर केलंस आणि आत्मकल्याणाची अखंड अनुभूती घेत राहिलास पण आमचे काय? माथ्यावरचं आकाश कोसळलं आहे. पायाखालची धरणी दुभंगली आहे. जीवनाची सारी उज्ज्वल मूल्यं तुडवली जात आहेत. आणि तुला तर समाधीत गाढ शांतिनिद्रा लागली आहे. अशा अवस्थेत आम्ही हृदयापासून तुलाच साद घालणार आणि म्हणणार 'ये ज्ञानदेवा ये, तृषित चातक मेघहृदया ये, हिंसा आणि अन्याय या राक्षसांचा संहार करण्यासाठी श्रीकृष्णाचे सुदर्शन चक्र घेऊन ये. संहार हा शब्द तुझ्यासारख्या परमकारुणिक संताला मान्य नसेल तर, 'खळांची व्यंकटी सांडण्यासाठी' ये आणि 'ईश्वरनिष्ठांची मांदियाळी' निर्माण करण्यासाठी वेगाने ये. आजच्या जगाला ज्ञानी संतांची, माणुसकीचा ध्वज फडकावणाऱ्या मानवतावादी तत्त्ववेत्याची जरूर आहे. आंधळ्या भोगवादाच्या उत्पाती प्रचंड लाटेत सापडलेल्या समाजाची सुटका तुझ्यासारखा परम सहिष्णू कृतार्थ वीरच करू शकेल याबद्दल माझ्या मनात तिळमात्र शंका नाही. राजकारण, समाजकारण, धर्मकारण या सर्व जीवनक्षेत्रांत भ्रष्टतेचं, आत्यंतिक स्वार्थाचं कलुषित वातावरण पसरलं आहे. तुझ्या स्वच्छ, विमल अंतःकरणातील निकोप विचारांचा गंध पुन्हा एकदा या जगाला मिळाल्याशिवाय जग सुस्थिर होणार नाही. ज्ञानेश्वरा, तुझ्या विचारभावनांचा प्राणवायू या गुदमरणाऱ्या मानवतेला देण्यासाठी पुन्हा एकदा तुला आलंच पाहिजे. तोल ढळलेल्या या जगाचा तोल ज्ञान, तपस्या, साधुत्व आणि ममता व समता यांचा संगम झालेल्या तुझ्यासारख्या व्यक्तीलाच सावरता येईल. मी तुला 'पसायदान' मागत आहे.

दोन हस्तक जोडून आणि तुझ्या चरणी मस्तक ठेवून तुला आजच्या जगात आमंत्रित करीत आहे. ये ज्ञानदेवा ये!

हे प्रज्ञाप्रतिभेच्या सम्राटा, तुझ्या व्यक्तिमत्त्वाचं वर्णन करण्यासाठी माझ्याजवळ शब्द नाहीत. तुझेच शब्द घेऊन तुलाच ते भक्तिभावानं वाहिले पाहिजेत. समुद्रातलं ओंजळभर पाणी समुद्रालाच वाहून ज्याप्रमाणं माणूस आपली भक्ती प्रकट करतो, सामान्य तेजाची आरती ओवाळून ज्याप्रमाणं सूर्याला वंदन करतो त्याप्रमाणं तुझ्या शब्दांनी तुलाच ओवाळण्याचा प्रयत्न करणं उचित वाटतं.

जे ज्ञानगंगे न्हाले । जे पूर्णता जेऊनि धाले ॥
जे शांतीसि आले । पालव नवे ॥
जे परिणामा निघाले कोंभ । जे धैर्यमंडपाचे स्तंभ ॥
जे आनंदसमुद्री कुंभ । चुभकळूनि भरिले ॥

(अ-९-१८९-९०)

तू आनंदाच्या सागरात भरलेला मंगल कुंभ आहेस. ज्ञानाच्या गंगेत न्हालेला तृप्त भक्त आहेस. धैर्यमंडपाचा तू आधार आहेस आणि शांतीच्या वेलीला फुटलेली नवी पालवी आहेस. तुझी शांती, तृप्ती, भक्ती, आनंद आणि धैर्य यांचे काही थोडेसे अंश जरी आम्हाला मिळाले तरी आम्ही तुझ्या स्वप्नातल्या एका नव्या सुंदर समतावादी समाजाची उभारणी करू शकू. तू केवळ संत आणि केवळ कवी नाहीस. दरिद्री बनलेल्या जगाला नवनवीन स्वप्नांची जरतारी वस्त्रे लेवविणारा आणि नवमूल्यांचे अलंकार दान करणारा कुबेर आहेस. जेथे कृष्ण आणि अर्जुन आहे तेथे जसा विजय निश्चित आहे त्याप्रमाणं जेथे तुझं व्यक्तित्व प्रकट झालं, जेथे तुझ्या वाणीचा विलास व्यक्त झाला ती 'भावार्थदीपिका' आहे. तेथे तेथे 'सकळ धर्मांचे माहेर' आहे. आम्हाला तू दिलेल्या अमूल्य स्वप्नांची जपणूक केली पाहिजे. स्वप्नांचं रूपांतर वास्तव सृष्टीत करण्यासाठी तुझं बोट धरूनच वाटचाल केली पाहिजे. ज्ञानवंत संताचा आधार मिळाला तर आमचं स्वातंत्र्य आणि लोकशाही चिरंतन होऊ शकेल. आज दृष्टीसमोर कुठलंही भव्य उद्दिष्ट राहिलेलं नाही. दिशा ओस झाल्या. त्यामुळं वाट हरवली. आयुष्याच्या कुरुक्षेत्रावर लढण्याची हिंमत उरली नाही. यावेळी ज्ञानराया, तू आमच्या उधळलेल्या रथाच्या घोड्यांचे लगाम श्रीकृष्णाप्रमाणं हाती घे आणि हा रथ सुरक्षितपणे युद्धभूमीवर उभा कर. तू लढलास त्याप्रमाणं शांतीनं, निर्मितीशील वृत्तीनं लढण्याची आम्हाला प्रेरणा द्यावीस म्हणून म्हणतो समाधीतून उठून पुन्हा

आम्हाला मार्गदर्शन करण्यासाठी ये. ज्ञानदेवा, आता गेल्या सातशे वर्षांतल्या अनुभवानं आमचा घोर अपराध आम्हाला कळला आहे. 'हे विश्वचि माझे घर' अशी स्थिरमती झालेल्या आणि सारं चराचर विश्व बनलेल्या तुझ्यासारख्या विश्वसंताला आम्ही ओळखलं नाही. करंट्या बुद्धीच्या लोकांनी त्या काळात तुझी अवगणना केली हे खरं, पण पूर्वीप्रमाणं पुन्हा एकदा अनन्यभावानं मुक्ताईच्या शब्दांत विनवितो 'ताटी उघडा ज्ञानेश्वरा,' विश्व तारण्यासाठी समाधीची शिळा बाजूला सारून पुन्हा एकदा आपलं आगमन होऊ द्या. दुर्गंधीनं भरलेल्या जगात पुन्हा तुमच्या सहवासाचा मोगरा फुलू द्या. सुवासाचं साम्राज्य पसरू द्या. तुम्ही सुगंधवादी आहात. आनंदवादी आणि पुरुषार्थी आहात. म्हणूनच इतक्या लवकर समाधी घेऊन जगाला अनाथ करण्याचा तुझ्यासारख्या महापुरुषाला अधिकार नाही. अलंकारिक अर्थानं तुझ्या जीवनाची यात्रा अखंड चालूच राहणार आहे पण तरीही प्रत्यक्ष तुझा सहवास आम्हाला या शतकात पुन्हा मिळाला तर तुझ्या प्रसादचंद्रम्यामुळं लोकजीवनाची पौर्णिमा होईल.

हे शब्दसृष्टीच्या परमेश्वरा, अभिनव्‌वाग्विलास करणाऱ्या कलावंता, विश्वाला मोहिनी घालणाऱ्या वागीश्वरा, तत्त्वज्ञानाच्या गाभ्यातून नवरसांचे कारंजे निर्माण करणाऱ्या कुशल चित्रकारा, विश्वात्मक देवाला प्रसन्न करण्यासाठी जीवनभर वाग्यज्ञ करणाऱ्या परमसमर्थ याज्ञिका, तू आमच्या मराठी भाषेला अपूर्व लावण्य दिलंस. नवविचाराचं तारुण्य दिलंस, तुझ्या लेखणीतून अमृताच्या शाईत भिजलेली अपूर्व अक्षरचित्रं उमटत राहिली. त्यामुळं तू कवीश्वर झालास. अपूर्वसृष्टीचा निर्माता बनलास. तुझ्या कवित्वामुळं सामर्थ्याची शक्ती वाढली. सौंदर्याचा देखणेपणा दुणावला. प्रकाशाला उज्ज्वलता आली. संगीत मधुर झालं. जीवनाला जिवंतपणा आला. यात अतिशयोक्ती अल्पांशानंही नाही. रसभावनांनी संपन्न असलेल्या तुझ्या कवित्वानं तत्त्वज्ञानाला आणि परिपूर्ण विचारांनी समृद्ध असलेल्या तुझ्या तत्त्वज्ञानानं कवित्वाला प्रतिष्ठा दिली. तुझ्या लेखणी-वाणीनं मायमराठीचं आकाश उजळून निघालं. तुझ्या ओवी अभंगांनी मराठी कवितेला लावण्याची नव्हाळी दिली. तूच म्हटल्याप्रमाणं,

की प्रथमवयसाकाळी । लावण्याची नव्हाळी ।
प्रकटे जैसी आगळी । अंगनाअंगी ॥

बाल्य संपत आहे व यौवनाचं आगमन होत आहे अशा संधिकालात स्त्रीच्या अंगोपांगांवर सौंदर्याची नवलाई ज्याप्रमाणं प्रकट होते त्याप्रमाणं तुझ्या रूपानं वसंत ऋतू अवतरल्यावर आमच्या मराठी भाषेच्या अंगोपांगांना नवयौवनाचे रंग लाभले.

खरोखरच तू कलावंतांचा कलावंत आहेस. कवींचा कवीश्वर, योगियांचा योगेश्वर आणि ज्ञानियांचा ज्ञानेश्वर आहेस. गेल्या सात शतकांत अनेक साहित्यकृती आल्या, अल्पकाळ चमकल्या, आणि विस्मृतीच्या अंधारात निघून गेल्या. पण तुझ्या काव्याचं तारुण्य अभंग राहिलं. काळाचा कठोर स्पर्श तुझ्या चिरंजीव कवित्वाला आजपर्यंत होऊ शकला नाही. तिच्या रसवैभवात, आवाहनशक्तीत रतिमात्रही उणेपण आलं नाही, राजवटी बदलल्या, सिंहासनांची उलथापालथ झाली, अभिरुचीच्या प्रवाहानं अनेक वळणं घेतली. पण तुझ्या वाणीचं तजेलदार पाणी जसंच्या तसं राहिलं. तू म्हटल्याप्रमाणं जसं गीतातत्त्व नूतन आहे तसंच मी म्हणतो, ज्ञानेश्वरांचं आणि ज्ञानेश्वरीचं व्यक्तिमत्व नित्यसुंदर व नित्यनूतन आहे. प्रतिक्षणाला या व्यक्तिमत्वांचा वेगवेगळा पैलू रमणीय दिसतो. एक अजर, अमर कलाकृती निर्माण करून आमच्या मराठी भाषेत तू सुंदरतेच्या खाणी उघडल्यास, जोपर्यंत तुझी 'ज्ञानेश्वरी' आमच्या हातात आणि मुखात आहे, जोपर्यंत तिचं अस्तित्वं आमच्या हृदयात आहे तोपर्यंत आम्ही आणि आमची भाषा सुरक्षित आहोत असंच म्हटलं पाहिजे. पण मराठी माणसाला आपल्या मच्छ्रटपणाची आठवण करून देण्यासाठी आता सातशे वर्षानंतर पुन्हा एकदा तुझ्या वाणीचा मधुर प्रेरक झंकार प्रकट करण्यासाठी तू यावंस कारण ज्ञानोबाची मराठी या महाराष्ट्रात विस्मृत होते काय अशी भीती वाटू लागली आहे. मराठी भाषा आणि संस्कृती यांच्या पुनरुज्जीवनासाठी हे ज्ञानेश्वरा, मी तुला आवाहन करतो.

हे विशालहृदयी ज्ञानदेवा, श्रेष्ठ कवितेचा उगम श्रेष्ठ अंतःकरणातूनच होतो हे तू सिद्ध केलंस. पवित्र गंगेचा उगम हिमालयातूनच होणार यात आश्चर्य नाही. अज्ञानी क्षुद्र लोकांनी तुझ्या मातापित्यांना झिडकारलं. तुला आणि तुझ्या भावंडांना नानाप्रकारांनी छळून अवमानित केलं, पण तुझ्या शांत मुद्रेवरची प्रसन्न स्मितरेषा कधी पुसली गेली नाही. किंवा तुझ्या साहित्यात त्यासंबंधी एकही अधिक्षेपाचा उद्‌गार तू काढला नाहीस. तुझी जीवनदृष्टी आनंदपूरित आहे.

जो खांडावेया घावो घाली । का लावणी जेयाने केली ।
दोघां येकचि साउली । वृक्ष जैसा ॥

ज्यानं झाड लावलं, जोपासना केली, आणि ज्यानं त्याच्यावर घाव घातले त्या दोघांनाही समत्वबुद्धीनं एकच सावली झाड देतं तसं तुझं अलौकिक जीवन आहे. माझ्या मते हाच चमत्कार आहे. आम्ही अतिसामान्य माणसं आमच्या वाट्याला

आलेल्या वेदनांचं भांडवल करीत बसतो. खऱ्याखोट्या दुःखांची आरास मांडतो. पण तू मात्र चंदनाच्या झाडासारखा आहेस. विळखा घालणाऱ्या विषारी सर्पांनाही सुगंध देत राहिलास. सुगंधातच विषाला मारण्याची शक्ती असते हे सिद्ध केलंस. माणूस माणुसकीच्या दृष्टीनं महान असला की त्याला महान कविता स्फुरू शकते याचा जणू तू वस्तुपाठ घालून दिलास. प्रथम माणूस व्हा. समाजप्रेमाचं बीज आपल्या हृदयात पेरा आणि मग त्यातून साहित्याचे व कलेचे अंकुर उगवतील, त्यांचे वृक्ष होऊन ते समाजाला शीतल छाया देतील. हे पुन्हा झडझडून सांगण्यासाठी आजही ज्ञानेश्वरा, तू आम्हाला हवा आहेस.

तू लिहिलेल्या 'पसायदाना' विषयी काय बोलू? सकलसृष्टीशी समरस होण्याची प्रगाढ प्रेरणा देणारी शक्ती म्हणजे तुझं पसायदान. हे उत्कट भावनेचं, परमोत्कट, श्रेष्ठ विचारांचं भावगीत आहे. ज्ञानेश्वरीच्या मंदिराचा हा तेजस्वी कळस आहे. 'पसायदान' केवळ तुझ्यासारखा परिपूर्ण, वत्सल, ज्ञानराजच लिहू शकतो. मी जेव्हा जेव्हा हे गीत ऐकतो आणि वाचतो तेव्हा तेव्हा माझ्या बुद्धीला आणि मनाला गहिवर येतो. त्यावेळी मला वाटतं की मायेनं ओथंबलेला तुझा हात माझ्या पाठीवरून फिरत आहे आणि तो मला आश्वासन देत आहे. तो मला एका अतिभव्य स्वप्नाकडं घेऊन जात आहे. तो म्हणत आहे, 'भिऊ नकोस, हताश होऊन नकोस. अंधार असतो म्हणूनच आपण प्रकाश निर्माण करण्यासाठी धडपडायचं असतं. विश्वात धर्मरूपी सूर्याचा उदय व्हावा म्हणून प्रयत्न करायचा असतो. धीर धर. काटे संपून जातील. अंधार निरसून जाईल. दुष्ट बुद्धीचा निरास होईल. सद्भावनांची फुलं फुलतील. अरे, माझ्या या सृष्टीत चंद्रावर कलंक असणार नाही. सूर्य कुणावर आगीचा वर्षाव करणार नाही. हे जग बदलणार आहे. धीर धर.'

ज्ञानेश्वरा, तुझं 'पसायदान' हे मानवतेचं महागान आहे. या गीताला कोणत्याही सीमा नाहीत. कारण जेव्हा कवी असीम असतो तेव्हा त्याची कविताही निःसीम असते. तू आम्हाला साऱ्या क्षुद्र सीमा ओलांडण्याचा आणि विश्वव्यापी होण्याचा संदेश दिलास. आज तुझ्याच मुखातून पुन्हा हा दिव्य संदेश ऐकायला आमची मनं आसुसलेली आहेत. सातशे वर्षांचं मौन आता संपू दे. आता पुन्हा एकदा तुझे स्नेहमय शब्द कानी पडू दे.

साच आणि मवाळ । मितले आणि रसाळ ।
शब्द जैसे कल्लोळ । अमृताचे ॥

अशा तुझ्या शीतल, शामक शब्दांचा वर्षाव होऊ दे. आम्ही त्याचे तहानलेले आहोत. कारण आजच्या जगात प्रामाणिक व मृदुल मधुर शब्दही दुर्मिळ झाले आहेत. पसायदानात तुझी मूर्ती स्वच्छपणे दिसते. खरं तर तुझ्या कोणत्याही ओवीत आणि अभंगात तुझ्या मनःप्रकृतीच्या साऱ्या रेषा आणि रंग प्रकट झालेले दिसतात. 'भूमीचे मार्दव सांगे कोंभाची लवलव' असं तूच म्हटलं आहे. पसायदानात जीवनदृष्टीचा निर्मळपणा ताजेपणा किती सहजतेनं व्यक्त झाला आहे. विशेष म्हणजे स्वतःसाठी त्या विश्वात्मक देवाकडं तू काहीही मागितलं नाही याचा अर्थ तू पूर्णकाम आहेस. स्वार्थाचा लेशही राहिलेला नाही. साऱ्या मानवतेची चिंता करणारा महात्मा केवळ जगासाठी जगतो. त्याचं मन निखळ असतं. निष्कलंक मनाच्या विश्वप्रेमी संतकवीनं हे पसायदान मागून सुखाची आणि तृप्तीची एक मंगल प्रभात आपल्या जीवनात अनुभवली यात शंका नाही. ज्ञानदेवा, तुझ्यामुळं मानवी संस्कृतीची उंची वाढली. तुझ्यामुळं आम्हीही लौकिकाच्या चित्रात काही अलौकिकतेचे रंग मिसळू शकतो. आम्हाला अपार्थिवाच्या अलौकिकाच्या पातळीवर नेण्यासाठी आणि आमचं क्षुद्र जीवन क्षणभर तरी जिवंत करण्यासाठी तुझ्याबरोबर 'संवाद' करण्याची संधी दे. 'ज्ञानेश्वरांशी संवाद' म्हणजे स्वतःला ज्ञानेश्वर घडविण्याची, जागृत करण्याची एक प्रक्रिया आहे. हे ज्ञानदेवा-

हेचि दान देगा देवा। तुझा विसर न व्हावा।

यापेक्षा अधिक काय बोलू ? अधिक काय मागू ?

ooo

# आत्मकथन ज्ञानेश्वरांचे

माझ्या आयुष्याच्या वाटेत माझ्या दुर्दैवानं कितीतरी काटे नियतीनं पेरले. अनवाणी पायांनी चालताना पाय रक्ताळले. मनाचं वस्त्र कितीतरी वेळा फाटून गेलं. पुन्हा पुन्हा आशावादी दृष्टीनं हे वस्त्र मी प्रयत्नपूर्वक शिवलं, दु:खांची आणि संकटांची मी कधीच फारशी तमा बाळगली नाही. राहून राहून मला एक शल्य मात्र खुपत राहिलं. त्यावर कोणतीही उपाययोजना करता आली नाही. माझ्या निष्पाप, प्रेमळ, सहनशील माता-पित्यांना धर्ममार्तंडांच्या आज्ञेनुसार नदीत देहत्याग करावा लागला. ते पूर्णपणे निष्कलंक होते. निरपराध होते. माझे पिताजी तर मूर्तिमंत तापहीन मार्तंड होते. त्यांच्या दृष्टीत, आचार-विचारात अमृत ओथंबलेलं होतं. मातेच्या वात्सल्याला कोणती उपमा देऊ? प्रेमाची, वत्सलतेची, शुभंकर विचारांची ती मूर्तिमंत गंगा होती. आम्हा भावंडांच्या कल्याणासाठी त्यांनी देहविसर्जन केलं. ब्रह्मवृंदाची आज्ञा त्यांनी शिरोधार्य मानली. आम्हा चार भावंडांच्या मस्तकावर आभाळ कोसळलं.घरटं उद्ध्वस्त झाल्यानंतर पक्षिणीच्या पिलांनी नाहीशा झालेल्या आपल्या पालनकर्त्या मायतातांसाठी जिवाचा आकांत करावा तसं आक्रंदन आमचं मन रात्रंदिवस करीत राहिलं. कोणत्या पातकाबद्दल ही घोर शिक्षा आम्हाला मिळाली? कोणत्या शास्त्रात ग्रंथात हे घोर प्रायश्चित्त सांगण्यात आलं आहे हेच मला कधी कळलं नाही. आमचे पूज्य वडीलबंधू म्हणाले,

'ज्ञानराजा, हे सारं आपण शांतचित्तानं स्वीकारलं पाहिजे, सहन केलं पाहिजे. समाज हा गतानुगतिक विचारांचा प्रवासी असतो. शास्त्रीपंडितांना पोथ्यापुराणांची पानं माणसांच्या जीवनापेक्षा आणि समाजहितापेक्षा अधिक वंदनीय वाटतात. तो त्यांचा दोष नाही. परंपरेची मळलेली वाट सोडून कोणी नव्या वाटेनं चालू लागला तर ते कृत्य त्यांना धर्मविघातक वाटतं. परंपरा म्हणजेच धर्म असं जिथं मानलं जातं तिथं एखादा नवा किरण देखील स्वीकारला जात नाही. जीर्ण परंपरेच्या अंधारात शतकानुशतकं राहिलेल्या धर्ममार्तंडांना नव्या प्रकाशाची तिरीप सहन होत नाही. त्यांची मर्यादा आपण ओळखली पाहिजे. पाचामुखी परमेश्वर बोलला असं समजून त्यांनी सांगितलेलं प्रायश्चित्त आपण निमूटपणानं घेतलं पाहिजे. समाजपुरुषांचे

अपराध पोटात घेऊन मायेनं त्याच्या कल्याणाची चिंता तुझ्यासारख्या ज्ञानवंतानं वाहिली पाहिजे. नाहीतर समाजसंस्था विस्कळीत होईल, आपले हात जे जे विस्कळीत आहे ते ते जोडण्यासाठी आहेत. तोडण्यासाठी नव्हेत.'

निवृत्तिनाथांनी माझ्या पाठीवरून ममतेनं हात फिरवला. माझ्या डोळ्यांतले अश्रू त्यांनी आपल्या धोतरानं टिपून घेतले. माझ्या मनातली बंडखोर विचारांची ठिणगी शांत झाली. दुभंगत चाललेला समाज पुन्हा अभंग, अखंड करायचा असेल तर आपण आपलं मन विशाल आणि समावेशक केलं पाहिजे. अन्यायाचं कालकूट पचवण्याची क्षमता आपल्यात आली पाहिजे हा विचार माझ्या अंतःकरणात ज्येष्ठ बंधूंनी हलुवारपणे पेरला. पण मातापित्यांच्या प्रेमाला मात्र आम्ही कायमचे अंतरलो हे दुःख मनाच्या एका कोपऱ्यात सदैव जागं राहिलं. ती वेदना सहन करीत असतानाच मी प्रतिज्ञा केली,

अवघाचि संसार। सुखाचा करीन।
आनंदे भरीन। तिन्ही लोक॥

जगात दुःख इतकं आहे की ते पाहताना स्वतःच्या दुःखाची मला कधी आठवण झाली नाही. केव्हातरी ती दुःखद स्मृती उचंबळून आली की मी माझ्या तडफडणाऱ्या मनाचं समाधान करीत होतो. कुरुक्षेत्रावर भगवंतांनी धनुर्धर अर्जुनाला जो महनीय उपदेश केला, जी दिव्यवाणी प्रभूच्या मुखातून उमटली तिचे काही सूर माझ्याही चित्तात उमटत असत. स्थितप्रज्ञाची जी लक्षणं परमात्म्यानं सांगितली तसा स्थितप्रज्ञ होण्यासाठी मी प्रयत्न करू लागलो. पण परंपरानिष्ठ समाज आम्हा भावंडांची हेटाळणी करीत होता. आम्हाला पाहिल्या बरोबर शिव्याशापांचा उच्चार होऊन घरांची दारं बंद होत होती. अन्यायाची परिसीमा झाल्यावर मनाचा समतोल केव्हातरी ढळू शकतो. परमेश्वर सुद्धा कधीकधी अस्वस्थ होतो. माझ्यासारख्या माणसाची काय कथा? व्यासांनीही आक्रंदन करून म्हटलं होतं,

'अरे! मी बाहू उभारून कंठरवानं साऱ्या जगाला सांगत आहे. अर्थ आणि काम यांच्या मुळाशी धर्म असला पाहिजे. धर्मानं वागा, धर्मानं चाला, माझा घसा सुकून गेला. माझं कुणीही ऐकत नाही. मी अगतिक आहे.'

पूज्य आचार्य व्यासांसारख्या ज्ञानर्षीच्या मनाचाही क्षोभ व्हावा तिथं केव्हातरी मी अशांत झालो तर त्यात आश्चर्य कसलं?

एके दिवशी मी ताटीचं दार बंद केलं. ज्या समाजासाठी फुलं वेचीत होतो तो

समाज माझ्या पदरात मात्र काटे टाकीत होता. ज्याला मी उजेडाची वाट दाखवीत होतो तो मला पुन्हा पुन्हा अपमानाच्या, अवहेलनेच्या अंधारात ढकलीत होता, ज्याला मी हृदयीचं वात्सल्य देत होतो तो समाज माझा आणि माझ्या भावंडांचा तिरस्कार करीत होता. हे मला दुःसह वाटत होतं. खरं तर कुऱ्हाड घेऊन तोडण्यासाठी आलेल्या वैऱ्यालाही झाड तीच सावली देतं. जी त्यानं आपल्या हितकर्त्यालाही दिलेली असते. त्याच्या मनात भेद नसतो. हे उदाहरण दृष्टीसमोर असूनही मी त्यादिवशी अस्वस्थपणानं काहीशा क्रोधानं ताटीचं दार बंद करून घेतलं. कशासाठी मी या अज्ञ समाजाला प्रबोधित करण्याचा प्रयत्न करावा? हे जग कधीतरी प्रबुद्ध झालं आहे का? इथं एकेक युगप्रवर्तक महात्मे येऊन गेले. प्रभू रामचंद्र आले. जगानं त्यांच्यावरही शिंतोडे उडवायला कमी केलं नाही. योगेश्वर श्रीकृष्णाचीही निंदानालस्ती करणारे अज्ञानी लोक होतेच. महावीर आणि बुद्ध हेही समाजाच्या निर्दय छळणुकीतून सुटू शकले नाहीत. अशा अज्ञानी जगात आपण कशासाठी धडपड करायची? खरंतर मी आणि माझी भावंडं आत्मचिंतनात आपलं आयुष्य व्यतीत करू शकत होतो. सामाजिक जाणीव आम्हाला अधिक उत्कट असल्यामुळं समाजाचं उद्बोधन करण्यात आम्ही शक्तीचा अकारण अपव्यय करीत आहोत असं मला तीव्रतेनं वाटू लागलं. म्हणूनच ताटीचं दार बंद करून मी बसून राहिलो. इतक्यात माझ्या लाडक्या बहिणीचे आश्वासक, मंजुळ सूर माझ्या कानावर पडले. तिच्या स्वरात एक प्रकारचं मधुर सामर्थ्य होतं. होरपळत्या मनावर त्या सुरांचा शीतल वर्षाव होत होता. माझं मन हळूहळू निवत होतं. ती मला आवाहन करीत होती.

विश्व रागे झाले वन्ही। संतीं सुखे व्हावे पाणी।
तुम्ही तरून विश्व तारा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा॥

समाजाविषयीचं प्रेम आणि वात्सल्य तिच्या शब्दाशब्दांतून ओसंडून वहात होतं. त्या वात्सल्यधारांनी मी चिंब भिजून गेलो. आत्मजागृतीचा एक नवा क्षण माझ्या आयुष्यात जणू मुक्ताईच्या अभंगानं उगवला. मी विचार करू लागलो, 'दारं बंद करून काय होणार?' बंद दारांच्या आत आपणच स्वतःला बंदिवान करून घेतो. माणसानं आपल्या हृदयाची दारं उघडली पाहिजेत. आजपर्यंत प्रत्येकाच्या अंतःकरणाच्या ताटीचं दार बंद राहिलं म्हणूनच हा समाज अज्ञानात पिचत पडला नाही काय? माणूस जेव्हा समाजापासून विभक्त होतो आणि केवळ स्वयंकेंद्रित बनतो

तेव्हा त्याच्या जीवनाला स्वार्थ आणि अहंकार यांचे वेटोळे पडतात. मला पूर्णतः स्वतंत्र होण्यासाठी प्रथम ही स्वार्थाची उपाधी बाजूला सारली पाहिजे. अज्ञानी समाजाला अज्ञानाची जाणीव करून देणं आणि त्याला 'मार्गाधारे वर्तावे' असं सांगणं हे महत्त्वाचं आहे. माझा संभ्रम संपला. दृष्टीसमोरचं धुकं वितळून गेलं. आसमंत स्पष्ट दिसू लागलं. शंका कुशंका संपून गेल्या. नवी पहाट जन्माला आली आणि मी माझी प्रतिज्ञा अधिक दृढ केली. मी मनाशी म्हणालो,

वाग्विलास विस्तारू । गीतार्थेसी विश्व भरू ।
आनंदाचे आवारू । मांडू जगा ॥

मी दुःखवादी कधीच नव्हतो. कचित केव्हातरी निराशावादी विचारांचे ढग मनात आले असतील ! पण माझे गुरु निवृत्तिनाथ यांच्या कृपेनं ते ढग वितळून गेले. मला हे जग कुरूप किंवा घृणास्पद वाटत नाही. याचा अर्थ हे जीवन सर्वस्वी सुंदर आणि निष्कलंक आहे असं नव्हे. पण तसं ते माणूस करू शकतो. प्रयत्न केला तर 'खळांची व्यंकटी' संपून जाईल. एक गोष्ट मात्र खरी की, दुःखवेदनांची वाट तुडवताना, काटेरी अनुभव पदरात बांधून घेताना माझ्या मनातला एक सौंदर्यवादी, पुरुषार्थवादी कलावंत अधिकाधिक जागृत होऊ लागला. चंद्रकला जशी प्रतिदिवशी एकेक कलेनं वृद्धिंगत व्हावी, त्याप्रमाणं माझ्या कलाशक्तीला हळूहळू भरती येत होती. ही माझ्यावर गुरूची असामान्य कृपा झाली. त्याच्या प्रसादचंद्रामुळं माझ्या प्रतिभेला पौर्णिमा भेटली. माझा गुरू हा मला साक्षात परमेश्वरचं होता.

ताटी उघडल्यावर मी पाहिलं, मुक्ताईच्या डोळ्यात अश्रू दाटले होते. ती मला म्हणाली,

'ज्ञानराजा, तुम्ही दार बंद केल्यावर आम्हाला सारीच दारं बंद होतील. तुझ्यासारखा संत महात्मा हेच मुक्तीचं दार आहे. सुवर्णाला अग्नीची भीती कसली? अग्नीच्या संसर्गामुळं त्याचं सुवर्णत्व अधिकाधिक उजळून निघतं. ज्ञानराजा, तू आहेस म्हणून सुविचारांची फुलं फुलतात. तुझ्यासारखा संत जगाला हवा आहे. संत जगाला विटला तर या जगातलं उरलं सुरलं सौंदर्य नष्ट होईल.'

मी संत आहे की नाही हे मला माहीत नाही. पण संतकृपेच्या दीपकाचा उज्ज्वल प्रकाश मी माझ्या हृदयात भरून घेतला. निवृत्तिनाथांसारखी संत माऊली आत्मज्ञानाचे घास मला प्रेमानं भरवीत होती. सोपान आणि मुक्ता यांच्या सारखे बहीणभाऊ माझ्यावर मायेचा वर्षाव करीत होते. माझ्या आयुष्याचा मोगरा फुलत चालला. याची जाणीव

मला होत होती. आता समाजासंबंधी एक अदम्य सहानुभूतीची लाट उचंबळून आली. हे सारं विश्व म्हणजे माझाच घटक आहे. विश्वात मी आणि माझ्यात विश्व सामावलेलं आहे. मला कुणीच परका वाटत नव्हता. 'हे विश्वचि माझे घर' अशी माझी मती स्थिर होऊ लागली. उपेक्षेचे, अपमानाचे, उपहासाचे आणि छळाचे वाट्याला आलेले क्षण पार विरघळून गेले. मला तो देव विश्वात्मक आहे अशी अनुभूती आली. खरंच, तो बहुरूपी, बहुरंगी परमेश्वर सर्वत्र भरून उरला आहे. तो जलबिंदूत आहे, तो विशाल सिंधूत आहे. अनंत आकाशाच्या पोकळीत त्याचेच सूर दुमदुमत आहेत. ताऱ्यात आणि वाऱ्यात, बालकांत आणि वृद्धांत, झाडांच्या पानात, गवताच्या पात्यात, मातीच्या कणकणांत तो परमात्मा चिरंतन वास्तव्य करीत आहे. तो जितका मंदिरातल्या पाषाणमूर्तीत आहे तितकाच नुकत्याच जन्माला आलेल्या बालकाच्या देहकणातही मिसळून गेला आहे. हे भान जगाला आलं तर जगाचं नंदनवन होणार नाही का? निवृत्तिनाथांनी माझ्या मनाच्या भूमीत जे जे पेरलं ते ते उगवून आलं. ही त्यांची पुण्याई. एरवी मी तर एक बालक पण गुरूचा अनुग्रह असा की या बालकाच्या हातून त्यांनी 'गीताभाष्य' आपल्या मायमराठीत लिहिलं जावं अशी अपेक्षा केली. कल्पवृक्षानंच इच्छा करावी, कामधेनूनंच दुधाची भिक्षा मागावी, बृहस्पतीनं ज्ञानाची याचना करावी, सूर्यानं प्रकाशाची प्रार्थना करावी तसा हा अपूर्व प्रकार होता. गुरू हीच सरस्वती. तीच ज्ञानशक्ती. तिनं माझ्या मस्तकावर आपला वरदहस्त ठेवला आणि चमत्कार घडून आला. गुरूच्या उपकारामुळं, 'माझे नित्यनवे श्वासोश्वासही प्रबंध होआवे' ही किमया घडून आली.

तो महन्मंगल दिवस मला आठवतो. कोवळी उन्हं पसरत होती. आकाश स्वच्छ होतं. मला ते माझ्याच मनाचं प्रतिबिंब वाटत होतं. गीतेवरील मराठी भाष्य त्या दिवसापासून मला लिहायचं होतं. महनीय आचार्यांनी ज्या दिव्य ग्रंथावर विद्वत्ताप्रचुर अनेक टीका लिहिल्या होत्या त्या ग्रंथावर माझ्यासारख्या बालकानं भाष्य लिहिण्यासाठी हाती लेखणी घ्यावी हे एक अविचारी साहस होतं. पण माझा सामान्य मराठी माणूस संस्कृत टीका समजू शकत नव्हता. मरगळलेल्या मराठी मातीत गीतेचं पुरुषार्थीतत्त्वज्ञान पेरण्यासाठी मी उत्सुक झालो होतो. अर्जुनाला जसा भगवान श्रीकृष्ण सारथी मिळाला त्याप्रमाणं मलाही निवृत्तिनाथांसारखा साक्षात्कारी महापुरुष मार्गदर्शक गुरू म्हणून लाभला होता. नेवाशाच्या मंदिरात व्यासपीठावर मी आरूढ झालो. समोरच्या श्रोतृवर्गाकडं पाहिलं आणि एखादी निद्रिस्त सतार जागृत व्हावी व तिच्यातून

हृदयस्पर्शी स्वरझंकार उमटत राहावेत त्याप्रमाणं माझ्या वाणीला जणू ईश्वरी चैतन्याचा स्पर्श झाला. एकेक ओवी प्रकट होऊ लागली. परब्रह्माचाच मला साक्षात्कार झाला.

पौर्णिमेच्या रात्री भरतीच्या लाटांनी उचंबळून येणारा सागर मला दिसत होता. मधुपान करणारे भ्रमर, हिरव्यागार गवताचे गालिचे, मातीतून वर येणारे अंकुर, लक्षावधी राजहंसांची धवलशुभ्र यात्रा, पावसाच्या कोसळणाऱ्या धारा, मातेच्या अंकावर खेळणारं गोंडस बालक आकाशात उचंउंच गेलेली पर्वतशिखरं, प्रेमळ दंपतीच्या मुखावर पसरलेले प्रणयोत्कट भाव, किती सांगू? या विश्वातल्या अनेक सौंदर्याची, रंगगंधांची, नादांची आणि रूपांची असंख्य चित्रं माझ्या दृष्टीसमोर तरळंत राहिली. एकेक ओवी फुलत होती. तिचा सुगंध मी अनुभवीत होतो. गीताभाष्य करताना सौंदर्याची एक नवी वाट मलाही न कळत मी चालत राहिलो. जीवनातलं सारं रसवैभव मला जाणवत होतं. खरंच हे जीवन किती अर्थपूर्ण आहे याचं भान नेवाशाच्या मंदिरात मी जे गीतेचं प्रकट चिंतन करीत होतो त्यावेळी मला येऊ लागलं. कवीच्या हातातली लेखणी आणि वक्त्याच्या मुखातली वाणी कल्पवल्लीसारखी सृजनशील असते. ती एक नवं विश्व निर्माण करू शकते याचा प्रत्यय मला आला. खरं तर मी काहीच करीत नव्हतो. माझा हृदयस्थ परमात्मा माझ्या अंतर्मनात एक दिव्य सतार छेडीत होता. एक अभिनव संगीत उमलत होतं. ईश्वरीय सामर्थ्याची ही प्रतीती मला येत होती. गुरू निवृत्तिनाथांच्या मुद्रेवर प्रसन्न स्मित चमकत होतं.

श्रोते आनंदित झालेले दिसत होते. मी भगवान श्रीकृष्णाची बासरी झालो होतो. ओव्यामागून ओव्या गुंफीत होतो. मायमराठीच्या सुवासिक फुलांचा हार मला महाराष्ट्र शारदेच्या चरणी वाहायचा होता. भावार्थदीपिकेच्या लेखनाचे, निरूपणाचे ते दिवस आणि त्या रात्री मंतरलेल्या होत्या. शब्द उच्चारण्याचा अवकाश की सच्चिदानंद बाबा तो लिंपिबद्ध करीत होते. मराठी भाषेतली ही पहिली गीताटीका काव्यरसानं परिपूर्ण व्हावी ही माझी इच्छा होती. म्हणून गुरूमाऊलीला मी विनवीत होतो,

म्हणोनि साधकां तू माऊली । पिके सारस्वत तुझां पाऊली ॥
या कारणे मी साऊली । न संडी तुझी ॥
अहो सद्गुरूचिये कृपादृष्टी । तुझे कारुण्य जयाते अधिष्ठी ॥
तो सकळ विद्यांचिये सृष्टी । धात्रा होय ॥
म्हणोनि अंबे श्रीमंते । निजजन कल्पलते ॥

आज्ञापी माते । ग्रंथनिरूपणी ॥
नवरसी भरवी सागरू । करवी उचित रत्नांचे आगरू ॥
भावार्थाचे गिरिवरू । निफजवी माये ॥
साहित्य सोनियाचिया खाणी । उघडवी देशियेचिया आक्षोणी ॥
विवेकवेलीची लावणी । हों देई सैंघ ॥
संवादफळ निधाने । प्रमेयाची उद्याने ॥
लावी म्हणे गहने । निरंतर ॥

माझी ही प्रार्थना सफल झाली. मराठीच्या अंगणात मी इवलेसे रोप लावले. आज ना उद्या त्याचा वेल गगनावर जाऊ शकेल असे माझी मनोदेवता मला सांगते. ज्या वाटेनं व्यासांची प्रतिभा आपले सुगंधी निःश्वास सोडीत गेली त्याच वाटेनं माझ्यासारख्या पामरानं चालण्याचं ठरवावं हा वेडेपणा असला तरी 'भाष्यकारांते वाट पुसत' मी चालत राहिलो. भावार्थाची एक सुंदर वाट मला सापडली.

हिंसा आणि रक्तपात, सूड आणि द्वेष यांनी जगाचं वातावरण इतकं धुरकट झालं आहे की श्रेष्ठ मूल्यांचा गंधही जाणवू नये. दशदिशांना अन्याय, अत्याचाराचे ढोल वाजत असताना माझ्या 'भावार्थदीपिकेची' हळूवार सुरावट कोण ऐकून घेणार असा प्रश्न कित्येक पंडितवर्यांनी विचारला. मी शांतपणे म्हणालो,

'एक दिवस असा निश्चित उगवणार आहे की त्यावेळी प्रेम, करुणा, शांती, भक्ती आणि कर्म यांची महती जगाला मान्य करावी लागेल. अहिंसा-विचाराचा प्राणवायू घेतल्याशिवाय हे सारं जग सुखानं जगू शकणार नाही. आपल्या जगण्यासाठी दुसऱ्याचं जगणं, साऱ्यासृष्टीचं जीवनआवश्यक आहे. 'भूतां परस्परे पडो मैत्र जिवांचे हे माझं स्वप्न आहे.केव्हातरी ते परिपूर्ण होणारच आहे. कधीतरी काट्यांची शल्ये बोथट होतील. दुर्जनांची कुटिलता संपून जाईल. संतसज्जनांच्या आकांक्षा फलद्रूप होतील. भावनांचा दुष्काळ निरसून जाईल. माणूस आणि माणुसकी यांचं सख्य प्रस्थापित होईल. मी सुखी आहे. समाधानी आहे. आकाश जसं निर्लेप असतं, सागर जसा अखंड असतो त्याप्रमाणं माझं मन निखळ आहे. कोणताही विकल्प आता माझ्या चित्तात उरलेला नाही. माझा जगाच्या मूलभूत चांगुलपणावर संपूर्ण विश्वास आहे. कोणी काही म्हटलं तरी हे जग सुंदरच आहे. ते निष्कलंक व्हावं म्हणून ज्या महापुरुषांनी आपली सारी सामर्थ्ये वेचली त्यांच्या पाऊलखुणांचा मागोवा घेत चालण्याचा मी प्रयत्न करीत आहे. गीताभाष्याचा हा वृक्ष चढत चढत जावो

हीच मांझी तुम्हा समस्त श्रोत्यांना प्रार्थना आहे.

हे सारस्वताचे गोड । तुम्हीचि लाविले जी झाड ।
तरी अवधानामृते वाड । सिंपौनि कीजे ॥
मग हे रसभाव फुली फुलेल । नानार्थ फ़ळभारे फळा येईल ।

यापेक्षा अधिक काय सांगू? ज्या परमात्म्याच्या कृपेनं ही 'भावार्थदीपिका' मी प्रज्वलित केली. त्या परमचैतन्याला परमकृतज्ञतेनं मी वंदन करतो. जे आर्त असतील. दुःखपीडित असतील, अस्वस्थ असतील त्यांनी ही 'भावार्थदीपिका' आपल्या श्रवणात आणि मनात भरून घ्यावी. कारण या दीपिकेचे तेजःकण परमात्मस्वरूपीच्या सूर्याचे आहेत. ज्ञानेश्वर नावाचा पामर केवळ एक निमित्तमात्र आहे. हा ग्रंथ जीवनभाष्य आहे. जीवनसाधकांचं जीवनच आहे.

म्हणौनि व्यासाचा हा थोरू । विश्वासि जाला उपकारू ।
श्रीकृष्णउक्ती आकारू । ग्रंथाचा केला ॥
आणि तोचि हा मी आता । व्यासांचापदे पाहता पाहता ।
आणिला श्रवणपथा। मराठिया ॥

खरं तर, आत्मकथन करू नये, अशा कथनात अहंकाराचे अंश उतरतात. पण आपल्यासारख्या सुहृदांच्या आग्रहामुळं काही संस्मरणं इथं नोंदवली आहेत.

०००

# बांधल्या तळ्याचा फुटलासे पाट

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांची संजीवनसमाधी आजही आपल्या कुतूहलाचा विषय आहे. सातशे वर्षांपूर्वी शके १२१८ मध्ये कार्तिक वद्य त्रयोदशीला आळंदीला ज्ञानेश्वरांच्या समाधीची करुण, अद्‌भुत घटना घडली. आळंदी हे भाविकांच्या श्रद्धेचे तीर्थस्थान बनावे यात आश्चर्य नाही. या समाधिस्थळासमोर नतमस्तक झालेल्या असंख्य भाविकांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहातात. कित्येकजण 'माऊली' म्हणून लोटांगण घेतात. काही भक्त स्तब्ध उभे असले तरी त्यांच्या मुद्रेवर उत्कट श्रद्धेचे रंग दिसतात. ज्ञानेश्वरांसारखा एक महनीय प्रतिभावंत, परम कारुणिक संत इंद्रायणीच्या तीरावर समाधिस्थ होतो हा प्रसंग महाराष्ट्राच्या इतिहासात अपूर्व वाटतो.

दोन तीन महिन्यांपूर्वी मी प्रथमच आळंदीला गेलो. समाधीसमोर विनम्र भावाने उभा राहिलो. ज्ञानेश्वरांचे सारे चरित्र माझ्या दृष्टीसमोर उभे राहिले. ज्याने आपल्या विशाल प्रतिभेच्या पंखांनी काव्याच्या असीम आकाशात गरुडभरारी घेऊन भगवद्‌गीतेचा वेध घेतला आणि नऊ हजार अमृतमय ओव्यांची 'भावार्थदीपिका' लिहिली तो महाकवी याच ठिकाणी समाधिसुखाचा सोहळा गेली सातशे वर्षे भोगत आहे. त्याच्या पवित्र सान्निध्यात आपण उभे आहोत या विचाराने माझ्या अंगावर तरारून रोमांच उभे राहिले.

मी मनाशीच म्हणालो, 'हे ज्ञानदेवा, हे ज्ञानियांच्या राजा, महाराष्ट्राच्या जीवनात चैतन्याचा दीप लावून तू जो प्रसन्न प्रकाश निर्माण केलास तो शतके उलटल्यानंतरही आम्हाला 'अमृतानुभव' देत आहे. हे ज्ञानराजा, तुझ्या आयुष्यात तुला सुखाची सावली कितपत मिळाली याबद्दल मी साशंक आहे. कर्मठ परंपरेच्या दासानुदासांनी तुझा आणि तुझ्या भावंडांचा छळ केला. निंदा, अपमान आणि उपेक्षा यांच्या तीव्र उन्हात तू स्वतः होरपळलास, पण येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी 'ज्ञानेश्वरी' लिहून सुखशांतीची सावली निर्माण केलीस. 'अवघाचि संसार' सुखाचा करून तिन्ही

लोक आनंदाने भरून टाकण्यासाठी आपले जीवन समर्पित केलेस. दुःखात पिचत पडलेल्या सामान्य माणसाला वात्सल्याने पोटाशी धरलेस. सामान्य लोकांच्या मायबोलीला शब्दार्थांची, कल्पनेची जरतारी वस्त्रे आणि अमूल्य अलंकार देऊन तिला प्रतिष्ठित केलेस. पण हे कविसम्राटा, ऐन तारुण्यात आम्हा गरिबांच्या जगाकडे तू पाठ फिरवलीस आणि आम्हाला कायमचे दु:खी केलेस. तुझ्यासारखा संत म्हणजे इच्छित फळ देणारा कल्पवृक्ष. कल्पवृक्षाने दीर्घकाळ जगून समाजजीवनाला आधार दिला पाहिजे. तू 'तापहीन मार्तंड' आहेस. 'अलांछित चंद्रमा' आहेस. दुरिताचे तिमिर निरसून टाकण्यासाठी तुझ्या दीर्घ जीवनाची जरूर असताना पंचविशीच्या आतच तू जीविताचा निरोप का घ्यावास हे कळत नाही. महापुरुषांचे मनोगत जाणून घेण्याची योग्यता सामान्य माणसात असत नाही. म्हणूनच तुझी क्षुद्र लोकांनी अवहेलना केली. पण ज्ञानदेवा, तुझ्यासारखे श्रेष्ठ मार्गदर्शक जगाकडे पाठ फिरवू लागले तर या मानवतेचे काय होणार? ही समाधी घेण्याचा निर्णय आणखी पंचवीस वर्षे लांबवला असतास तर आजचा माणूस कदाचित अधिक सुजाण, सुसंस्कृत झाला असता.

ज्ञानेश्वरांच्या समाधीसमोर उभा असताना असे अनेक भावविचार मनात उचंबळून गेले. ज्ञानेश्वर हे युगप्रवर्तक संत, तत्त्वज्ञ आणि कवी होते. दु:खवेदनांच्या वेलीवर ज्ञानेश्वर हे एक सुगंधी फूल उमलून आले होते. आपल्या हृदयीचा दिव्य सुगंध समाजाला देऊन त्याने स्वेच्छेने जीवन समाप्त केले. या अलौकिक संताचे वर्णन करायचे झाले तर त्याच्याच शब्दांची उसनवारी करणे भाग आहे. 'ज्ञानेश्वरीच्या' नवव्या अध्यायात ज्ञानी भक्ताचे चित्रण पुढील ओव्यांतून केले आहे.

जे ज्ञानगंगे न्हाले । जे पूर्णता जेऊनि धाले ।
जे शांतीसि आले । पालव नवे ॥
जे परिणामा निघाले कोंभ । जे धैर्यमंडपाचे स्तंभ ।
जे आनंदसमुद्री कुंभ । चुभळूनि भरिले । (अ-९- १८९-९०)

आनंदाच्या सागरात भरलेला कुंभ, ज्ञानगंगेत सुस्नात झालेला तृप्त भक्त, धैर्यमंडपाचा स्तंभ आणि शांतीच्या वेलीला फुटलेले नवे पल्लव ही अन्वर्थक विशेषणे जशीच्या तशी ज्ञानेश्वरांच्या व्यक्तित्वाला लागू पडतात यात संशय नाही. अशा ज्ञानवंताच्या समाधीसमोर येणारा प्रत्येक भाविक आणि प्रत्येक साधारण माणूस सातशे वर्षांपूर्वीच्या घटनेने सद्‌गदित होतो. पुण्यवंतांच्या समाधीला पावित्र्याचे अधिष्ठान मिळावे हे स्वाभाविकच आहे. गेली सातशे वर्षे आळंदी हे पावनक्षेत्र

बनले आहे.

आज या समाधीसमोर उभा राहिल्यावर माझ्या 'बुद्धिवादी' मनालाही इतका गहिवर येतो तर ज्यांनी सात शतकांपूर्वी ज्ञानेश्वरांचा हा समाधी सोहळा प्रत्यक्ष पाहिला त्यांची अवस्था त्यावेळी काय झाली असेल? एक चालते बोलते ज्ञानभक्तीचे माहेरघर आता आपल्याला कायमचे अंतरणार या जाणिवेने त्यांच्या मनात झालेली कालवाकालव कुणाला सांगता येईल? संत नामदेवांनी या हृदयस्पर्शी प्रसंगाचे चित्रण ज्ञानेश्वर चरित्रातून केले आहे ते खरोखरच विलक्षण प्रत्ययकारी वाटते. आपल्या डोळ्यांसमोर तो प्रसंग जणू काही नामदेव साक्षात उभा करतात. सात शतकांनंतरही हा प्रसंग वाचकांच्या हृदयाला भिडतो आणि त्यातले- कारुण्य मनाला व्यापून राहाते. एक समाजपुरुष आपल्या अंतरात्म्यात विलीन होण्यासाठी बाह्य जगाचे आणि जीविताचे सारे पाश तटातट तोडून टाकतो आणि पूर्णपणे आत्मरत होतो या घटनेचा अर्थ खरोखर गहन आहे. अशी समाधी ही योग्याच्या दृष्टीने पौर्णिमा असते पण साधारण माणसाला मात्र ती अंधारी रात्र वाटते.

ज्ञानेश्वरांवर निस्सीम प्रेम करणारी त्यांची भावंडे, नामदेवादी संत याप्रसंगी कमालीचे व्याकुळ होतात. खरे तर ज्ञानेश्वर हा मुक्तात्मा आहे. ज्या शरीरात तो तात्पुरता राहिला आहे ते शरीर आणि भोवतालचे जग योगबळाने बाजूला सारून त्याला अधिक सुंदर, निरामय वातावरणात जायचे आहे. हे निवृत्तिनाथांना आणि नामदेवांना कळत नव्हते काय? निवृत्तिनाथ हे तर ज्ञानेश्वरांचे गुरू, नामदेव हे देवाशी संवाद करणारे भक्तश्रेष्ठ. दोघेही विचारवंत आणि संत. पण ज्ञानेश्वर नावाचा सूर्य मावळणार, आपल्याला अंधारात चाचपडावे लागणार ही कल्पना दोघांनाही- साऱ्याच भक्तांना असह्य झाली. नामदेव म्हणाले,

> कोण जाणे माझे जीवीचा कळवळा । प्रेमाश्रु डोळां लोटताती ॥
> अवघियांचे मन दूषित तटस्थ । लहान थोर संत वोसंडती ॥
> तारियेले जड बा माझ्या कीर्तनी । आठवती मनी गुण तुझे ॥
> नामा म्हणे येथे बोलवेना मज । जातेसे निजगुण आवडीचे ॥

खरे तर ही अवस्था केवळ नामदेवांचीच नव्हती. ज्ञानेश्वरांसारखा एक श्रेष्ठ योगी, मंहान भक्त योगाच्या साहाय्याने जिवंत समाधी घेणार आहे ही वार्ता वाऱ्यासारखी पसरली. हजारो वारकरी आळंदीला दुःखी-कष्टी होऊन एकत्र आले. इंद्रायणी नदीच्या दोन्ही तीरांवर लोकांची गर्दी उसळली होती. या प्रसंगाला उद्देशून

नामदेवांनी म्हटले आहे,

अल्याड पल्याड पताकांचे भार । मध्ये मनोहर इंद्रायणी ॥
नामा म्हणे तेथे पताकांचे भार । केव्हडे भाग्य थोर ज्ञानोबांचे ॥

ज्ञानेश्वरांच्या चरित्रातल्या या अद्‌भुत घटनेचे दर्शन नामदेवांनीच घडवावे यात एक वेगळे औचित्य आहे. ज्ञानेश्वर आणि नामदेव शरीरांनी वेगळे पण त्यांची प्रकृती एकच. यात्रेच्या निमित्ताने दोघेही पाच-सहा वर्षे परस्परांच्या सहवासात होते. दोघांचा हृदयसंवाद झालेला. 'ये हृदयीचे ते हृदयी घातले' इतकी एकरूपता या भक्तांनी अनुभवलेली. दोघेही रससिद्ध कवी. दोघेही उदात्त ध्येयाने भारलेले. दोघांनीही सर्वसामान्य माणसांचे प्रतिनिधित्व केलेले. विठ्ठलरंगात अंतर्बाह्य रंगून गेलेले. त्यामुळे नामदेवांनीच ज्ञानदेवांचे चरित्र लिहिणे ही सहज घटना वाटते. या चरित्रातल्या अभंगांतील प्रत्येक ओवी मात्र नामदेवांची नसावी असे दिसते. 'आदि', 'तीर्थावळी', 'समाधी' या तिन्ही प्रकरणांत व्यक्त झालेल्या ज्ञानेश्वरचरित्राचे लेखन एकट्या नामदेवांचे मानता येत नाही. कदाचित 'परिसा भागवत' या दुसऱ्या संतकवीने आपली रचना मूळ चरित्रात समाविष्ट केलेली दिसते. नाव नामदेवांचे आणि काही रचना दुसऱ्याने प्रक्षिप्त केलेली अशी या चरित्रकाव्याची स्थिती आहे. पण नामदेवांच्या अस्सल अभंगांची ओळख त्यातील उत्कटतेमुळे व सहजगुणांमुळे पटते. मराठीत ज्ञानेश्वरांचे पहिले चरित्र नामदेवांनीच लिहिलेले आढळते. 'समाधी' या हृदयद्रावक प्रकरणातले चित्रदर्शी वर्णन विशेष प्रत्ययकारी आहे.

नामदेवांचे मन हळुवार आहे. चरित्रलेखकापाशी समरस पावण्याची जी क्षमता असावी लागते ती त्यांच्यात पुरेपूर आहे. ज्ञानेश्वर हा त्यांच्या भक्तीचा, प्रेमाचा, आत्मीयतेचा विषय आहे. त्यांच्या सहवासाला आपण आता अंतरणार आहोत ही कल्पना नामदेवांना एखाद्या शल्यासारखी खुपत आहे. त्यामुळे आपल्या आंतरिक वेदनेला ते आकार देत आहेत. शास्त्रशुद्ध दृष्टीने पाहिल्यास हे परिपूर्ण चरित्र नव्हे. तसे सांगसंपूर्ण चरित्र लिहिण्याचा कवीचा हेतूही दिसत नाही. आपल्या अंतर्हृदयावर उमटलेली ज्ञानेश्वरांची काही स्मरणचित्रे शब्दांतून मांडून ठेवावीत इतकाच त्यांचा हेतू असावा. पण त्यांनी लिहिलेल्या अभंगांत स्वतःची भर घालण्याचा उद्योग दुसऱ्या एखाद्या कवीने केल्यामुळे प्रस्तुत चरित्रकाव्याचे सौंदर्य काहीसे क्षीण झालेले दिसते.

खरे पाहिल्यास या लेखनात भोजनाची अप्रस्तुत वर्णने, काही अद्‌भुत प्रसंग यांचे रसभंग करणारे मिश्रण करण्याचे काहीच कारण नव्हते. अशी जी स्थळे आहेत

ती निश्चितच नामदेवांची नाहीत. नामदेव हे उत्कट मनोवृत्तीचे भावकवी. त्यांच्या कल्पना, भावना यात आर्त कोवळेपणा असतो. आपल्या प्रत्येक अभंगाच्या शेवटी 'नामा म्हणे..' हे शब्द ते आणतात. पण यातल्या कित्येक अभंगात हे आढळत नाही. तथापि एका भक्तकवीच्या अंत:करणाचा स्पर्श झाल्यामुळे या चरित्राला जी रसवत्ता कित्येक स्थळी आलेली आहे ती विसरता येत नाही. नामदेव म्हणतात,

कासावीस प्राण मन तळमळी । जैसी कां मासोळी जीवनाविण ॥
दाही दिशा वोस वाटती उदास । करिताती सोस मनामाजी ॥
घालियेली घोण प्राण आला कंठी । ज्ञानदेवासाठी तळमळी ॥
नामा म्हणे देवा वाटतसे खंती । चालती विभूति योगियांची ॥

वरील अभंगात वर्णिलेली मन:स्थिती केवळ नामदेवांचीच नाही. इंद्रायणीच्या तीरावर जमलेल्या सहस्रावधी स्त्री-पुरुषांचे डोळे पाणावले होते. मन सैरभैर झाले होते. पाण्याशिवाय मासा तडफडावा तशीच ही अवस्था होती. आता दाही दिशा ओस वाटणार. आता ती ज्ञानराज माऊली पुन्हा दिसणार नाही, तो महायोगी महाज्ञानी पुन्हा कुठे भेटणार? ज्याने गीतेवर ग्रंथ लिहिला आणि आम्हाला दृष्टी दिली तो ज्ञानाचा ईश्वर येथून गेल्यानंतर कुठे बरे शोधावा? नाना प्रकारांनी मनाला आवरण्याचा प्रयास करूनदेखील हा ज्ञानेश्वर मी विसरू शकत नाही. 'नामा म्हणे आता देहासी विटला । स्वरूपी पालटला ज्ञानदेव ।' देहाचे कुंपण ओलांडून हा आत्मपक्षी गगनभरारी घ्यायला सिद्ध झाला. आम्ही तर सारेच शरीराच्या भिंतीत स्वत:ला कोंडून बसलो आहोत. या आकाशगामी पक्ष्याकडे आम्हाला कसे जाता येईल? असाच प्रश्न जणू सर्वांच्या पुढे त्यावेळी उभा राहिला असेल.

सर्वसामान्य माणसाच्या हिशेबी समाधी म्हणजे मृत्यू. जीवन आणि मरण या संकल्पनांचा व्यापक अर्थ त्यांच्या लक्षात येत नाही. पाण्यातले मातीचे भांडे फुटले आणि त्यातील पाणी पाण्यात मिसळून गेले म्हणजे वस्तुत: काहीच विपरीत घडले नाही. पण तरीही सामान्य बुद्धीला ही घटना चमत्कारिक वाटते. ज्ञानेश्वर- जे या विश्वाचा अंगभूत घटक होते ते 'विश्वरूप' होणार होते. या नैसर्गिक घटनेमुळे नामदेवांसारखा महान संतही गलबलून गेला तेथे साधारण लोकांची काय कथा?

जीवनाची वाट चालताना काही अतूट प्रेमसंबंध जडतात. केव्हातरी ते तुटू लागले म्हणजे माणसाचे मन व्याकुळ व्हावे हे स्वाभाविकच आहे. सीता नाहीशी झाल्यावर रामचंद्रासारखे अवतारी, ज्ञानीदेखील आक्रंदन करू लागले. यावरून

माणसामाणसांतले भावबंध किती नाजुक, किती हळवे असतात हे सांगायला नको. आत्म्याच्या अमरत्वाचा सिद्धांत कितीही सत्य असला तरी आपली एखादी प्रिय व्यक्ती जेव्हा देहत्याग करून निघून जाते तेव्हा अनावर दुःख अटळपणे होते. आज तर ज्ञानेश्वरांसारखा एक युगंधर पुरुष समाधिस्थ होणार ही जाणीव सर्वांच्याच चित्ताला जाळीत होती. निवृत्तिनाथ हे ज्ञानेश्वरांचे गुरू आणि ज्येष्ठ बंधू, सोपान आणि मुक्ता ही धाकटी भावंडे. त्यांच्या भावनेचे कढ व्यक्त करताना नामदेवांनी म्हटले आहे,- 'फार आठवते निवृत्तिचे चित्ती। सोपान स्फुन्दती मुक्ताबाई॥ आम्हा मातापिता नित्य ज्ञानेश्वर। नाही आता थार विश्रांतीसी॥' निवृत्तिनाथांच्या भावनिक आवेगाचे नामदेवांनी केलेले वर्णन उल्लेखनीय आहे.

वोसंडोनि निवृत्ति आलिंगो लागला। आणिकांच्या डोळां अश्रू येती॥
अमर्यादा कधी केली नाही येणे। शिष्यगुरूपण सिद्धि नेले॥
फेडिली डोळ्यांची अत्यंत पारणी। आता ऐसे कोणी सखे नाही॥

ज्ञानेश्वरांचे हे गुरू निवृत्तिनाथ 'पूर्णकाम' होते. आपल्या गुरूचे स्तवन, संकीर्तन करताना ज्ञानेश्वरांची प्रतिभा फुली फुलून आली आहे. कारण निवृत्तिनाथांनीच यांना योगसुखाचे सोहळे दाखवले. गुरूची कृपा असेल तर आपण अरूपाचे रूप दाखवू. गुरूच्या अनुग्रहाने आपल्या लेखनात नवरसांचे सागर भरवू असे म्हणून ज्ञानेश्वरांनी अनेक ओव्यांतून निवृत्तिनाथांचे सामर्थ्य वर्णिले आहे. आत्मविद्येत शिष्याला पारंगत करणारा हा महाज्ञानी गुरू जेव्हा याप्रसंगी स्फुंदू लागला आणि ज्ञानेश्वरांना प्रेमभराने मिठी मारू लागला तेव्हा इंद्रायणी नदीचे पाणीसुद्धा शोकावेगाने उचंबळून आले असेल. निवृत्तिनाथांनी आपल्या पोरक्या भावंडांचे आईप्रमाणे पालनपोषण केले. त्यांना विद्या दिली. कर्मठांच्या शिव्याशापांची बाधा होऊ नये म्हणून त्यांना आपल्या मायेच्या पदराखाली घेतले. ज्ञानदेवांची ज्ञानज्योत अधिकाधिक प्रकाशमान केली. त्या निवृत्तिनाथांचा शोक अवर्णनीय असूनही तो यथोचित शब्दांत, नामदेवांनी वर्णिला आहे. निवृत्तिनाथांचा निरोप घेताना ज्ञानेश्वर म्हणतात,

पाळिले पोसिले चालविला लळा। बा माझ्या कृपाळा निवृत्तिराजा॥
स्वामिचिया योगे झालो स्वरूपाकार। उतरलो पार मायानदी॥
निवृत्तीने हात ठतरिला वदना। त्यागिले निधाना आम्हालागी॥
नामा म्हणे देवा देखवेना मज। ब्रह्मी ज्ञानराज मिळविला॥

'निवृत्तिनाथांच्या कृपेमुळे दुस्तर मायानदी मी पार करू शकलो. मला माझ्या

'आत्मरूपाचे भान आले' ज्ञानेश्वरांच्या या निवेदनात वस्तुस्थिती आणि विनय दोन्ही आहे. आपण आता आपल्या गुरूच्या, सोपान-मुक्ताई या प्रेमळ भावंडांच्या, या जगात जोडलेल्या स्नेह्यासोबत्यांच्या सान्निध्याला अंतरणार आहोत, ही जाणीव ज्ञानेश्वरांच्याही मनात टोचत असावी. पण तरीही ते शांत राहिले. मुक्तीच्या महासागराला मिळण्यासाठी उत्सुक झालेली नदी ज्याप्रमाणे मागे वळून पाहात नाही किंवा एखाद्या ठिकाणी स्थिरावत नाही, त्याप्रमाणे या तरुण, वैराग्यसंपन्न योग्याने आता आपल्या मागील जीवनाकडे पाहाण्याचे नाकारले असावे. ब्रह्मस्वरूपांत विलीन होताना कोणता योगी मोहाच्या पाशात गुंतून राहील? नामदेवांनी त्यांच्या प्रसन्न, स्थितप्रज्ञ वृत्तीचे वर्णन करताना म्हटले आहे, ज्ञानेश्वरांपाशी आनंदी आनंद । प्रेमे ज्ञानेश्वर डुल्लतसे.'

'समाधी' प्रकरणातील एकूण १३० अभंगांपैकी सुमारे ७० अभंग नामदेवांचे आहेत. बाकीचे साठ अभंग- खरे तर त्या ओव्या आहेत. त्यांचे लेखन परिसाभागवताने केले असावे असे मानायला आधारआहे. पण नामदेवांचे अभंग प्रत्यक्ष अनुभूतीतून उतरले असल्यामुळे ते अधिक हृदयस्पर्शी आणि जिवंत वाटतात.

प्रसंगवर्णनापेक्षा भावदर्शनाकडे हे अभंग अधिकांशाने वळलेले आहेत. एकाद्या मोठ्या संतकवीच्या काव्यात आपली कविता त्याच्या नावाने घुसडून देण्याचा प्रकार जुन्या मराठी काव्यात आढळतो. अशी सरमिसळ मूळ कवीवर अन्याय करणारी असते.

'संजीवन' समाधी घेण्याचा ज्ञानेश्वरांचा निर्णय सर्व भक्तांना दु:खदायक वाटला तरी स्वत: ज्ञानेश्वरांना मात्र तो - अत्यंत आनंदकारक होता. तारुण्याच्या शिखरावर चढत असताना जीवनाची अखेर करण्यामागे त्याची भूमिका निराशावादी किंवा जीवनद्वेषाची नव्हती. ज्याने गीतेसारख्या पुरुषार्थी ग्रंथावर आपले अभिनव भाष्य लिहिले, ज्याने जीवनाचा जयजयकार करून आदर्श जीवन जगण्यासाठी समाजाला प्रेरित केले, ज्याच्या साहित्यात भक्ती आणि शांती या रसांना मध्यवर्ती स्थान मिळाले, जो उदात्त कल्पनांचा आणि शब्दांचा कुबेर होता तो ज्ञानदेव वैफल्याकडे कधी तरी झुकणे शक्य आहे काय?

दुरितांच्या अंधाराचा निरास व्हावा आणि नीतिधर्माचा प्रकाश सर्वत्र पसरावा. ज्याची जी इच्छा असेल ती तृप्त व्हावी  अशी मागणी विश्वात्मक देवाला मागणारा आणि पृथ्वीचे नंदनवनात रूपांतर करू इच्छिणारा हा ज्ञानियांचा राजा निराश विचारांनी

कधी तरी झपाटला जाईल का? सौंदर्य, प्रेम आणि भक्ती, मानवता, अंतर्बाह्य शुचिता आणि रसिकता यांचे माहेरघर असलेला हा प्रतिभावंत सर्वार्थांनी जीवनवादी होता. नाना प्रकारच्या छळवादाला तोंड देऊन हसतमुखाने वीरोचित तत्त्वज्ञान सांगणारा तो आनंदवादी तत्त्ववेत्ता होता. सारे विश्व आनंदमय आहे आणि म्हणून या आनंदाचा निर्भेळ मनाने आस्वाद घेऊ अशी त्यांची धारणा होती. ज्ञानेश्वरांची समाधी हा त्यांच्या जीवन विकासाचा एक महत्त्वपूर्ण टप्पा होता.

काही शंकेखोर टीकाकारांच्या मनात असे येते की, ज्ञानेश्वर भोवतालच्या सामाजिक परिस्थितीला विटले होते, वाढत्या वयाबरोबर जगाचे विपरीत अनुभव येत गेल्यामुळे हे जीवन दूर सारण्याची आणि मृत्यूला स्वीकारण्याची कल्पना त्यांच्या मनात मूळ धरू लागली. या प्रकारचा निष्कर्ष ज्ञानेश्वरांच्या जीवनविषयक दृष्टिकोनाशी पूर्णपणे विसंगत आहे. ज्ञानवंताचे मन या टीकाकारांना कसे समजणे शक्य आहे? केवळ बाह्य प्रपंचाशी जोडला गेलेला बहिर्मुख वृत्तीचा सामान्य माणूस पावलोपावली वैतागतो, वैफल्याच्या आहारी जातो. कारण त्याला उच्चतर जीवनाची ओळखच झालेली नसते. त्याच्या इच्छा, आकांक्षा आणि स्वप्ने क्षुद्र असतात. आपल्या पायापुरते तो पाहात असतो. अशा सामान्य माणसाच्या मनाशी ज्ञानेश्वरांसारख्या महामनस्क वृत्तीची तुलना करणे हास्यास्पद आहे. समाधी म्हणजे आत्मघात नव्हे. योगशास्त्रातली आत्मविकासाची ती एक पद्धती आहे. 'मी म्हणजे शरीर नव्हे. मी एक अखंड प्रकाशमान व आनंदाने ओथंबलेला आत्मा आहे. त्या आत्म्यातच मला रममाण झाले पाहिजे हा विचार ज्ञानेश्वरांच्या मनात रात्रंदिवस खेळत असला पाहिजे.

दुसरे असे की या कर्मयोग्याने आपले कर्तव्यकर्म पूर्ण झाले असे समजून निरामय वृत्तीने जीवनाकडे पाठ फिरविली. योग्याच्या चित्तांत जीवन आणि मृत्यू अशा दोन वेगळ्या अवस्था नसतात. योगबळावर योगी चिरंजीवनाला बिलगून राहातो. शरीराची पातळी सुटली तरी आत्मिक उन्नतीच्या उंच आकाशात तो भराऱ्या घेत असतो. आपण सामान्य माणसे जगणे आणि मरणे या क्रियांचा केवळ वरवरचा अर्थ लावतो. त्यामुळेच समाधी हा एक सोहळा असतो, समाधीत अपूर्व आनंद नांदत असतो. समाधी हा आत्मज्ञानाचा प्रकर्ष असतो याची आपल्याला कल्पना सुद्धा येत नाही. मग केवळ बाह्यदृष्टी पाहून 'समाधी म्हणजे आत्मघात' असा विपर्यस्त, विकृत अर्थ करतो.

ज्ञानेश्वर हे आनंदयोगी होते. समाधी घेणे म्हणजे आपण आपल्या माहेरी

जाणे हा त्यांचा अर्थ होता. जीवात्म्याने परमात्म्याच्या विशाल व्यक्तित्वात विलीन होणे ही भूमिका होती. म्हणूनच समाधीचा आत्महत्येशी संबंध जोडणाऱ्या तथाकथित बुद्धिवादी लोकांना हे प्रकरण समजण्यासारखे नाही. ज्याचे मन आकाशासारखे स्वच्छ, निखळ बनले आहे आणि ज्यांच्या साऱ्या वासना आकांक्षा जीर्ण झालेल्या पानांप्रमाणे गळून पडल्या आहेत त्यालाच समाधीतला आनंद भोगता येतो. ज्ञानेश्वर हे तरुण असले तरी त्यांना या जगाविषयीची आसक्ती उरली नव्हती, ते सर्वार्थांनी तृप्त होते. त्यांच्या मुखमंडलावर प्रसन्नतेचे स्मित झळकत होते.नामदेवांनी या संबंधांत लिहिलेला एक अभंग असा आहे,

ज्ञानदेवालागी चंदनाची उटी । पंचारती होती आनंदाच्या ॥
गंध आणि अक्षता पुष्पपरिमळा । घेतो वोसंगळा नामदेवा ॥
ज्ञानदेव स्वस्थ देवा वोसंगळा । माळा घाली गळा नामदेवा ॥

ज्ञानेश्वर समाधिस्थळी आसनस्थ झाले. आपल्या प्रेमदृष्टीने त्यानी सर्वांकडे पाहिले. त्यांच्या डोळ्यात प्रसन्नतेच्या ज्योती तेवत होत्या. मुद्रेवर अलौकिक स्मिताची मंद छटा होती. बाह्य जगाशी मर्त्य जगाशी हा त्यांचा अखेरचा संबंध होता. क्षणार्धातच हा संबंध संपणार होता. ज्या विवरात ते बसले होते त्या विवराला आता शिळा लावण्यात येणार होती. कुणी धाय मोकलून रडत होते, शांतिब्रह्माचा हा महनीय अवतार आता पुन्हा पाहायला मिळणार नाही म्हणून अश्रू पुसून व्याकुळ दृष्टीने कोणी ज्ञानदेवांकडे टक लावून पाहात होते. सातशे वर्षांपूर्वी इंद्रायणीच्या तीरावर ही एक अभूतपूर्व घटना घडत होती. एक नवा इतिहास लिहिला जात होता. सूर्यही जणू ते दृश्य स्थिर होऊन पाहात होता. कारण त्यालाही पुन्हा हे दर्शन घडणार नव्हते.

सातशे वर्षांपूर्वी हे दृश्य ज्यांना पहायला मिळाले ते खरोखरच भाग्यवान म्हटले पाहिजेत. महापुरुषाची संजीवन समाधी कशी अलौकिक असते याचे चित्रण करण्याचा प्रयत्न संत नामदेवांनी केला. त्यामुळे त्यांचे अभंग वाचताना आपल्याही दृष्टीसमोर ती जुनी अलंकापुरी उभी राहते. साऱ्या जगाला आपल्या स्मितातून जीवनाचा संदेश देणारा तो ज्ञानदेव दर्शन देतो. हुंदके देऊन रडणारी ज्ञानेश्वराची लाडकी बहीण मुक्ता डोळ्यांसमोर येते. अंतर्बाह्य हलून गेलेले आणि कसेबसे स्वतःला सावरण्याचा प्रयत्न करीत असलेले निवृत्तिनाथ हेही आपल्याला पाहायला मिळतात. मुक्ताबाईच्या हुंदक्यात सोपानदेवाचेही आंक्रदन मिसळून गेलेले दिसते; समाधी प्रकरण''चे हे वैशिष्ट्य आहे. नामदेवांनी म्हटले आहे,

लावियेला दीप निरंजन ज्योति ! प्रकाशल्या दीप्ती तन्मयाच्या ॥
पुजूनि समाधि निघाले बाहेर । प्रेमे ज्ञानेश्वर कृपा केली ॥
अनुमानिले स्थळ सभोवती सारे । धन्य ज्ञानेश्वरे कृपा केली ॥
देव आणि नामा रूक्माई राही । स्फुंदती ठायी ठायी संतजन ॥

या अभंगात विठ्ठल आणि रूक्माई याप्रसंगी उपस्थित होते असा उल्लेख नामदेव करतात.

देव निवृत्ति यानी धरिले दोन्ही कर । जातो ज्ञानेश्वर बैसावया ॥
जाऊनि ज्ञानेश्वर बैसले आसनावरी । पुढे ज्ञानेश्वरी ठेवियेली ॥
ज्ञानदेव म्हणे सुखी केले देवा । पादपद्मी ठेवी निरंतर ॥
तीन वेळा तेव्हा करकमळ । झांकियेले डोळे ज्ञानदेवे ॥
नामा म्हणे आता लोपला दिनकर । बाप ज्ञानेश्वर समाधिस्थ ॥

सूर्य मावळला, दिशा अंधारल्या. अश्रूभरल्या डोळ्यांना काही दिसेना. दुःखाने बधीर झालेल्या मनाला काय घडले ते कळेना. ज्ञानेश्वर नावाचे एक सुगंधी वादळ विश्वचैतन्यात विलीन झाले. अखंड आनंदाची, प्रचंड उत्साहाची एक लाट विरून गेली. आजूबाजूच्या अंधारात भक्तजन चाचपडू लागले. कदाचित कुणीतरी त्या समाधिस्थानी ज्ञानदेवांचे अभंग गायला सुरुवात केली. 'मोगरा फुलला....' हा अभंग उच्च स्वरात गायिला गेला आणि त्यानंतर भक्तिभावाने 'पसायदानाचे' गायन झाले असावे असे मला वाटते.

या आर्त, करुण घटनेनंतर मात्र निवृत्तिनाथ स्वतःला सावरू शकले नाहीत. ज्ञानेश्वरांचा हा तत्त्वज्ञानी श्रेष्ठ गुरू वियोगदुःखाच्या वणव्यात होरपळू लागला. संयमाचे सारे बांध कोसळून पडले. महनीय व्यक्तींच्या दुःखाचे सांत्वन करणारे समर्थ शब्द नामदेवापाशी तरी कुठे होते? शब्दांची फुंकर, वियोगाचे चटके शमवू शकत नाही. निवृत्तिनाथांच्या हृदयातला वणवा वाढत चालला. स्वतः वडील भाऊच असा अगतिक झालेला पाहून सोपान आणि मुक्ताबाई यांच्या हुंदक्यांना आवर घालणे कुणालाच शक्य नव्हते. निवृत्तिनाथांचे समाधान करण्यासाठी नामदेवांनी त्यांच्या पाठीवरून हात फिरवला असावा. त्यांनी हे अत्यंत भावोत्कट क्षण शब्दबद्ध केले आहेत.

निवृत्तिदेव म्हणे करिता समाधान । काही केल्या मन राहात नाही ॥
बांधल्या तळ्याचा फुटलासे पाट । ओघ बारा वाट मुरडताती ॥
बांधल्या पेंढीचा सुटलासे आळा । तृण रानोमाळा पांगलेसे ॥
हरिणीवीण खोपी पडियेली वोस । दशदिशा पाडस भ्रमताती ॥
मायबापे आम्हा त्यागियेले जेव्हा । ऐसे संकट तेव्हा आले नाही ॥
नामा म्हणे देवा पेटला हुताशन । करा समाधान निवृत्तीचे ॥

काही प्रसंग ज्ञानवंतालाही विलक्षण धक्का देऊन जातात. त्या धक्क्यातून तो मग लवकर सावरला जात नाही. वस्तुतः ज्ञानेश्वरांप्रमाणेच निवृत्ती, सोपाना आणि मुक्ता हे स्वयंप्रज्ञ होते. निवृत्ती ही तर ज्ञानदेवांची प्रेरणाशक्तीच होती. पण त्यांच्या समाधीनंतर जणू ही तीन भावंडे आधार गमावून बसली. जणू त्यांच्या आत्मशक्तीवर अभ्र आले होते. निवृत्तिनाथांचे सांत्वन कसे करायचे हाच आता प्रश्न होता. देव, रूक्माबाई आणि इतर साधूजनांनी त्यांना म्हटले, 'ज्ञानवंताला शोक साजत नाही. आकाशात ढग येतात आणि निघून जातात. आकाशाला त्यांचा लेप लागत नाही. श्रेष्ठ अवतारी पुरुष आले आणि निघून गेले. याबद्दल खंत करण्यात अर्थ नाही. हा सारा मृगजळाचा विस्तार आहे. 'गलितगात्र होऊन बसलेल्या निवृत्तिनाथांना संतांनी हाती धरून उठवले; सर्व वैष्णव मंडळींनी समाधीच्या समोर अजान वृक्षाची पर्णहीन दांडी स्थापन केली. आश्चर्य असे की त्या कोरड्या लाकडाला पालवी फुटली. पुढे नामदेव म्हणतात,

नामा म्हणे ऐसा सुखी ज्ञानेश्वर । झाला असे स्थिर ब्रह्मबोधे ॥

संत नामदेवांनी लिहिलेले हे 'समाधी' प्रकरण म्हणजे भावकवितेचा एक उत्कृष्ट नमुना आहे. संजीवन समाधीचे हे प्रत्यक्षदर्शी चित्रण त्यांनी केले हे आपले सुदैव आहे. निवृत्तिनाथांनी काढलेले शोकदग्ध उद्‌गार वाचताना ज्याचे चित्त कालवणार नाही असा कुणी मुक्त किंवा पशू असेल असे वाटत नाही. त्यांचे उद्‌गार कारुण्याने पराकाष्ठेच्या आर्ततेने थबथबलेले आहेत. त्याचे वर्णन केवळ नामदेवांसारखे कोमलहृदयी कवीच करू शकतात. बांधलेल्या तळ्याचा पाट फुटावा आणि बारा वाटांनी पाण्याचा ओघ वाहत राहावा किंवा बांधलेली गवताची पेंढी सुटावी आणि रानोमाळ गवत पांगावे तसे माझे झाले आहे. हरिणीची खोपी पाडल्यानंतर तिची पाडसे दाही दिशांनी धावू लागतात तीच ही अवस्था आहे. आमच्या मायबापांनी

आमचा त्याग केला तेव्हासुद्धा एवढे संकट आले नव्हते. आता या मनाचे कसे समाधान करू?

हे उद्‌गार हृदय पिळवटून टाकणारे आहेत. 'समाधी' या प्रकरणातील निवृत्ती आणि ज्ञानेश्वर ही व्यक्तिचित्रे नामदेवांनी आत्यंतिक समरसतेने रेखाटली आहेत. नामदेवांची सारीच कविता कोवळी, हळवी, रसाळ आणि भक्तीच्या गंधाने भारलेली आहे. पण समाधीचा सोहळा आपल्या दुःखीकष्टी मनाने वर्णिताना या संताच्या वेदनेला आलेला शब्दांचा मोहोर खरोखरच अवर्णनीय आहे. वाचक भूतकाळाची पाने उलटीत शके १२१८ मध्ये जातो आणि मग त्याच्या डोळ्यांसमोर समाधी सोहळ्याचे अलौकिक दृश्य दिसू लागते. ही किमया अर्थातच संत नामदेवांच्या शब्दकळेची आणि भावार्त अंतःकरणाची.

ज्ञानेश्वरांची समाधी हा महाराष्ट्राच्या भावजीवनातला एक करुणरम्य प्रसंग आहे. सातशे वर्षे उलटली तरी हृदयावर कोरलेला हा चित्रलेख महाराष्ट्राने जपून ठेवला आहे. तो पुसट झालेला नाही. 'ज्ञानेश्वरी' हा जसा अद्‌भुतरमणीय प्रतिभेचा सुंदर आविष्कार आहे, त्याप्रमाणेच ज्ञानेश्वरांनी घेतलेली संजीवन समाधी ही देखील त्यांच्या शांतप्रसन्न, निकोप, विरागी, व्यक्तित्वाची अभिव्यक्ती आहे. 'समाधी' प्रकरणात ज्ञानदेव आणि नामदेव या दोघांचेही दर्शन घडते. त्यांची जवळून भेट होते.

०००

# 'एक तरी ओवी...'

'ज्ञानेश्वर' आणि 'ज्ञानेश्वरी' हे मराठी सारस्वतातले दोन दैदीप्यमान चमत्कार आहेत, असे विधान केले तर ती अतिशयोक्ती ठरू नये. मराठी साहित्याच्या समृद्धीचे, सौंदर्याचे व सामर्थ्याचे हे मानदंड ठरले आहेत. ज्ञानेश्वरीमुळे रसांना रसाळता आली. काव्याला कवित्वाची शोभा आली. प्रेमाला रुची, भक्तीला उत्कटता, शब्दांना श्रीमंती आणि तत्त्वज्ञानाला शुद्धता प्राप्त झाली. ज्ञानेश्वरीचा विचार करताना जाणवत राहते, की एका तरुण प्रमत्तप्रतिभेच्या सुवासिक आविष्काराचे हे विलक्षण रूप आहे. रसिकांच्या रसिकतेला आकंठ तृप्ती देणारे रसायन ज्ञानेश्वरांनी आपल्या या काव्यग्रंथात ओतप्रोत भरले आहे. सात शतकांचा प्रवाह वाहत गेला; पण ज्ञानेश्वरीच्या अभिजात तारुण्याला तो विचलित करू शकला नाही. काळाच्या ओघात साम्राज्ये बुडाली, संस्कृती उद्ध्वस्त झाल्या; पण या साऱ्या अपरिहार्य उत्पातातून 'ज्ञानेश्वरी' मात्र अभंग राहिली. अक्षर राहिली. तिच्या सौंदर्याचे आणि चिरंतन तारुण्याचे गूढ अद्याप उलगडलेले नाही.

एखादी विलक्षण सुंदर कलाकृती नेमकी कशामुळे रमणीय वाटते हे सांगणे कठीण असते. आकाशाची निळाई, समुद्राच्या उचंबळत्या लाटा, निष्पाप बालकाच्या मुद्रेवरचे अवखळ स्मित या गोष्टी सुंदर असतात यात शंका नाही, पण या सुंदरतेची तार्किक चिकित्सा करता येत नाही. कित्येक कलाकृती अशा चिकित्सेच्या चिमटीत पकडता येत नाहीत. एक प्रकारच्या गूढतेचे वलय या कलाकृतींच्या भोवती असते काय? मला तरी ज्ञानेश्वरींच्या प्रत्येक ओवीत ज्ञानेश्वरांचे स्वच्छ, प्रशांत, वत्सल, रसिक व्यक्तिमत्व जाणवते आणि त्यामुळे 'ज्ञानेश्वरी' नित्यनूतन वाटते. हे मी भाविकपणाने लिहीत नाही किंवा 'ज्ञानेश्वरी' संबंधीच्या पारंपारिक मतांचाही अनुवाद करीत नाही. तो धर्मग्रंथ म्हणून सुंदर व समर्थ आहे असे विधान मला करायचे नाही. धर्म आणि नीती यांच्या सांकेतिक कक्षांच्या पलीकडे ज्ञानेश्वरांमधील कलावंत उंच भरारी घेतो. हा धर्मग्रंथ असण्यापेक्षा उदात्तसुंदर जीवनाचे चित्र रेखाटणारा काव्यग्रंथ आहे व म्हणून तो मला आवडतो. ज्ञानेश्वरीच्या चिरतारुण्याचे आणि चिरंतन लावण्याचे रहस्य यातच सामावलेले आहे.

ज्ञानेश्वरी हा काव्यग्रंथ मी अनेक वेळा वाचला. प्रत्येक वेळी या साहित्यकृतीचा माझ्या मनावर अधिकाधिक परिणाम होत गेला. प्रत्येक वाचनाच्या वेळी या काव्यातले कल्पनेचे, भावनेचे आणि विचारांचे सौंदर्य अधिकाधिक जाणवत गेले. 'प्रतिक्षणी ज्यात नवनवीन सौंदर्यकळा भासमान होतात त्यालाच रमणीयतेचे रूप म्हणावे,' असे महाकवी माघाचे म्हणणे आहे. नावीन्य हा सुंदरतेचा प्रमुख घटक असतो, याची जाणीव स्वतः ज्ञानेश्वरांनाही होती. पहिल्याच अध्यायात गीतातत्त्वाच्या अखंड नवीनतेबद्दल त्यांनी म्हटले आहे.

या गीतार्थाची थोरी।
स्वये शंभू विवरी॥
जेथ भवानी प्रश्नु करी।
चमत्कारोनी॥
तेथ हरू म्हणे नेणिजे।
देवी जैसे का स्वरूप तुझे॥
तैसे हे नित्यनूतन देखिजे।
गीतातत्त्व॥

देवी पार्वतीला शंकर म्हणतात, ''तुझे सौंदर्य जसे नित्यनूतन आहे, तसेच हे गीतातत्त्वही सतत नवीन आहे.'' ज्ञानेश्वरीच्या संदर्भात हेच विधान करता येते. ओव्यांमागून ओव्या वाचताना मनात एक प्रकारचा वैचारिक आणि भावनिक सुगंध दाटून येतो. ही अनुभूती प्रत्येक वेळी यावी यातच त्या काव्याची परिणामक्षमता आहे. 'पसायदान' मी शेकडो वेळा ऐकले आहे. पसायदानातला प्रत्येक शब्द माझ्या दाट ओळखीचा आहे. असंख्य वेळा ऐकलेल्या आणि उच्चारलेल्या शब्दातले स्वारस्य क्षीण होते, हा सर्वांचाच अनुभव आहे. पण पसायदान ऐकताना प्रत्येक वेळी मी रोमांचित होतो. त्या गीतातला शांत, भव्य, रुचिर, सत्त्वसुंदर भाव हृदयाला असा भिडतो, की काही क्षण मनातला स्वार्थ गळून जातो. दुरितांचे तिमिर निमिषमात्र तरी दूर होते. विकारांचा सदैव पडलेला विळखा निदान त्या वेळी सैल होतो. द्वेष-मत्सर क्षीण होतात. या अनुभवात एक प्रकारची दिव्यता आहे. खरे तर हजारो वेळा ऐकलेले हे शब्द प्रत्येक वेळी ताजे, टवटवीत वाटतात. याचे काय कारण असावे? प्रतिभावंतांच्या शब्दांवर व्यावहारिक धूळ कधी साचत नाही. कारण एका महान अंतःकरणाचा अवीट गंध घेऊन ते शब्द अवतीर्ण झालेले असतात. काहीसे

आध्यात्मिक परिभाषेत बोलायचे झाल्यास ज्ञानेश्वरांच्या विशाल आणि व्यापक आत्म्याला स्फुरलेले अपार्थिव संगीत पसायदानातून आपल्याला ऐकायला मिळते. त्याचा नाद आणि लय आपल्या मनात काही वेळ तरंगत राहते. पसायदानातल्या नऊ ओव्यां हा चमत्कार घडवतात. नऊ हजार ओव्यांची ज्ञानेश्वरी वाचकांच्या मनावर हाच संकलित परिणाम घडवू शकते. ज्ञानेश्वरीतल्या काव्यात, प्रत्येक ओवीत उदारमनस्क आनंदवादी, भक्तवत्सल, सौंदयप्रेमी, मानवतावादी ज्ञानेश्वरांचा श्वासोच्छ्वास मिसळलेला आहे. कविता हा केवळ सुंदर शब्दांचा खेळ नव्हे. शब्द हे कवितेचे आवरण असते. श्रेष्ठ मनाने उदात्त सुखदुःखांचे अनुभवलेले क्षण जेव्हा शब्दांतून मुखरित होतात, तेव्हाच खरी कविता जन्माला येते. कवितेच्या मुळाशी ज्ञानेश्वरांचा असलेला हेतू उन्नत आहे. ते म्हणतात-

वाग्विलास विस्तारू।
गीतार्थेसी विश्व भरू॥
आनंदाचे आवारू।
मांडू जगा॥

वाणीच्या विलासावर ज्ञानेश्वरांचे प्रेम आहे. जन्मजात कवी शब्दाच्या रूपावर, रंगगंधावर आणि नादस्पर्शावर अवश्य प्रेम करतो. शब्द हे त्याचे धन असते. म्हणूनच 'आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने' असे म्हणून तुकोबा 'शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन' असा उद्घोष करतात. ज्ञानेश्वरांसारखा रससिद्ध प्रतिभावंत 'वाग्विलास विस्तारू' हे अभिमानाने सांगतो. पण गीतेचा अर्थ सकल विश्वात भरण्यासाठी आणि त्यातून आनंदाची निर्मिती करण्यासाठी वाणीचा प्रभाव हे एक साधन त्यांनी मानले आहे. आनंदाची कल्पनाही व्यापक आहे. मन, बुद्धी आणि आत्मा यांच्या विकसनातून उत्पन्न होणारा श्रेष्ठ प्रतीचा आनंद हा त्यांना अभिप्रेत आहे. त्यामुळे त्यांच्या काव्याचे मुख्य प्रयोजन काव्यानंद नसून, 'जो जे वांछील तो ते लाहो' असे आहे. जगातले दुष्टत्व निरसून जावे आणि प्राणिमात्र परस्परमैत्रीने बांधले जावेत, ही या संताची तीव्र इच्छा समग्र ग्रंथातून प्रकट झालेली दिसते. भक्ती, शांती, करुणा, क्षमा आणि कर्तव्यनिष्ठा या मूल्यांविषयी त्यांना अतूट आकर्षण आहे. हीच मूल्ये ज्ञानेश्वरीत प्रभावाने आढळली तर त्यात आश्चर्य नाही. या मूल्यनिष्ठेलाच ज्ञानेश्वर 'परतत्त्वस्पर्श' म्हणतात. कवित्वाविषयीचा आपला महत्वपूर्ण सिद्धांत स्पष्ट करताना त्यांनी म्हटले आहे, 'वाणीत कवित्व असावे हे चांगले. त्या कवित्वाला रसिकत्वाचे पैलू असावेत. पण

सारेच कवित्व परतत्त्वाच्या स्पर्शाने उजळून निघालेले असावे. नुसत्या कल्पनेचे व शब्दांचे सुंदरपण काव्याला श्रेष्ठत्व देऊ शकत नाही. भावविचारांची शुद्धता आणि सभोवतालचे जग निरामय व्हावे ही तीव्र आकांक्षा काव्यात एकत्रित झाली म्हणजे साहित्याला श्रेष्ठत्वाची पदवी लाभते.'

ज्ञानेश्वर हे नवसमाज निर्माण करण्यासाठी धडपडत होते. त्यांच्या काळातला समाज गतानुगतिक, जीर्ण विचारांच्या बंधनात अगतिक झाला होता. निष्क्रिय आणि निष्प्रभ झालेल्या या समाजाला उंच आचारविचारांच्या पातळीवर नेण्याची कल्पना ज्ञानेश्वरांच्या मनात तीव्रतेने होती. लेखक-कवींच्या साहित्याला असा परतत्त्वस्पर्श होणे आवश्यक असते. समाजमन घडवण्याची खरी क्षमता यातूनच साहित्यात येते. ज्ञानेश्वरांचा हा दृष्टिकोन आजही आणि पुढे केव्हाही समर्थनीयच ठरेल. साहित्यनिर्मात्याच्या जिवंत, वर्धिष्णू व्यक्तिमत्वाचे चित्र साहित्यात उमटल्याशिवाय त्याला संपन्न साहित्याचा दर्जा प्राप्त होत नाही. केवळ तंत्रवादी आणि कलावादी दृष्टीतून पाहणाऱ्या समीक्षकांना हा विचार पटण्यासारखा नाही. त्यामुळे ते ज्ञानेश्वरांच्या साहित्यविचारातल्या परतत्त्वस्पर्शाला मान्यता देत नाहीत. 'परतत्त्व' याचा अर्थ परमप्रतीचे-श्रेष्ठ असे तत्त्व. याचा परलोकाशी किंवा केवळ अध्यात्माशी संबंध जोडण्याचे कारण नाही. इमर्सन या तत्त्वचिंतकाने काव्याची व्याख्या करताना म्हटले आहे- 'जी मला स्वच्छ आणि समर्थ बनवते तिलाच मी कविता म्हणतो.' आधुनिक पाश्चात्य कवी समीक्षक टी. एस. इलियट याचेही मत इमर्सनासारखेच आहे. वाङ्मयीन श्रेष्ठता केवळ वाङ्मयीन निकषावर मोजता येत नाही. त्यासाठी जीवनमूल्यांचा आधार घ्यावा लागतो.

ज्ञानेश्वरी हा आनंद आणि प्रकाश देणारा काव्यग्रंथ आहे असे मी म्हणतो, तेव्हा आनंद आणि प्रकाश या संज्ञांचा रूढ झालेला सामान्य, व्यावहारिक अर्थ घ्यायचा नाही. ज्ञानेश्वरांची आनंदवादी विचारसरणी सध्याच्या भोगवादासारखी आकुंचित आणि क्षुद्र नाही. ज्याची प्रेमभावना वाढत चालली आहे, ज्याच्या वृत्तीत आणि वाणीत, चालण्यात आणि वागण्यात ऋजुता येत आहे, ज्याच्या स्वार्थभावनेला ओहोटी लागली आहे आणि जो समाजजीवनातील सुखदुःखांशी सहकंप पावत आहे त्याची अनुभूती अधिक आनंदाची असते. स्वतः ज्ञानेश्वरांची त्यांच्या काळात उपेक्षा झाली. मानसिक छळ आणि अपमान त्यांच्या वाट्याला अनेक वेळा आला. पण या ज्ञानी संताच्या अंतर्मनाला या दुःखाचा लेश लागू शकला नाही. आकाश जसे

निर्लेप, निखळ असते तसेंच या महात्म्याचे मन निरामय होते. ते विश्वजीवनाशी समरस होत गेले.

हे विश्वचि माझे घर।
ऐसी मती जेयाचि स्थिर।
किंबहुना चराचर।
आपण जाला॥

ही श्रेष्ठ आनंदवादी भूमिका ज्या ज्ञानेश्वरीने मांडली तिच्यातल्या काव्याला व्यापक विचारांचे अधिष्ठान आहे. कलावंत जेव्हा उदात्ततेच्या पातळीवर जातो तेव्हाच त्याच्या कलेला अधिक पक्वता आणि घनता येते. जोपर्यंत फळ पिकत नाही तोपर्यंत त्याच्या रसात मधुरतेचे सारे घटक उतरत नाहीत. ज्ञानेश्वरांच्या परिपक्व, रसमधुर अभिरुचीची ज्ञानेश्वरीत झालेली अभिव्यक्ती सुंदर वाटण्याचे हे प्रमुख कारण आहे. असे म्हणता येते.

आणखी एका दृष्टिकोनातून ज्ञानेश्वरीतल्या ओव्यांच्या सौंदर्याची चिकित्सा करता येईल. या कवितेतला विचार हळूहळू बुद्धीत आणि मनात रुजत जातो. पेरलेले बीज ज्याप्रमाणे रुजते, मातीचा कस शोषून घेते आणि अंकुरत राहते त्याप्रमाणे ज्ञानेश्वरीतले वैचारिक सौंदर्य वाचकाच्या हृदयात सावकाश; पण निश्चितपणाने परिवर्तन घडवून आणते. या परिवर्तनालाच मी 'प्रकाश' म्हणतो. 'मी अविवेकाची काजळी फेडूनि विवेकदीप उजळी' ही आपली प्रतिज्ञा ज्ञानेश्वर पार पाडतात. एका बुद्धिवादी पंडिताने मला म्हटले होते, 'मी रोज रात्री झोपण्यापूर्वी ज्ञानेश्वरीचे कोणतेही पान उघडतो. वीस-पंचवीस ओव्या मनःपूर्वक वाचतो. त्या मनात घोळत राहतात. त्या ओव्यांच्या मागे असलेले ज्ञानेश्वरांचे प्रसन्न व्यक्तित्व दृष्टीसमोर उभे राहते. ओव्यांतून व्यक्त झालेला जीवनविचार बुद्धीच्या कसावर घासून पाहताना मला कधी ठिसूळ वाटला नाही. ज्ञानेश्वरीतले यच्चयावत विचार आज जसेच्या तसे स्वीकारले पाहिजेत या मताचा मी नाही; पण प्रत्येक ओवी विचार करायला भाग पाडते. त्या ओवीत सामाजिक जाणीव असते. दृष्टांताचे आणि शब्दांचे लावण्य असते. ती ओवी आक्रमक नसते. मार्दव आणि आर्जव, संयम आणि आपुलकी हे तिचे गुणधर्म असतात. अशी ओवी माझ्या चिंताग्रस्त मनाला हळुवार स्पर्श करते आणि मग मी तिच्या स्वाधीन होतो.' त्या पंडिताचा हा अनुभव सर्वांच्याच वाट्याला येऊ शकतो. सुशिक्षित आणि अशिक्षित साऱ्यांनाच ज्ञानेश्वर आणि ज्ञानेश्वरी 'माऊली' वाटते हा

साहित्याच्या क्षेत्रातला अपूर्व अनुभव नव्हे काय?

संत नामदेवांनी ग्रंथ व ग्रंथकर्ता यांच्या विषयीचा आपला अभिप्राय उत्कट शब्दांत व्यक्त केला आहे. ते उद्‌गारतात-

ज्ञानराज माझी योग्यांची माऊली ।
जेणे निगमवल्ली प्रकट केली ॥
गीता अलंकार नाम ज्ञानेश्वरी ।
ब्रह्मानंदलहरी प्रकट केली ॥
श्रवणाचे मिसे बैसावे येऊनी ।
साम्राज्य भुवनी सुख नांदे ॥
नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी ।
एक तरी ओवी अनुभवावी ॥

एक तरी ओवी अनुभवली पाहिजे, हे नामदेवांचे सांगणे साकार कसे करायचे हाच सर्वांचा प्रश्न आहे. श्रेष्ठ प्रतीच्या भावविचारांनी ओथंबलेली आणि प्रत्येक शब्दावर ज्ञानदेवांच्या उदात्त व्यक्तित्वाची मुद्रा उमटलेली ही साहित्यकृती आपल्या आंतरिक आस्वादाचा विषय कसा होऊ शकेल? शरीर पातळीवरचे सामान्य, गद्यप्राय अनुभव आपल्याला सहज घेता येतात. पण ज्ञानेश्वरांची ओवी इंद्रियागम्य नव्हे. फार काय ती बुद्धिगम्यही नव्हे. पांडित्याला तिचे रहस्य समजेल असेही नव्हे. देवाचे 'दर्शन' घडण्यासाठी भक्तालाही काही अंशी देवत्वाच्या पातळीवर चढावे लागते. संतांच्या हृदयीची विचारधारा अनुभवण्यासाठी संतत्वाच्या भूमीवर उभे राहिले पाहिजे. संस्कृतीला सामर्थ्य देणाऱ्या साहित्यकृतीतील गूढ सामर्थ्य अनुभवण्यासाठी एक विशेष मानसिक तयारी करावी लागते. फुलपाखरू बोटाच्या चिमटीत किंवा मुठीत पकडता येत नाही. ते पकडले गेले तर त्याचे कलेवरच हातात राहील. बालकाच्या सहवासाचा आनंद घेताना प्रौढ माणसाला बालक होण्याशिवाय गत्यंतर नाही. ज्याला आपले शैशव जपता येत नाही त्याला बालकांच्या सान्निध्यात काय मिळणार? फुलात फूल व्हावे, बालांत बाल व्हावे आणि कलाकृतीचा आस्वाद घेताना आपणच कलावंत व्हावे! झाडाच्या पानांचे हिरवेपण ज्याच्या मनात नसते त्याला त्या हिरव्या पानांची सळसळ समजू शकत नाही. कविता देखील काव्यदृष्टीने वाचावी लागते. संतांची कविता तर संतांच्या स्नेहदृष्टीने वाचल्याशिवाय तिचे सूर आपल्या मनात झंकारत नाहीत. ज्ञानेश्वरांनी आपल्या कथेचा आस्वाद कसा घ्यावा हे अत्यंत काव्यात्म शब्दांतून

आणि अनुरूप दृष्टांतातून सांगितले आहे. ते म्हणतात-

जैसे शारदेचिये चंद्रकळे । माजि अमतृतकण कोवळे ॥
ते वेचिती मने मवाळे । चकोरतलगे ॥
तियापरी श्रोतां । अनुभवावी हे कथा ।
अतिहळुवारपण चित्ता । आणुनिया ॥

शारदीय पौर्णिमेच्या चांदण्यातून झरणारे कोवळे अमृतकण ज्या मृदुल मनाने चकोरीचीपिले टिपून घेतात, तोच हळुवारपणा चित्ताला यावा म्हणजे माझे काव्य तुम्हाला अनुभवता येईल. कलेचा भोग घेण्यासाठी रसिकाची मनोभूमिका प्रथम रसानुकूल बनली पाहिजे. हळुवार अंतःकरणातच कलेचा सुगंध भरून राहतो. ज्या मनात स्वार्थ आहे, रूक्ष व्यवहार आहे, रोमांचित होण्याची वृत्तीच नाही ते मन कलेचा भावस्पर्श स्वीकारू शकत नाही. ज्ञानेश्वरांच्या ओवीला भेटताना ज्ञानेश्वरांची सुकुमार मानसिक प्रवृत्ती रसिकांत उतरली पाहिजे. ऋजुता, नम्रता आणि रसिकता असेल तरच ज्ञानेश्वरांची ओवी श्रोत्यांशी लाडिक हितगुज करू शकते; नाहीतर ती मौन धारण करते. रसास्वादाची प्रक्रिया सांगताना ज्ञानेश्वर आणखी म्हणतात-

जैसे भ्रमर परागु नेति ।
परि कमळदळे नेला नेणति ।
तैसी परि आहे सेविती । ग्रंथी इये ॥
कां आपुला ठाउ न संडिता ।
आळंगिजे चंद्रु प्रकटता ।
हा अनुरागु भोगितां ।
कुमुदिनी जाणे ॥

कमलदलातील पराग नेताना भ्रमर विलक्षण हळुवारपणे ते घेतो. चंद्राचा उदय झाल्याबरोबर कमलिनी आपले स्थान न सोडता त्याचा प्रेमोपभोग घेते. अशा प्रकारचा अनुराग रसिकाच्या मनात असायला हवा, हे ज्ञानेश्वरांचे मत आहे. कोणतीही ललितकला रसडोळस अंतःकरणालाच समजू शकते. कलाकृतीशी एकरूप होण्याचा प्रयत्न हाच कला अनुभवण्याचा मार्ग असतो. तटस्थ वृत्तीच्या अरसिकाला रसानुभूती कशी मिळणार? याच अभिप्रायाने बेन जॉन्सन या समीक्षकाने, **'To judge of poets is only the faculty of poets'** असे म्हटले. संतांच्या काव्यात दुर्बोधता नाही; पण सखोल अनुभवांच्या सूक्ष्म छटा विखुरलेल्या आहेत. काव्य आणि अध्यात्म

यांच्या संगमातून उत्पन्न झालेला एक आगळा गहिरा रंग या कवितेला मिळालेला असतो. त्यामुळेच संतवाणीचे मन:पूर्वक चिंतन केल्याशिवाय या वाणीचा व्यापकपणा लक्षात येत नाही. ज्ञानेश्वर हे तर विलक्षण संपन्न, प्रसन्न आणि परिपूर्ण प्रतिभा लाभलेले साहित्यक्षेत्रातले युगंधर कवी आहेत अध्यात्माच्या क्षेत्रातही त्यांनी नवयुगाची रचना केली. म्हणून तर 'ज्ञानदेवे रचिला पाया' असे म्हणण्यात येते. अर्थपूर्ण, रसमय शब्द ऐकणे आणि वाचणे हाच एक उत्कट अनुभव असतो. ज्ञानेश्वरांच्या शब्दशारदेचे वर्णन करताना त्यांनीच केलेल्या सरस्वतीस्तवनाची आठवण होते. त्यातले 'अभिनववाग्विलासिनी', 'चातुर्यकलाकामिनी', 'विश्वमोहिनी' हे शब्द ज्ञानेश्वरांच्या ओवीचे वर्णन करण्यासाठी योग्य आहेत.

तैसे साच आणि मवाळ। मितले आणि रसाळ।
शब्द जैसे कल्लोळ। अमृताचे॥

ज्ञानी भक्ताच्या बोलण्याचे हे वर्णन खरे तर ज्ञानेश्वरांच्या कलावती वाणीचेही आहे, यात शंका नाही. अशी मधुर अर्थवती भाषा रसिकाला 'अनुभवता' आली तर त्याचे मन समृद्ध बनेल, हे सांगायलाच नको. मनाची समृद्धी वाढल्यावर संत नामदेव म्हणतात, त्याप्रमाणे, 'एक तरी ओवी अनुभवण्याची' संधी मिळणार आहे. समीक्षक आणि प्राध्यापक मंडळी केवळ बौद्धिक आकलन करून घेतात आणि पारंपारिक पठडीतील मंडळी ओवी वाचताना किंवा गाताना केवळ श्रद्धेच्या वलयात गुरफटलेली असतात. शेकडो आणि हजारो ओव्या तोंडपाठ असलेले भक्त ओवीच्या अंतरंगाचा आणि ज्ञानेश्वरांच्या विशाल हृदयाचा ठाव घेतात काय, हा प्रश्न उपस्थित करता येईल. आस्वादण्यासाठी, अनुभवण्यासाठी भक्ती जरूर पाहिजे, पण केवळ भक्तीने ज्ञानेश्वरी अथवा कोणतेही काव्य अनुभवाचा विषय होईल, असे मला वाटत नाही. रंगातून चित्र निर्माण होते; पण त्या रंगात चित्रकाराचे अंतरंग नसेल, तर ही नुसती कारागिरी ठरते. तसे आमच्या कित्येक अभ्यासकांचे झाले आहे. ज्ञानेश्वरीचे पारायण करूनही ज्ञानेश्वर भेटलेच नाही, ही अवस्था बहुसंख्य लोकांच्या वाट्याला येते याची नामदेवांना कल्पना होती. म्हणूनच 'एक तरी ओवी अनुभवण्या' चा संदेश हा संतश्रेष्ठ देत आहे.

ज्ञानेश्वरीच्या प्रत्येक ओवीत साहित्यगुण आहेत, तसेच ज्ञानेश्वरांच्या वृत्तीचेही गुणधर्म मिसळून गेले आहेत. प्रत्येक ओवी रसिकाच्या आणि भक्ताच्या हृदयाला जाग आणते. त्याचा आंतरअग्नी फुलवते. जीवशक्तीला चेतना देते. संसारातल्या

सुखदुःखांचा भोग घेतानाही त्यांच्या आहारी जाऊ देत नाही. ही ओवी आपल्या श्वासनिःश्वासातून माणसाला जगण्यासाठी प्राणवायू देते. कारण प्रत्येक ओवी हा प्रतिभेचा एक निःश्वास आहे. ज्ञानेश्वरी वाचणारा व एक तरी ओवी अनुभवणारा वाचक हळूहळू बदलत जातो. त्याच्यात निद्रिस्त असलेले जीवनप्रेमाचे आणि माणुसकीचे सूर जागे होतात. एका नव्या जीवनाची पहाट त्या सुरांतून उजळू लागते. संत नामदेवांनी ज्ञानेश्वरांची ओवी सर्वार्थांनी अनुभवली होती. म्हणूनच या विस्तृत ग्रंथातल्या एका तरी ओवीने आपल्या अंतःकरणात प्रवेश करावा, ही इच्छा त्यांनी व्यक्त केली आहे. ओवी अनुभवताना आणखी एक प्रचीती येऊ शकते, ती म्हणजे-

हे शब्देविण संवादिजे । इंद्रियां नेणता भोगिजे ।
बोलाआदि झोंबिजे । प्रमेयासी ॥

शब्द आणि इंद्रिये बाजूला ठेवून अंतर्मनात 'ज्ञानेश्वरी' ची सतार वाजू लागते.

'ये हृदयीचे ते हृदयीं घातले ।
द्वैत न मोडता आपणा ऐसे केले ॥'

श्रीकृष्णाने आपल्या हृदयातले ज्ञान आणि दर्शन अर्जुनाच्या हृदयात प्रविष्ट केले, त्याप्रमाणे ज्ञानेश्वरी जेव्हा हृदयाच्या गाभ्यापासून वाचली जाते, तिचे चिंतन केले जाते, ती आत्म्याचा विषय होते तेव्हा ज्ञानेश्वरी ही अनुभवाचे अंग बनते. या अनन्यसाधारण काव्यकृतीतील एखादी ओवी अनुभवगम्य झाली, की मग हळूहळू सारी ज्ञानेश्वरीच आपल्या अनुभवाच्या कक्षेत येऊ शकते, हे संत नामदेवांचे वचन संयुक्तिकच आहे. मी म्हणतो की 'एक तरी ओवी अनुभवावी', हे बरोबरच आहे. पण आयुष्यात एकदा तरी 'ज्ञानेश्वरी' वाचावी. वाचताना अनुभवाची वाट सापडेल. मग अनुभवण्याची प्रक्रिया सुलभ होईल.

○○○

# संतकवी चोखामेळ्याचे अश्रू

संतकवी चोखामेळा यांचा एक अभंग असा आहे की, त्यात पंढरीच्या विठ्ठलाचे वर्णन केले आहे. अभंगाची भाषा भावपूर्ण आहे. विठ्ठलदर्शनाने तृप्त झालेल्या चोखोबांच्या अंतःकरणातली आनंदाची धार जणू या अभंगातून वाहाते आहे. भक्ती आणि तृप्ती यांचे एक सुंदर चित्रण या दृष्टीने हा अभंग मनाला आनंद देतो यात शंका नाही. चोखामेळ्याची कविता या अभंगात प्रत्ययकारी आहे. आपल्या दृष्टीला झालेला हर्षाचा प्रत्यय त्याने या अभंगातून वाचकांच्या पदरात टाकला आहे.

लावण्याचा गाभा त्रैलोक्याची शोभा । विटेवरी उभा पंढरीये ॥
पाऊले गोजिरी श्रीमुख शोभले । ध्यान मिरवले भिमातीरी ॥
वैजयंती माळा किरीट कुंडले । परिधान केले पीत वस्त्र ॥
चोखा म्हणे ऐसा लावण्य पुतळा । तो आम्ही देखिला दृष्टिभरी ॥

विठ्ठलाचे वर्णन 'लावण्याचा गाभा' 'लावण्य पुतळा' अशा शब्दांनी केले आहे. त्याची पाऊले गोजिरी आहेत. पीतवस्त्र परिधान केलेल्या त्याच्या गळ्यात वैजयंती माळा शोभत आहे. असा हा सौंदर्याचा देव 'तो आम्ही देखिला दृष्टिभरी' असे उद्‌गार कवीने गहिवरून काढले आहेत. दुसऱ्या एका अभंगात 'विठोबा पाहुणा, आला आमुचे घरा' असे म्हटले आहे. 'चोखा म्हणे माझ्या जीवीचा जीवनु । पाहता तनुमनु भुलोनी जाय ।' परमभक्त जेव्हा देवमूर्ती डोळां भरून पाहातो तेव्हा त्याच्या हृदयात आनंदाचे कल्लोळ उचंबळून येतात. जगातले सारे लावण्य आणि मांगल्य या मूर्तीच्या ठायी एकत्रित झाले आहे असे त्याला वाटते. भक्ताला देव दिसणे ही भक्ताच्या आयुष्यांतली असीम आनंदाची आणि सौभाग्याची घटना असते यात संशय नाही.

पण......

चोखामेळ्याला खरोखरच विठ्ठलाचे दर्शन घडले काय ? ज्याचे वर्णन करताना या कवीच्या शब्दांना मोहोर येतो त्याच्या दृष्टीला तो विटेवर उभा असलेला देव खरोखरच दिसला काय ? का हे केवळ स्वप्नरंजन आहे ? तहानेल्या हरिणाने मृगजळ पाहून पाणी प्यायला मिळाल्याच्या आनंदात नाचू लागावे तसा तर हा प्रकार नव्हे ना? खरी गोष्ट अशी आहे की, विठ्ठलमंदिराची पायरी चढण्याचेही भाग्य

चोखामेळ्याच्या ललाटी लिहिले नव्हते. दुःखी माणसाने आनंदाचे नाटक करावे. धाय मोकलून रडणाऱ्याने अश्रू पुसून चेहऱ्यावर कृत्रिम हास्य आणावे, तसा हा प्रकार आहे. जो पांडुरंग या संताला कधी दिसलाच नाही तो त्याला 'लावण्याचा गाभा' म्हणतो ही त्याने एक प्रकारे स्वतःची करून घेतलेली करुण वंचना आहे. दूर उभे राहून मंदिराचे शिखर पाहावे आणि त्यालाच नमस्कार करावा हा अस्पृश्यांच्या बाबतीत समाजव्यवस्थेचा दंडक होता. सवर्णांनी विठ्ठलाला मंदिरात स्थानबद्ध करून ठेवले होते. शूद्रातिशूद्रांना पांडुरंगाने पोटाशी धरल्याच्या कितीही आख्यायिका पोथ्यापुराणांतून आढळत असल्या तरी चोखामेळ्या सारखा एक महान भक्त मंदिरात चुकून सुद्धा प्रवेश करूच शकत नव्हता. भक्त देवाला भेटू शकत नव्हता. ही सारी परिस्थिती माहीत असूनही देव कटीवर हात ठेवून स्तब्ध उभा होता. चोखामेळाच काय पण त्यांची पत्नी सोयराबाई, मेहुणा बंका, बहीण निर्मळाबाई आणि कर्ममेळा हा मुलगा, कोणीही विठ्ठलाचे दर्शन घेऊ शकत नव्हते. चोखामेळ्याचे हे सारे कुटुंब काव्यातून आपल्या भाव-भावनांचे सुंदर प्रकटन करतात. हे घराणेच कवींचे आहे. काव्यशक्तीचा वरदहस्त या साऱ्यांच्या मस्तकावर आहे. पण अस्पृश्यतेची तप्तमुद्रा नियतीने यांच्या कपाळावर ठोकल्यामुळे हे संतकवी उपेक्षेच्या अंधारात आपला मानसिक छळ निमूटपणे सहन करीत राहिले. आपल्याला विठ्ठल दिसला आणि भेटला ही यांची एक कविकल्पना आहे. वास्तव मात्र याविरुद्ध होते.

विठ्ठलदर्शन घडल्याची काल्पनिक कथा चोखामेळ्याने का सांगावी ? हे सांगण्यात एक प्रकारचे केविलवाणे समाधान होते. मनोमन हा संत जाणून होता की आपण आपला ललाटलेख पुसू शकत नाही. अस्पृश्यता ही जन्माबरोबरच चिकटली आहे. आपल्याच पूर्वजन्मीच्या संचितामुळे आपण या हीन जातीत जन्माला आलो. जाती आणि वर्ण ईश्वरानेच निर्माण केले. 'देवाघरचा हा न्याय' स्वीकारण्याशिवाय आता आपल्याला गत्यंतर नाही. पण सदैव तडफडत असलेल्या चित्ताचे समाधान करून घेण्यासाठी निदान कवितेत तरी आपल्याला विठ्ठल पाहाता आला असे म्हणावे आणि डोळ्यांतले अश्रू त्या काल्पनिक साक्षात्काराने विसरून जावेत यासाठी ही चोखामेळ्याची आर्त धडपड होती. हे एक कारुण्यपूर्ण कल्पनानाट्य होते. बळेच रंगवलेले एक स्वप्न होते.

संत सोयराबाई एका अभंगात म्हणते,

पंढरीचे ब्राह्मणे चोख्यासी छळीले। तयालागी केले नवल देवे।

सकळ समुदाव चोखियाचे घरी । ऋद्धी सिंद्धी द्वारी निष्ठताती ॥
रंगमाळा सडे गुढीया तोरणे । आनंद कीर्तन वैष्णवाचे ॥
असंख्य ब्राह्मण बैसल्या पंगती । विमानी पाहती सूरवर ॥
तो सुखसोहळा दिवाळी दसरा । वोवाळी सोयरा चोखीयासी ॥

या अभंगातले चित्रण म्हणजे स्वैर कल्पनेचा चमत्कृतिपूर्ण विलास आहे. आपल्या मनातल्या अपूर्व इच्छांची पूर्ती या कवयित्रीने कवितेत करून घेतली आहे. विषमतावादी ब्राह्मणांनी चोखामेळ्याला छळले. सोयराबाईच्या मनात हा असंतोष खदखदत होता. उच्चवर्णीय ब्राह्मणं देवाने आपल्याघरी भोजनासाठी पाठवले. असंख्य ब्राह्मणांच्या पंगती बसल्या. ऋद्धी-सिद्धी दारात उभ्या आहेत. हा सुखसोहळा पाहण्यासाठी देवलोकातील देव विमाने घेऊन आले आहेत. कल्पनेचा हा एक अपूर्व आविष्कार वाटतो. प्रत्यक्ष व्यावहारिक आयुष्यात चोखामेळ्याच्या झोपडीसमोर एखादा तरी ब्राह्मण त्याला भेटण्यासाठी आला असेल ही शक्यता दिसत नाही. पण गरिबांचा स्वप्नावर तरी अधिकार असावा, निदान आपली स्वप्ने शब्दांतून गुंफण्याचे त्यांना स्वातंत्र्य असावे. चोखामेळा आणि सोयराबाई व त्याचे कुटुंब अस्पृश्यतेचे चटके प्रत्यक्षात सहन करीत होते. पण तरीही त्यांची विठ्ठलभक्ती अतूट होती. केव्हातरी कर्ममेळा संतप्त होऊन बोलतो, 'आमची हीन याती तू केलीस, आमचा सारा जन्म उष्टे खाण्यात गेला याची लाज मात्र देवा तुला वाटत नाही का? आम्हाला मात्र हीनत्व आले. तुझ्या संगतीला राहून आम्हाला काय मिळाले ? लाजिरवाणे आयुष्य मात्र पदरात पडले.'

पण या साऱ्यांनीच आपले विधिलिखित मान्य केले आहे. मंदिरातला विठ्ठल त्यांना दिसला नसला तरी या आर्त भक्तांच्या हृदयाच्या विटेवर उभा असलेला विठ्ठल त्यांना रात्रंदिवस दिसत होता. आधार देत होता. म्हणूनच यातनात जळत असतानाही त्यांच्या मनातल्या भक्तीला कधीच तडा गेला नाही. या उपेक्षित, बहिष्कृत संतांच्या काव्यांतून त्यांच्या मनभावनांचे वेगवेगळे रंग दिसतात. त्यांची सुखदुःखे कशी निराळी आहेत याची जाणीव होते.

सात शतकांपूर्वी महार कुटुंबातला एक कष्टकरी माणूस विठ्ठलाच्या भक्तीने ज्ञानेश्वर-नामदेवांच्या सान्निध्यात ओढला जातो. त्यांची प्रवचनं-कीर्तनं ऐकून त्याच्याही चित्तात कवित्वाचा अंकुर रुजतो. थोडीफार अक्षरओळख झाली असेल. पण तो उमाळ्याने अभंगरचना करू लागतो. विठ्ठल आपल्याला भेटत नाही या जाणीवेने

दुःखित झालेला हा भावकवी आणि संत आपल्या कवितांतून अश्रू गाळू लागतो. माझ्या मते चोखामेळ्याच्या काव्यात त्याच्या गळ्याशी दाटून आलेले हुंदके आहेत. डोळ्यांतून ओघळलेले आसू आहेत. त्याच्या विफल जीवनाची कर्मकहाणी आहे. घरात अठरा विश्वे दारिद्र्य आहे. मनात खोलवर मुरलेली निराशा आहे. पण तरीही हा संतकवी विठ्ठल नामाच्या गजरात आपले सारे दुःख बुडवून टाकतो. कल्पनेच्या नेत्रांनी पांडुरंगाचे रूप पाहातो आणि तो पांडुरंग आपल्याच झोपडीत वसतीला आला आहे असे मानून सुखावतो, हे सगळे रंग आणि गंध त्याच्या करुणोदत्त कवितेने टिपून घेतले आहेत. पण एकंदरीत पाहिले तर विषमतेच्या आगीत होरपळून गेलेल्या वैफल्याने काजळलेल्या एका सत्प्रवृत्त मनाची ही भक्तिकविता आहे. परंपरेने चोखामेळ्याच्या जीवनाचा सारा रस शोषून घेतला. देवभक्तीचा आधार नसता तर या कुटुंबाच्या दुःखाला व दैन्याला पारावार उरला नसता. त्याने कंठरवाने जगाला ओरडून सांगितले की, 'मी माणूस आहे. मी विठ्ठलाचा भक्त आहे. माझ्या पदरात न्याय टाका.' पण सातशे वर्षांपूर्वीची कर्मठ, अन्यायी समाजव्यवस्था द्रवली नाही.

'जे जे भेटे भूत, ते ते जाणिजे भगवंत' ही उदार दृष्टी असलेला वारकरी पंथही चोखामेळ्याच्या पदरात मानवी न्याय टाकू शकला नाही. शेकडो वर्षांच्या जुनाट रूढीवादाने अशा हजारो चोखामेळ्यांच्या आयुष्यात विषमतेचे विष कालवले. त्यांच्या किंकाळ्यांनी परिस्थितीत कोणताही फरक पडला नाही. आपली जात न पाहाता आपली प्रामाणिक भक्ती जनताजनार्दनाने पाहावी. ही त्याची प्रार्थनाही धुडकावली जाते.

ऊस डोंगा परि रस नव्हे डोंगा। चोखा डोंगा परि भाव नव्हे डोंगा।

हे शब्दही निरुपयोगी ठरतात. एके दिवशी विठ्ठलाच्या कंठातील हार चोरल्याचा आळ चोखोबांवर येतो.

धाव घाली विठु आता चालू नको मंद।
बडवे मज मारिती ऐसा काही तरी अपराध ॥
विठोबाचा हार तुझे कंठी कैसा आला।
शिव्या देती महारा म्हणती देव बाटविला ॥
असे करणे होते तुला। तरी कां जन्म दिला मला।
जन्म देवोनी सांडिले। का हो निष्ठुर मन केले।

वर्णव्यवस्था आणि जातिबद्ध समाजरजना ही ईश्वरकृत **आहे असा** विचार

काही लोक मांडतात. तेव्हा हसू येते. अशीच व्यवस्था परमेश्वराने इतर देशात का निर्माण केली नाही ? तो करुणाघन, विश्वनिर्माता आपणच निर्माण केलेल्या माणसांत उच्चनीचपणाचा भाव कसा निर्माण करील ? या प्रश्नाचे उत्तर धर्मशास्त्रात सापडत नाही. वारकरी पंथाने मात्र चोखामेळ्याला आपल्यात सामावून घेतले. जातीपातीची कुंपणे भक्तीच्या क्षेत्रात आडवी येऊ नयेत ही या पंथाची भूमिका तर्कशुद्ध आहे. पण सामाजिक व्यवहाराच्या क्षेत्रात मात्र हा अध्यात्मनिष्ठ समतावाद त्यांनी आणला नाही. याचे कारण परंपरागत शास्त्रप्रामाण्याला धक्का लावून ती विस्कळीत करणे त्यांना इष्ट वाटले नाही. याचा परिणाम लक्षावधी शूद्रातिशूद्रांच्या जीवनावर शतकानुशतके होत राहिला. इतका की त्यांच्यापासून त्यांचा देवदेखील हिरावून घेण्यात आला. आपल्या स्पर्शाने देव विटाळतो ही भ्रांतिष्ट कल्पना तथाकथित अस्पृश्यांच्या मनात धर्मशास्त्रांनी बसवली. डॉ. आंबेडकरांना नाशिकच्या काळाराम मंदिरात प्रवेश करण्यासाठी संघर्ष करावा लागला. रामदर्शनासाठी जाणाऱ्या दलितांना दगडधोंड्यांचा मारा सहन करावा लागला. सार्वजनिक तळ्याचे पाणी पिण्याचा साधा माणुसकीचा हक्कही नाकारण्यात आला. साने गुरुजींना विठ्ठल मंदिराबाहेर अस्पृश्यांच्या हक्कासाठी प्राणांतिक उपोषणाला बसावे लागले. आणि मग दीर्घ प्रयत्नानंतर लाखो चोखामेळ्यांना विठ्ठलाचे दर्शन घडू शकले. एका अर्थाने विठ्ठलाचीच कारागृहातून मुक्तता झाली.

हीन याती माझी देवा । कैसी घडे तुझी सेवा ॥
मज दूर दूर हो म्हणती । तुज भेटूं कवण्या रीती ॥

चोखामेळ्याचा हा आर्त प्रश्न अनुत्तरितच राहिला. त्याला समर्थपणाने कोणी उत्तर देऊ शकले नाही. 'एष मार्गः सनातनः' हे सारे श्रुतिस्मृतिपुराणोक्त आहे. अस्पृश्यता हे पूर्वजन्मीच्या पातकाचे फलित आहे. असला तर्कशून्य युक्तिवाद झाला की मग हा सामाजिक आणि धार्मिक प्रश्न निकालात काढल्याचे समाधान सनातनी लोकांना मिळत असे.

मी जेव्हा जेव्हा संत चोखोबांची कविता वाचतो तेव्हा एका अत्यंत केविलवाण्या, हळव्या, भावसंपन्न, उदारमनस्क माणसाचे दर्शन घडते. सामाजिक अन्यायाचा बळी ठरलेला हा माणूस विद्रोहाची भाषा बोलू शकत नाही. त्याच्या बोलण्यात आणि वागण्यात लाचारीचा भाव आहे. 'मी तुमच्या उष्ट्याचा महार' असे म्हणून तो प्रत्येकाला जोहार घालतो. खरे तर या विठ्ठलभक्ताच्या वाणीत आणि वृत्तीत ओज व स्वाभिमान हे गुण दिसत नाहीत याची खंत वाटते. पण सातशे

वर्षांपूर्वीच्या सर्वस्वी प्रतिकूल परिस्थितीत चोखामेळ्याच्या कवितेने आणि स्वभावाने याप्रकारचे वळण घ्यावे यात आश्चर्य नाही. आज मनात येते की, पंढरीच्या देवळात, पांडुरंगाच्या पायाशी उभे राहण्याचा अधिकार या संतकवीला मिळाला असता तर त्याची कविता आनंदाच्या तरंगांनी उचंबळून आली असती. त्याची उत्फुल्ल प्रतिभा काव्यफुलांचा वर्षाव करीत राहिली असती. आज मात्र त्याच्या कवितेतले खारट अश्रू मनाला विषण्ण करतात.

आख्यायिका असे सांगते की मंगळवेढ्यात भिंत बांधीत असताना ती अंगावर कोसळून अनेक मजूर मृत्यूमुखी पडते. त्यात संत चोखामेळाही होते. त्या जागी विखुरलेल्या अस्थीतून चोखोबांची हाडे कशी ओळखायची हा प्रश्न नामदेवाला पडला. ज्या हाडातून 'विठ्ठल' 'विठ्ठल' असा नामघोष ऐकू येईल ते चोखोबांचे आहे हा निर्णय नामदेवांनी केला. नामदेवांनी आपल्या या शिष्याची पंढरीला महाद्वारासमोर समाधी बांधली. दंतकथा आणि आख्यायिका चमत्कारमय असतात. माझा त्यावर विश्वास बसत नाही. पण चोखोबा हे हाडाचे विठ्ठलभक्त होते यात संदेह नाही. त्यांच्या काव्यातला प्रत्येक अश्रू याची साक्ष देईल. एक महान भगवद्भक्त पंढरीच्या मंदिराच्या महाद्वाराशी गेली सातशे वर्षे विठ्ठलभक्तीत अविरत रंगून गेला आहे. त्याच्या भक्तीला आणि कवित्वाला अभिवादन करू. त्याच्या काव्यातल्या तीव्र व्यथावेदना हा विषमतावादी परंपरेचा एक परिणाम आहे. माणूस हा ब्राह्मण किंवा शूद्र असतो. तो नुसता 'माणूस' कधीच नसतो ही लाजिरवाणी कहाणी सांगणारी अश्रुपूर्ण कथा म्हणजे संत चोखोबांची भावकविता.

ooo

# ज्ञानेश्वरांचे व्यक्तित्व

ज्ञानेश्वर आणि त्यांची ज्ञानेश्वरी ही नित्यनूतन सौंदर्याची व सामर्थ्याची रूपे आहेत. जड शब्दांच्या माध्यमातून त्यांची चिकित्सा कशी करता येईल? पण शब्दांशिवाय दुसरे साधन नसल्यामुळे याच माध्यमाचा उपयोग करणे अटळ आहे. ज्ञानेश्वरी ही ज्ञानेश्वरांच्या हृदयरूपी दीपकाची एक शांत पण तेजस्वी ज्योत आहे. जीवनातल्या परम अर्थाची ती प्रसन्न रचना आहे. संस्कृतीचा आणि सारस्वताचा ज्ञानेश्वरी हा मानस्तंभ आहे. काय असेल ते असो, काव्य आणि तत्त्वज्ञान यांनी ओथंबलेल्या या ग्रंथाविषयी बोलताना भाषेला आपोआप अलंकारांचे कोंभ फुटू लागतात. ज्ञानेश्वरीला 'माऊली' म्हणणे ही सुद्धा अलंकारिक भाषा नव्हे काय? हा ग्रंथ महाराष्ट्राने सात शतके आपल्या मनात जिवाभावाने जतन करून ठेवला; आणि या ग्रंथानेही गेली सातशे वर्षे महाराष्ट्राच्या भाषेला, भावनेला व संस्कृतीला आकार दिला. त्याला 'महाराष्ट्र' ही संज्ञा ज्या व्यक्तीमुळे आणि कृतीमुळे मिळू शकली त्यात ज्ञानेश्वर आणि ज्ञानेश्वरी यांचा उल्लेख अग्रक्रमाने करावा लागेल. पहिल्या अध्यायात महाभारताची प्रशस्ती करताना ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे.

ना तरि सकळ धर्मांचे माहेरण सज्जनांचे जिव्हार।
लावण्यरत्न भांडार। शारदेचें॥
म्हणौनि महाकाव्या रावो। ग्रंथु गुरुवतिचा ठावो।
एथौनि रसां जाला आवों। रसाळपणाचा॥(१/३१-३३)

हे वर्णन ज्ञानेश्वरीलाही पूर्णपणे अनुरूप असेच आहे. सरस्वतीच्या लावण्याचा प्रत्यय या ग्रंथातून येतो. धार्मिकता आणि सुजनता यांचे ज्ञानेश्वरी हे माहेरघरच आहे. महाकाव्यांच्या मालिकेत या ग्रंथाचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण ठरेल. रस, कल्पना आणि विचार यांची अनेकरंगी दर्शने यात प्रकट झाली आहेत. मराठी साहित्यात तरी ज्ञानेश्वरीसारखा दुसरा ग्रंथ अद्यापि झालेला नाही; यात कोणतीही अतिशयोक्ती नाही.

साहित्यकृती ही लेखकाच्या व्यक्तित्वाचे रंग घेऊन जन्माला येते. ज्या भूमीत

वृक्षवेली फोफावतात, त्या भूमीचे गुणधर्म त्यांनी घेतलेले असतात. काव्य हा तर कवीच्या हृदयाचा हुंकार असतो. कवीच्या भावभावनांचा आणि त्याच्या जीवनदृष्टीचा तो उत्कट आविष्कार असतो. म्हणूनच ज्ञानेश्वर आणि ज्ञानेश्वरी एकरूप आहेत असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. ज्योत आणि तिचे तेज या दोन वेगळ्या गोष्टी नव्हेत. ज्ञानेश्वरीच्या रूपाने ज्ञानेश्वर आजही आपल्यासमोर उभे असून, स्वतःच्या वत्सल वाणीतून आपल्याशी 'संवाद' करीत आहेत. या ज्ञानेश्वरीतील ज्ञानेश्वरांविषयी वेगळे असे सांगण्यासारखे काय आहे? केवळ विवेचनाच्या सोयीसाठी या श्रेष्ठ ग्रंथात प्रकटलेल्या ग्रंथकाराच्या व्यक्तित्वाचे काही पैलू पाहता येतील.

वॉल्ट व्हिटमन या कवीने म्हटले आहे, 'आपण जेव्हा एखाद्या ग्रंथाला स्पर्श करतो तेव्हा ग्रंथलेखकाच्या व्यक्तित्वालाच आपण स्पर्श करीत असतो'. निर्मिती आणि निर्माता एका अर्थाने अभिन्न असतात, हाच त्यांच्या विचाराचा सारांश आहे. नऊ हजार ओव्यांची 'भावार्थदीपिका' वाचत असताना ज्ञानेश्वरांची सस्मित, प्रसन्न, धीरोदात्त मूर्ती वाचकाच्या दृष्टीसमोर उभी राहते. श्रीक्षेत्र नेवासे येथील मंदिरात एका खांबाला टेकून ज्ञानेश्वर बसले आहेत. शेजारीच त्यांचे गुरू निवृत्तिनाथ आहेत. भाविक आणि रसिक श्रोत्यांनी मंदिराचा सभामंडप फुललेला आहे. त्या उत्सुक श्रोत्यांच्या कानामनांत ज्ञानेश्वरांच्या वाणीची सतार झंकारत आहे. वक्ता आणि श्रोता दोघेही संवादसुखात निमग्न झाले आहेत. 'धर्मकीर्तन' रंगात आले आहे. हे दृश्य डोळ्यांपुढून हलत नाही. आपल्या प्रत्येक शब्दाला आणि ओवीला चैतन्याचा सुगंधी स्पर्श देणारे ज्ञानेश्वर शब्दाशब्दांतून जाणवत रहावेत, हा एक वाङ्मयीन सुखानुभव म्हटला पाहिजे.

सर्वप्रथम ज्ञानेश्वरांची अभिजात नम्रता आणि सुसंस्कृतपणा यांचे दर्शन आपल्याला प्रभावित करते. श्रेष्ठ अध्यात्मविचार विवरून सांगणाऱ्या प्रज्ञावंताची वृत्ती शालीन असावी, ही अपेक्षा असते. पण अनुभव असा येतो की, पांडित्याला अनेक वेळा अहंकाराने वेढलेले असते. आपण सांगतो ते अंतिम आहे, त्याला कोणीही आव्हान देऊ शकत नाही, अशा आढ्यतेने कित्येक पंडित बोलत असतात. ज्ञानेश्वर मात्र विनयाच्या पातळीवरून कधीही खाली उतरत नाहीत. अहंकाराचा वारा न लागलेल्या या पंडित कवीच्या अभिजात विनयानेच वाचक स्मिमित होतो; जिंकला जातो. ज्ञानेश्वरांचे भाष्य तो मनापासून ऐकू लागतो. विनीत वृत्ती हा ज्ञानेश्वरांचा एक स्वाभाविक गुणधर्म आहे.

कां कमळावरी भ्रमर। पाय ठेविती हळुवार।
कुचुंबैल कैसर। इया शंका ॥ (१३/२४७)

कमळावर बसून मधुपान करणाऱ्या भ्रमराचा हळुवारपणा येथे ज्ञानेश्वरांनी वर्णिला आहे. हाच हळुवार, आर्जवी आणि विनयी स्वभाव ज्ञानेश्वरीत ठायी ठायी व्यक्त झाला आहे. ज्ञानेश्वरांनी श्रोत्यांना जशी नम्र आळवणी केली आणि त्यांचे श्रोतृत्व जसे सहजतेने जागे केले तशी कृती इतर कवींनी केलेली दिसत नाही. आपले वक्तृत्व श्रोत्यांना आवडण्यासारखे आहे, याची जाणीव ज्ञानेश्वरांना आहे. पण श्रोते हेच वक्त्यांच्या वाणीला चालना देऊ शकतात, असे त्यांनी म्हटले आहे.

अहो चंद्रकांतु द्रवता कीर होये। परि ते हातवटी चंद्रीं की आहे।
म्हणउनि वक्ता तो वक्ता नोहे। श्रोतेनविण ॥

श्रोत्यांशी विनयाने, सलगीने व मधुर वाणीने बोलून आपला प्रतिपाद्य विषय कलात्मकतेने फुलवणारा कवी मराठी सारस्वतात ज्ञानेश्वरांसारखा दुसरा कोणी आहे काय? ज्ञानेश्वर केवळ स्वान्तः सुखाय' बोलत नाहीत. श्रोत्यांना आपण प्रमुदित व प्रबोधित करावे हा त्यांचा हेतू आहे. त्यांच्या वृत्तीतच आर्जव आणि मार्दव ओथंबलेले आहे. श्रोत्यांच्या हृदयाची तार हर्षकंपित व्हावी, आणि ते आपल्या प्रवचनाशी सहकंप पावावेत, ही त्यांची आकांक्षा स्पष्ट दिसते. ते श्रोत्यांना 'सुखामृताचे डोह' असे संबोधतात. श्रोत्यांनी केवळ अवधान द्यावे म्हणजे ते सर्व सुखांना पात्र होतील, असे प्रतिज्ञेवर ज्ञानेश्वर सांगतात. या वचनात अहंकार असावा असा गैरसमज होऊ नये म्हणून ते म्हणतात, 'तुम्हा सर्वज्ञांच्या मेळाव्यात मी प्रौढीने बोलत नाही, सलगीने विनवणी करतो. तुमच्या दृष्टीमुळे प्रसन्नतेचे मळे फुलतील; आणि त्या बागेच्या सावलीत मी विश्रांती घेईन.' नाना परींनी, निरनिराळ्या अनुरूप दृष्टांतांच्या माध्यमांतून ज्ञानेश्वरांनी श्रोत्यांना विनविले आहे. श्रोतृसंवाद करणारे ज्ञानेश्वर अंतर्बाह्य विनम्र आणि मृदुभाषी आहेत याची जाणीव सर्वत्र होते. वस्तुतः ज्ञानेश्वरांसारख्या शास्त्रसंपन्न विद्वान वक्त्याला आणि कवीला श्रोत्यापुढे इतके अवनम्र होण्याची आवश्यकता नाही. पण ते मूलतःच नम्र स्वभावाचे आहेत. निरहंकार ज्ञानेश्वरांची सुजनतेने ओसंडून वाहणारी प्रसन्न वाणी हा ज्ञानेश्वरीच्या सौंदर्याचा एक घटक आहे. विनम्रतेची भाषा प्रांजल आहे. धोरण म्हणून तिचा अवलंब ज्ञानेश्वरांनी केला नाही. लोकमनावर संस्कार करून लोकजीवनाला विशिष्ट वळण लावण्याची त्यांची भूमिका

आहे. अभिजात विनयभावना, ऋजुता, मधुर प्रसन्नता हे ज्ञानेश्वरांच्या व्यक्तित्वाचे गुणधर्म आहे. या गुणांची अभिव्यक्ती ज्ञानेश्वरीत सर्वत्र झाली आहे. ज्ञानेश्वरी प्रत्यक्ष ज्ञानेश्वरांच्या तोंडून ऐकताना श्रोते कसे रोमांचित झाले असतील, याची कल्पना काही अंशी येते. आज सातशे वर्षानंतर ज्ञानेश्वरी वाचताना, वाचकांना 'अमृताचा घनु' आपल्यावर वर्षाव करीत आहे, ही अनुभूती येते. पण जे श्रोते त्या महान ऐतिहासिक क्षणी उपस्थित होते, त्यांच्या अनुभवांचे वर्णन पुन्हा ज्ञानेश्वरांच्याच शब्दांतून केले पाहिजे. 'या बोला संत रिझले। म्हणती तोषलो गा भले केलें ॥' ज्ञानेश्वरांचे निरूपण ऐकून संतजनांनी संतोषाची अशी प्रसन्न पावती दिली आहे. (११/२१)

आपल्या श्रोत्यांशी संवाद साधणाऱ्या ज्ञानेश्वरांच्या मनात निवृत्तिनाथाविषयी आपल्या गुरूविषयी पराकोटीचा आदर आहे. गुरुस्तवनाच्या ओव्या उत्कट भक्तिभावाने चिंब भिजलेल्या आहेत. गुरूचा उल्लेख ते 'माऊली' असा करतात. गुरुकृपेची दृष्टी भक्ताला सर्व विद्यांच्या सृष्टीचा धारक बनवू शकेल. कारण गुरू ही भक्तांची कल्पलता आहे. तिच्या आशीर्वादाने आपल्या साहित्यात नवरसांचे सागर आणि भावार्थाचे गिरिवर निर्माण होऊ शकतात. अशा आशयाचे वर्णन ज्ञानेश्वर भाविकतेने करतात. श्रोत्यांसमोर विनम्र होणारा हा कवी आपल्या गुरूंच्या संदर्भात किती विलक्षण नम्रतेने आपले मनोगत व्यक्त करतो, हे पाहिल्यावर त्याच्या श्वासनिःश्वासात भक्तिभावना, सुकुमारता आणि सुजनता कशी भरून उरली आहे. याचा प्रत्यय येतो. निवृत्तिनाथांच्या उपस्थितीतच ज्ञानेश्वर आपले भाष्य करीत आहेत. त्यामुळे अनेक स्थळी परम आदराने ज्ञानेश्वर त्यांचा उल्लेख करतात. केवळ गुरूच्या वरदानामुळे आपण बोलत आहोत; अन्यथा गीताभाष्य करण्याची क्षमता आपल्या ठायी नाही अशी अतिशय विनयाने नोंद करतात. गुरू आणि श्रोते यांना सहजतेने आणि उत्कटतेने वंदन करणारी ही वृत्ती ज्ञानेश्वरांच्या व्यक्तित्वावर रुचिर प्रकाश टाकते.

ग्रंथ पूर्ण झाल्यावरही विश्वात्मक देवाकडे ज्ञानेश्वरांनी जे 'पसायदान' मागितले आहे, ते त्यांच्या अलौकिक, निःस्वार्थ व निरामय भक्तीचे अपूर्व दर्शन घडवू शकते. ज्ञानेश्वर समाजमनस्क वृत्तीचे संत आणि कवी आहेत. साऱ्या विश्वाच्या आत्यंतिक कल्याणाची त्यांना तळमळ लागून राहिली आहे हेही प्रत्ययाला येते. समाजचिंतक, गुरुभक्त, ईश्वराचा उपासक, श्रीकृष्णाचा प्रेमिक, गीता आणि महाभारत यांचा प्रगाढ अभ्यासक इत्यादी अनेकविध नात्यांनी ज्ञानेश्वर या महाग्रंथात आपल्याला भेटतात;

आणि आनंदाची व तत्त्वविचारांची आपल्यावर उधळण करतात. खरे तर, समग्र ज्ञानेश्वरी म्हणजे ज्ञानेश्वरांच्या बहुरंगी व्यक्तित्वाचा हृद्य आविष्कार आहे. प्रत्येक ओवीवर जणू त्यांच्या मनाची मुद्रा उमटलेली आहे. तुकारामांचा प्रत्येक अभंग ज्याप्रमाणे त्यांच्या विशिष्ट व्यक्तित्वाचा ठसा घेऊन येतो, त्याप्रमाणे ज्ञानेशांची ओवी त्यांच्या प्रभावी व्यक्तित्वाला साकार करते. या ग्रंथाची लोकप्रियता कित्येक शतकांच्या वाटचालीत क्षीणबल होणार नाही, असे वाटते. याचे कारण ज्ञानेश्वरांच्या जीवनाचे आणि व्यक्तित्वाचे उमलते रंग व गंध अवीट आहेत.

ज्ञानेश्वरीतील ज्ञानेश्वर आनंदवादी आहेत; आशावादी आहेत. ते पराभूतप्रवण अथवा दु:खवादी नाहीत. काही तत्त्ववेत्ते इहजीवनातले सौंदर्य नाकारतात. हे सारे मायावी आहे असे सांगून त्याकडे पाठ फिरवितात. जीवनातले दु:खानुभव त्यांना विफलतावादी बनवतात. पण आश्चर्य असे की, ज्ञानेश्वरीत सुख आणि आनंद यांचे दर्शन त्यांनी घडविले आहे. 'येतुलेनि आनंदाच्या राशीवरी बैसावें।' असा सुखद प्रत्यय ज्ञानेश्वरीत पानोपानी येतो. 'मृत्युलोकातली सुखाची कहाणी म्हणजे इंगळांच्या आंथरुणी घेतलेली सुखनिद्रा आहे' याची त्यांना जाणीव आहे. आपल्या श्रोत्यांना ही विदारक कहाणी ते जरूर सांगतात. ते म्हणतात,

जेयाचेनि उजियेडे। उघडति बुद्धिचे डोळे।
जीऊ दोंदावरी लोळे। आनंदाचिया ॥
दिसो परतत्त्व डोळां। पाहो सुखाचा सोहोळा।
रिघो महाबोध सुकाळां -। माजी विश्व ॥
तैसा वाग्विलास विस्तारू। गीतार्थेसी विश्व भरू।
आनंदाचे आवारू। मांडू जगा ॥

व्यक्तिगत जीवनात ज्ञानेश्वरांना पावलोपावली संघर्ष करावा लागला. त्यांना, त्यांच्या भावंडांना तत्कालीन धर्माच्या ठेकेदारांनी बहिष्कृत ठरविले. उपेक्षा, विरोध आणि निंदा यांचे तीव्र चटके त्यांना सहन करावे लागले. पण आश्चर्याची गोष्ट अशी की, ज्ञानेश्वरीत आणि त्यांच्या अन्य रचनांतही या दु:खानुभवांची पुसटही छाया पडलेली दिसत नाही. कवीच्या निर्मितीत त्याचे वैयक्तिक जीवनानुभव अपरिहार्यपणे मिसळून जातात. काही कवी तर आपल्या अत्यंत व्यक्तिगत अनुभवाचे तुणतुणे सतत वाजवीत राहतात. पण ज्ञानेश्वरांनी एका उच्च भूमिकेवरून आपल्या साहित्याची रचना केली आहे.ते अशा उदात्त पातळीवर पोहोचले आहेत की, सारे व्यक्तिगत रागलोभ

गळून गेले आहेत. एक प्रकारची वीतराग मनोवृत्ती त्यांच्या लेखनाची प्रेरक शक्ती बनली आहे. त्यांच्याच शब्दांत सांगायचे झाल्यास

घरिचिया उजियेड करावा। पारखेया आंधारु होआवा।
हे न म्हणे चि पांडवा। दीपु जैसा।
ऐसी सर्वभूतमात्रि। येकपणाची मैत्री।
कृपेची धात्री। आपण जो ॥(१२/४७-४८)

वृक्ष ज्याप्रमाणे जोपासना करणाऱ्यालाही सावली देतो; आणि घाव घालणाऱ्यालांही सावली नाकारीत नाही; तशा समदृष्टीने ज्ञानेश्वरांनी सर्वांकडे पाहिले आहे. 'जो जे वांछील तो ते लाहो।' ही सद्‌भावना ते व्यक्त करतात. आकाशाप्रमाणे निर्लेप असलेला हा संतकवी रसिकांना आणि भाविकांना आपलेसे करून टाकतो. ज्ञानेश्वरांची ही विशेषता त्यांच्या कवितेला आणि जीवनाला एक आगळा गंध देऊन जाते. चंदनाच्या झाडाने कुऱ्हाडीलाही सुवासित करावे, तसे हे अंतर्बाह्य शुचिष्मंत व्यक्तित्व आहे. रवींद्रनाथ टागोरांच्या एका वचनाची येथे अपरिहार्यपणे आठवण होते. 'The sandal tree, as if to prove that man can conquer hate with love, perfumes the axe that lays it low.'

ओपेल नावाच्या एका रत्नाची अशी विशेषता सांगतात की, त्यांच्यात वेगवेगळे रंग झळकताना दिसतात. ज्ञानेश्वरांच्या व्यक्तित्वाबद्दल असेच म्हणता येईल. ज्ञानेश्वरांची बहुमुखी रसिकता हा एक आनंदाचा विषय आहे. अध्यात्माची आणि भक्तीची थोरवी गाताना त्यांच्या प्रतिपादनात कोठेही जडता वा नीरसता आलेली नाही. याचे कारण, ते जन्मजात रसिक आहेत. सहृदयत्व, रसिकत्व आणि विद्वत्व यांचा अपूर्व समन्वय त्यांच्या ठायी सहजपणे झालेला आहे. ज्ञानेश्वरी वाचताना पदोपदी या कवीच्या रसिकतेचे विलोभनीय रंग दिसतात. आपण एका कलाकृतीची निर्मिती करीत आहोत, याची जाणीव आहे. शब्द कसा घडतो, हे आपल्याला कळत नाही, असा विनयोद्गार काढणाऱ्या या प्रतिभावंताने रसभावनांनी आणि शब्द व कल्पना यांच्या चमत्कृतींनी फुलून आलेले एवढे अप्रतिम काव्य निर्माण केले की, ज्याचे अधिराज्य मराठी साहित्यात अबाधितपणे चालू आहे. या रसिकश्रेष्ठ कवीच्या रसलुब्धतेबद्दल संक्षेपाने काही सांगणे अवघड आहे. भाष्य हे मूलतःच तर्ककर्कश असण्याचा संभव अधिक असतो, पण गीतेवरील आपल्या भाष्याला विविध रसांत न्हाऊ घालण्याचे आणि ते भाष्य काव्यदृष्ट्या परिपूर्ण करण्याचे अद्‌भुत कार्य ज्ञानेश्वर

करू शकले. त्यांचा पिंड हा रसिकाचाच आहे. त्यामुळे ज्ञानेश्वरी हे सर्व रसांचे तीर्थस्थान व्हावे यात आश्चर्य नाही. सृष्टीतल्या विविध स्वरूपी आणि सूक्ष्मातिसूक्ष्म सौंदर्याचा संवेद्य मनाने ते स्वीकार व सत्कार करतात. एक प्रकाराच्या निकोप अनुरक्तीने आणि तरीही, अलिप्तपणे ते सृष्टीतल्या रसांचे ग्रहण करू शकतात. रसास्वादाची पद्धती विवरून सांगताना त्यांनी आपल्या उपजत रसिकतेचे दर्शन घडविले आहे. ते म्हणतात, 'शरद ऋतूतल्या पौर्णिमेच्या पूर्ण चंद्रातून झरणाऱ्या अमृताचे कण ज्या मृदुल वृत्तीने चकोराची पिले टिपून घेतात, त्या हळुवार वृत्तीने श्रोत्यांनी माझ्या या कथेचा आस्वाद घ्यावा.' काव्याचा आणि कलेचा हा आस्वाद घेताना मन कसे मुलायम आणि संवेद्य व्हावे, हे एका अभिनव प्रतिमेच्या माध्यमातून त्यांनी सांगितले. पण एवढेच सांगून ज्ञानेश्वर थांबत नाहीत. ते पुढे म्हणतात,

जैसे भ्रमर परागु नेति । परि कमळदळे नेला नेणति ।
तैसी परि आहे सेविती । ग्रंथीं इये ॥
कां आपुला ठाउ न संडिता । आलंगिजे चंद्रु प्रकटता ।
हा अनुरागु भोगितां । कुमुदिनी जाणे ॥

भ्रमराचा आणि चंद्रविकासी कमलिनीचा, असे दोन दृष्टांत घेऊन ज्ञानेश्वरांनी कल्पकतेची, भावनात्मकतेची आणि रसिकतेची जी उंची गाठली आहे; ती शब्दातीत आहे. कमलिनी आणि चंद्रकिरण, भ्रमर आणि कमळ यांच्या माध्यमांतून केवळ सौंदर्यवादी कवीच आपले हृदयस्थ भाव व्यक्त करतो. ज्ञानेश्वर हे निर्भरशील, सौंदर्यनिष्ठ, जीवनवादी कवी आहेत. त्यांना भव्य-दिव्याचे आकर्षण आहे. कोमलता आणि मधुरता त्यांना पुलकित करू शकते. सृष्टीतले नानाविधत्व हा त्यांच्या चिंतनाचा विषय आहे. आकाशाची निळाई, सागरावर उचंबळून येणाऱ्या लाटा, सूर्यप्रकाशातील संजीवकता, चंद्रकिरणातली शीतलता, वाऱ्याच्या झुळकी, फुले आणि फुलपाखरे, पतिव्रतेच्या पतिनिष्ठेतले पवित्र सौंदर्य, प्रथमवयसा काळी अंगनेच्या अंगावर दिसणाऱ्या लावण्याची नव्हाळी, पौर्णिमेने चंद्राला दिलेले आलिंगन, वसंत ऋतूतली प्रिय व्यक्तीची संगत, पिकलेल्या सुखाचा सुगंध, श्रीकृष्णाचा श्यामल रंग, हिमालयावरील सरोवरे अशा ऐंद्रिय आणि अतींद्रिय, चित्रविचित्र सौंदर्यावर मनःपूर्वक लुब्ध झालेले ज्ञानेश्वर हे सौंदर्याचे आणि दिव्य प्रेमाचे कवी आहेत, यात शंका नाही. वस्तुतः संतकवी प्रामुख्याने विरक्तीची तार छेडतो. इहजीवनातील सुंदरता

शंका नाही. वस्तुत: संतकवी प्रामुख्याने विरक्तीची तार छेडतो. इहजीवनातील सुंदरता त्याला आकृष्ट करून घेत नाही; पण या जीवनाच्या रसगंधात ज्ञानेश्वर सुस्नात झाले आहेत, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. मात्र त्यांच्या सौंदर्यासक्त मनाला कोठेही वासनेचा आणि विकृतीचा लेशमात्रही स्पर्श होऊ शकलेला नाही, ही विशेषता आहे. स्त्री-पुरुषातील शृंगार काही ओव्यांतून त्यांनी सूचित केलेला असला तरी त्यातील विचाराचे निखळ सौंदर्य तेवढे आपल्याला जाणवत राहते. याचा अर्थ असा की, ज्ञानेश्वरांच्या व्यक्तित्वातच कवित्व आणि रसिकत्व ओतप्रोत ओथंबलेले असून त्या गुणांना जीवनविषयक सखोल चिंतनाचे व संतत्वाचे अधिष्ठान लाभले आहे. 'बोलीं अरूपाचें रूप दावीन' ही तर ज्ञानेश्वरांची प्रतिज्ञा आहे. त्यांची वृत्ती गद्यप्राय **(Prosaic)** नाही. एका समृद्ध व्यक्तित्वाच्या कवीश्वराने गीतेतील तत्त्वज्ञान सांगताना जणू साऱ्या जीवनाचाच सुंदर वेध घेतलेला आहे.

एक कवी- सर्व रसांवर उत्कट प्रेम करणारा रससिद्ध कवी म्हणून ज्ञानेश्वरांचे व्यक्तित्व जसे ज्ञानेश्वरीत दिसते, तसे इतर कवींचे दर्शन त्यांच्या काव्यातून होऊ शकत नाही. याचे काय कारण असावे? ज्ञानेश्वरांच्या जीवनाचे हेच एक रसमय, महनीय काव्य आहे. त्यांच्या मनोवृत्ती पूर्णपणे प्रकाशित झालेल्या पूर्णचंद्राप्रमाणे सकल आहेत. म्हणून तर ज्ञानेश्वरीत कोठेही विफलतेचे, अगतिकतेचे सूर आढळत नाहीत. विकास पावलेल्या मनाच्या भूमीतून सुगंधी प्रतिभेचे नि:श्वास प्रकट व्हावेत हे स्वाभाविकच वाटते. ज्ञानेश्वरात भक्ती, ज्ञान आणि कर्म यांची पूर्णता आहे. श्रेष्ठ जीवनादर्शाच्या भोवती त्यांनी अनेक प्रदक्षिणा घातल्या आहेत. ज्याची इच्छाशक्ती महान, ज्याच्या हृदयातली माणुसकी व्यापक, ज्याच्या डोळ्यांतली स्वप्ने विशाल, त्याची प्रतिभा सर्वार्थांनी समर्थ झाली नाही, तरच ते आश्चर्याचे ठरेल. ज्ञानेश्वरांचे स्वप्न अतिभव्य आणि नितांत सुंदर आहे. इतके की, त्यांच्या संवेदनशील मनाला सृष्टीतले कोणतेही वैगुण्य खपत नाही. ही सृष्टी ज्ञान व आनंद यांनी परिपूर्ण व्हावी हा त्यांचा ध्यास आहे. अपूर्णतेचे शल्य त्यांना टोचत राहते. म्हणूनच 'तापहीन मार्तंड' व 'अलांछित चंद्रमे' यांची कल्पना त्यांना मांडावीशी वाटली. जीवनाला परम मांगल्य देणाऱ्या मूल्यांचा जयघोष ज्ञानेश्वर पुन्हा पुन्हा करतात. त्यांनी स्वत:च म्हटल्याप्रमाणे त्यांच्या कवित्वाला आणि रसिकत्वाला परतत्त्वाचा पावन स्पर्श झाला आहे. हेच त्यांच्या व्यक्तित्वसंपन्नतेचे अनुपम लक्षण आहे.

ज्ञानेश्वरी वाचताना, एकेका ओवीचा मनातल्या मनात अनुभव घेताना एक

क्षण असा येतो, की स्वतः ज्ञानेश्वरच आपल्या मनाच्या गवाक्षापाशी येऊन उभे राहतात. त्या धीरललित मूर्तीच्या मुद्रेवर एक निष्पाप, वत्सल, प्रसन्न स्मित चमकत असते. त्यांना पाहिल्यावर वाचकांच्या मनात भक्तीची एक लाट उचंबळून येते. आपली सारी व्यक्तिगत स्वरूपाची सुखदुःखे वाचक विसरून जातात. ज्ञानेश्वरीतून दिसणारे ज्ञानेश्वर वाचकांच्या पाठीवरून आपला प्रेमळ, आश्वासक, प्रेरक हात फिरवितात. त्यांना धीर देत आपल्या संजीवक शब्दांतून सांगत राहतात.

'जग जसे आहे तसेच ते स्वीकारावे या मताचा मी नाही. या जगात अनेकविध दुःखे आणि समस्या आहेत. मनुष्य आभासात्मक सुखाला कवटाळून बसतो. इंद्रियपरायण होतो. धर्म आणि कर्तव्य विसरून तो आयुष्यात भटकत राहतो. त्याला मार्ग दाखविण्यासाठी 'मार्गाधारें वर्तावें' हे सांगण्यासाठी मी 'अविवेकाची काजळी फेडुनी विवेकदीप उजळण्याचा प्रयत्न केला. दुरितांचा अंधार नाहीसा होऊन स्वधर्म-सूर्याच्या प्रकाशाने विश्व धवळून निघावे म्हणून मी धडपडत राहिलो. आजचे विकारग्रस्त, स्वार्थकेंद्रित जग बदलून ईश्वरनिष्ठांची मांदियाळी उत्पन्न व्हावी, प्रेम, क्षमा, समता, शुचिता या दैवी गुणांची समाजात वाढ व्हावी; आसुरी गुण पराभूत व्हावेत. माझी सुखाची व आनंदाची ही व्याख्या आहे. अवघाचि संसार सुखाचा व्हावा. आनंदाचे सूर मुखरित व्हावेत. याचसाठी माझा अट्टहास आहे.'

ज्ञानेश्वरीतले साहित्यगुण ज्ञानेश्वरांच्या व्यक्तित्वाशी इतके तादात्म्य पावले आहेत की, ज्ञानेश्वर आणि ज्ञानेश्वरी परस्परांहून वेगळे काढणे कसे शक्य आहे? ज्ञानेश्वरी वाचताना, ओव्यांचा आस्वाद घेताना ज्ञानेश्वरांचे अनेकरंगी व्यक्तित्व वाचकाच्या दृष्टीसमोर उभे राहते. त्या व्यक्तित्वाला विशुद्ध आनंदाचे अधिष्ठान आहे. ते शुभंकर मन आपल्याला रसभावगांच्या सुगंधयात्रेत ओढून नेते. त्यांचा स्पर्श आपल्यात परिवर्तनाची एक लाट निर्माण करतो. ज्याने ज्ञानेश्वरी मनःपूर्वक वाचली, त्याला ज्ञानेश्वरांचीच भेट मिळाली यात शंका नाही; आणि ज्याला ज्ञानेश्वर भेटतात तो पूर्वीचा राहत नाही. तो बदलत जातो. त्याला सर्व काही मिळते. त्याला 'पसायदान' मिळते. त्याला 'अमृतानुभव' येतो.

ooo

# संत नामदेवांच्या मराठी – पंजाबी काव्यधारा

संत नामदेवांचे व्यक्तिमत्व अनेकांगी आहे. ते विठ्ठलाचे अनन्यभक्त,, आर्त भक्तीने ओथंबलेल्या उत्कट काव्याचे कवी. लोकांचे प्रबोधन करणारे रसाळ वाणीचे कीर्तनकार, भागवत संप्रदायाला महाराष्ट्राच्या भूमीत समर्थ आधार देणारे संप्रदायाचे श्रेष्ठ प्रवक्ते आणि भागवत धर्माची पताका खांद्यावर टाकून पंढरीपासून पंजाबपर्यंत विठ्ठलभक्तीचा प्रसार करीत गेलेले एक ईश्वरनिष्ठ प्रचारक असे अनेक पैलू त्यांच्या व्यक्तित्वाचे सांगता येतात. पंजाबमध्ये त्यांनी सुमारे वीस वर्षे वास्तव्य केले. तेथील लोकभाषेतून शेकडो अभंग लिहिले. लोकजीवनाशी ते समरस झाले. नामदेवांच्या व्यक्तिमत्वाची आणि भक्तिकाव्याची मुद्रा पंजाबी जनतेवरही अशी स्पष्टपणे पडली की, नामदेवांची मंदिरे देखील तेथे उभारण्यात आली. शीख धर्माचे प्रणेते गुरू नानकदेव यांनी नामदेवांपासून प्रेरणा घेतली अशी इतिहासाची साक्ष आहे. शीखांच्या 'ग्रंथसाहेब' या धर्मग्रंथात संत नामदेवांची एकसष्ट पदे समाविष्ट झालेली आहेत. शूर मराठ्यांच्या फौजा पुढे अटकेपार गेल्या आणि त्यांनी समशेर गाजवली हा इतिहास घडण्याच्या काही शतके आधीच नामदेवांच्या प्रतिभासंपन्न वाणीने उत्तर हिंदुस्थान जिंकून घेतला होता. नामदेवांच्या पावलावर पाऊल टाकून उत्तरेत आणखी कित्येक संत निर्माण झाले. भारताच्या आध्यात्मिक इतिहासात नामदेव हे एक अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असे अभिमानास्पद व्यक्तित्व होऊन गेले यात संशय नाही.

भक्तीच्या सागरावर विलक्षण आवेगाने उचंबळून आलेली एक विलोभनीय लाट म्हणजे नामदेव. कीर्तनाच्या रंगात सर्वस्वी रंगून नाचणारा आणि आपल्या हृदयातील भक्तिज्ञानाच्या ज्योतीने समाजजीवनात ज्ञानदीप उजळणारा हा महनीय संत आहे. 'नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी॥' ही त्यांची प्रतिज्ञा होती. असे संत एखाद्या उदात्त स्वप्नासाठी जगत असतात. एखाद्या भव्य आदर्शाकडे समाजाला घेऊन जाण्याची त्यांची तीव्र आकांक्षा असते. संत नामदेवांनी मराठी आणि हिंदी-पंजाबी साहित्याला भक्तिकाव्याची अपूर्व देणगी दिली. लोकमानसात नामदेवांची प्रतिमा अत्यंत दृढपणे बसली आहे. ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम या नावांच्या भोवती

पावित्र्याचे वलय निर्माण झालेले आहे. या नावांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाला नवा अर्थ मिळवून दिला. याच नावांनी मराठी साहित्याचे शिल्प घडविले. ही नावे वगळली तर महाराष्ट्राच्या इतिहासातला संतत्वाचा आणि कवित्वाचा प्रकाश ओसरून जाईल. नामदेवांची कविता कोवळी, हळवी, हृदयाला सहज भिडणारी, भक्तीच्या सुगंधाने ओथंबलेली उत्कट अशी आहे. प्रसाद, माधुर्य आणि सौकुमार्य या गुणांनी ती नटलेली आहे. नामदेवांच्या हृदयाचा शब्दरूप हुंकार म्हणजे त्यांची कविता. मग ती मराठीतली असो अथवा पंजाबी भाषेतली असो. भाषा हे कवितेचे एक वाहन असते. कवितेचा आत्मा म्हणते तिची रसात्मकता. शब्दात व अर्थात कवीचे अंतःकरण नसेल तर ती कविता ही केवळ तांत्रिक रचना ठरते. नामदेवांसारख्या भावकवीला काव्याच्या तंत्राची क्षिती बाळगण्याचे काहीच कारण नव्हते. प्रगाढ भक्तीच्या भावनेने स्पंदन पावणारे जिवंत हृदय हेच नामदेवांच्या कवितेचे सारसर्वस्व असते. असे कवी भाषेला व व्याकरणाला वाकवतात. तंत्राला नमवतात. स्वतः त्यांनीच एका अभंगात म्हटले आहे. 'टाळ-मृदंग पूर्वेकडे, आमुचे गाणे पश्चिमेकडे' गाणे जेव्हा हृदयात भरलेले असते, उचंबळून आलेले असते तेव्हा त्याला टाळ आणि मृदंग याची जरूर नसते. नाद आणि लय यांची खटपट करावी लागत नाही. फुलाला सुगंध असला की त्याच्याभोवती रुंजी घालण्यासाठी भ्रमराला आमंत्रण द्यावे लागत नाही. त्याप्रमाणेच अंतःकरणाची तार झंकारली की सूर जुळून येतात. शब्द मिळून येतात. अर्थ धावत येतो. संतांच्या काव्यात रस असल्यामुळे रंग आणि गंध आपोआपच आलेले आहेत. नामदेवांच्या काव्यात त्यांच्या वत्सल, कोवळ्या आणि आर्त मनाची थरथर अनुरूप शब्दांतून प्रकट झाली आहे. मराठीत भावकविता हा काव्यप्रकार ज्यांनी प्रथम रुजवला त्यात ज्ञानदेव आणि नामदेव या दोन संतकवींची नावे अग्रभागी असतील. प्रथम नामदेवांची एक मराठी रचना पाहू आणि नंतर पंजाबी भाषेतील त्यांच्या काही कवितांचा आस्वाद घेऊ.

सुखाचे हे सुख श्रीहरीमुख । पाहताही भूक तहान गेली ॥
भेटली भेटली विठाई माऊली । वासना निवाली जिवांतील ॥
चंद्रासी चकोर मेघासी मयूर । वाटे तैसा भर आनंदाचा ॥
नामा म्हणे पाप ताप आणि दुःख । गेले झाले सुख बोलवेना ॥

श्रीहरीचे मुख हेच सुखाचे सुख आहे. ते पाहताक्षणीच तहान भूक मावळली.

पाप-ताप, दुःख निरसून गेले. वासनेचा अंत झाला. कारण विठाई माऊलीचे दर्शन झाले. चकोराला चंद्र भेटला. मोराला मेघ दिसला. आनंदाची एकच लाट चित्तांतून ओसंडून वाहू लागली. नामदेवांची ही भावावस्था या मराठी अभंगात चित्रित झाली आहे. साध्या भावमय शब्दांतूनच कवितेला कसे रूप येऊ शकते याचे हे एक उदाहरण आहे. वत्सल आणि करुण रसाचे अनेक पाझर त्यांच्या काव्यातून वाहातात. भक्ती ही एक कधीच न संपणारी सुंदर बेहोषी असते. नामदेवांच्या काव्यात स्वच्छंद आणि आर्त भक्तीचे जे स्वैरसुंदर नृत्य आहे ते अपूर्व स्वरूपाचे आहे असेच म्हणावे लागते.

प्रेमपिसे भरले अंगी । गीतसंगे नाचो रंगी ॥
कोणे वेळे काय गाणे । हे तो भगवंता मी नेणे ॥

कोणता तरी ध्यास, कोणते तरी पिसे अंगी भरल्याशिवाय गाणे जन्माला येत नाही. हेच खरे.

नामदेवांच्या पंजाबी गीतातही भक्तिप्रेमाचा सुवास असाच दरवळताना दिसतो. काहीशा अलंकारिक भाषेत बोलायचे झाल्यास मी असे विधान करतो की, नामदेव नावाच्या एका अभिजात कलावंत शिंप्याने मराठी व पंजाबी भाषेच्या अंगावर आपल्या तलम भावनेच्या धाग्यांनी शिवलेली सुंदर वस्त्रे घातली आणि या दोन भाषांच्या सौंदर्यात त्यामुळे महनीय भर पडली. 'पंजाबी काव्यात भक्तीची धारा मिसळण्याचे कार्य नामदेवांनी केले त्यांच्या काव्यात तत्कालीन सामाजिक परिस्थितीचेही रंग मिसळलेले दिसतात. नामदेव हे दर्जी किंवा शिंपी. परंपरागत समाज-व्यवस्थेत वर्णीय रचनेत शिंप्याचे स्थान उपेक्षित असेच होते. काही जाती-जमाती हलक्या मानण्याची एक दुष्ट प्रथा होती. आजही या प्रथेचे संपूर्ण उच्चाटन झालेले दिसत नाही. महाराष्ट्रात भक्तिसंप्रदायाने भक्तीच्या क्षेत्रात वर्ण आणि जाती यांना कोणतेही महत्त्व नसून केवळ भक्ती हीच या क्षेत्रात प्रतिष्ठित होण्यासाठी आवश्यक अशी सनद आहे हे स्पष्ट करून निदान भक्तीच्या प्रदेशात तरी समतेचे तत्त्व दृढ केले. त्याचा परिणाम असा झाला की सर्व जातीतून श्रेष्ठ संत निर्माण झाले. नामदेवांच्याच कालखंडात, नामदेवांच्याच प्रभावळीत चोखामेळा, जनाबाई, कान्होपात्रा, गोरा कुंभार, सावता माळी, नरहरी सोनार, सेना न्हावी असे भिन्न भिन्न स्तरांतील भक्त एकत्र येऊन विठ्ठल नामाचा जयघोष करू लागले. मर्यादित अर्थाने ही सामाजिक परिवर्तनाची पहाट होती. आणि ही पहाट जन्माला घालण्याचे कार्य ज्या संतांनी केले त्यात नामदेवांचे नाव इतिहासाला

आवर्जून घ्यावे लागेल. पण आपल्या शिंपी जातीमुळे तथाकथित उच्चवर्णीय कर्मठ लोक आपल्याला अस्पृश्य मानतात हे शल्य नामदेवांच्या हृदयात टोचत होते. आपल्या एका कवितेत ते म्हणतात,

मोकऊ तू न बिसारी तूं न बिसारी ॥
तूं न बिसारी रामइआ । रहाऊ ॥
आलावंती इहु भ्रमु जोहै
मुझ उपरि सभ कोपिला ॥
सूदु सूदु करि मारि उठाइउ
कहा करउ बाप बीठुला ॥
मूए हुए जऊ मुकति देहुगे
मुकति न जानै कोइला ॥
ए पंडिआ मोकऊ ढेढ कहत
तेरी पैज पिछऊडी होईला ॥
तू जू दइआलु क्रिपालु कहीअतु है
अतिभुज भइअु अपारला ॥
फेरि दिआ देहुरा नामे
कऊ पंडीअन कऊ पिछ वारला ॥

या कवितेत उत्कटता तर आहेच पण भक्तीच्या सामर्थ्याने भक्ताच्या मनात नवशक्तीचा कसा संचार होऊ शकतो हे काहीशा आक्रमक पद्धतीने नामदेवांनी स्पष्ट केले आहे. कनिष्ठ वर्णाचा किंवा आपण अस्पृश्य असे समजून आपल्याला अपमानित करणाऱ्या आणि परमेश्वरदर्शन घेऊ न देणाऱ्या पंड्यांना कवीने येथे निरुत्तर केले आहे.

'हे प्रभो, हे विठ्ठला, हे रामचंद्रा, हे सर्वत्र रममाण होणाऱ्या ईश्वरा मला विसरू नकोस. गर्वाने आणि अज्ञानाने भ्रमिष्ट झालेल्या या पंड्यांनी 'शूद्र शूद्र' असे माझ्यावर मोठ्याने ओरडून त्यांनी मला मारहाण केली. विठ्ठला केवढा हा अन्याय आहे ! मेल्यानंतर मला मुक्ती नको आहे. मृत्यूनंतर मिळालेल्या मुक्तीमुळे माझा उद्धार झाला हे कोणालाही कळणार नाही. जिवंत असतानाच मला मुक्ती मिळावी. अरे पंड्यांनो, तुम्ही मला अस्पृश्य समजता काय ? अस्पृश्य म्हणजे कोण याबद्दल माझ्याशी पैज

लावायला तयार आहात काय ? परमेश्वरा ! माझ्यावर ओढवलेल्या प्रसंगात तुमचा काय संबंध आहे ? पण माझा अपमान, हा तुमचाच अपमान आहे. तुम्ही तर कृपावंत, दयावंत, बलवंत म्हणून प्रसिद्ध आहात. हा माझा अपमान तुम्हाला कसा काय सहन होतो ? इतक्यात एकाएकी मंदिराचे तोंड नामदेवाकडे फिरले आणि त्या पंड्यांच्या बाजूला पाठ झाली.'

ही कविता सामाजिक आशयाने संपन्न आहे. जाती पातींची क्षुद्र कुंपणे भक्तीचे पंख असणाऱ्या भावशक्तीला सहज ओलांडता येतात. ज्याच्या अंतःकरणात ईश्वरभक्तीचे अमृत साठलेले आहे, ईश्वर नामाचे संगीत ज्याच्या कानामनात घुमत आहे, ज्यांच्या दृष्टीला सर्वत्र ईश्वरी सौंदर्य दिसत आहे अशा श्रेष्ठ भक्ताला जातीच्या आणि वंशाच्या अतिक्षुल्लक कारणांवरून मंदिरात प्रवेश न देणारी परंपरा ही अज्ञानाची, दुष्टपणाची आसुरी परंपरा आहे. या परंपरेचा बळी नामदेवासारखा भक्त होतो ही घटना म्हणजे संस्कृतीची विटंबना आहे. अखेर ईश्वर कर्मठ, मूर्ख परंपरावाद्यांकडे पाठ फिरवतो आणि भक्ताला अभिमुख होऊन त्याला आनंदभराने आलिंगन देतो हा आशय नामदेवांनी आपल्या चित्रदर्शी शब्दांतून विशद केला आहे. शब्दज्ञानी पंडितापेक्षा भक्तीलाच वाहिलेला भक्त परमेश्वराला प्रिय असतो. भक्तीचे ज्ञान ज्याला झाले नाही त्याच्यासारखा दुसरा अज्ञानी कोण असेल ? गीतेतही 'न मे भक्तः प्रणश्यति।' असे म्हणून भक्तीचाच डिंडिम वाजवला आहे.

नामदेवांच्या आणखी एकाच पंजाबी कवितेचा विचार करू. यातही भक्ती आहे. पण आपल्या भक्तीचे स्वरूप आपल्या शिंप्याच्या व्यवसायाच्या माध्यमातून नामदेवांनी रूपकात्मक पद्धतीने प्रकट केले आहे. ते म्हणतात,

मन मेरे गजु जिव्हा मेरी कातीमपिमपि काटउ जम की फासी ॥
कंहा करउ जाती कह करउ पाती
रामको नामु जपउ दिनराती
रांगनि रागऊ सीवनी सीवउ
राम नाम बिनु घरीअन जीवउ ॥
भगति करउ हरिके गुन गावउ
आठपहर अपना खसमु घिआवउ ॥
सुईनेकी सुई रूपे का धागा

नामेका चितु हरिसउ लागा ॥

माझे मन हा गज, जीभ ही कातर. या दोहोंच्या मदतीने मी यमाचा फास हळू हळू कापीत आहे. जातापातीशी मला काहीच कर्तव्य नाही. रात्रंदिवस रामनामाचा जप करीत आहे. कपडे शिवताना हाच जप चालू असतो. रामनाम स्मरणाशिवाय मी घटकाभरही रहात नाही. अष्टौप्रहर हे स्मरण चालू आहे. माझ्या सुईला मी सोन्याची समजतो. दोरा रुप्याचा मानतो. माझे मन परमेश्वराकडेच लागलेले आहे.

मनाचा गज आणि जिभेची कातरी घेऊन यमाचे बंधन कापणारे नामदेव येथे दिसतात. भक्तीच्या कवितेचा हा एक उत्कृष्ट नमुना मानावा लागेल. ईश्वराच्या नामघोषाने यमपाशही छेदता येतो. मृत्यूवरही मात करता येते. आपल्या आयुष्याचे कापड शिवणारा हा नामशिंपी समाजजीवनाचेच कपडे शिवीत होता.

पंजाबी भाषेतल्या नामदेवांच्या दोन कविता वानगीदाखल येथे दिल्या आहेत. अशा एकसष्ट कविता 'ग्रंथसाहेबात' समाविष्ट आहेत. 'गुरू नामदेवजी की मुखबानी' या नावाने त्या प्रसिद्ध आहेत. प्रत्येक शीख या कवितांना भक्तिपूर्वक वंदन करतो. पंजाबीतल्या या कवितांचे सौंदर्य केवळ उल्लेखनीय नाही तर ते चिंतनीयही आहे.

या काव्यात फार्सी शब्दही ठिकठिकाणी आले आहेत. याचे कारण उत्तर हिंदुस्थानात चौदाव्या शतकात मुसलमानी सत्तेचे प्राबल्य वाढत चाललेले होते. पुढील ओळी वाचल्यानंतर पंजाबी भाषेवरला फार्सीचा प्रभाव कसा होता हे जाणवेल.

मै अंधुले की टेक तेरा नामु खुंदकारा ।
मैं गरीब मैमसकीन तेरा नामु है अधारा ।
करीमा रहीमा अलाह तू गनी ।
हाजराहजूरी दरि पेसि तू मनी ।

याही कवितेत ईश्वरविषयक भक्तीचे स्वच्छ दर्शन घडते. 'हे प्रभू, माझ्यासारख्या पामराला तुझे नाव हाच आधार आहे. तू श्रेष्ठ आणि दानशूर आहेस. दृष्टीहीनाला काठी जेवढी महत्वाची तितकाच तू मला महत्वाचा वाटतोस.'

कोठे पंढरी आणि कोठे पंजाब ? पण मानवप्रेमाने आणि ईश्वरनिष्ठेने भारलेला हा मराठी संत ज्ञानेश्वरांनी समाधी घेतल्यानंतर चालत चालत पंजाबमध्ये जाऊन पोहोचला. गुजराथ राजपुताना संयुक्तप्रांत (उत्तरप्रदेश) आणि पंजाब या प्रदेशात त्यांनी संचार करून समाज मनाच्या भूमीत ईश्वरभक्तीची बीजे पेरली. नामदेव हे

पिंडाने भक्त आणि प्रचारक होते. कीर्तनाच्या माध्यमातून त्यांनी सतत प्रबोधन केले. पंजाबात तर इस्लामी आक्रमणामुळे धर्ममूल्ये संकटात सापडली होती. संत नामदेव आणि गुरूनानक हे पंजाबचे दोन रक्षक होते असेच म्हणता येईल. पंजाब प्रांतात अस्तंगत होत चाललेली संस्कृती पुन्हा नामदेवांनी तेवत ठेवली. संस्कृतिरक्षणाचे आणि संवर्धनाचे कार्य त्यांनी केले. नामदेवांची मंदिरे पंजाबात आणि राजस्थानात अनेक ठिकाणी आहेत. गुजरातचे श्रेष्ठ संत नरसी मेहता यांनीही आपल्या काव्यातून नामदेवांचा गौरव केला आहे.

सारांश, कवी म्हणून आणि एक भक्त व समाज प्रबोधन करणारा संत म्हणून नामदेवांची योग्यता महान आहे हे एक ऐतिहासिक सत्य आहे. नामदेवांच्या हिंदी व पंजाबी कवितेचा अभ्यास महाराष्ट्रातही अधिकांशाने झाला पाहिजे. या संताने मागितलेले 'पसायदान' असे आहे.

आकल्प आयुष्य व्हावे तया कुळां ।
माझिया सकळा हरिच्या दासां ॥
कल्पनेची बाधा न हो कोणे काळी ।
हे संतमंडळी सुखी असो ॥
अहंकाराचा वारा न लागो राजसा ।
माझ्या विष्णुदासा भाविकासी ॥
नामा म्हणे तया असावे कल्याण ।
ज्यामुखी निधान पांडुरंग ॥

ooo

# ज्ञानेश्वरांच्या जीवनदृष्टीचे काही पैलु

काही साहित्यकृती चिरतारुण्याचे वरदान घेऊन येतात. शतके उलटली तरी त्याचे सौंदर्य आणि यौवन अबाधित राहते. खरे तर सृष्टीतल्या साऱ्या सुंदर-असुंदर वस्तूंच्या कपाळी विनाश लिहिलेला आहे. पण शब्दांत खोदलेली काही ललितलेणी मात्र याला अपवाद ठरली आहेत. रामायण महाभारताचा उल्लेख या संदर्भात केला जातो. प्रत्येक भाषेच्या इतिहासात चिरंतनाचा ताम्रपट लाभलेल्या काही कलाकृती असतात. मराठी भाषेचा आणि साहित्याचा विचार करताना प्रथम ज्ञानेश्वरी आपल्या दृष्टीसमोर एखाद्या मानस्तंभासारखी उभी राहाते. सातशे वर्षांपूर्वी लिहिली गेलेली ही साहित्यकृती आजही भाविकांना रसिकांना आणि चिकित्सकांना आकृष्ट करून घेते. सातशे वर्षांत काळाच्या ओघाबरोबर कितीतरी साम्राज्ये आणि सिंहासने वाहून गेली. पण ज्ञानेश्वर नावाच्या एका कोवळ्या युवकाने लिहिलेला एक काव्यग्रंथ मात्र काळाच्या विध्वंसकतेला न जुमानता रसिक मनाची तार छेडीत आहे. हा चमत्कार नव्हे काय? एकाद्या साहित्यकृतीला असे चिरंजीवित्व कशामुळे लाभते? तिच्यातली आवाहनक्षमता सदैव ताजी टवटवीत का असते? या प्रश्नांची उत्तरे सहजगत्या सापडतील असे नव्हे. पण ती शोधण्यात एक प्रकारचा अवीट आनंद असतो.

श्रेष्ठ साहित्यकृतीला साहित्यिकाच्या व्यक्तित्वाचा घनिष्ठ स्पर्श झालेला असतो.त्याच्या मनाचे आणि भावभावनांचे रंग त्या साहित्यात उतरलेले असतात. 'ज्ञानेश्वरी' हा ज्ञानेश्वरांच्या उदात्त मनाचा, सुजन प्रवृत्तीचा आणि सुंदर कल्पनांचा विलक्षण आविष्कार आहे. केवळ काव्यसौंदर्याच्या दृष्टीने विचार केल्यास मराठीतला हा अद्वितीय ग्रंथ ठरावा. कारण शब्द, रस आणि कल्पना यांचे 'ज्ञानेश्वरी' लावण्यरत्नभांडार मानले जाते. ज्ञानेश्वरांची कविता त्यांनी केलेल्या सरस्वतीच्या वर्णनाप्रमाणे 'अभिनववाग्विलासिनी' आहे यात शंका नाही किंवा महाभारताचे वर्णन करताना त्यांनी 'की अभिनव उद्यान विवेकतरूचे' असे म्हटले आहे. हे विशेषण 'ज्ञानेश्वरी'लाही यथार्थपणे साजून दिसते. या ग्रंथाच्या लोकप्रियतेची मीमांसा अनेक दृष्टींनी करता येईल. एका अपूर्व साहित्यकृतीची कलात्मक निर्मिती करावी असा हेतु

ज्ञानेश्वरांच्या मनात नव्हता असे नाही. सृष्टीतल्या नानाविध सौंदर्यांचे मनस्वी आकर्षण असलेल्या या कवीच्या प्रत्येक ओवीला कलात्मक जाणीवेचा स्पर्श झालेला असला तर त्यात आश्चर्य नाही. महाकवींच्या प्रतिभेशी तुल्यबळ अशीच ज्ञानेश्वरांची 'नवनवोन्मेषशाली' प्रतिभा आहे हे निर्विवाद. पण केवळ प्रतिभासामर्थ्यामुळेच साहित्य महनीय ठरत नाही. साहित्याची महात्मता त्यातून व्यक्त होणाऱ्या जीवनदृष्टीवर अवलंबून असते. ज्ञानेश्वरांच्या जीवनदृष्टीचा सुगंध 'ज्ञानेश्वरी'ला येत नसता तर तिला शेकडो वर्षे रसिकांच्या मनात स्थान मिळाले असते काय हा प्रश्न आहे.. 'ज्ञानेश्वरी'त 'शब्द जैसे कल्लोळ अमृताचे' असे शब्दसौंदर्य आहे. पण ज्ञानेश्वरांच्या हृदयस्थ भावनांची आणि जीवनविषयक विचारांची श्रीमंती प्रकट करणारे गुणही आहेत जीवनाकडे सूक्ष्म आणि संवेद्य दृष्टीने पाहून या जीवनाला उन्नतीच्या शिखरावर नेण्याची धडपड करीत राहण्याची एक आशावादी प्रवृत्ती ज्ञानेश्वरांत स्पष्टपणे जाणवते. मला वाटते यातच ज्ञानेश्वरीच्या दीर्घकालीन लोकप्रियतेचे रहस्य सामावले आहे.

या संतकवीच्या विकसित जीवनदृष्टीचे कोवळे सुगंधी किरण जेव्हा वाचकांना जागृत करतात, तेव्हा त्यांचे जीवन हळूहळू उजळू लागते. माणसासमोरच्या वाटा उजळण्यासाठीच आपण लिहावे असे ज्ञानेश्वरांना वाटत होते. ही 'भावार्थदीपिका' लिहिताना त्यांनी म्हटले आहे, 'मी अविवेकाची काजळी फेडूनि विवेकदीप उजळी' ज्ञानेश्वरांच्या या जीवनदृष्टीचा एखाददुसरा पैलू या लेखातून मला स्पष्ट करायचा आहे. कोणताही कवी किंवा लेखक त्याच्या विशिष्ट जीवनदृष्टीमुळेच लक्षणीय ठरतो. ज्ञानेश्वरांचा हा दृष्टिकोन त्यांनी ग्रंथाच्या शेवटी लिहिलेल्या 'पसायदाना'तून उत्कृष्टपणे व्यक्त झाला आहे. 'पसायदान' हे ज्ञानेश्वर नावाच्या महात्म्याचे भव्य स्वप्न आहे. केवळ 'पसायदान' वाचले तरी ज्ञानेश्वरांच्या निरामय, विशाल आणि सर्वसमावेशक सहानुभूतीची कल्पना येते. पसायदानाला कोणत्याही संकीर्ण विचाराचा स्पर्श झालेला नाही. कोणतेही कुंपण नाही. पंखांच्या भरारीला ज्याप्रमाणे सारे आकाश मोकळे असावे, त्याप्रमाणे ज्ञानेश्वरांच्या विचारपक्ष्याने उदात्ताच्या गगनात मुक्तपणे झेप घेतली आहे. त्यांच्या दृष्टीसमोर दुष्टांची दुष्टता आणि अधर्माचा अंधार दोन्ही निरसून गेली आहेत. पापी माणसाचे मन:परिवर्तन होऊन त्याच्याही मनात माणुसकीचे वृंदावन उभे केले आहे. ज्ञानेश्वरांच्या या आदर्श सृष्टीतले चंद्र आणि सूर्य 'निष्कलंक' आणि 'तापहीन' आहेत. 'ईश्वरनिष्ठांची मांदियाळी' निर्माण झाली आहे. द्वेषमत्सराचा वारा ओसरून गेला आहे. प्राणिमात्रात प्रेमाची उत्कट भावना उचंबळून आली आहे.

आपापल्या इच्छेप्रमाणे त्यांना फळ मिळत आहे.

**निखळ जीवन प्रेमाचे द्योतक जीवन प्रेमाचे द्योतक**

ज्ञानेश्वरांनी रेखाटलेले जीवनाचे हे अतिभव्य चित्र त्यांच्या निखळ जीवनप्रेमाचे द्योतक आहे. हृदयाच्या रंगांनी हे चित्र त्यांनी तन्मयतेने रंगवले आहे. माणसाच्या माणूसपणाची ध्वजा फडकत रहावी आणि हा माणूस उत्तरोत्तर अधिक सुखी व संपन्न व्हावा हा ध्यास त्यांनी घेतला आहे. ज्ञानेश्वरीतले सौंदर्य ज्ञानेश्वरांच्या या प्रवृत्तीत भरलेले आहे. 'ज्ञानेश्वरी' त हा भाव पुन्हा पुन्हा प्रकट झालेला दिसतो. याचा परिणाम वाचकांच्या मनावर होणे अपरिहार्य आहे. मानवी जीवनातली कुरूपता नष्ट करून ती जीवनाची ममतेच्या पायावर मांडणी केली पाहिजे हा महत्त्वाचा विचार ज्ञानेश्वरांनी विवरून सांगितला आहे. खरे तर माणूस अनेक प्रकारच्या विसंगतींनी आणि वैगुण्यांनी भरलेला त्यांनी पाहिलेला होता. ज्ञानवंत समजले जाणारे लोकही माणसाच्या जीवनापेक्षा पोथ्या पुराणांतली निर्जीव अक्षरे प्रमाण मानीत होते. ज्ञानेश्वरांचा आणि त्यांचा भावंडांचा याच कर्मठ, दुराराध्य, धार्मिक माणसांनी छळ केला होता. त्यांच्या आईवडिलांना याच अमानुष प्रवृत्तीने देहान्तांची शिक्षा ठोठावली होती. या अनुभवानंतर कुणाचेही मन उद्विग्न झाले असते. तुच्छतावादी बनले असते. पण ज्ञानेश्वरांच्या मनाला या भावनांचा लेपही लागलेला दिसत नाही. त्या संतकवीचे मन आकाशासारखे 'निखळ', 'निर्लेप' राहिले. स्वतःला विळखा घालणाऱ्या सर्पालाही सुवास देणाऱ्या चंदनाप्रमाणे ज्ञानेश्वरांनी आपल्या मनाची सुगंधी समाजात आणि साहित्यात ओतली. त्यांच्या जीवनदृष्टीचा हा एक उल्लेखनीय विशेष मानला पाहिजे. माणूस जसा आहे तसाच तो राहील असा विचार सामान्य माणसे करतात. पण असामान्य वृत्तीचे संत-महंत माणूस बदलण्याचा प्रयत्न करीत रहातात. 'ज्ञानेश्वरी' तून हेच प्रत्यंतर येते. व्यक्तिगत क्रोध आणि क्षोभ यांना थारा न देता दुष्टांना क्षमा करणारी आणि त्यांच्या हृदयात माणुसकीची बीजे पेरणारी विचारधारा या संताने सांगावी यावरून त्याच्या जीवनदृष्टीचा उदारपणा जाणवतो. ज्ञानेश्वर म्हणतातः

हे विश्वचि माझे घर । ऐसी मती जेयाची स्थिर
किंबहुना चराचर । आपण जाला ॥

प्रेम, क्षमा आणि शांति यांच्या माध्यमातून जग बदलता येते यावर ज्ञानेश्वरांची श्रद्धा आहे. संपूर्ण 'ज्ञानेश्वरी' या प्रेममार्गाच्या पुरस्कारासाठी लिहिली असावी असा

विचार मनात येतो. गुरू आणि शिष्य, यांच्या प्रेमाचाही हृद्य आविष्कार ज्ञानेश्वरीत दिसतो. निवृत्तिनाथ आणि ज्ञानेश्वर, श्रीकृष्ण आणि अर्जुन अशा दोन गुरुशिष्यांच्या जोड्या यात आढळतात. त्यांच्यातले भक्तियुक्त प्रेम अनेक स्थळी प्रकट झाले आहे, श्रोत्यांविषयीची एक स्नेहधारा 'ज्ञानेश्वरी' तून वाहताना जाणवत राहते. भक्ती, प्रेम, शांती या प्रमुख भावधारांच्या एकत्रीकरणाचे सुंदर दर्शन 'ज्ञानेश्वरी' त घडते. याचे कारण स्वतः ज्ञानेश्वर याच भावनांच्या लोलकातून साऱ्या जगाकडे आणि जीविताकडे पाहत आहेत. त्यामुळेच समग्र ज्ञानेश्वरी वाचल्यानंतर वाचकांच्या मनावर शांतरसाचा शिडकावा झालेला असतो. नाना प्रकारच्या आधी व्याधींच्या चक्रव्यूहात सापडलेल्या आजच्या संत्रस्त माणसाला ही मानसिक शांति आणि तृप्ती ज्ञानेश्वरीत सापडत असली पाहिजे. तिच्यातून व्यक्त झालेल्या ज्ञानदेवांच्या जीवनदृष्टीचे हे रूप निःसंशय शीतल आणि शामक आहे.

**सामाजिक जाणिवतेचे-समतेचे अधिष्ठानसमतेचे अधिष्ठान**

ज्ञानेश्वरांना वेदांचे सामर्थ्य मान्य असूनही वेदांची कृपणता अमान्य होती. त्यामुळेच शास्त्रप्रामाण्याची रूढ चौकट त्यांनी थोडी शिथिल आणि समावेशक करण्याचा आपल्या काळात जो प्रयत्न केला तो उल्लेखनीय आहे. समाजनिष्ठ दृष्टीला खुपणारे एक शल्य असे होते की, भक्ती आणि अध्यात्म ही क्षेत्रेही विषमतेने माखलेली आहेत. सर्वसामान्य माणूस भक्तिसुखाचाही वाटेकरी होऊ शकत नाही. वेदांनी त्याला वंचित ठेवले. ही जाणीव त्यांच्या मनात खुपत राहिली. ज्ञानेश्वरांच्या जीवनदृष्टीला सामाजिक जाणिवेचे, समतेचे एक अधिष्ठान आहे. त्यामुळेच तेराव्या शतकात अठरापगड जाती जमातीतल्या लोकांना भक्तीच्या क्षेत्रात त्यांनी ममतेने साद घातली आणि त्याचा महाराष्ट्राच्या सामाजिक घडणीवर एक विशिष्ट परिणाम झाला. सामाजिक समतेची चळवळ अभ्यासणाऱ्या अभ्यासकांना ज्ञानेश्वरांच्या या कार्याची दखल घ्यावी लागेल. कारण सातशे वर्षांपूर्वी चंद्रभागेच्या तीरावर भागवत धर्माची पताका नाचवीत भिन्नभिन्न स्तरांतली आणि वरिष्ठ, कनिष्ठ जातींची माणसे एकमेकांत मिसळून गेली. ज्ञानेश्वर नावाच्या ब्राह्मणाला चोखामेळा नावाचा एक महार उराउरी भेटतो आणि दोघेही विठ्ठलभक्तीची गीते मुक्तकंठाने गातात ही घटना जितकी धार्मिक आहे, त्यापेक्षाही ती अधिक सामाजिक महत्त्वाची आहे. चंद्रभागेच्या वाळवंटावर ब्राह्मणापासून अत्यंजांपर्यंत साऱ्याच भक्तांची 'मांदियाळी' एकत्र आली. हे समाजदर्शन 'अभूतंपूर्व' होते. धर्माच्या आणि देवभक्तीच्या क्षेत्रातही अनेक कुंपणे

उभी होती. मनुष्य मनुष्याला आणि देवाला सरळ भेटू शकत नव्हता. स्वतः ज्ञानेश्वरही 'बहिष्कृत' होते. सर्वसामान्य माणूस लौकिक व्यवहारात जसा हीनदीन होता तसाच तो पारमार्थिक क्षेत्रातही उपेक्षितच राहिला. जन्मजात उच्चत्वाची कल्पना लोकमानसात आणि विशेषतः वरिष्ठ वर्णियात इतकी रुजून बसली होती की, सामान्य मनुष्य त्यामुळे केवळ अंधारातच खितपत पडला होता. शूद्र, अतिशूद्र आणि स्त्रिया यांच्या आध्यात्मिक आकांक्षाना त्या काळात कोणताही अवसर नव्हता. सारी दारे परंपरेच्या कुलुपांनी बंद केलेली होती. ज्ञानेश्वरांसारख्या संताला आणि समाजनिरीक्षकाला हे दृश्य आव्हान देत राहिले. या संदर्भातला त्यांचा अनुभवही दुःखदायक होता. म्हणूनच वेदप्रामाण्याला बाजूला सारून गीतेची उदार भूमिका स्वीकारल्याशिवाय सर्वसाधारण माणसाचे जीवन आपल्याला घडवता येणार नाही. हा विचार त्यांच्या मनात रुजला. धर्म आणि देव या मूल्यांवर विशिष्ट लोकांची प्रस्थापित झालेली मालकी त्यांनी धुडकावून लावली. धर्माचा प्रदेश मुक्त आहे. तेथे जात आणि संप्रदाय, कुळ आणि वंश यांच्या तटबंदी उभारणे चुकीचे आहे हा सिद्धांत ज्ञानेश्वरांनी झडझडून मांडला. ते म्हणतात,

म्हणोनि कुळजाति वर्ण । हे आघवेचि गा अकारण ।
येथ अर्जुना माझेपण । सार्थक येक ॥

कुळजातीवर्णाचा अहंकार किंवा न्यूनगंड ईश्वरभक्तीच्या क्षेत्रातून हद्दपार केला. सात शतकांपूर्वी या कार्याला असलेले महत्व जाणले पाहिजे. ज्या सामाजिक स्तरात स्वातंत्र्याचा उजेड पोहोचला नव्हता ते स्तर वारकरी पंथातल्या त्या मुक्त वातावरणामुळे प्रभावित झाले. ज्ञानेश्वरांच्या जोडीला मग चोखामेळा, नामा शिंपी, सावता माळी, सेना न्हावी, नरहरी सोनार, गोरा कुंभार हे कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या ज्ञातीतले भक्त आत्मप्रत्ययाने भजन-कीर्तन करू लागले. बोलू लागले, उपदेश करू लागले, साहित्य निर्मिती करू लागले. सामाजिकदृष्ट्या ही जागृती निश्चितच अपूर्व आहे. ईश्वराच्या दृष्टीने आपण सारेच समान पातळीवरील आहोत. या जाणीवेने त्यांना नवीन बळ दिले. कर्मठ पुरोहितशाहीचा पराभव झाला. पढीक पांडित्यालाही भक्तीच्या उत्कटतेसमोर मान वाकवावी लागली. समाजाच्या भिन्न भिन्न स्तरांत शतकानुशतके सुप्तावस्थेत पडलेले सामर्थ्याचे, निर्माणक्षमतेचे आणि भक्तीज्ञानाचे अनेक झरे होते. ते या मध्ययुगात खळखळून वाहू लागले. सहज असा विचार मनात येतो की, माणसाच्या माणूसपणाला प्रतिष्ठा मिळणे हा जर प्रगतीचा गाभा असेल तर

त्या दृष्टीने वारकरी पंथाच्या धार्मिक तत्त्वधारेतून महाराष्ट्राची सामाजिक उन्नती निःसंशय होत गेली. ज्ञानेश्वर आणि नामदेव यांनी समतेचा आणि ममतेचा ध्वज येथे उंच धरला. लहान मोठा माणूस आपल्या स्वतःच्या प्रामाणिक सुरात गाऊ लागला. ज्ञानेश्वरांचे कार्य क्रांतिकारक स्वरूपाचे आहे की नाही यावर अभ्यासकात मतभेद असतील. स्वतः ज्ञानेश्वर वर्णव्यवस्थेचे पुरस्कर्ते होते. यातही शंका नाही. पण ईश्वरभक्ती आणि धर्म या प्रांतात माणसाच्या कुळजातीपेक्षा त्यांच्या अंतःकरणाची उंची जेव्हा ते प्रमाण मानतात तेव्हा तत्कालीन विचारवंतापेक्षा त्यांचा सामाजिक दृष्टिकोणही अधिक प्रगत स्वरूपाचा होता याची प्रतीती येते.

**साहित्याच्या संदर्भातील क्रांतिकारक घटना**

मराठी साहित्याच्या दृष्टीने विचार केल्यास ज्ञानेश्वरांनी वारकरी पंथाच्या झेंड्याखाली एकत्र आणलेली जनता आपल्या मायबोलीतून स्वतंत्रपणे लिहू लागली आणि केवळ पांडित्याच्या व वर्णश्रेष्ठत्वाच्या आसनावर बसलेल्या अहंकारी प्रवृत्तीला हास्यास्पद ठरवू लागली. नामदेव तुकारामांची कविता तर राहोच, पण चोखामेळा, बंका महार आणि सेना न्हावी यांच्याही कवितेने आपली अस्मिता सिद्ध केली. सर्वसामान्य मनुष्याला मिळालेली ही स्वातंत्र्याची सनद ज्ञानेश्वरांच्या प्रयत्नातून मिळू शकली हा इतिहास आहे. मराठी साहित्याला वेढून बसलेली पारंपारिक चौकट निखळून पडली. समाजाच्या आध्यात्मिक व सामाजिक आशाआकांक्षांना साहित्यात स्थान मिळाले. भिन्न भिन्न व्यवसायातले व थरातले कवी निर्मिती करू लागल्यामुळे मराठी भाषेला विविध वळणे मिळाली ती त्याच्या विकासालाच कारण झाली. झोपडीतला सामान्य गरीब माणूसही संतांच्या कवितेवर प्रेम करू लागला, ही घटना साहित्याच्या संदर्भात क्रांतिकारक म्हणावी लागेल.

ज्ञानेश्वरांच्या समाजनिष्ठ भूमिकेमुळे उपेक्षित समाजातल्या कित्येक संतकवींची देणगी मराठी सारस्वताला मिळाली. वेदांच्या कृपणतेविरुद्ध बंडखोरीचा उद्‌गार काढणाऱ्या ज्ञानेश्वरांनी भक्तीच्या भाषेच्या आणि साहित्यनिर्मितीच्या क्षेत्रातली जुनी परंपरा उखडून टाकली. मराठीच्या नगरीत जर आपल्याला ब्रह्मविद्येचा सुकाळ करायचा असेल तर लोकभाषेशिवाय तरणोपाय नाही हाच विचार त्यांनी ठामपणे मांडला. त्यांच्या उदार जीवनदृष्टीचे हे पैलू पाहूनच त्यांचा उल्लेख 'बी' कवींनी 'बडा बंडवाला' असे केले आहे. ते यथोचित वाटते. पण ज्ञानेश्वरांची दृष्टी प्रगत असूनही तिला एक अंगभूत मर्यादा आहे आणि तिचा प्रत्यय ज्ञानेश्वरीतून येतो, हे मात्र लक्षात घेतले

पाहिजे. 'जे जे भेटे भूत, ते ते जाणिजे भगवंत' हा विशाल दृष्टिकोन आध्यात्मिक क्षेत्रात त्यांनी स्वीकारला आणि रुजवला. पण ज्ञानेश्वरांची सामाजिक मतसरणी परंपरेला संवादी अशीच राहिली. वर्णभेदाला आणि प्राचीन वर्णीय विषमतेला ज्ञानेश्वरांनी संमती दिली आहे. सात शतकांपूर्वीच्या अतिकर्मठ वातावरणात ज्ञानेश्वरांना सारीच पुरातन व्यवस्था उखडणे शक्य नव्हते. ते त्यांना मान्यही नव्हते. आज सातशे वर्षानंतर ज्ञानेश्वरीतला हा विचार कालबाह्य झालेला दिसतो. हा विचार त्यांच्या जीवनदृष्टीची मर्यादा स्पष्ट करणारा आहे. समतेची धारा सामाजिक व्यवहारातही ज्ञानेश्वरांनी आणली असती तर महाराष्ट्राच्या समाजमनाचे चित्र कदाचित बदलून गेले असते. समतेची धारा सामाजिक व्यवहारातही खांद्याला खांदा भिडवून चोखा-मेळा भजन-कीर्तनात सहभागी होत होता. पण विठ्ठलमंदिरात मात्र त्याला प्रवेश मिळत नव्हता. ही समाजव्यवस्था विषमतामूलक विचारांवर आधारलेली आहे. शतकानुशतके लोकांच्या हाडीमासी खिळलेली आहे. ज्ञानेश्वरीत क्रांतिकारकाचा आवेश नाही. मोडतोड करण्याची, उखडून फेकून देण्याची मूर्तिभंजकता नाही, त्यांचा मार्ग संतांचा आहे. रस्त्यातले काटे उपटून टाकण्यापेक्षा ते हलुवारपणे बाजूला सारणे, शोषितांच्या आणि दुःखितांच्या डोळ्यातील अश्रू वात्सल्याने टिपणे आणि त्यांना आपुलकीने पोटाशी धरणे ही त्यांची कार्यपद्धती आहे. या पद्धतीच्या काही अपरिहार्य मर्यादा असतात. पण त्या लक्षात घेऊनही ज्ञानेश्वरांची ही कार्यशैली विधायक आणि समाजाला हितकारक होती हे काळ आणि परिस्थिती याचा संदर्भ पाहिला तर मान्य करावे लागते.

**आनंदवादी ज्ञानेश्वर**

ज्ञानेश्वरांच्या दृष्टिकोनाचे आणखी एक लक्षणीय वैशिष्ट्य स्पष्ट केले पाहिजे. ते 'आनंदवादी' होते. जीवनाला त्यांनी भ्रम अथवा माया मानले नाही. कर्मयोगाचा खणखणीत पुरस्कार ज्ञानेश्वरीत आढळतो. सर्व लोकसंस्था रक्षिण्याची जबाबदारी ज्ञानी समाजपुरुषावर आहे असे सांगून त्याने कर्मसंन्यास घेऊ नये हे मत ते निर्धाराने मांडतात :

देखें प्राप्तार्थ जाहले । जे निष्कामता पावले ।
तेयां हि असे कर्तव्य उरले । लोकांलागी ॥
हां गा ऐसे जरी न कीजे । तरी अज्ञाना काय उमजे ।
तिहीं कवणेपरी जाणिजे । मार्गाते या ॥

हे ऐसे असे स्वभावे । म्हणोनि कर्म न संडावे ।
विशेष आचरावे । लागे संती ॥

जे कृतार्थ झाले, त्यांच्या ज्ञानाला पूर्णता आली, त्यांनी सुद्धां कर्माचा त्याग करू नये. केवळ आत्मचिंतनातच निमग्न होऊ नये. समाजाला सर्व परिस्थितीत मार्गदर्शन करण्याची ज्ञानी पुरुषांवर जबाबदारी असते. म्हणून लोकसंग्रह करून त्याने नेतृत्व करावे आणि आपली सामाजिक जबाबदारी पेलावी.

म्हणौनि मार्गाधिरे वर्तावे । विश्व हे मोहरे लावावे ।
अलौकिकां नोहावे । लोकांप्रती ॥

धर्म हा केवळ वैयक्तिक उन्नतीसाठी असत नाही. समाजजीवनाच्या सर्व अंगोपांगांशी तो निगडित आहे. यासाठीच सामाजिक रुचीला, नीतीला आणि भावनेला योग्य वळण लावण्याचे कर्तव्य ज्ञानवंतांनीच करायचे असते. ज्ञानवंत जर संन्याशी झाले आणि लोकांतातून उठून एकांतात जाऊन बसले तर लोकजीवन कर्तव्यभ्रष्ट होण्याचा संभव आहे हे त्यांना दिसत होते. ज्ञानेश्वरांची ही भूमिका रसरशीत आहे. कोणत्याही काळात लोकरक्षणाची आणि लोकशिक्षणाची जबाबदारी समाजातल्या जाणत्या, विवेकवंतांनी उचलायची असते. जेव्हा हे विवेकवंत लोकसंपर्क तोडून कुठल्यातरी गिरीकंदरात तळ ठोकून बसतात तेव्हा समाज आणि संस्कृती दोन्ही भरकटत चाललेली दिसतात. विचारवंतांच्या हातात समाजाचे सारथ्य असावे हा विचार ज्ञानेश्वरांच्या व्यापक सामाजिक जीवनदृष्टीचा द्योतक आहे. त्यांना स्वतःला काहीही साधायचे नव्हते. 'अवघाचि संसार सुखाचा करीन, आनंदे भरीन तिन्ही लोक' या महत्त्वाकांक्षेने भारलेले ते संत होते. तेराव्या शतकातला मरगळून गेलेला महाराष्ट्र त्यांना दिसत होता. उत्तरभारताची यात्रा करताना मुसलमानी आक्रमणाची दुश्चिन्हे त्यांनी पाहिली होती. ही आक्रमक लाट उत्तरेतून दक्षिणेकडे पसरत जाईल याची जाणीव त्यांना निश्चित झाली असेल. अशा परिस्थितीत ज्ञान, कर्म आणि शक्ती यांचा संगम झाल्याशिवाय समाजात स्थैर्य आणि शांती नांदू शकणार नाही. म्हणून धर्माच्या सामाजिक अंगाची त्यांनी तिळमात्रही उपेक्षा केली नाही. गीतेचे रहस्य कर्मसंन्यासात आणि व्यक्तिगत मोक्षात आहे असे मानणाऱ्या प्रवृत्तीशी विरोध पत्करून आपली पुरुषार्थी जीवनदृष्टी त्यांनी ठसठशीतपणे मांडली आहे. अर्जुनाला उद्देशून ते म्हणतात :

जे विश्वप्रमाणिची मुदी । आजि तूझां हाती सुबुद्धी ।
लोकसंग्रहाची त्रिशुद्धी । योग्यु होंसी ॥

उद्योच्या बलिष्ठ, धर्मनिष्ठ सुसंस्कृत समाजाचे उज्ज्वल चित्र ज्ञानेश्वरांच्या दृष्टिसमोर तरळत आहे. धर्म आणि समाज यांच्यात सुसंवाद नांदावा यासाठी त्यांनी 'भावार्थदीपिका' लिहिली. ज्ञानेश्वरांच्या जीवनविषयक दृष्टिकोनात वैफल्य नाही, कर्मसंन्यास नाही, पराभूत प्रवणता नाही, पलायनवादी विचारांचा अंशही नाही. रचनात्मकता आहे, कर्मतत्परता आणि पुरुषार्थवाद यांचा प्रभाव आहे. साऱ्या जगात गीतेचे आनंददायक, कर्मप्रवृत्त सूर पेरण्याचा महनीय प्रयत्न ज्ञानेश्वरांनी केला. आजच्या मूल्यांची पडझड होत असलेल्या जगात ज्ञानेश्वरांचा हा दृष्टिकोन निश्चितच प्रेरणा देऊ शकेल. त्यांच्याच शब्दात असे म्हणता येईल की,

वाग्विलास विस्तारू । गीतार्थेसी विश्व भरू ।
आनंदाचे आवारू । मांडू जगा ॥

ज्ञानी संत समाजरक्षणाची, समाज विकासाची जबाबदारी केव्हाच नाकारीत नाहीत. त्यांची समाजनिष्ठा अतूट असते. ज्ञानेश्वरांच्या समाजप्रेमाबद्दल शंका घ्यायला तिळमात्रही जागा नाही. उपेक्षा, अवहेलना मानसिक छळ सारे सारे पोटात घेऊन समाजाला सुदृढ व सुंदर बनवण्याचा त्यांनी केलेला प्रयत्न इतिहासात अपूर्व म्हणावा लागेल. गीतेचा अर्थ विश्वात भरताना हतबल झालेल्या अर्जुनाने पुन्हा बलसंपन्न व्हावे ही भूमिका ज्ञानेश्वरांना मान्य आहे. धर्म समाजाचे रक्षण करतो हे खरे, पण धर्माचे रक्षण शूरवीरांनी शस्त्रबलानेही केले पाहिजे. याचा स्पष्ट उच्चार ज्ञानेश्वर करतात. अर्जुनाला उद्देशून त्यांनी म्हटले आहे.

'रणांगणात कारुण्य विसंगत आहे. जे जीवनमूल्यांचा समाजाच्या स्थैर्याचा आणि सज्जनांच्या अस्तित्वाचा विध्वंस करतात त्यांच्याशी लढणे हाच धर्म आहे.' ज्ञानेश्वरांच्या जीवनदृष्टीचे हे विशेष नीट समजून घेतले पाहिजेत.

ooo

# तुका आकाशा एवढा

काही वर्षांपूर्वी नागपूर विद्यापीठाच्या मराठी विभागाने मला अभ्यागत प्राध्यापक म्हणून आमंत्रण दिले होते. त्या पंधरा दिवसांच्या वास्तव्यात मी विद्यापीठात व शहरात अनेक विषयांवर व्याख्याने दिली. तीन व्याख्याने 'तुकारामांच्या अभंगवाणीचे सामर्थ्य आणि सौंदर्य' या विषयावर झाली. विद्यापीठात झालेल्या या भाषणांना सर्व शाखांचे पदव्युत्तर विद्यार्थी, प्राध्यापक आणि गावातील अनेक नागरिक उपस्थित होते. तुकाराम हा तर माझा आवडता कवी. त्याच्या काव्याविषयी बोलताना माझ्या भावना उत्कट होत जातात. या अभिजात कवीच्या वाङ्मयीन श्रेष्ठपणाबद्दल किती सांगू अन् किती नको असे होऊन जाते. ज्ञानेश्वरही मला आवडतो. साऱ्या महाराष्ट्राने ज्ञानेश्वराला आपल्या मस्तकावर घेतले आहे. पण तुकाराम मात्र हृदयातच घर करून बसला आहे. आपल्या साध्या भावपूर्ण शब्दांतली आंतरिक शक्ती घेऊन हा देहूचा वाणी घरोघरी गेला. झोपडी झोपडीतून गेला. तो शेतकऱ्यांच्या आणि कष्टकऱ्यांच्या काळजाला जाऊन भिडला. म्हणूनच अशा विलक्षण लोकमान्य कवी बद्दल बोलताना मला तीन व्याख्याने देऊनही समाधान वाटले नाही. तिसरे व्याख्यान संपल्यानंतर श्रीमती लक्ष्मी नावाची अर्थशास्त्राची एक ज्येष्ठ प्राध्यापिका जी माझ्या सारखीच अभ्यागत होती, व्यासपीठाजवळ आली आणि माझे अभिनंदन करून इंग्रजीत म्हणाली.

'मी केरळ विद्यापीठात अर्थशास्त्र शिकवते. मला मराठी फारसं समजत नाही. पण तुकारामांच्या अभंगांचं इंग्रजीत झालेलं भाषांतर मी वाचलं आहे. त्यानंतर मी मराठी लिहायला वाचायला थोडंसं शिकले. तुकाराम वाचता यावा म्हणूनच मी मराठी शिकले. या संतकवीचे कित्येक अभंग मला तोंडपाठ झाले आहेत.'

तिचं बोलणं ऐकून मला फार आनंद वाटला. तुकाराम केवळ महाराष्ट्राचा नाही, तो साऱ्या भारतवर्षाचा आहे. नव्हे साऱ्या मानवतेचा आहे यात कसलीच शंका नाही. त्रिवेंद्रमच्या विद्यापीठात इकॉनॉमिक्स शिकवणारी एक विदुषी देहू गावातल्या एका साध्या भोळ्या कवीच्या अभंगांवर नितांत प्रेम करते ही जाणीव

मला फार अभिमानास्पद वाटली. प्रा. लक्ष्मी पुढे म्हणाली,

'आय लव्ह महाराष्ट्र बिकॉज ऑफ तुकाराम ओन्ली' माझ्या अंगावर आनंदाचे रोमांच उठले. ज्याचे फारसे शिक्षणही झाले नाही असा कोणी एक तुकाराम नावाचा देहूकर असंख्य विद्याविभूषित आधुनिक पंडितांनाही मोहिनी घालू शकतो. मार्गदर्शन करू शकतो. आणि त्याच्या काव्याची कितीही कठोर परीक्षा केली तरी इतकेच सिद्ध होते की, तुकारामांची अभंगवाणी ही कोणत्याही वाङ्मयीन कसोटी पेक्षा कितीतरी उंच आणि श्रेष्ठ आहे. मी अतिशयोक्ती करीत नाही किंवा उगीच भक्तिभावाने बोलत नाही. मी इतकेच म्हणेन की तुकारामांचे काव्य अनेक शतकांतून निर्माण होणाऱ्या महाकवीचे काव्य आहे. केव्हाही त्यांची अभंगगाथा उघडून बसावे आणि दृष्टीला पडेल तो अभंग वाचावा म्हणजे आपल्या अनुभवाला येते की हा संतकवी आपल्या हृदयाशी परमवात्सल्याने 'संवाद' करीत आहे. मग हा कवी केवळ कवी राहात नाही. 'आत्मीय' भावाने तो बोलत असल्याने स्वकीय होतो. म्हणूनच मी नेहमी म्हणतो, की ज्या घरात ज्ञानेश्वरी नाही, तुकारामाची गाथा नाही त्या घराला मी घर म्हणण्यास तयार नाही. श्रेष्ठ कविता म्हणजे ज्ञान आणि संस्कृती यांच्या पवित्र समईची जळती ज्योत. हा शांत आणि सोज्वळ प्रकाश घरात नसेल तर ते घर 'घरपणच' हरवून बसले आहे असे समजावे.

तुकारामांच्या व्यक्तित्वाची आणि कवितेची रसग्रहणात्मक चिकित्सा करणे सोपे नाही. केवळ काहीतरी शेरेबाजी करण्याची सवंग सवय लागलेल्या एखाद्या लेखनिकाने तुकारामावर काही खरडावे इतका हा कवी सामान्य नाही. कवी आणि कविता यांच्या संबंधी लिहिताना लेखकालाच कवित्वाच्या पायरीवर उभे राहावे लागते. ज्याच्या ठायी रसिकत्व असेल त्यालाच कवित्वाबद्दल बोलण्याचा अधिकार पोहोचतो. पण तुकारामाच्या संतत्वाचा किंवा कवित्वाचा लवलेशही अंगी नसलेले मंबाजी जेव्हा तुकारामावर चिखलफेक करतात तेव्हा आश्चर्य वाटते. पण यात नवल ते काय? जेथे जेथे महानता असेल तेथे तिला अपशकुन करणारी एखादी क्षुद्र दांभिक वृत्ती उपस्थित असतेच. चंदनाच्या झाडालाच सापांनी विळखा घालावा हा सृष्टीचा नियमच आहे. तुकारामाचे काव्य म्हणजे एका भाबड्या भक्ताने उधळलेले शब्दांचे बुडबुडे आहेत असे काही मूर्खांना वाटले तर तो त्यांचा दोष नव्हे. मूर्खपणापासून दुसरी अपेक्षा करता येत नाही. कोणत्याही कवीचे, कलावंताचे मूल्यमापन करताना किमान रसिकतेचा कांही अंश जवळ असावा लागतो नाहीतर तुकारामानेच

म्हटल्याप्रमाणे, 'कानडीने केला मराठी भ्रतार, एकाचे उत्तर एका न ये.' अशी स्थिती होऊ शकते.

मराठी साहित्यावर आणि समाजमनावर आपल्या अभंगवाणीचे 'अक्षर' संस्कार करणाऱ्या संत तुकारामांविषयी आता नवीन सांगण्यासारखे काय आहे? सामान्य माणसाच्या हृदयाच्या गाभ्यापर्यंत हा कवी जाऊन पोहोचला. चार बरी-वाईट पुस्तके लिहिणारा लेखक स्वतःला युगप्रवर्तक समजू लागतो. दोन-चार पारितोषिकांचे तुरे खोवून नाचू लागतो. स्वतःचा एक मठ स्थापन करून वाचकांना संदेश वगैरे देऊ लागतो. मधून मधून तो रेडिओ, टी. व्ही. तून डोकावत राहतो पण तरीही सामान्य माणसाचे मन त्याच्या वाङ्मयाने किंवा दर्शनाने हेलावून जात नाही. त्याचे परकेपण संपत नाही. तो कधीच आपल्याला कडकडून भेटू शकत नाही. त्याची प्रतिमा अत्यंत अंधुक अशीच राहते. त्याच्या शब्दांना खोल सहानुभूतीचा, उच्च माणुसकीचा स्पर्श झाल्याचे दिसत नाही. आणि म्हणूनच सर्वोच्च पारितोषिके मिळवून सुद्धा समाजाच्या मनावर आपले एखादेही अक्षर तो कोरू शकत नाही. पण 'यातिशूद्र' असलेला देहूचा एक साधारण वाणी आपल्या आंतरिक सामर्थ्याने पंडितांनाही आव्हान देणारी आंतरिक तत्त्वज्ञानी कविता लिहितो आणि महाराष्ट्राच्या संस्कृतीवर आपली स्वतःची एक विशिष्ट मुद्रा उमटवतो हा खरोखरच चमत्कार नव्हे काय? या कवीला पंडिताचा मुखवटा घेऊन कधी बोलता आले नाही. तो सामान्य माणसाचीच पण असामान्य प्रत्ययाची अशी भाषा बोलत राहिला की पंडिती अहंकाराने त्याच्यासमोर लोटांगण घ्यावे. आपल्या खडतर आयुष्याशी झगडत राहिलेल्या या कवीने रंजल्या-गांजल्यांना पोटाशी धरण्यातच आपल्या साऱ्या जीविताची कृतार्थता मानली.

'तुकोबा' या एकाच शब्दाने साऱ्यांच्या अंतःकरणात आपुलकीची उचंबळ दाटून येते याचे हेच कारण आहे. शब्दांची सुंदरता आणि शुद्धता यापेक्षा भावनेची प्रामाणिकता व आर्तता हीच साहित्याला सामर्थ्य देऊ शकते. तुकोबांच्या साहित्याचे मर्म त्यांच्या नितांत प्रांजळ, उत्कट शब्दांत आणि त्यांच्या उदार हृदयात सामावले आहे. मानव्यावर प्रेम करणाऱ्या माणसाचे जीवाभावाचे शब्द त्यांच्या काव्यातून आपल्याला भेटतात. ज्याची परमेश्वरावर श्रद्धा नाही अशा नास्तिकालाही ईश्वर भक्तीने ओथंबलेली त्यांची अभंगवाणी आश्वासन देऊ शकते. कारण ईश्वरभक्ती आणि मानवताप्रेम ही मूल्ये तुकोबांच्या दृष्टीने परस्परभिन्न नाहीतच. ही एकमेकात मिसळून एकरूप झाली आहेत. त्यामुळेच तुकाराम कोणत्याही एका जातीचा, पंथाचा

किंवा धर्माचा कवी राहात नाही. तो केवळ 'माणसांचा' कवी ठरतो. एक निखळ माणूस म्हणूनच तो आपल्या समोर ठाम उभा राहतो. तो संत आहे आणि कवीही आहे.कारण त्याच्या माणुसकीचा पूर्ण विकास झाल्याच्या सुंदर खुणा अभंगवाणीत दिसतात. त्यांचा एक सर्वप्रसिद्ध अभंग मी उद्धृत करतो तो केव्हाही वाचताना त्यातून व्यक्त झालेल्या अथांग वत्सलवृत्तीने आणि समभावनेने प्रत्येक वाचक गहिवरल्याशिवाय राहणार नाही.

जे का रंजले गांजले । त्यासि म्हणे जो आपुले ॥
तोचि साधु ओळखावा । देव तेथे चि जाणावा ॥
मृदु सबाह्य नवनीत । तैसे सज्जनाचे चित्त ॥
ज्यासि आपंगिता नाही । त्यासि धरी जो हृदयी ॥
दया करणे जे पुत्रासी । तेचि दासां आणि दासी ॥
तुका म्हणे सांगू किती । तो चि भगवंताची मूर्ती ॥

ज्ञानेश्वरांचे 'पसायदान' ज्याप्रमाणे त्यांच्या निःस्वार्थ, शुचिष्मंत, निर्मल भावनेचे द्योतक आहे तसाच हा अभंग ही तुकारामांच्या व्यापक, सर्वसमभावी प्रवृत्तीचे प्रसन्न दर्शन घडवतो. सर्व धर्मांचे आणि सर्व तत्वज्ञानाचे सार यात सामावलेले आहे. अशी कविता सुवास घेऊन येते कवीच्या मनाचा. मन, बुद्धी आणि आत्मा या तिहींचा विकास झाल्या शिवाय उच्च मूल्यांचा साहित्यावर प्रभाव पडत नाही.

**जीवनाची जिवंत कहाणी**

तुकोबांच्या कवितेला त्यांच्या साऱ्या आयुष्याचा एक अस्सल वास सदैव वेढून राहिला आहे असे दिसते. या वासात अनेक छटा आहेत. प्रसन्नता, मधुरता, भक्ती आणि वात्सल्य जसे आहे तसेच कडवटपणा, उद्वेग, क्षोभही आहे. आर्तता, वैफल्य व दुःखाचे सुस्कारेही आहेत. दांभिकतेची चीड आहे आणि माणुसकीचे उदंड प्रेमही आहे. प्रतिगामी प्रवृत्तीशी झुंजत राहण्याची जिद्द आहे. त्यांच्या साऱ्या आयुष्यानेच या कवितेला घट्ट मिठी मारली आहे. आणि त्यांच्या कवितेनेही जीवनाला आपल्या कवेत घेतले आहे. जीवित आणि कवित्व यांचा इतका अतूट, इतका जातिवंत, इतका प्रभावी संगम कदाचित इतर कवींच्या काव्यात झाला नसावा. तुकोबा कवितेकडे का वळले? एक छंद म्हणून, एक विरंगुळा म्हणून मुळीच नव्हे. त्यांची सारी कविता म्हणजे नाना प्रकारच्या दुःखसंकटाशी झुंजत आत्मसाक्षात्कारासाठी केलेल्या एका खडतर वाटचालीची जिवंत कहाणी आहे. त्यांचा कोणताही अभंग

जीवनाचा पदर घेऊनच आपल्यासमोर उभा राहतो. आपल्या वाट्याला आलेल्या प्रत्येक कडुगोड अनुभवाला तुकोबा कडकडून झोंबले आणि त्यातल्या रसायनाची त्यांनी चव घेतली. प्रत्येक अभंग हा अनुभवाचा एक सलग भाग असतो. उदाहरणार्थ आपल्या साऱ्या श्वासनिःश्वासांचा, साऱ्या सुखदुःखांचा एकमेव आधार परमेश्वर हाच आहे या आत्यंतिक श्रद्धेने ते परमेश्वराला अनुलक्षून म्हणतात की, 'तूच माझा सांगाती, तूच माझे सर्वस्व.'

जेथे जातो तेथे-देवा तू माझा सांगाती।
चालविसी हाती धरूनिया॥
चालो वाटे आम्ही तुझा चि आधार।
चालविसी भार सवे माझा॥

"सोयिरे सकळ प्राणसखे' आणि 'जाले तुझे सुख अंतर्बाही' ही अनुभूती व्यक्त करताना तिच्याकडे अलिप्तपणे पाहण्याची एक आगळी शक्ती त्यांच्या ठायी होती. साहित्याचे शास्त्र माहीत नसलेल्या या माणसाने जीवनाच्या शास्त्राचा सर्वांगानी अभ्यास केला होता हे लक्षात येते. जे 'केवळ साहित्यिक' आहेत त्यांचे शब्द डौलदार असतील. रंगीबेरंगी असतील, काही वेळ त्यांच्याकडे पाहात राहावेसे वाटेल पण ते शब्द वाचकांच्या हृदयात तीरासारखे घुसून त्या हृदयावर आपली खूण उमटवू शकतील काय याची शंका वाटते. ज्याच्या आयुष्याच्या मातीत माणुसकीचे रोपटे वाढते त्याच्या प्रतिभेला आलेल्या फुलांचा वास किती ताजा टवटवीत असतो किती चैतन्यमय असतो हे तुकारामांच्या कवितेतून समजत राहाते. खरे तर तुकाराम हे काव्यशास्त्राचे कधीच जाणकार नव्हते. कविता कशी लिहावी हे समजून घेण्यासाठी एखाद्या गुरूकडे जाऊन त्यांनी त्यांच्याकडे अक्षरांची भीक मागितली नाही. आपण कलात्मक काव्याची निर्मिती करीत आहोत असाही दावा त्यांनी कधी केला नाही. अखेर हेच खरे की सुंदर आणि श्रेष्ठ साहित्य लिहिण्यासाठी पुस्तकी ज्ञानापेक्षा अनुभवाचेच धन गाठीशी असावे लागते. आपल्याला आलेल्या साऱ्याच अनुभवांची अभिव्यक्ती तुकारामांनी काव्यातून केली आहे.

**रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग आम्हा युद्धाचा प्रसंग.**

तुकोबांच्या चरित्रात काही चमत्कारिक वळणे आहेत. दुष्काळाच्या विलक्षण आपत्तीचे वादळ आले नसते तर ते संतकवी झाले असते काय हा प्रश्नच आहे. एक साधा व्यापारउदीम करणारा सामान्य मनुष्य. तुकाराम बोल्होबा आंबिले हे त्य चे

अगदीच गद्यप्राय नाव. नावाने, जातकुळीने, ज्ञान अनुभवाने सामान्य असलेला हा तुकाराम असामान्यांच्या वर्तुळात कसा पोहोचला याचे आश्चर्य वाटते. एखाद्या कोळशाने पेट घ्यावा आणि पाहता पाहता त्याचा जळजळीत निखारा व्हावा तसे तुकारामांच्या चरित्राचे आणि व्यक्तित्वाचे आहे. ते आपली दुकानदारी सांभाळीत बसले होते. व्यापारात त्यांचा लौकिक बरा असावा असे ते ह्या आत्मचरित्रात्मक अभंगातून जाणवते. 'एक यशस्वी दुकानदार' म्हणूनच कदाचित तुकाराम वर्षानुवर्षे राहिले असते तर आज त्यांच्या नावाभोवती जे अतीव आदराचे वलय निर्माण झाले आहे ते झालेच नसते, संकटांच्या झंझावातांनी तुकारामांना मुळापासून गदगदा हलवले, पार लोळवले हे जितके खरे, तितकेच या आपत्तीच्या माथ्यावर पाय रोवून ते नव्या जोमाने, नव्या रूपात उभे राहिले हे अधिक खरे. 'कठीण वज्रास भेदू ऐसे' अतर्क्य बल त्यांच्या मनात संचारले. वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी व्यापाराची जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यात आली. पण काही वर्षातच दैवी आपत्तींचे वादळ घोंघावू लागले. घरात मृत्यूने थैमान घातले. आईवडील जग सोडून गेले. वडील भाऊ परागंदा झाला. पहिली पत्नी आणि मुलगा दुष्काळात मरण पावले. जिकडे जावे तिकडे मृत्यू, दुष्काळ आणि नाना प्रकारची संकटे त्यांना दिसू लागली. सुखाचे दिवस फार लवकर संपून गेले. वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी तुकाराम पार बदलून गेले. दुष्काळ आणि मृत्यू यांच्या फेऱ्यात सापडलेल्या तुकोबांचा प्रपंच सर्वस्वी जळून गेला असे विधान करता येईल. एका पाठोपाठ भीषण संकटे असहाय्य माणसापुढे दंड थोपटून उभी राहतात. आणि तो दुबळा माणूस मुकाट्याने त्याच्यासमोर लोळण घेतो. पुरता हतबल होतो. ही अवस्था तुकारामांनी अनुभवली. असले अनुभव माणसाला पूर्णपणे गिळून टाकतात. पण काय असेल ते असो, भयानक प्रतिकूल परिस्थितीच्या लाटा अंगावर घेत असतानाही या कवीच्या या सर्वसामान्य व्यक्तीच्या मनात एक आगळेच सामर्थ्य हळूहळू रुजत होते. वाढत होते. तुकारामांच्या काव्यात आणि जीवनात एक प्रचंड झगडा सदैव चाललेला दिसतो. कदाचित या संघर्षामुळेच ते अधिक कणखर, सहनशील आणि तेजस्वी बनत गेले. कितीही मोठी लाट आली तरी ती त्यांना गिळंकृत करू शकली नाही. उलट त्या त्या लाटेवर स्वार होण्यासाठीच तुकारामांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली आहे. इतके सामर्थ्य कुठून आले? परमेश्वराच्या नामस्मरणाने ते आले असे जरी ते म्हणत असले तरी त्यांचा स्वभावच येणाऱ्या संकटाशी झगडत राहण्याचा होता. दैवाने केलेले प्रचंड आघात, विरोधकांनी केलेला

मानसिक व शारीरिक छळ व स्वतःच स्वतःबरोबर केलेली अनेक भांडणे यांनी त्यांचे सारे आयुष्य गजबजून गेले आहे. ते म्हणतात-

रात्रं दिन आम्हा युद्धाचा प्रसंग ।
अंतर्बाह्य जग आणि मन ॥
जीवा ही आगोज पडती आघात ।
येऊनिया नित्य नित्य करी ॥
तुका म्हणे तुझ्या नामाचिया बळे ।
अवघीयांचे काळे केले तोंड ॥

अवघ्या संकटांचे काळे तोंड करण्याची ही जिद्द केवळ ईश्वरनामाने येऊ शकत नाही. तुकाराम हा एक निर्धारी, प्रतिकारक्षम मनोवृत्तीचा माणूस आहे. स्वतःच स्वतःला घडवीत राहणारी काही माणसे असतात. परिस्थितीचे फटकारे बसू लागले की त्यांच्यातली सुप्तावस्थेत असलेली शक्ती जागृत होते. तुकाराम अशाच मनोवृत्तीचे असल्यामुळे त्यांनी आजन्म लढा दिला. दुबळा माणूस भक्त होतो आणि तो रात्रंदिवस केवळ देवापुढं लोटांगणे घेत राहातो. ही एक विकृत समजूत आहे. संत होणारी माणसे दुबळी किंवी भित्री नसतात. साऱ्या भौतिक सुखाकडे पाठ फिरवून लोक कल्याणासाठी आपले आयुष्य व्यतीत करणारे संत दुबळे म्हणण्यात आपलाच दुबळेपणा आहे. आपल्या स्वार्थावर निखारे ठेवून परार्थासाठी धडपडणाऱ्या व्यक्ती मानसिक आणि बौद्धिकदृष्ट्या समर्थ असाव्या लागतात. तुकारामामध्ये हे आंतरिक सामर्थ्य पुरेपूर सामावलेले होते. म्हणूनच मला तरी तुकाराम हा नियतीशी आणि विरोधी शक्तीशी जिवाच्या आकांताने झगडत राहिलेला एक शूरवीर वाटतो. तुकारामांचे काही अभंग प्रारब्धवादी प्रवृत्तीचे आढळतात. तेवढ्या आधारावर काही टीकाकारांनी या कवीला दैववादी आणि निराशावादी ठरविण्याची व्यर्थ खटपट केली आहे. एक तर असे अभंग अगदी थोडे आहेत. आणि दुसरे असे की एखाद्या हताश क्षणी त्यांची निर्मिती झाली आहे. वैफल्य हा काही तुकोबांचा स्थायीभाव नाही. तो केवळ संचारी भाव आहे. 'आले देवाचिया मना । तेथे कोणाचे चालेना' असे त्यांचे उद्‌गार असले तरी देवावर भार टाकून स्वस्थ बसणाऱ्या निष्क्रिय व्यक्तीत तुकारामांसारखा स्वयंप्रज्ञ मनुष्य कधीच असू शकणार नाही. आपल्या चित्रविचित्र आणि विपरीत अनुभवांच्या शाळेत त्यांनी जगण्याचे धडे घेतले आहेत. अनुभव नावाच्या शिक्षकाला जबरदस्त फी दिल्याशिवाय तुकारामांना शिकणे शक्यच नव्हते.

आपल्या आयुष्याची ओली माती आपल्याच हातांनी आकारित करण्याचा आणि तिला एक विशिष्ट घाट देण्याचा हट्ट त्यांनी घेतला होता. अशी मनस्वी माणसे उगीच कोणापुढे हतबल होत नाहीत. आरंभी दुर्बल असलेली किंवा वाटणारी ही माणसे सबल होतात आणि नंतर प्रबलही होतात. याच मालिकेत तुकाराम हे नाव गुंफल्याशिवाय गत्यंतर नाही. स्वत्व आणि स्वाभिमान यांची धारदार जाणीव त्यांच्या ठायी होती. कधी पराकोटीच्या विनयाने किंवा क्वचित क्षणिक निराशेने त्यांनी काढलेले उद्‌गार वाच्यार्थीने घ्यायचे नसतात. आत्मप्रतीतीने फुलून आलेले त्यांचे व्यक्तिमत्व कित्येक अभंगांतून प्रकट झाले आहे. ते म्हणतात,

आता मी सर्वथा नव्हे गा दुर्बळ ।
यातिहीनकुळ दैन्यवाणा ॥
माय रखुमाई पांडुरंग पिता ।
शुद्ध उभयता पक्ष दोन्ही ॥
बापुडा मी नव्हे दुर्बल ठेंगणा ।
पांगिला हा कोणा आणिकांसी ॥
तुका म्हणे जालो निर्भर मानसी ।
जोडलिया रासी सुखाचिया ॥

तुकारामांच्या समग्र जीविताचा आणि कार्याचा शोध घेतल्यानंतर मला असे निभ्रांततपणे म्हणावेसे वाटते की ज्यांनी तुकारामांना निराशावादी आणि दैववादी ठरविले त्यांना या संताच्या कर्तृत्वाचे मर्म समजलेच नाही. इतिहासाचार्य म्हणून ज्यांची ख्याती होती, त्या राजवाड्यांना, ज्ञानकोशकार डॉ. केतकरांना आणि संतसाहित्याचे मर्मग्राही टीकाकार म्हणून ज्यांना मान्यता मिळाली, त्या पु. ग. सहस्रबुद्धे यांना संतांच्या कार्याची यथायोग्य चिकित्सा करता आलेली नाही. संतानी देश बुडविला, दुबळा केला हाच यांचा प्रधान आक्षेप आहे. एका शूर देशाला दुबळे करण्याचे श्रेय संत मिळवू शकले याचा अर्थ संत दुबळे नव्हते इतका तरी निश्चित करावा लागेल. या टीकाकारांनी वारकरी पंथातले सारेच संत दैववादी होते व ते समाजाच्या अभ्युदयासाठी निरुपयोगी होते असाच निष्कर्ष काढला आहे. वस्तुस्थिती मात्र वेगळी आहे. न्या. मू. रानडे यांनी छत्रपती शिवाजीचा अवतार संतांच्या कार्याचे फलित आहे, असेच म्हटले आहे. त्यांच्या या मतात अतिशयोक्ती भासली तरी संतांच्या वाणीने आणि कायनि लोकमनात काही धार्मिक निष्ठा रुजल्या व समाजजीवनाला आकार आला यात मात्र

शंका नाही. तुकारामांच्या संदर्भात चुकीचे, गैरलागू मुद्दे उपस्थित करून 'महाराष्ट्र सारस्वत' कार वि. ल. भावे यांनी तुकारामांवर अकारण तोंडसुख घेण्याचा अपराध केला आहे. असल्या प्रयत्नांनी, अतार्किक टीकेने तुकारामांची प्रतिमा मलिन झाली काय? लोकहृदयाच्या सिंहासनावरून तुकाराम लेशमात्रही ढळले नाहीत. 'ग्यानबा तुकाराम' हा उद्‌घोष कधी थांबेल असे वाटत नाही. गरीब बिचारे टीकाकार! सारेच महापंडित आहेत. पण या देहूच्या वाण्याने त्यांची टीका अगदीच व्यर्थ ठरवली. पांडित्य हरले. संतत्व आणि कवित्व मात्र जिंकले.

तुकारामांना वास्तवाची तीव्र जाणीव आहे असे त्यांच्या काव्यावरून स्पष्ट दिसते.वास्तवाच्या भूमीवरून आदर्शाच्या आकाशाकडे पाहणारा व झेप घेणारा हा महत्वाकांक्षी कवी पलायनवादी मात्र नाही. व्यापारात दिवाळे निघाले आणि दुष्काळाच्या आपत्तीमुळे त्याच्या प्रपंचाची ससेहोलपट झाली म्हणून तो संसारातून पळून गेला आणि टाळमृदंगाच्या नादात विठ्ठलनामाचा निष्क्रिय घोष करू लागला असा निष्कर्ष अज्ञानमूलक आहे. प्रपंचाचे खरे स्वरूप त्याला आपत्तीच्या वादळामुळे समजले. या मुळातच क्षणभंगुर असलेल्या ठिसूळ संसारात माणसाने पूर्णपणे बुडून जाऊ नये, त्याने काही उच्च व शाश्वत मूल्यांची कास धरावी हाच निर्णय तुकोबांनी केला. त्यांच्या दुःखी, होरपळलेल्या मनाने परमेश्वराला अत्यंत आर्त साद घातली. अस्सल आणि उत्कट भक्तीच्या धारांनी चिंब भिजलेले त्यांचे अभंग म्हणजे मराठी कवितेचे अक्षयसुंदर लेणे आहे. एका भक्ताच्या साध्या शब्दांतून अगदी सहजपणे समूर्त झाली आहे. अनेकानेक उदाहरणे देता येतील. मागील विवेचनातून एक अभंग उद्‌धृत केलाच आहे. आणखी एक येथे देतो.

कन्या सासुऱ्यासि जाये । मागे परतोनी पाहे॥<br>
तैसे जाले माझ्या जिवा । केव्हा भेटसी केशवा॥<br>
चुकलिया माये । बाळ हुरूहुरू पाहे ॥<br>
जीवनावेगळी मासोळी । तैसा तुका तळमळी ॥

या भक्तीचे संपूर्ण दर्शन अशा अनेक अभंगांतून होते. पण ही भक्ती भाबडी नाही. तिला विवेकाचं अधिष्ठान आहे. केवळ भक्त हे काही तुकारामांचं वैशिष्ट्य नाही. जीवनाचा एक अभ्यासक, समाजाला मार्गदर्शन करणारा एक विचारवंत, अन्यायी प्रवृत्तीवर सामर्थ्यपूर्ण आघात करणारा एक बंडखोर लढवय्या, एक प्रतिभावंत कवी, ईश्वरी साक्षात्काराचे रहस्य समजून घेऊन सर्वांच्या ठायी ईश्वरत्व पाहू शकणारा

एक विकसित मनाचा साधुपुरुष-अशी तुकारामांची विविध रूपे आहेत. तो एक केवळ आर्तभक्त नव्हता. त्याच्या व्यक्तित्वालाही नानाविध समर्थ आणि सुंदर अंगे होती. त्यातच त्याची महत्ती सामावलेली आहे ही सारी अंगे दर्शनीय आहेत. तुकारामावर प्रेम करणाऱ्या आणि त्याच्यावर टीका करणाऱ्या प्रत्येकाने या संतकवीचा 'सर्वांग परिपूर्ण' अभ्यास केला पाहिजे.

**आत्मसाक्षात्कार**

तुकारामाच्या उत्कट भक्तीतून त्याला 'ईश्वरी साक्षात्कार' घडला असे त्यानेच नमूद करून ठेवले आहे. या साक्षात्काराचा अर्थ असा की आपल्या हृदयात वास्तव्य करीत असलेल्या परमेश्वराचे त्याला दर्शन घडले. आपल्याच आंतरिक सामर्थ्याची अनुभूती येणे म्हणजेच परमेश्वरी साक्षात्कार असे म्हणणे अधिक संयुक्तिक ठरेल. स्वतःच्या दुःखवर्तुळातून तुकाराम फार लवकर बाहेर पडले. वैयक्तिक सुख आणि दुःख यांच्या वेटोळ्यात जोपर्यंत मनुष्य सापडलेला असतो तोपर्यंत तो सर्वार्थांनी सामान्य राहतो. पण ज्या क्षणी हे वेटोळे सुटते आणि आपल्या व्यापकपणाची प्रतीती मनुष्याला येऊ लागते, तोच क्षण साक्षात्काराचा जिवंत मानावा लागेल. ज्या परमेश्वराचा आपण कसोशीने शोध करीत आहोत तो तर साऱ्याच विश्वात सामावला आहे. आपल्याही जीवनात ईश्वररूपाची वेल फुलत चालली आहे. आपण विश्वरूप बनत आहोत ही चैतन्ययुक्त जाणीव तुकारामांच्या चित्तात रसरसून फुलली. एक अंधारी रात्र संपून गेली, एक नवी पहाट उदयाला आली. आपल्या आत्म्याचा सुवास तुकाराम स्वतःच अनुभवू लागला.

पण येथपर्यंत या संताची झालेली वाटचाल सहज आणि सोपी नव्हती. तुकारामाला एखादी समृद्ध अशी पार्श्वभूमी नव्हती. एखाद्या अधिकारी गुरूने त्याचा हात धरून त्याला आत्मसाक्षात्काराच्या वाटेवर आणून सोडले असे घडले नाही. दुःखांनी आणि संकटांनी सर्वस्वी गांजलेल्या तुकोबाने भक्तीची वाट चोखाळली. पण ही वाटसुद्धा खडतरच होती. प्रपंचातूनबाहेर फेकला गेलेला आणि दुर्दैवाचे तडाखे सहन करीत राहिलेला हा सामान्य माणूस परमेश्वराच्या भेटीसाठी भक्तिभावाने चालत राहिला. अंधाराचे आणि खाचखळग्याचे अडथळे येतच होते. दाट जंगलात वाट हरवलेल्या वाटसरूने अंधारात चालत राहण्याचा अट्टाहास करावा तसाच एक विचित्र आणि वेडा हट्ट तुकारामाने घेतला. कशाच्या बळावर तो हे नवे साहस करीत होता? या दुबळ्या माणसाने आपली आत्मज्योत पेटवण्याचा निर्धार केला होता.

म्हणूनच तो ठेचकाळत होता. धडपडत होता. हा अंधार लवकरच वितळून जाणार आहे हा आशावाद घेऊन तो प्रत्येक क्षणाला चालत राहिला. तुकारामाचे सारेच जीवन प्रयत्नवादाचा एक तेजस्वी नमुना आहे. तो म्हणतो,

आपुल्या माहेरा जाईन मी आता।
निरोप या संतां हाती आला ॥
सुख दुःख माझे ऐकिले कानी।
कळवळा मनी करुणेंचा ॥

'माहेरची वाट' पाहणाऱ्या या भक्ताला 'माहेरहून' निरोप मिळाला याचाच अर्थ जीवाला शिवस्वरूप आतां दिसणार असे चिन्ह दिसू लागले.रात्र विरघळून गेली. अतृप्तीच्या दुःखाचा ठणका संपून गेला. अज्ञान आणि आशंका यांचे काटेकुटे दूर झाले. प्रकाशाच्या सुरांनी ओथंबलेले एक गाणे तुकारामाच्या रक्तातून आणि श्वासनिःश्वासातून लहरू लागले. हाच आत्मसाक्षात्कार होय. स्वतः तुकारामाने त्याचे विलक्षण सुंदर वर्णन केले आहे. त्याचे जे अभंग अंतर्बाह्य काव्यसौंदर्याने न्हाऊन निघाले. त्यात साक्षात्कारानंतर लिहिलेल्या अभंगांचा समावेश होतो. साक्षात्कारामुळे तुकाराम पार बदलून गेला. तो जुना, दुबळा, अज्ञानी वाणी जणू आता नाहीसा झाला आणि ज्याच्या आत्मप्रत्ययी वाणीला अमृताची रसाळ फळे येत आहेत असा एक नवीन प्रतिभावंत जन्माला आला. आपल्यात झालेले हे अद्‌भुत परिवर्तन तुकारामाला स्वच्छपणे जाणवत होते.

आनंदाचे डोही आनंदतरंग।
आनंद चि अंग आनंदाचे ॥
काय सांगो जाले काहीचिया बाही।
पुढे चाली नाही आवडीने ॥
गर्भाचे आवडी मातेचा डोहळा।
तेथीचा जिव्हाळा तेथे बिंबे ॥
तुका म्हणे तैसा ओतलासे ठसा।
अनुभव सरिसा मुखा आला ॥

आता 'नित्य नवा दीस जागृतीचा' त्यांना भेटू लागला. तुकारामांच्या मनोभूमीत चैतन्याचे झाड उगवले. नानाविध भावनांची आणि कवितांची गंगा वाहू लागली.

**प्रकाशाचे झाड**

साक्षात्कार घडल्यानंतर आणि सर्वत्र भरून उरलेल्या चैतन्य प्रकाशाचे आपण एक अविभाज्य घटक आहोत. याची जाणीव झाल्यानंतर खरे तर तुकारामाला साधण्यासारखे आता काहीच राहिले नव्हते. ती दिव्य ईश्वरी प्रेमाची ज्योती त्याच्या हृदयात आता पेटली होती. पण हा संत स्वार्थी नव्हता. खऱ्या अर्थाने 'स्व' ची सीमा ओलांडून तो निस्सीम होत होता. त्यामुळे त्याच्या जगण्याला एक व्यापक सामाजिक अधिष्ठान प्राप्त झाले. 'तुका म्हणे तोचि संत । सोशी जगाचे आघात' जगापासून आपण फुटून वेगळे राहावे. आपल्या आत्मानंदातच निमग्न राहावे असे मानणारे काही योगी असतात. पण जो योग व्यक्तीला समाजापासून पृथक् करतो तो सुयोग आहे काय? तुकाराम समाजापासून कधीच दूर गेला नाही. समाजविषयक प्रेमाची एक उत्कट धारा त्यांच्या जीवनात सदैव दुथडी भरून वाहत होती. त्याच्या ठायी असलेली ही प्रेमभावना जितकी सुंदर तितकीच समर्थ होती. म्हणूनच बुडणाऱ्या लोकांना मुक्तीच्या किनाऱ्यावर आणून सोडण्याची त्याने अविरत धडपड केली. त्याच्या माणुसकीचे आणि संतत्वाचे हेच मर्म आहे. तो म्हणतो,

जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति ।
देह कष्टविती उपकारे ॥
भूतांची दया हे भांडवल संतां ।
आपुली ममता नाही देही ॥
तुका म्हणे सुख पराविया सुखे ।
अमृत हे मुखे स्त्रवतसे ॥

या अभंगात संतत्वाचे प्रधान लक्षण सांगितले आहे. दुसऱ्यांच्या सुखाने सुखावणारी अत्यंत थोर सुसंस्कृत बुद्धी आणि स्वतःविषयीचे ममत्व सोडून सर्व प्राणिमात्रांविषयी करुणा आणि ममता हा भाग असणे हेच संतत्वाचे स्वरूप आहे. समता आणि ममता, दया, क्षमा आणि शांती यांच्यावर आधारलेला माणसांचा समाज निर्माण व्हावा हे तुकारामांचे एक भव्य स्वप्न होते: तुकाराम नावाच्या एका चैतन्याच्या झाडाला काही सुंदर स्वप्नांची फळे लहडलेली दिसतात. स्वतः तुकाराम म्हणतात,

उपकारासाठी बोले हे उपाय ।

येणेविण काय आम्हा चाड ॥
बुडतां हे जन न देखवे डोळा ।
येतो कळवळा म्हणऊनि ॥
तुका म्हणे माझे देखतिल डोळे ।
भोग देते वेळे येईल कळो ॥

आत्मसाक्षात्कारानंतर तुकोबांना आपल्या कीर्तनातून आणि प्रवचनांतून जो उपदेश केला आहे त्याचे स्वरूप पाहताना स्पष्ट जाणवते की त्यांनी संन्यासाचा कधीच पुरस्कार केला नाही. तुकाराम हे प्रारब्धवादी नव्हते. तसेच ते संन्यासवादीही कधी नव्हते. लोकांनी या संसारात राहूनच आपली कर्मे करावीत. पण संसाराच्या मोहपाशात सर्वस्वी गुरफटून उदात्त मूल्यांची विटंबना करू नये. परमेश्वराचा विसर पडू देऊ नये हीच त्यांची भूमिका आहे. ते जीवनवादी संत आहेत. आपल्याला जे पटते ते सांगताना त्यांनी कुणाचीही क्षिती बाळगली नाही. निर्भयता, स्पष्टवक्तेपणा आणि बावनकशी प्रामाणिकता हे त्यांच्या व्यक्तित्वाप्रमाणेच त्यांच्या कवित्वाचेही लक्षणीय विशेष आहेत. संसाराचे मर्म कशात सामावले आहे हे सांगताना अत्यंत अनुरूप अन्वर्थक दृष्टांत घेऊन ते म्हणतात,

गुळ सांडुनि गोडी घ्यावी ।
मीठ सांडुनी चवी चाखावी ॥
ऐसा प्रपंच सांडुनी द्यावा ।
मग परमार्थ जोडावा ॥
आकारासी कैचा ठाव ।
देह प्रत्यक्ष झाला वाव ॥
तुका म्हणे अवघे जग ।
सर्वा घटी पांडुरंग ॥

गूळ सांडून त्यातील गोडी चाखण्याची कला ज्याला साधली तो खरा रसिक म्हटला पाहिजे. तुकोबांचा हा दृष्टांत अत्यंत समर्थ आहे. गोडी चाखण्याला त्यांचा विरोध नाही. पण गोड पदार्थाभोवती घोटाळत राहण्याची लोचट वृत्ती त्यांना उचित वाटत नाही. संसारात प्राप्त होणारी सुखे पार लाथाडून द्यावीत आणि त्यांच्याकडे पूर्णपणे पाठ फिरवावी असा त्यांचा अभिप्राय नाही. सुखाच्या लिप्ताळ्यात गुरफटून न जाता सुखास्वाद घेण्याची निकोप वृत्ती आवश्यक आहे. इतकेच त्यांच्या विधानाचे

सार आहे. गूळ सांडून अलिप्तपणाने त्याची गोडी ग्रहण करता यावी त्याप्रमाणे पाठीमागे लागलेला प्रपंच अलगदपणे दूर सारण्याची किमयाआपल्याला साधली पाहिजे असे मत ते व्यक्त करतात.

तुकोबांनी हे सार आपल्या सूक्ष्म निरीक्षणातून काढले आहे. केवळ पूर्वसूरींच्या मताची त्यांनी नक्कल केली नाही. आपल्या अनुभवांचे मंथन केल्यावर जे नवनीत हाती आले ते जनतेसमोर ठेवले. 'ठाऊकचि आहे संसार दुःखाचा । चित्ती सीण याचा वाहो नये' संसार दुःखप्रद आहे असे सांगून झाल्यावर ते म्हणतात,

सुखे करावा संसार ।

परि न सांडावे दोन्ही वार ।।

संसाराची निंदा करीत असतानाच संसार सुखाने करावा असा उपदेश जेव्हा तुकोबा करतात तेव्हा सकृतदर्शनी आश्चर्य वाटते. पण संसारात राहूनही आणि त्यातील रसाचा आस्वाद घेऊनही त्याच्या आधीन होऊ नये. परमेश्वरावर विश्वास ठेवून राहावे हाच त्यांच्या उपदेशाचा इत्यर्थ मानला पाहिजे. सारे आयुष्य सत्प्रेरणेने व्यतीत करावे. सज्जनांची संगत धरावी, कारण विचारात आणि आचारात शुचिता आल्याशिवाय जीवन खऱ्या अर्थाने सुंदर होऊ शकत नाही. तुकारामांनी निर्मल जीवनाचा आदर्श जनतेसमोर ठेवला हे निर्मल जीवन ते स्वतः पावलोपावली जगले. गंगाजलासारखे शुचिमान आयुष्य आपल्या हातांनी त्यांनी घडवले. अशा पवित्र, स्वच्छ जीविताची आणि सज्जनसंगतीची महती गाताना तुकाराम म्हणतात,

शुद्ध बीजा पोटी ।
फळे रसाळ गोमटी ।
मुखी अमृताची वाणी ।
देह वाचावा कारणी ।।
सर्वांगी निर्मळ ।
चित्त जैसे गंगाजळ ।।
तुका म्हणे जाती ।
ताप दर्शनि विश्रांती ।।

सर्वांगी निर्मळ होण्याचा संदेश देण्याचा श्रेष्ठ अधिकार तुकोबांना निश्चितच होता. खरे सांगायचे तर तुकोबा हे एक पावनतीर्थ आहे. चैतन्यमय प्रकाशाचे हिरवे झाड आहे. या तीर्थातल्या पाण्याचा स्पर्श अनुभवणे आणि या प्रकाशझाडाच्या

सावलीचा लाभ घेणे हे भाग्याचे लक्षण आहे. 'भाग्य आम्ही तुका देखियेला' असेच त्याच्या काव्याचे आणि जीवनाचे चिंतन करताना जाणवत राहते.

तुकाराम हे केवळ कवी आहेत असे विधान कोणी केले तर ते चुकीचे ठरेल. ते केवळ संतही नाहीत. ते एक समाज घडवू इच्छिणारे सुधारणावादी कार्यकर्ते आणि तत्त्वचिंतक आहेत.

तुकारामांनी जीवनाला कलंकित करणाऱ्या दुर्जनांवर आणि दांभिकांवर आपल्या धारदार, फटकळ वाणीचे अनेक कोरडे ओढून अन्याय, ढोंग, अधार्मिकता आणि सांप्रदायिकता यावर दाहक टीका केली आहे. ज्याला समाज शुद्ध करायचा आहे त्याला जे जे अशुद्ध, जे जे अनिष्ट असेल ते उखडून फेकून देणे आवश्यकच असते. अन्यायाला कुरवाळून अन्याय नाहीसा होत नाही. जे मुळातच कडू आहे त्यात कितीही साखर मिसळली तरी त्याचा मूळ स्वभाव कसा नाहीसा होणार? अधर्म आणि अनीती यांनी शुभंकर मूल्यांचा गळा आवळून टाकला आहे. सत्याला आणि पावित्र्याला या जगात अनेकवेळा दारुण वनवास भोगावा लागतो. स्वतः तुकारामांचाही दांभिक आणि कर्मठ प्रवृत्तीने कमी छळ केला नाही. सज्जनांच्या छळात आनंद मानणारी घाणेरडी माणसे जगात असतात याचा तीव्र अनुभव तुकारामांसारख्या सत्पुरुषालाही आला. या संताची वाढती लोकप्रियता सहन न होऊन त्याच्या अभंगाच्या वह्या नदीत बुडवायला लावणारी क्षुद्र, मत्सरी, दुर्गंधी मनाची माणसे (?) तुकारामाच्या भोवती होती. आपल्या नसलेल्या ज्ञानाची जाहिरात करून तुकोबांवर चिखलफेक करणाऱ्या या कुटाळांची थोबाडे तुकारामांनी रोखठोक काव्यवाणीने चांगलीच रंगविली आहेत. हा संत केवळ नियतिवादी आणि दुबळा होता असा ज्यांचा मूर्ख समज झाला आहे त्यांनी पाखंड्याचा, दांभिकाचा खरपूस समाचार घेणारी तुकयाची जळजळीत कविता वाचावी. धर्माचा आणि संतत्वाचा टेंभा मिरवणाऱ्या यां अतिक्षुद्र कीटकांचा तुकारामाने जो उपहास केला आहे तो पाहाण्यासारखा आहे. एकीकडे या साधुपुरुषाने अत्यंत कोवळे, वत्सल असे अभंग लिहून सर्व भूतमात्रांवरील आपले परमकोटीचे मंगल प्रेम प्रकट केले आहे. पण दुसरीकडे त्याच्या जळत्या शब्दांचा चाबूक विद्युल्लतेच्या वेगाने आणि तेजाने नतद्रष्ट लोकांच्या पाठीवर कडाडला आहे. मला तरी तुकारामाच्या वाणीची ही दोन्ही रूपे सुंदर वाटतात. असला लढाऊ ओजस्वी बाणा या साध्या भोळ्या तुकोबात आहे म्हणून तर तो मराठी माणसांच्या गळ्यातला कंठमणी झाला आहे. संत म्हणजे केवळ

सज्जनता आणि दुबळेपणा असे जे समीकरण झाले होते ते तुकारामाने पार उधळून लावले आहे. त्याची दयेची संकल्पना समजून घेतली पाहिजे. तो म्हणतो,

दया तिचे नांव, भूतांचे पालन।
आणिक निर्दाळन कंटकांचे ॥

काट्याकुट्यांचा नायनाट केल्याशिवाय रस्ता साफ होत नाही. हलुवार हातांनी काटे दूर करता येत नाहीत. त्यावर घाव घालून त्यांची नांगी मोडून टाकावी लागते. 'नाठाळाच्या काठी देऊ माथा' हे तुकारामांचं वचन समाजाचं धारण, नियमन आणि पोषण करताना नेहमीच ध्यानात ठेवावे लागते. जेथे दया करायची ते स्थळ दयेला पात्रअसले पाहिजे. सरसकट साऱ्यांवरच दया करावी असा अशास्त्रीय, वेंधळा विचार तुकोबांनी मांडला नाही. जो भला असेल त्याला कासेचं वस्त्रही सोडून देण्याची त्यांची तयारी आहे. पण ढोंगी, दुर्जनाच्या मस्तकावर प्रहार करण्यास मागेपुढे पाहू नये हा त्यांचा संदेश अत्यंत अर्थपूर्ण आहे यात शंका नाही. दुष्टांना जरब बसवणे, त्यांना कळेल अशाच भाषेतून त्यांच्याशी बोलणे आणि सत्कार्याच्या आड येत असतील तर त्यांना जबरदस्त शासन करणे ही व्यावहारिक आणि सामाजिक नीती आहे. परमेश्वरालाही याच नीतीचा अंगीकार करावा लागला. जगात सत्प्रवृत्ती आणि सज्जन माणसे नांदायची असतील तर दुष्ट अधमांना निर्दयतेनं बाजूला सारलेच पाहिजे. त्यांना दया दाखवणे हा दुबळेपणा ठरेल. असली वांझ, भेकड दया नीच प्रवृत्तीला उलट उत्तेजन देते. तुकारामांनी या संदर्भात व्यक्त केलेले विचार अत्यंत मननीय आहेत. त्यांच्या शब्दातच ते ऐकले पाहिजेत.

गाजराची पुंगी।
तैसे नवे झाले जोगी ॥
काय करोनि पठन।
केली अहंता जतन ॥
अल्प असे ज्ञान।
अंगी ताठा अभिमान ॥
तुका म्हणे लंड।
त्याचे हाणोनि फोडा तोंड ॥
देव्हाऱ्यावरी विंचू आला।

देवपूजा नावडे त्याला ॥
तेथे पैजारेचे काम ।
अधमासी तो अधम ॥

विंचू देव्हाऱ्यावर जाऊन बसला म्हणून त्याची गय करण्याचे काय कारण? पायातली वहाण काढून त्याला ठेचलाच पाहिजे. देव्हाऱ्याचा आश्रय घेऊन काही विंचू समाजात डंख मारीत सुटले आहेत. हे तुकारामाला दिसत होते पण हा संतकवी अशा वेळी देव्हाऱ्याचीच प्रतिष्ठा राखण्यासाठी विंचवांना धडा देण्याचा संदेश देतो. तुकारामांचे भागवतसंप्रदायी संतांतले स्थान यामुळेच वेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण ठरते. 'तुका झालासे कळस' असे संत बहिणाबाईने म्हटले ते सर्वस्वी औचित्यपूर्ण वाटते.

पाखंड्यांवर प्रहार करताना तुकारामांनी योजलेल्या भाषेवर काही विद्वानांनी आक्षेप घेतले आहेत. आक्षेप घेणे, विक्षेप निर्माण करणे इतकेच काही विद्वानांचे काम असते. तुकारामांची भाषा अशा वेळी काही प्रमाणात शिवराळ होते. ग्राम्य शब्दांचा ते बिनदिक्कत वापर करतात. त्यात आवेश असतो. नागर शिष्टपणाला विसंगत वाटणारी भाषा या विद्वानांना प्रशस्त वाटत नाही. ते सरळ असे मत व्यक्त करतात की, तुकारामांची वाङ्मयाभिरुची खालच्या प्रतीची आहे. ती उच्च दर्जाची असायला हवी होती. काही वेळा अभिनिवेशाच्या भरात हा संतकवी एखादा अश्लील वाटणारा शब्दही सरळ बोलून जातो. संताच्या मुंखी अशी अभद्र वाटणारी भाषा नसावी अशा अभिप्रायाची टीका या टीकाकारांनी केली आहे. विद्वान आणि व्यासंगी समजल्या जाणाऱ्या या आक्षेपकांचे मला आश्चर्य वाटते. कित्येक वेळा त्यांची टीका अप्रस्तुत असते. चुकीचे गृहीतकृत्य स्वीकारून केलेल्या त्या टीकेचा समाचार घेणे फारसे अवघड नाही.

तुकारामांनी ज्यांच्यावर शाब्दिक हल्ले जढवले आहेत ते समाजमनात घाणेरडी बीजे पेरणारे नतद्रष्ट, दांभिक लोक आहेत. या प्रवृत्तीला उखडून टाकण्यासाठी ज्वलज्जहाल भाषेचा उपयोग करणेच आवश्यक होते. तुकारामांना जे अमंगल आहे ते खोडून, खणून मंगलाची निर्मिती करायची होती. जमिनीत घुसून बसलेले विषारी तण हळुवार हातांनी उपटण्याचा प्रयत्न कधीतरी यशस्वी होतो का? त्यासाठी कुदळ आणि फावडेच वापरावे लागते. सामाजिक जीवनातल्या अन्यायावर, दंभविसंगतीवर, कुरूपतेवर तुटून पडताना मृदुमधुर, शालीन भाषा अगदीच निरर्थक आणि परिणामशून्य ठरली असती यात काय संशय? समाजबांधणीच्या कामात कधी कधी मोडतोड

करण्याचा प्रसंग येतो. विध्वसंन हे निष्ठुरपणेंच करावे लागते. भद्र उद्दिष्टांसाठी अभद्र शब्दांचा वापर व्यवहारात आणि साहित्यात अटळ असतो. ढोंग दिसले की त्याच्या पेकाटात लाथच घालावी लागते. तुकाराम हा तर सर्वसामान्य माणसाचा प्रवक्ता आणि प्रतिनिधी आहे. त्याची या प्रसंगाची भाषा जशी असणे आवश्यक होते तशीच आहे.

**आडरानी भरले जग** **आडरानी भरले जग**

आत्मसाक्षात्कारानंतर तुकारामांच्या उपदेशवाणीला बहर यावा हे स्वाभाविक होते. पण हा केवळ व्यासपीठीय उपदेश नव्हता. अंत:करणातून उंचबळून आलेले अत्यंत प्रामाणिक विचार त्यांनी जनतेला सांगितले आहेत. भूमीतून एखादा जिवंत झरा वेगानं उसळून यावा त्यांप्रमाणं तुकोबांच्या हृदयातली समाजविषयक सहानुभूती उफाळून आली आहे. हा उपदेश करताना त्यांनी शाश्वत मूल्यांचा अखंड पुरस्कार केला आहे. तुकोबांच्या दृष्टीसमोर एक नवे सुंदर जग उभे होते व ते अस्तित्वात यावे म्हणून त्यांची सारी धडपड होती. ते म्हणतात,

आम्ही वैकुंठवासी ।
आलो त्याचि कारणासी ॥
बोलिले जे ऋषी ।
साच भावे वर्तावया ॥
झाडू संतांचे मारग ।
आडरानी भरले जग ॥

आपण जे सांगत आहोत ते नवीन नसून पूर्वकालीन साधुसंतांनी जे प्रतिपादन केले तेच पुन्हा करीत आहोत असे तुकोबा म्हणतात. केवळ शब्दज्ञानाने नाश केला. पुराणांतला अर्थ लुप्त झाला याची तीव्र खंत त्यांच्या मनात आहे 'आडरानी भरलेल्या जगाला' पुन्हा मार्ग दाखविण्याची जबाबदारी त्यांना पेलायची आहे. तयार केलेले रस्ते पुन्हा पुन्हा उद्‌ध्वस्त होतात,बुजून जातात. संताना ते पुन्हा दुरुस्त करावे लागतात. अनेक शतके हाच उद्योग चालू आहे. काय असेल तो असो ! पण माणसांची जात खरोखरच मोठी मुर्दाड आहे. महापुरुषांनी सांगावे आणि क्षुद्र लोकांनी ते विसरून जावे असा क्रम चालू आहे.

जगातील सर्वच संत महंतांच्या सांगण्यात काही अंशी समानता आढळते. चिरकालीन मूल्यांचा अस्त होऊ नये म्हणून सारेच संत आपली आत्मशक्ती पणास

लावतात. तुकारामांनी हेच केले. त्यांनी पूर्वीच्या सत्पुरुषांचा आदर्श समोर ठेवून समाजाला उद्‌बोधित केले. पण तुकाराम हे मनस्वी प्रकृतीचे संत होते. जीवनाचे निरीक्षण आणि परीक्षण त्यांनी आपल्या स्वतःच्या दृष्टिकोनातून केले होते. त्यांना आलेले अनुभवही खास त्यांचे होते. त्यांनी विनयाने जरी असे म्हटले की, 'मी नवीन काही सांगत नाही' तरी ते सर्वस्वी खरे नसते. त्यांनी आपल्या बंडखोर प्रवृत्तीला अनुसरून सामाजिक दृष्टीने उपदेश केला आहे. उदाहरणार्थ जातीच्या आणि कुळाच्या अहंकारात गळ्यापर्यंत बुडालेल्या मूर्खांचा ते उपहास करतात. 'हिंदुधर्मातील जातिव्यवस्था तुकोबांना मनापासून मान्य होती काय ? असा प्रश्न कुणी विचारला तर मी त्याचे असे उत्तर देईन, 'विषमतेवर आधारलेली जातीची आणि वर्णाची उतरंड तुकोबांना फारशी रुचलेली दिसत नाही.' 'नाही जातीसवे काम' असे म्हणून तें 'विष्णुमय जग वैष्णवाचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ' असे स्पष्टपणाने खडसवतात. याचाच अर्थ तुकोबांनी जंन्मसिद्ध उच्चनीचत्वाची कल्पना पार धुडकावून लावली आहे. भागवतधर्मीय संतांत तुकारामांनी जातिव्यवस्थेच्या विरुद्ध जेवढी ओरड केली तेवढी इतरांनी केली नाही. याचे प्रमुख कारण असे की स्वतः तुकारामासारख्या अत्यंत श्रेष्ठ अशा लोककवीला आणि संताला समाज व्यवस्थेत खालचे स्थान मिळाले होते आणि पावलोपावली त्यांचा दारुण मुखभंग तत्कालीन उच्चकुलोत्पन्न लोकांनी केला होता. ज्यांच्या मनातले सारे भेद मावळलेले आहेत, जो सर्वांना समभावनेने पाहू शकतो आणि साऱ्या समाजावर आपल्या वात्सल्याचा वर्षाव करतो त्या संतांवरही उच्चनीचत्वाचे शिक्के मारणाऱ्या पढतमूर्खांना काय म्हणावे? पण इतके खरे की तुकारामांच्या स्वाभिमानावर याच मूर्ख कल्पनेने पछाडलेल्या लोकांनी अन्याय्य प्रहार केले. तुकोबा म्हणतात,

शुद्धाशुद्ध निवड कैसे ।
चर्म मांस भिन्न नाही ।।
काही अधिक, काही उणे ।
कवण्या गुणे देखसी ॥
बाहाळ, बावी सरिता नदी ।
सूर्यतेजे निवडी काय, ।।
रश्मी रसा सकळला खाय ।
वर्णा भिन्न दुधां नाही ।।

सकळा गायीसारिखे ॥
करिता भिन्न नाही माती ।
मडक्या गति भिन्न नावे ॥
कर्ते एकविध अग्नि।
नाही मनी शुद्धाशुद्ध ॥
तुका म्हणे पात्र चाड ।
किंवा विषे अमृत गोड ॥

विषमता, भेदवृत्ती यांच्यावर भर देणाऱ्या विचारसरणीचे खंडन या अभंगात तर्कशुद्ध पद्धतीने केले आहे. परमेश्वराच्या ठायी हा शुद्ध आणि हा अशुद्ध असा भेद कधीच नसतो. ओढ्यातले पाणी काय, नदीतले काय किंवा झऱ्यातले काय पाणी हे एकच असते. गायीचे रंग निरनिराळे असले तरी त्यांच्या दुधाचा रंग एकच असतो. मग माणसांत उच्चनीच असले भेदभाव त्यांच्या जातीवरून आणि कुळावरून करण्यात काय अर्थ आहे?

तुकारामांनी जातीय विषमतेची दु:खे जन्मभर सहन केली. या विषमतेतून भोगाव्या लागणाऱ्या वेदनेचे शल्य त्यांच्या काव्यात उमटलेले आपल्याला दिसते. ज्ञानेश्वरांनाही या चिवट जातिव्यवस्थेचा जाच सहन करावा लागला. चोखामेळा, बंका महार, गोरा कुंभार, सेना न्हावी, जनाबाई, कान्होपात्रा या साऱ्याच भक्तांना 'जातीच्या' कारणामुळे मानसिक छळ सहन करावा लागला. पण या सामाजिक विषमतेच्या विरुद्ध तुकारामांनी आपला आवाज उठवला आहे. व्यक्तीच्या ठायी असलेल्या स्वतंत्र प्रेरणांची गळचेपी करणारी ही वर्णीय आणि जातीय विषमता धर्माच्या व समाजाच्या अधोगतीला कारणीभूत झाली यात काहीच शंका नाही.

भागवत संप्रदायाने भक्तीच्या आणि अध्यात्माच्या क्षेत्रात या विषमतेला कसून विरोध केला असला तरी सामाजिक व्यवहारात मात्र हा भेदभाव तसाच राहिला. जन्मसिद्ध उच्चनीचत्वाची भूमिका शतकानुशतके लोकांच्या रक्तात रुजवणारी विचारधारा काही स्वार्थी हितसंबंधी लोकांनी निर्माण केली आणि ती ईश्वरप्रणीत आहे असे सांगून या अन्यायी विचाराला तात्त्विक अधिष्ठान देण्याचा प्रयत्न केला. हिंदूंच्या समाजशास्त्रात फुटीरतेची बीजे अशारीतीने फोफावत गेली. तुकारामांसारखा एक युगंधर संतही या विषमतेच्या मगरमिठीतून सुटला नाही. सर्वसामान्य माणसाला श्रेष्ठ मूल्यांची भावोत्कट दीक्षा देण्याच्या ध्यासाने कार्य करणाऱ्या या थोर देवभक्ताला,

समाजसेवकाला 'जातीय' शक्तीशी लढण्यात आपल्या सामर्थ्याचा व्यय करावा लागला. समाज आपली भक्ती पहात नाही, कवित्व आणि साधुत्व पाहात नाही, केवळ जातीच्या विचारांनी आपल्याला तो हीन लेखतो, उपहास करतो, उपेक्षा करतो या दु:खाच्या शेकडो इंगळ्या तुकोबांच्या हळव्या मनाला डसत राहिल्या. खरे तर माणूस हा जात, वंश किंवा वर्ण यावरून कधीच मोजायचा नसतो. तो कृती कोणती करतो, त्याची मन:प्रकृती काय आहे यावरच मनुष्याची योग्यता ठरवायची असते. पण विषमतेच्या भ्रामक विचाराला तत्त्वज्ञान समजून थोर साधुसंतांनाही या समाजाने अखंड छळलेले पाहिले म्हणजे मनाला तीव्र खंत वाटते. आमची संस्कृती माणसाच्या 'माणुसकीचा'. अपमान करणारी अविचारसंपन्न शक्ती आहे. याची कोणालाही शरम वाटेल. तुकारामांच्या काळात उच्च वर्णीय समजले जाणारे ब्राह्मण नानाप्रकारच्या व्यसनांत आणि अनाचारांत गुरफटून गेले होते. भ्रष्ट झाले होते. ईश्वराची भक्ती, नीती यांचा लेशही त्यांच्या ठायी नव्हता. पण तरीही ते 'ब्राह्मण' असल्यामुळे त्यांच्या जन्मजात उच्चत्वाला कसलीही बाधा येऊ शकत नव्हती. हा चमत्कार नव्हे काय? म्हणूनच तुकाराम म्हणतात,

बरा कुणबी केलो ।
नाही तरी दंभेचि असतो मेलो ॥
विद्या असती काही ।
तरी पडतो अपायी ॥
गर्व केला होता ताठा ।
जातो यमपथे वाटा ॥

वेद वाचण्याचा, कीर्तन प्रवचन करण्याचा साधा मानवी अधिकारदेखील ज्या पवित्र समजल्या गेलेल्या परंपरेने नाकारला आणि सामान्य माणसाला अज्ञानातच ठेवण्याची तरतूद केली त्या परंपरेचे चौघडे आज विसाव्या शतकाच्या अखेरीलाही काही 'सुविद्य' माणसे वाजवीत बसली आहेत.

महारासि सिवे ।
कोपे ब्राह्मण तो नव्हे ॥
नातळे चांडाळ ।
त्याचा अंतरी विटाळ ॥

असे सांगून तुकाराम म्हणतात,

कस्तुरीचे रूपे अति हीनवर।<br>
माजी असे सार मोल तया॥<br>
आणिकही तैसी चंदनाची झाडे।<br>
परिमळे वाढे मोल तया ॥<br>
काय रुपे असे परीस चांगला।<br>
धातु केली मोला वाढ तेणे॥<br>
फिरंगी अटिता नये बारा रूके।<br>
गुणे मोले विके सहस्रावरी॥<br>
तुका म्हणे नाही जाती सवे काम।<br>
ज्यांचे मुखी नाम तोचि धन्य॥

**'माणूसपणाला' मान्यता**

माणसाच्या माणूसपणाचा निर्भेळ पुरस्कार करून तुकोबांनी कुलीनपणाच्या, उच्चपणाच्या भ्रांतिष्ट कल्पना मोडून काढल्या ही त्यांच्या प्रगमनशीलतेची अत्यंत महत्त्वपूर्ण खूण आहे. बहुजनसमाज कर्मठ कल्पनांच्या गळफासामुळं अर्धमेला झाला होता. पण तुकोबांनी अखेर 'माणूसपण' हेच उच्च आहे असा जयघोष केल्यामुळं या बहुसंख्य लोकांना आत्मविश्वासाचं वरदान मिळालं.

माझ्या मनात असा विचार येतो की तुकाराम जर विसाव्या शतकात उदयाला आले असते तर त्यांनी या जातीय विषमतेवर आणखी तीव्रतेने कोरडे ओढले असते. पण याबाबतीतील त्यांच्या 'बंडखोरीला' काळाची, परिस्थितीची आणि वैदिक धर्मकल्पनांची काही अंशी मर्यादा पडली आहे. जातीपातींच्या आकुंचित कल्पना मनातून मान्य नसणाऱ्या या संताने काळ ओळखून जातिव्यवस्थेवर काही सौम्य टीका केली आहे. पण सतराव्या शतकाच्या पार्श्वभूमीवर त्यांचे बंड ठळकपणे लक्षात येते. 'तोचि देवभक्त। भेदाभेद नाही ज्यात। भूतदया ज्याचे मनी। त्याचे घरी चक्रपाणी।' या वचनांचा रोख जात आणि कुळ यांच्या तथाकथित मोठेपणावर टीका करण्याचाच आहे. कुलीनपणाच्या आणि ब्राह्मण्याच्या, शब्दज्ञानाच्या अहंकाराने फुगलेल्या लोकासंबंधी ते म्हणतात,

बसोनि थिल्लरी।
बेडूक सागरा धिक्कारी॥
नाही देखिला ना ठावा।
तोंड पिटी करी हावा॥
फुगते काऊळे।
म्हणे राजहंसा आगळे॥
गजाहुनि खर।
म्हणे चांगला मी फार॥
मुलाम्याचे नाणें।
तुका म्हणे नव्हे सोने॥

उच्च समजल्या जाणाऱ्या जातीचा केवळ मुलामा दिलेली कृत्रिम, खोटी नाणी समाजाच्या बाजारात वापरली जात होती. मी राजहंसाहून श्रेष्ठ असे कावळे सांगत होते आणि मिरवत होते. आपली योग्यता हत्तीहून अधिक आहे असे गाढवांना वाटत होते. हत्ती ओळखायला सुद्धा किमान शहाणपणा लागतो. ज्ञानेश्वरांनाही त्यांच्या काळातल्या कर्मठ दुराराध्य लोकांनी असेच छळले होते. संतत्वाला नामोहरम करण्यासाठी काही दुष्ट शक्ती नेहमीच दंड थोपटून उभ्या राहातात. काही काळ त्या यशस्वी म्हणून मिरवतात. पण संतांच्या व्यक्तित्वापुढं अखेर त्या लोळण घेतल्याशिवाय राहात नाहीत असाच इतिहास आहे.

**कवित्वाचे दर्शन**

तुकारामांच्या अभंगांतून जाणवणाऱ्या त्यांच्या प्रतिभासंपन्न कवित्वाचे थोडेसे विवरण केल्याशिवाय या लेखाचा मला समारोप करता येणार नाही. या ठिकाणी उदाहरणासाठीम्हणून एक अभंग घेतो.

नाही निर्मळ जीवन।
काय करील साबण॥
तैसी चित्तशुद्धी नाही।
तेथे बोध करील काई॥
वृक्ष न धरी पुष्पफळ।
काय करील वसंतकाळ॥

वांझे न होती लेकरे।
काय करावे भ्रतारे ॥
तुका म्हणे जीवनेविण।
पीक नव्हे नव्हे जाण ॥

या काव्याचा अर्थ वाचतानाच मनात भरतो. अनुरूप दृष्टांतांच्या आधाराने कवी आपला भाव सहज सांगतो. सहजता, अकृत्रिमता ह्याच तुकारामांच्या काव्याचा सर्वांत अधिक असा स्पृहणीय गुणविशेष आहे. काव्यातला अर्थ कळण्यासाठी शब्दकोश घेऊन बसावे लागत असेल तर त्या काव्याला कसला अर्थ आहे? प्रसाद आणि माधुर्य हे दोन्ही गुण तुकोबांच्या वाणीत भरलेले आहेत. विषयाला अन्वर्थक असा दृष्टांत देऊन परिणामकारक प्रतिपादन करण्यात ही वाणी कुशल आहे. लौकिक जीवनातली मार्मिक उदाहरणे संतकाव्यात तुकारामांनीच अधिकांशाने दिली असे विधान करण्यात अतिशयोक्ती नाही, कविता म्हणजे काय याचे त्यांनी केलेले काव्यमय विवेचन वाचण्यासारखे आहे. ते म्हणतात,

नाही सरो येत जोडिल्या वचनी।
कवित्वाची वाणी कुशलता ॥
सत्याचा अनुभव वेधी सत्यपणे।
अनुभवाच्या गुणे रुचो येतो ॥

अनुभव हीच तुकोबांच्या काव्यामागील प्रेरक शक्ती. 'अनुभव येथे पाहिजे साचार' हे महनीय साहित्य तत्त्व त्यांना समजले होते. 'शिकविल्या शब्दांतून' ते कधी बोलतच नाहीत. आयुष्याच्या कणाकणात रुजलेला विविधरंगी, सुखदुःखरूपी उत्कट अनुभव अत्यंत प्रांजलपणाने तुकोबांनी सांगितला म्हणूनच तो कलापूर्ण, काव्यमय झाला. साहित्याचा धर्म म्हणजे बावनकशी सत्य अनुभव. तुकारामांच्या वाणीतले सत्याचे सौंदर्य मनाला झपाटून टाकते यात शंकाच नाही.

उत्तम काव्य हा चर्चेचा नव्हे तर आस्वादाचा विषय आहे. तुकारामाची मराठमोळी कविता मराठी साहित्याच्या सिंहासनावर सम्राज्ञी म्हणून नांदत आहे. आम्ही आमचे सारे काही गमवायला तयार आहोत. पण आम्हाला आमचा 'ग्यानबातुकाराम' आमच्या हृदयाशी धरून ठेवला पाहिजे.

तुकारामांची प्रसन्न, प्रखर आणि प्रभावी अभंगवाणी गेली तीनशे वर्षे मराठी

माणसाला अभय देत 'अभंग' राहिली आहे. तीनशे वर्षांपूर्वी ती जितकी तरुण आणि ताजी होती तितकीच ती आजही आहे. ती एका संताने लिहिली म्हणून ती श्रेष्ठ आहे असे मला मुळीच म्हणायचे नाही. ती देवभक्तीला वाहिली आहे की नाही याच्याशी मला मुळीच कर्तव्य नाही. पण आमच्या दुःखी, निराश आणि रित्या मनात उदात्त भावसंगीताच्या धारा ओतून आम्हाला पुन्हा उत्साहित करण्याचे कार्य ती करू शकते. म्हणूनच आम्ही तिच्यावर प्रेम करतो. या कवितेतून एक असा जिवंत माणूस दिसतो की जो नियतीशी, विरोधी शक्तीशी मर्दपणाने संघर्ष करीत राहिला. काहीवेळा त्याने मात केली, काहीवेळा त्याला पराभव पत्करावा लागला. पण त्याची जिद्द हरली नाही. मानव्यावरील श्रद्धा ढळली नाही. ध्येयनिष्ठा विरली नाही. तुकारामांच्या कवितेच्या सहवासात मिळणारे-मिळालेले आनंदाचे असंख्य क्षण मी विसरू शकत नाही. आजच्या अश्रद्ध अगतिक परिस्थितीत मनाचा तोल हरवण्याचे अनेक प्रसंग येतात. कित्येक सुंदर मूल्यांची आज पडझड झालेली दिसते. माणसाच्या अंतर्मनात दबा धरून बसलेले साप विषारी फूत्कार करताना दिसतात. मन अस्वस्थ होऊन जाते. पण अशा वेळी तुकाराम आणि त्यांची गाथा हा मोठाच आधार आहे. एक सामान्य समजला जाणारा आणि विध्वंसक नियतीच्या लाटेने आहत झालेला तुकोबा नावाचा माणूस असामान्य सामर्थ्याकडे आपल्या बळावर झेप घेताना दिसतो. आणि मग माझ्या मनाला धीर येतो. तुकाराम ही एक ज्योत आहे. खरे सांगायचे तर ती ज्वालाच आहे. तिच्या जवळ गेल्यावर आपल्या हृदयातही कर्तृत्वाच्या आणि पुरुषार्थाच्या ज्योती पेट घेतल्याशिवाय राहात नाहीत. तुकारामाच्या माथ्यावरचे आभाळ फाटलेले होते. जमिनीवर त्याला आधार नव्हता. आजूबाजूला काळोख पसरलेला, उपेक्षा आणि अपमान व विरोध यांचे खाचखळगे वाटेत विखुरलेले. पण 'आम्हा भय धाक कोणाचे हे पाहे। काळ भक्षक काय मानव हे।' असे गर्जत अदम्य विश्वासाने हा समाजमनस्क वृत्तीचा बेडर कलावंत माणुसकीचा, समतेचा, प्रेमाचा जयघोष करीत नेटाने चालत राहिला. तो लाभाविण प्रीती करीत राहिला. त्याच्या एकतारीवर जे सूर मुखरित झाले ते आजही दिलासा देतात. आमच्यासारखाच सामान्य असलेला एक माणूस वाढता वाढता आकाशाएवढा झाला हा खरे तर आम्हा सामान्य माणसाचाच गौरव आहे. 'आकाशाएवढा तुका' आम्हाला आमच्या हृदयात जतन करून ठेवायचा आहे. कारण तो आमचे शतकानुशतके जतन करणार आहे.

ooo

# महात्मा बसवेश्वरांची क्रांतिकारक विचारदृष्टी

भारतीय संस्कृतीच्या रचनेला महत्त्वपूर्ण हातभार लावणाऱ्या महापुरुषांत बसवेश्वरांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. इसवी सनाच्या बाराव्या शतकात त्यांनी कर्नाटकाच्या भूमीवर जे कार्य केले ते केवळ त्या प्रदेशापुरते मर्यादित नव्हते. त्यांच्या विचारांना कोणतीही कृत्रिम सीमा नव्हती. महात्म्यांच्या विचारांना सीमित करण्याचे कार्य अज्ञानी लोक करीत असतात. त्यामुळेच महात्मा बसवेश्वरांच्या वास्तविक महतीची यथातथ्य जाणीव अद्यापि बहुसंख्य लोकांना झालेली नाही. वस्तुतः बसवेश्वरांना 'सिटिझन् ऑफ दि वर्ल्ड' ही संज्ञा उचित ठरते. पण अजूनही त्यांच्यावर काही आकुंचित कल्पनांचे शिक्के मारले जातात, याचा खेद वाटतो. काळ, परिस्थिती व प्रदेश यांच्या काही अंगभूत मर्यादा प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तित्वाला असू शकतात, हे मान्य करूनही काही असामान्य व्यक्ती आपल्याभोवतीची कुंपणे सहज बाजूला सारतात. त्यांच्या व्यापक विचारांच्या मळ्याला कोणतेही कुंपण राहू शकत नाही. एक साकल्याचा प्रदेश त्यांच्या दृष्टीसमोर क्षितिजापर्यंत पसरलेला असतो. अशाच व्यक्ती संस्कृतीला व इतिहासाला आकार देऊ शकतात. भारताच्या सांस्कृतिक आणि धार्मिक इतिहासातले बसवेश्वर नावाचे व्यक्तिमत्व मानवी संस्कृतीलाही काही प्रकाशकिरणांची देणगी देऊ शकले.

बसवेश्वर जितके संत होते तितकेच क्रांतिकारकही होते. अध्यात्माची वाट चालणारा हा संत समाजजीवनाच्या रचनेत काही मूलभूत बदल घडवून आणण्यासाठी धडपडत राहिलेला होता. महात्मा बसवेश्वरांच्या महात्मेपणाची खूण म्हणजे त्यांच्या ठायी उचंबळत असलेली तीव्र सामाजिक जाणीव होय. वैयक्तिक मोक्षाची, केवळ आत्मकल्याणाची संकल्पना या कर्मयोगी पुरुषाला कधीच मानवली नाही. निवृत्ती, संन्यास यासारख्या विचारांना बसवेश्वरांनी कधी मान्यता दिलेली नाही. आपल्या छत्तीस वर्षांच्या आयुष्यात एक पुरुषार्थवादी, इहजीवनवादी विचारधारा सदैव मांडण्याचा त्यांनी प्रयत्न केला. समाजाची मरगळून गेलेली कर्तृत्वशक्ती या प्रयत्नांमुळे

जागृत झाली आणि एक नवा समाज आकार घेऊ लागला.

बाराव्या शतकात कर्नाटकात जी सामाजिक आणि धार्मिक परिस्थिती होती ती परंपराजड स्वरूपाची होती. जरठ झालेल्या धर्मकल्पना समाजमनात खोलवर रुजलेल्या होत्या. कर्मकांड, अंधश्रद्धा, नाना प्रकारच्या रूढी यांना अवास्तव महत्व आले होते. धर्म हा मनुष्याच्या मनाशी संलग्न असतो. आणि मनाचा विकास हेच धर्माचे फलित असते. हा विचार केव्हाच लुप्त होऊन गेला होता.

समाजाचा पाया बदल्याशिवाय खऱ्या अर्थाने सामाजिक रचनेला हात घालता येणार नाही. याची जाणीव बसवेश्वरांना तीव्रतेने झाली. लोकजीवनाशी सर्वार्थाने समरस झालेल्या या विचारवंताने समाजघडणीचा प्रयत्न प्रत्यक्ष कृतीच्या पातळीवर उतरून केला. श्रीराम, श्रीकृष्ण, महावीर आणि बुद्ध यांनी ज्याप्रमाणे काही क्रांतिकारक जाणिवा समाजात पेरल्या, त्याप्रमाणेच बसवेश्वरांनी आपल्या कालखंडात प्रबोधनाचेच कार्य केले म्हणूनच त्यांच्यात संतत्वाची आणि नवनिर्माणकतेची अशा दोन्ही प्रवृत्ती नांदत होत्या असे म्हणता येते.

महात्मा बसवेश्वरांच्या विचारधारेला एक प्रकारचा अंगभूतपणा आणि तेज आहे. त्यांच्या तत्त्वदृष्टीचा विचार करताना असे जाणवते की जीवनाच्या सर्व अंगांचा ते वेध घेत आहेत. वीरशैव धर्माचा एक उपदेशक इतक्याच मर्यादित दृष्टीने त्यांचे महत्त्वमापन होऊ शकत नाही. ते उत्कट भक्त आणि रससिद्ध कवी होते. त्यामुळे भक्तीच्या आणि काव्याच्या क्षेत्रात त्यांच्या उमटलेल्या पाऊलखुणा आज आठशे वर्षानंतरही पुसट झालेल्या नाहीत. कन्नड साहित्याला त्यांच्या अभिजात 'वचनामुळे' एक अभिनव परिमाण मिळाले. बसवेश्वरानंतर आलेल्या अनेक कवींनी वचनसाहित्याचा पुरस्कार केला. त्यात त्यांनी भर टाकली. कवित्वाच्या प्रांतातही त्यांनी क्रांतीच घडवून आणली. राजसत्तेच्या माध्यमातून लोककल्याण साधण्याचा प्रयत्न करणारे ते एक राज्यकर्ते होते. पुरोगामी मूल्यांचा पुरस्कार करून प्रतिगामी शक्तींशी झुंजत राहिलेले ते एक लढवय्ये होते. क्रांतिकारक हा जीर्णतेचा व सांकेतिकतेचा कठोर टीकाकार असतो. त्यामुळेच त्याच्या रक्तात विद्रोह उचंबळत असतो. नवी बीजे पेरण्यासाठी जुनी भूमी तो नांगरून काढतो. त्याचा एक हात जुनाट झालेला मूल्यांची मोडतोड करणारा असतो.

महात्मा बसवेश्वरांच्या विचारांची अनेक वैशिष्ट्ये असली, तरी या लहानशा टिपणात मी केवळ तीनच वैशिष्ट्यांचा संक्षेपाने परामर्श घेणार आहे.

पहिले वैशिष्ट्य असे की, परंपरागत जाती आणि वर्ण यांच्या विशिष्ट व्यवस्थेमुळे (?) समता आणि एकता यांची साधी जाणीवही बाराव्या शतकातल्या समाजात उरलेली नव्हती. विषमतावादी प्रवृत्तीचा कडेलोट झालेला होता. आज विसाव्या शतकातही बहुसंख्य माणसांच्या मानगुटीवर जातीचे, सांप्रदायिक कल्पनांचे पिशाच्च बसले आहे. बुद्ध आणि महावीर यांच्यानंतर विषमतेवर आधारलेल्या वर्णव्यवस्थेला तीव्र विरोध करून ही दुर्व्यवस्था झुगारून देण्याचा समतावादी विचार बसवेश्वरांनी लोकांच्या मनात सतत रुजवला.

समतेची वैचारिक चळवळ कर्नाटकात नव्या जोमाने सुरू करणारे, मध्ययुगातले पहिले क्रांतिकारक म्हणून बसवेश्वरांचाच उल्लेख करावा लागतो.

महाराष्ट्रात या संदर्भात महानुभाव पंथाचे संस्थापक 'चक्रधर' यांचा उल्लेख होतो. त्यानंतर तेराव्या शतकात वारकरी संप्रदायाचा उल्लेख करता येतो. पण बसवेश्वरांनी वर्णव्यवस्था समूळ उखडून टाकण्याचा प्रयत्न केला हे विशेष आहे. वारकरी संप्रदाय समतेचा पुरस्कर्ता होता व आहे यात संशय नाही पण ही समता सामाजिक जीवनात, दैनंदिन व्यवहारात येण्यासाठी या सांप्रदायाने प्रयत्न केले नाहीत. पुरातन वैदिक संस्कृतीपुढे वारकरी संतांनी वर्णव्यवस्थेच्या बाबतीत मान लववली असा इतिहास आहे. या पार्श्वभूमीवर बसवेश्वरांच्या विचारातली प्रागतिकता व क्रांतिकारकता अधिक उठून दिसते. कारण त्यांनी वर्णीय विषमतेच्या मर्मावरच कठोर प्रहार केले. त्यामुळेच हिंदुधर्माच्याही अंतरंगात समतावादी विचारांचे प्रवाह वाहू लागले. धर्मविचारात स्थित्यंतरे झाली. हिंदू परंपरेला समता आणि ममता, आंतरिक भक्ती आणि शुद्धी यांनी बैठक देऊन त्यांनी माणसाच्या पायातील गुलामगिरीचे साखळदंड तोडून टाकले. आपल्या एका प्रसिद्ध वचनांत ते म्हणतात,

"माझ्यापेक्षा या जगात कोणीही लहान नाही. शिवभक्तावाचून कोणीही श्रेष्ठ नाही. जो सर्व जीवाचे कल्याण चिंतितो तोच श्रेष्ठ आहे, असे मी मानतो. अशा श्रेष्ठ व्यक्तीची जातपात पाहणे चुकीचे आहे. उच्चनीचपणाचा जातीशी काहीही संबंध नाही."

सारे समान आहेत. अशी घोषणा करूनच बसवेश्वर थांबले नाहीत. आठशे वर्षांपूर्वीच्या त्या अंत्यंत कर्मठ कालखंडात ब्राह्मण आणि शूद्र यांचा विवाह त्यांनी घडवून आणला. समाजांच्या सर्व स्तरांत त्यामुळे प्रचंड खळबळ उडाली, बसवेश्वरांच्या विरोधकांनी आणि तथाकथित धर्ममार्तंडांनी त्यांचा विलक्षण

मानसिक छळ सुरू केला. पण ते आपल्या विचारापासून विचलित झाले नाहीत. ज्या काळात परंपरागत विषमता हा पवित्र धर्म मानला जात होता आणि ज्या काळात अनेक धर्मपंडितांनी, शास्त्रकारांनी जातिव्यवस्थेचे समर्थन चालवले होते, ज्या काळात ब्राह्मण आणि शूद्र तर राहोच, पण सर्वसाधारण माणसातही जाती उपजातीच्या अनेक भिंती ठाण मांडून उभ्या होत्या, त्या काळात त्यांनी मधुवारस नावाच्या एका ब्राह्मणाच्या मुलीचे हरळय्या या अस्पृश्य माणसाच्या मुलाशी लग्न लावून द्यावे हा खरोखरच क्रांतीचा प्रकर्ष मानावा लागेल. पण गतानुगतिक प्रवृत्तीच्या समाजाला इतके मूलगामी स्थित्यंतर रुचणे शक्य नसते. त्याच्या हिशेबी बसवेश्वर धर्ममूल्यांचे विध्वंसक ठरावेत यात आश्चर्य नाही. आठ शतकांपूर्वी जाती आणि वर्ण नसलेला व समानतेच्या भूमिकेवर अधिष्ठित असलेला समाज उभा करण्याचा हा प्रयत्न अत्यंत महत्त्वाकांक्षी होता. या प्रयत्नात महात्मा बसवेश्वर कितपत यशस्वी झाले या प्रश्नाचे उत्तर गणिती पद्धतीने देता येणार नाही. त्यांचा हा प्रयत्न असफल झाला अशी नोंद सामाजिक इतिहासात करावी लागली. पण मनुष्याच्या समानतेची घोषणा करून त्याच्या निखळ मानव्याला प्रतिष्ठा देण्याचा हा प्रयत्न म्हणजे गौतम बुद्धापासून चालत आलेल्या एका दीर्घकालीन सामाजिक लढ्याचा एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे यात शंका नाही. महात्मा बसवेश्वरांनी आपल्या काळात जातीच्या हरळीचे मूळ बलिष्ठ हातांनी उपटून फेकून दिले. ही त्यांच्या तेजस्वी क्रांतिकारकत्वाची एक खूण आहे. माणसाचे माणूसपण जात, वर्ण आणि तत्सम कृत्रिम घटकांमुळे कधीच पुसले जात नाही, हे सिद्ध करण्यासाठी समतेचा जयघोष बसवेश्वरांनी केलाआणि पुढील इतिहासात झालेल्या समता-संघर्षाला त्यांनी नवे बळ दिले.

दुसऱ्या वैशिष्ट्यासंबंधी लिहिताना बसवेश्वरांनी स्त्री- पुरुषसमतेचा जो अत्यंत उदार विचार मांडला त्याचा उल्लेख केला पाहिजे. भारतीय समाजात स्त्रीच्या कपाळी शतकानुशतके गुलामगिरीच लिहिली गेली. माता, भगिनी, पत्नी आणि कन्या या नात्यांनी पुरुषांच्या जीवनात वावरणारी स्त्री नेहमीच पुरुषापेक्षा कनिष्ठ प्रतीची मानली गेली. स्त्रीचा उल्लेख प्राचीन काळापासून शूद्रांच्या बरोबरीनेच केला गेला. केवळ दासी अथवा भोगदासी यापलीकडे तिच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होऊ नये अशा प्रकारचीच बंधने धर्माच्या नावाखाली तिच्यावर घालण्यात आली होती. गार्गी, मैत्रेयी, द्रौपदी ही केवळ अपवादभूत उदाहरणे आहेत. स्त्रीच्या

जीवनाला, व्यक्तिमत्त्वाला पुरुषाइतकीच प्रतिष्ठा आहे. पुरुषाहून स्त्री कोणत्याही अर्थाने कमी दर्जाची असत नाही. स्त्री-पुरुष समान आहेत असा उद्‌घोष बसवेश्वरांनी केला आणि स्त्रीच्या ठायी असलेल्या शक्तीची, बुद्धीची, प्रतिभेची व कर्तृत्वाची जाणीव साऱ्या समाजाला करून दिली. स्त्री-पुरुष समानतेचा हा विचार अत्यंत तर्कशुद्ध आणि प्रगतिवादी आहे यात शंका नाही. सुधारलेल्या युरोपखंडात देखील अलीकडेच स्त्री-पुरुषांची समानता मान्य करण्यात आली. पण बाराव्या शतकात स्त्रीच्याभोवती उभारण्यात आलेली अशास्त्रीय व अधार्मिक कुंपणे मोडून काढून स्त्रीमुक्तीचा नवा विचार रचनात्मक दृष्टिकोनातून मांडणारे बसवेश्वर काळाच्या कितीतरी पुढे पाहू शकत होते याबद्दल संशय उरत नाही.

बसवेश्वरांच्या या निकोप विचारसरणीमुळे व स्त्रीच्या स्वातंत्र्याच्या चळवळीमुळे त्या काळात अनेक प्रतिभासंपन्न स्त्रिया काव्यलेखन करू लागल्या, तत्त्वचर्चा करू लागल्या. त्या उपदेशक व समाजोद्धारक बनल्या. अक्कमहादेवी त्यातील एक महत्वाचे नाव आहे. पुरुषाइतकेच स्त्रीलाही सारे अधिकार जन्मसिद्ध आहेत व आपले जीवन स्वत:च्या इच्छेने घडवण्याचा तिला अधिकार आहे, ही बसवेश्वरांची स्त्रीविषयक दृष्टी म्हणजे स्त्रीस्वातंत्र्याची सनद आहे. स्त्रियांच्या उन्नतीची चळवळ एकोणिसाव्या शतकात इंग्रजांच्या राजवटीत सुरू झाली, असे आपण मानतो पण आठ शतकांपूर्वी स्त्री-पुरुषांच्या समानतेची द्वाही फिरवून स्त्रीच्या भोवती बांधण्यात आलेल्या भिंती बसवेश्वरांनी कणखरपणे पाडून टाकल्या. मध्ययुगीन समाजव्यवस्थेत स्त्री-स्वातंत्र्याची पताका बसवेश्वरांशिवाय अन्य कोणी फडकाविली नाही. त्यांनी स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाकडे भूतदयेच्या दृष्टीने पाहिलेले नाही. स्त्री आणि पुरुष हे दोन्ही समाजाचे महत्त्वाचे घटक आहेत. या प्रतिपादनात त्यांचा शास्त्रशुद्ध विचार दिसून येतो. स्त्रीविषयक इतकी प्रगत आणि क्रांतिपर भूमिका विसाव्या शतकात सुद्धा काहीशी दुर्मिळच आहे. 'अनुभवमंटप' नावाचे एक धर्मपीठ बसवेश्वरांनी स्थापन केले होते. सर्व जाती व संप्रदायातील स्त्रीपुरुष तेथे एकत्र येऊन समानपातळीवरून तत्त्वचर्चा करीत असत, याचा अर्थ बुद्धिमता, प्रतिभा, संस्कृती वगैरे सर्वच बाबतीत स्त्री पुरुषांच्या बरोबरीची आहे, हेच जणू 'अनुभवमंटपा'च्या माध्यमातून त्यांनी सिद्ध केले.

श्रीबसवेश्वरांची जीवनदृष्टी कोणत्याही अशास्त्रीय विचाराने बाधित झालेली नाही. वास्तव जीवनाला सरळपणे सामोरा जाणारा निकोप विचार त्यांनी विवरून

सांगितला आहे. सर्वच धर्मांनी पारलौकिक मूल्यांचे स्तोम माजवलेले दिसते. इहलोकांचा विचार हाच वस्तुतः धर्माशी निगडित असला पाहिजे. पण इहलोक नाकारायचा आणि न दिसणाऱ्या परलोकाला मात्र महत्त्व द्यायचे, ही भूमिका बसवेश्वरांनी स्वीकारलेली नाही. इहजीवनाकडे त्यांनी कधीही पाठ फिरवली नाही. हे इहजीवन केवळ आभासात्मक व असत्य आहे असे अनेक तत्त्वचिंतक मानतात. 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' असे म्हणतात. लौकिक जीवनाला कित्येकांनी केवळ 'माया' असेच संबोधले आहे. वस्तुतः इहजीवन हा भास नव्हे. मानवी जीवन म्हणजे एखादा निरर्थक बुडबुडा नव्हे, त्याला त्याचे स्वतःचे अस्तित्व आणि महत्त्व आहे. स्वर्ग नावाची एखादी वेगळी वसाहत अस्तित्वात नाही. या संदर्भात श्रीबसवेश्वर म्हणतात. "देवलोक आणि मर्त्यलोक हे दोन्ही वेगवेगळे नाहीत. जेथे सत्य, शील , करुणा, माणुसकी हे सद्गुण आहेत तेथेच स्वर्ग नांदत असतो. हा स्वर्ग आकाशात कोठे नाही. तो या पृथ्वीवर आपल्या मनातच असू शकतो. पण जेथे सदाचार नाही, मूर्तिमंत अन्याय आणि अनाचार आहे तोच नरक आहे. स्वर्ग आणि नरक यांचे अस्तित्व आपल्या ठायीच आहे."

ही विचारसरणी जितकी तर्कशुद्ध तितकीच इंहजीवनवादी आहे. बसवेश्वरांनी लोकजीवनाकडे सतत लक्ष पुरवून ते उन्नत करण्याचा प्रयत्न केला. यातच त्यांची 'इहवादी' भूमिका स्पष्ट होते. जे विचारवंत प्रत्यक्ष जीवनाला 'मिथ्या' मानतात त्यांना हे जीवन सुंदर व निरामय व्हावे असे वाटण्याची शक्यता नसते. इहजीवनवादी विचार आणि कर्मयोग परस्परांवर अवलंबून आहेत. जीवितातली सारी कर्तव्ये बाजूला सारायची आणि संन्यास घेऊन केवळ परमार्थचिंतनात रममाण होणारी नैष्कर्म्याची भूमिका कोणत्याही कर्मयोग्याला कधीच मानवणार नाही. या जीवनातले सारे प्रश्न, साऱ्या गुंतागुंती नीटपणे व धीटपणे समजून घेतल्याच पाहिजेत. त्याची सोडवणूक करण्यासाठी आपण योग्य रीतीने प्रयत्न केले पाहिजेत, हा बसवेश्वरांचा विचार रचनात्मक स्वरूपाचा आहे. कर्मसंन्यासात कोणताही पुरुषार्थ नाही. 'कायकवे कैलास' म्हणजे अखंड उद्योगात राहणे हीच खरी मुक्ती आहे. ही जीवननिष्ठा विचारसरणी कुणीतरी झडझडून सांगणे आवश्यक होते. आपल्या एका प्रसिद्ध वचनातून हे तत्त्वज्ञान बसवेश्वरांनी मार्मिकपणे सांगितले आहे. ते म्हणतात,

ज्याने आपल्या घामाने ही काळी माती भिजवली
अखंड श्रमाने ज्याने आपला देह राबवला
कष्ट उपसले पोटासाठी
ज्याने आपले तन आणि मन श्रमपूर्वक झिजवले
श्रमाची पूजा करून ज्याने शिवाची पूजा केली
श्रमिकाच्या झोपडीला जो कैलास मानतो
ज्याची वाणी तशी करणी हे कूडलसंगमदेवा,
तोच जगद्‌गुरू झाला.

प्रामाणिक श्रमांचा, निर्मितिशील कष्टांचा बसवेश्वरांनी केलेला हा जयघोष हा खरोखर स्फूर्तिदायक आहे. माणसे दुसऱ्याच्या श्रमावर आरामाने चरत राहण्यात प्रतिष्ठा मानतात. उद्योग न करता दुसऱ्याचे शोषण करून स्वतःचे पोषण करण्याच्या स्वार्थी प्रवृत्तीला कडकडून विरोध करणारा हा विचार नवसमाजनिर्मितीला पायाभूत ठरणारा आहे. कोणत्याही काळात या विचाराला शाश्वत स्थान असेल. कर्मसंन्यासाचे तत्त्वज्ञान सामाजिक व राजकीय दृष्टीने आत्मघातक ठरण्याचा संभव असतो. समाज क्रियाशून्यतेमुळे हतबल होतो याची जाणीव बसवेश्वरांना झाली. ते स्वतः अखेरपर्यंत कर्मप्रवण राहिले. त्यांनी निर्माण केलेल्या अनुभव मंटपातल्या व्यक्ती सुद्धा आपली प्रापंचिक जबाबदारी पार पाडीत होत्या.

इहजीवनाला, त्यातल्या अपरिहार्य कर्तव्याला नकार देणे हा शुद्ध पलायनवादच नव्हे काय? निवृत्तीच्या विचाराचे कौडकौतुक या देशात सतत होत गेल्यामुळे प्रवृत्ती, पराक्रम, प्रयत्नशीलता आणि पुरुषार्थ यांचा पाया ढासळत चाललेला होता. हे जीवन लटके आहे आणि प्रपंच म्हणजे दोन घटकांचे एक स्वप्न आहे, या भ्रांतिष्ट विचाराने भारताच्या अनेक पिढ्यांवर आपले सावट टाकले होते. उद्यमशीलतेला त्यामुळे ओहटी लागली होती. दैववादाचे तण माजून निष्क्रियता वाढली होती. या पार्श्वभूमीवर 'कायकवे कैलास' हा महनीय मंत्र उच्चारल्यामुळे आत्मप्रत्ययाची एक नवी लाट उचंबळून आली. 'कायक' याचा अर्थ उद्यमशील विशुद्ध सात्त्विक जीवन जगणे हा आहे. आपल्या चरितार्थासाठी आणि सामाजिक स्थैर्यासाठी करायचा नाही. उद्योगाच्या मागे उन्नत, सुसंस्कृत जीवन जगण्याचा विचार आहे. बसवेश्वरांनी तर असाही नियम केला होता की, धर्मसाधना व धर्मप्रचार करणाऱ्या शिवशरणांनी सुद्धा आपल्या चरितार्थासाठी समाजावर अवलंबून राहू

नये. आपल्या कष्टावरच त्यांनी जगावे. 'अनुभवमंटपा' त दाखल झालेला एक राजा-मोळगी मारय्या-रानातील लाकडे तोडून त्यांच्या मोळ्या बांधून गावात त्या विकायचा आणि त्या श्रमावर निर्वाह करायचा अशी त्याची कथा आहे. भारतीय तत्त्वज्ञानात प्रवृत्तीचा, इहजीवनाचा आणि श्रमाचा इतका गौरव बसवेश्वरांनीच प्रथम केला. संन्यासवादाला लाभलेली प्रतिष्ठा त्यांनी काढून घेतली, हे त्यांच्या तत्त्वदृष्टीचे एक लक्षणीय अंग आहे. परमार्थाचे स्तोम माजलेल्या निवृत्तिप्रधान समाजात नवनिर्मितीचे कार्य होऊ शकत नाही. समाजजीवन क्रियाशील व्हावे, रसरशीत बनावे यासाठी ऐहिक जीवनाला प्रतिष्ठा मिळाली पाहिजे; नाहीतर सामाजिक शक्ती उत्तरोत्तर क्षीण होत जातात, असा इतिहास आहे.

कर्मवादी वीरप्रवृत्तीची चेतना बसवेश्वरांनी जीवनात ओतली आणि पुरुषार्थ-वादाचा ध्वज त्यांनी फडकावला. आत्मकल्याण साधायचे असेल तर प्रपंचाचा त्याग करावा, संन्यास धारण करून रानावनात राहून लोकसंपर्क सोडून द्यावा ही निष्क्रियतेची शिकवण बसवेश्वरांनी झटकून टाकली. निढळाचा घाम गाळणारा प्रामाणिक माणूस सामाजिक जीवनात त्यांनी प्रतिष्ठेने उभा केला. हे त्यांचे कार्य असामान्य स्वरुपाचे आहे. आपले जीवन केवळ आपल्या वैयक्तिक सुखासाठी नसून हे समाजाचे आहे, ते समाजाला दिले पाहिजे, ही उदात्त जाणीव नेहमीच संतांच्या ठायी वसत असते. समाजप्रेम हा त्यांचा उत्कट धर्म बनतो. श्रीबसवेश्वरांचा धर्म हा आत्मकल्याणापेक्षा समाजकल्याणावर अधिकांश भर देतो. आपल्या मठात किंवा अभ्यासिकेत बसून अमूर्त चिंतन करणारे काही तत्त्वज्ञ असतात, पण त्याचा उपयोग प्रत्यक्ष समाजाला फारसा होत नाही. प्रज्ञा आणि प्रतिभा या शक्तींना सामाजिक जाणिवेचे अधिष्ठान नसेल, शक्ती नव्या परिवर्तनासाठी सिद्ध नसतील, तर त्यांचा उपयोग काय ? ज्ञानवंताना समाजभान हवे आहे. प्राचीन काळापासून संत आत्मचिंतनात व पंडित आत्मकेंद्रिततेच्या वलयात गुरफटलेले दिसतात. आपल्याभोवती पसरलेल्या समाजाच्या आशाआकांक्षांशी सहकंप पावण्याची प्रवृत्ती अध्यात्मवाद्यात आणि शास्त्री-पंडितात फारशी नव्हती.

सर्वसाधारण माणूस हा आपल्या दैनंदिन समस्यांच्या विळख्यात वर्षानुवर्षे, शतकानुशतके सापडला होता. त्याच्या मनाशी 'संवाद' करण्याचा प्रयत्न झालाच नाही. बसवेश्वरांनी हा माणूस आपल्या जीवनकार्याचा केंद्रबिंदू बनवला. त्यामुळेच त्यांच्या आर्थिक, नैतिक व शैक्षणिक समस्यांचाही त्यांनी विचार केला आहे

मानव्यावरील आत्यांतिक निष्ठाच त्यांना परमेश्वरापर्यंत नेऊ शकली. माणसातील ईश्वरत्व या महामानवाने जाणले होते. श्रीबसवेश्वर हे विकसित मानवाचे एक परमदर्शनीय रूप आहे यात संशय नाही. त्यांच्या 'वचनसाहित्यात' ईश्वरभक्तीचे जे अत्यंत परिणत व उत्कट दर्शन घडते, त्याचे कारण त्यांच्या विशुद्ध जीवननिष्ठेत आणि मानवप्रेमात सामावलेले आहे.

जीवनाचे हे तत्त्वज्ञान जीवनभक्तालाच स्फुरू शकेल. सामान्य जनतेच्या भाषेत बसवेश्वर बोलतात. पंडितांच्या तत्त्वजड शब्दांतून न सांगता ते कलावंताच्या रसमय वाणीने मनुष्याच्या अंत:करणाचा ठाव घेतात.

अवघे पस्तीस वर्षांचे आयुष्य या महात्म्याला लाभले. आता आठशे वर्षे उलटून गेली आहेत. सांप्रदायिकतेविरुद्ध ज्याने बंड केले, त्याच्या व्यक्तिमत्त्वाला संप्रदायाच्या भिंतीत आपण कोंडू नये. मानवजातीच्या चिरंतन प्रगतीसाठी बसवेश्वराची विचारधारा आवश्यक आहे. या महात्म्याच्या एका वचनाचा उल्लेख करतो.

धनिक बांधतात शिवमंदिरे, गोपुरे
गरिबाने काय बांधावे?
माझ्या देहातच आहे देवाचे मंदिर
दोन पायांच्या आधाराने अढळ,
मस्तक माझे, सुवर्णाचा कळस
अविनाशी आत्मा आहे मंदिरात.

श्री बसवेश्वरांच्या जीवननिष्ठ विचारातून जीवनाला अधिक रसमयता येईल यात संदेह नाही.

○○○

# श्री सिद्धरामेश्वरांची भक्तिकविता

भक्ती ही मुळातच एक सुंदर आणि पवित्र भावना आहे. भक्ती उत्कट झाली की ती नेत्रांतून अश्रूरूपाने वाहू लागते. शब्दांतून काव्यरूपाने पाझरू लागते. भक्तीला उदात्त विषयाचे, महान आराध्य दैवताचे अधिष्ठान असले की भक्तिकाव्यातून तत्त्वज्ञानाच्या धारा नृत्य करू लागतात. भक्ताचे अंतःकरण आनंदाने, तृप्तीने फुललेले असते. मुक्तीपेक्षा आपली भावभक्तीच त्याला अधिक मोलाची वाटते. जेव्हा भक्ती तीव्र होते तेव्हा भक्ताचे डोळे पाषाणात देखील परमेश्वरी सौंदर्य पाहू शकतात. प्रत्यक्ष पाषाणालाही देवत्व प्रदान करण्याची शक्ती भक्तीतच असू शकते. याच भावनेतून पुढे भक्ताचे सारे जीवन अंतर्बाह्य सुखमय होऊन जाते. भक्तीचा आणि परमेश्वरप्रेमाचा सुभग आविष्कार अनेक संतकवींच्या काव्यातून झाला आहे. त्यांचे काव्य आजही वाचकाला आनंदाच्या वाटेने घेऊन जाते. श्रेष्ठ संतकवींच्या मालिकेत अनेक नावे गुंफता येतील. सिद्धरामेश्वर हे नावही भक्तीचे आणि प्रेमाचे, प्रज्ञेचे आणि प्रतिभेचे, शांतीचे आणि प्रसन्नतेचे प्रतीक म्हणून सदैव जनतेच्या अंतःकरणात राहिलेले आहे. श्री सिद्धरामेश्वरांचे वचनसाहित्य हा भारतीय साहित्याच्या सौंदर्याचा एक अविभाज्य घटक आहे.

ज्याचे हृदय संपन्न असते, ज्याच्या मनात सद्‌भावनांचे गंगाजळ असते आणि ज्याची सामाजिक कल्याणाची जाणीव तीव्र असते असा भक्त संतत्वाच्या उच्च पायरीवर उभा राहून लोकप्रबोधनाचे कार्य आपल्या समर्थ शब्दांतून करीत असतो. श्री सिद्धरामेश्वर केवळ भक्त नव्हेत ते तत्त्वज्ञही होते. मनुष्यजीवन विशुद्ध व्हावे. त्यात विश्वबंधुत्व नांदावे ही त्यांची आकांक्षा होती. त्यांचे समग्र आयुष्य या शिवतत्त्वालाच वाहिलेले होते. सोलापूरच्या भूमीत पुण्यप्रद विचारांची पेरणी करणारा हा संतकवी आपल्या वचन साहित्याने कन्नड भाषेला एक वैभव देऊन गेला. संतांची भाषा कन्नड आहे की मराठी आहे की हिंदी आहे या गौण तपशीलाला काहीच अर्थ असत नाही. त्यांची भाषा ही नेहमीच हृदयाची भाषा असते. जागृत अंतःकरणाच्या भाषेलाच चिरसौंदर्याचा ताम्रपट मिळू शकतो. श्री सिद्धरामेश्वरांचे 'वचन साहित्य'

दीपस्तंभाप्रमाणे आपल्याला मार्गदर्शक आहे.

वीरशैव धर्मात विश्वधर्माची जी मूलभूत तत्वे सामावलेली आहेत त्या तत्त्वांचे निरूपण आणि दर्शन वचनसाहित्यांतून होते हे काव्य 'मुक्तकाव्यासारखे' आहे. आकाशात मेघ दाटून यावेत आणि पावसाच्या सरीमागून सरी कोसळाव्यात त्याप्रमाणे भक्ताचे हृदय भरून आले की, काव्यधारा बरसू लागतात. वचनसाहित्याला त्यामुळे सामर्थ्य आणि आवेग यांची देणगी मिळाली. भावना, विचार, जीवनदृष्टी, उद्‌बोधन असे वेगवेगळे रंग यात जाणवतात. 'वचन साहित्य' ही कन्नड भाषेने भारतीय साहित्याला दिलेली एक अद्‌भुत देणगी आहे असे म्हटल्यास ते संयुक्तिक ठरेल. श्री सिद्धरामेश्वरांच्या काही वचनांचे या लेखात मला माझ्या दृष्टिकोनातून रसग्रहण करायचे आहे, स्वतः श्री सिद्धरामेश्वरांनी आपण अडुसष्टहजार वचने लिहिल्याचा उल्लेख एका कवितेत केला आहे. इतकी वचने गाणारा हा कवी विशाल प्रतिभेचा आहे यात संदेह नाही. त्यांनी लिहिलेल्या अन्य साहित्याचाही उल्लेख सापडतो. उदाहरणार्थ 'कालज्ञान' हा ग्रंथ व 'बसवस्तोत्र-त्रिविधी', 'अष्टावरण-त्रिविधी', 'मिश्रस्तोत्र-त्रिविधी' इ.ग्रंथरचना त्यांनी केली आहे. त्यांचे समग्र 'वचनसाहित्य'मात्र उपलब्ध नाही. पण जी वचने उपलब्ध आहेत त्यावरून संत, कवी, तत्त्वज्ञ आणि समाजसुधारक अशी त्यांच्या व्यक्तित्वाची चार अंगे जाणवतात. एका वचनात त्यांनी म्हटले आहे-

देशोदेशी भ्रमंती केली तरी काय?<br>
काशी-रामेश्वर यात्रा केली काय?<br>
कोशमय जाणून ओलांडल्याशिवाय?<br>
होते प्राप्ती देश फिरल्यास<br>
चांगल्या वाईटाचे अवलोकनाची<br>
होते प्राप्ती यात्रा केल्यास<br>
मूढ साधूजनाला पाहाण्याची<br>
होते प्राप्ती कोशमय ओलांडल्यास<br>
कपिलसिद्ध मल्लेद्रांच्या स्वरूपाची!

तीर्थयात्रेच्या संदर्भात व्यक्त केलेले हे स्पष्ट विचार आहेत. अंतःकरणाची शुद्धी नसेल तर तीर्थयात्रेचा उपयोग काय? असा सवाल श्री सिद्धरामेश्वर विचारतात. प्रत्येक संताने केलेली तीर्थयात्रा म्हणजे व्यर्थ परिश्रम आहेत. हृदयातली भक्ती निखळ असेल तर मग तीर्थयात्रेचीसुद्धा आवश्यकता नाही. या विचारातले सत्य भक्तांनी

समजून घेतले पाहिजे.

आणखी एका वचनात ते म्हणतात-
वेदवेदांग वाचून काय उपयोग?
मनातील सुतक नाश केल्याविण
सिद्धसिद्धांतात श्रम केल्यास काय उपयोग?
असती ह्या सर्व बाहेरील गोष्टी
परि साधावी एकच गोष्ट
कपिलसिद्ध मल्लिनाथांच्या समवेत होऊन सदाचारी
चालावे सन्मार्गावरी

वेदवेदांताचे नित्यपठण करणारे आणि तरीही मनातला विकार नाहीसा न झालेले पुष्कळ 'विद्वान' श्री सिद्धरामेश्वरांनी पाहिले होते.अहंगंडाने पछाडलेल्या तथाकथित वेदपरायणांच्या मनात मात्र शांती आणि भक्ती नव्हती. ते स्वतःच्या विद्वत्तेचे प्रदर्शन मांडीत होते. नुसत्या घोकंपट्टीने विद्वता येत नसते. ज्याचे मन स्वच्छ नसते, निरोगी नसते त्याच्या वाचनपठणाचा काहीही उपयोग नाही. अहंकाराने असा पंडित वाया गेलेला असतो. बाभळीच्या झाडाजवळ जाणाऱ्याला सावली मिळत नाही. काटे मात्र मिळतात. शब्दज्ञानापेक्षा भक्तीतून आणि सदाचारातून प्राप्त झालेली कल्याणकारक प्रसन्न जीवनदृष्टी हेच खरे ज्ञान आहे. बाह्य गोष्टीतून ते मिळत नाही. त्यासाठी आंतरिक स्वच्छता आवश्यक असते. हा आशय केवळ सहा-सात छोट्याशा ओळीतून या महनीय संताने व्यक्त केला आहे. शब्द कमी, अर्थ अधिक आणि भाव विकसित झालेला असे त्यांच्या वचनांचे स्वरूप आहे.

श्री सिद्धरामेश्वरांची रसमय, अर्थपूर्ण, भावसमृद्ध वचने वाचताना मला एक उपमा द्यावीशी वाटते. एखाद्या सुंदर स्त्रीने शुभ्रधवल वस्त्र परिधान करावे, तिच्या मुखावर आनंद आणि वात्सल्य असावे, कपाळावर कुकुंमतिलक असावा, नेत्रांत आणि गात्रांत शालीनतेची झाक असावी आणि अशा कलावतीच्या हातात पारिजातकांच्या फुलांची परडी असावी अशी त्यांची कविता आहे. मोकळ्या अंतःकरणाचे हे मोकळे सूर आहेत. भक्ताच्या हृदयीची ही अनिवार्य स्पंदने आहेत. जणू श्री सिद्धरामेश्वरांनी आपल्या वचनातून आपल्या मनाचे आणि भावनांचे चित्र हळुवार हाताने रेखाटले आहे. उत्कृष्ट कवितेला फक्त मनाचा ताल लागतो. तिला अलंकारांची आणि भरजरी शब्दांची, नाट्यपूर्ण विधानांची काहीच जरूर नसते श्री

सिद्धरामेश्वर सरळ आपल्या वाचकांच्या काळजालाच हात घालतात. त्यांच्या काव्याचा हेतू आत्माविष्कार आणि प्रबोधन हाच आहे. अहंकाराची लहानशीही झुळुक त्यांच्या कवित्वाला लागलेली नाही. अशा कविता सहजपणे वाचकाला अंकित करते. शांतपणे जळत राहिलेली एखादी उदबत्ती आपला हळुवार सुगंध देत असते त्याप्रमाणे या संताचे हे 'वचनसाहित्य' त्याच्या अंतरंगातील भावसुगंध देत आहे. ते म्हणतात-

अगा देवा! तुमच्या शरणांचे दुःखच
असे माझेच दुःख जाण
जाणूनी पाहूनी नसे होत सहन
तुमच्या शरणासारखे
वाकडे वागणारे दुष्ट
त्यांच्यावरी कसा होऊ मी रुष्ट?
कपिलसिद्ध मल्लेश्वरा तू त्यांच्यात
वसत असल्या कारणास्तव!

परदुःखाने दुःखे होणारी ही मनोवृत्ती आहे. अन्य शरणांचे दुःख पाहून श्री सिद्धरामेश्वर अस्वस्थ होतात, व्याकुळ होतात. दुष्टांनी सज्जनांचा छळ करावा हे शल्य त्यांना सारखे टोचत राहते. पण या दुष्टांच्या हृदयातही देवत्वाचा अंश आहे असा आशावाद त्यांना रुष्ट होऊ देत नाही. संतांच्या मनाची झेप किती उंच असते याचेच हे उदाहरण आहे. 'खळांची व्यंकटी सांडो। तयां सत्कर्मी रती वाढो' हीच संतांची मनोभूमिका असते. जगाला अधिक सोज्वळ, अधिक सुंदर रूप द्यावे हीच संतांची 'स्वार्थबुद्धी' असते. कारण जग सुंदर झाल्याशिवाय आणि ईश्वरभक्तीचा प्रकाश सर्वत्र पसरल्याशिवाय संत खऱ्या अर्थाने सुखी होऊ शकत नाहीत. आपल्या एका कवितेत श्री सिद्धरामेश्वर म्हणतात,

'कैलास मिळावा म्हणून धडपडणाऱ्या बांधवांनो, तुमच्यातच तो कैलास सामावला आहे. तुमच्या निरामय आचार-विचारातूनच तो कैलास साकार होणार आहे. आपले कर्तव्यकर्म हाच कैलास आहे. सदाचारातच साक्षात्कार घडतो कैलासाचा.' या विचारात खरोखरच एक अवीट सौंदर्य भेटते. शब्दांच्या माध्यमातून व्यक्त झालेला हा जीवनवादी विचार मनाला उल्हसित करतो. श्री सिद्धरामेश्वरांच्या वचनांत निराशावाद किंवा पलायनवाद कुठेही आढळला नाही. जीवनाची सार्थकता कशात आहे याचा विचार मात्र त्यांनी सूचक शब्दांतून मांडला आहे. त्यांची शैली

साधी असली तरी ती संपन्न वाटते. कपिलसिद्ध मल्लीनाथांवरची त्यांची भक्ती अतूट आहे. आपली भक्ती अधिकाधिक निर्मळ होण्यासाठी ते तळमळत आहेत. तळमळणाऱ्या हृदयाचे उष्ण निःश्वास त्यांच्या काव्याने अलगदपणे टिपून घेतल्यामुळे हे काव्य वाचकाच्या मनाला जाऊन भिडले तर त्यात आश्चर्य नाही. खरे काव्य हे मनाची उंची वाढवते, त्याला उत्साह देते. **'True Poetry raises and erects the mind'** हे बेकनचे वचन किती सार्थ आहे याची प्रतीती येथे येते. कवी कोणाला म्हणतात याचे वर्णन करताना एक विचारवंत म्हणतो, **'A poet is painter of the soul'** आत्म्याचे चित्र रेखाटणारा चित्रकार म्हणजे कवी. भक्तीच्या उच्च सीमेपर्यंत गेल्यानंतर परमेश्वराकडे सिद्धरामेश्वरासारखा संतकवी काय मागणी करतो हे पाहाण्यासारखे आहे.

घडवावा मला देवा तव शरणांचा संग
द्यावा मला देवा तव शरणांचा आनंद
करावे मला देव तुमच्या शरणासारिखे
शुद्ध निर्मळ भक्ती द्यावी मला
पादोदक प्रसादात स्मरण होण्यास
पात्रता द्यावी मला
तव शरणांच्यात एकरूप होऊन राहू द्यावे मला
तव शरणांच्या पदतली जन्मजन्मांतरी सदैव राहू द्यावे मला
देवा रे कपिलसिद्ध मल्लिकार्जुना,
जनन मरणाच्या भोवऱ्यातून सोडवावे प्रभो मला!

या कोमलार्त कवितेवर भाष्य करण्याचे काहीच कारण नाही. ही कविताच आपल्याशी दीर्घ संवाद करू शकते. खरे तर या कवितेच्या रूपाने आपल्याशी श्री सिद्धरामेश्वर हितगुज करीत आहेत. ही केवळ भक्तीची कविता नाही. तिच्यात जागृती आहे. शिवशरणांच्या मध्ये आपण एकरूप व्हावे ही इच्छा आहे. जन्म आणि मरण यांच्या चक्रातून व्यर्थ भ्रमण करण्यात त्यांना स्वारस्य वाटत नाही. देवत्वात विरून जावे हीच मनीषा उरलेली आहे. साखर दुधात एकरूप होते. दुधाचा ती अविभाज्य घटक बनते. त्याप्रमाणे भक्ताला ईश्वररूपात विलीन व्हावेसे वाटते.

श्री सिद्धरामेश्वरांची कविता भक्ती, अध्यात्म आणि सामाजिक जाणीव यांनी ओथंबलेली आहे. ती जितकी 'स्वान्तः सुखाय' आहे तितकीच 'बहुजन हिताय' आहे. ही कविता सांप्रदायिक नाही. सर्वच माणसांना - ही माणसे कोणत्याही धर्माची

वा संप्रदायाची असोत ही कविता सर्वांची आहे. विश्वात्मक आहे. कारण परमेश्वराची भक्ती आणि करुणा, शांती, प्रेम, समता या प्रवृत्तींचा उद्‌घोष म्हणजे मानवतेचीच पूजा आहे. मानव्याच्या पूजनात, शिवत्वाच्या उपासनेत रमलेल्या श्री सिद्धरामेश्वरांच्या हृदयवीणेचे झंकार स्वरबद्ध करणारी ही कविता खरोखरच प्रत्ययकारी आहे. तिची भेट होणे हे सुदैवाचे लक्षण आहे. वाचकांनी अशी भेट घ्यावी इतकेच मी म्हणतो.

ooo

# कबीरांची मुलायम चादर

जीवनाच्या अनुभवातून आणि चिंतनातून जे काव्य प्रकट होतं त्याला स्वतःचा विशिष्ट सुवास असतो. संत कबीरांचं साहित्य त्यांच्या अनुभवाचं रूप आहे. त्यात विद्वत्तेपेक्षा शहाणपणा अधिक आहे. अनेक कवींची कविता त्यांच्या पांडित्याच्या भाराखाली दबून जाते. ती वाचकांच्या आणि श्रोत्यांच्या हृदयाला स्पर्श करू शकत नाही. खरं तर कवितेनं हृदयाची उत्कट भाषा बोलावी. तिनं आपल्या अंतर्मनाचा नाद ऐकवावा. कवीची लेखणी बोलत असेल तर त्याची कविता कृत्रिम वाटू लागते. मराठी आणि हिंदी भाषेत किंबहुना साऱ्याच भाषांत पंडिती काव्याची एक परंपरा आहे. तिच्यात कल्पनेच्या भराऱ्या असतील, पांडित्याचे अवडंबर असेल. अलंकारांचा वर्षाव असेल, अशी कविता थोडा वेळ बुद्धीचं रंजन करते. पण ती अंतःकरणाचा मात्र ठाव घेऊ शकत नाही. मराठीत मुक्तेश्वरापासून मोरोपंतांपर्यंत पंडितकवींची काव्यधारा निर्माण झालेली दिसते. मूठभर संस्कृत रसिकांच्या पलीकडे तिला फारसा आश्रय मिळू शकला नाही. पंडित कवी आणि त्यांची कविता यांचा शोध साहित्याच्या इतिहासातच घेता येतो. या व्युत्पन्न पंडितांचा पराभव चोखामेळा, जनाबाई, गोरा कुंभार यासारख्या तथाकथित अशिक्षित संतकवींनी केव्हाच केला. आज आम्हाला चोखामेळ्याच्या कित्येक काव्यपंक्ती रोमांचित करतात. जनाबाई, घरोघरी पोहोचली. पण वामनपंडित, सामराज, नागेश ही नावंसुद्धा ओळखीची वाटत नाहीत. काव्य हा वस्तुतः अनुभूतीचा व चिंतनाचा आविष्कार आहे. तो पढीक पांडित्याचा विषय होऊ शकत नाही. ज्ञानी कोण या प्रश्नाचं उत्तर ज्यानं हातात कधी लेखणी घेतली नाही अशा निरक्षर असलेल्या संत कबीरानं मार्मिकपणानं दिलं आहे. 'ढीगभर ग्रंथ वाचणारा खरा पंडित नव्हे. प्रेम ही अडीच अक्षरं ज्याला उत्तम कळली तोच खरा ज्ञानवंत असतो.'

कबीरांचा हा निष्कर्ष अत्यंत अर्थपूर्ण आहे. स्वतः कबीराचा पढीक ज्ञानाशी कधीच संबंध आला नाही. तो एक श्रमजीवी कोष्टी होता. आपल्या हातमागावर, निढळाचा घाम गाळून चादरी आणि शेले विणणारा विणकर होता. वस्त्र विणताना त्याच्या मनातून रामनामाची धून बाहेर पडत असायची. उभे-आडवे धागे जोडून

आणि विणून तो आपला चरितार्थ चालवीत होता. अनेक ग्रांथिक विद्वानांपेक्षा त्याच्या ठायी आयुष्याच्या अनुभवातून आणि निरीक्षणातून आलेलं मौलिक शहाणपण कितीतरी अधिक होतं. सर्वांकडे तो समदृष्टीने पाहत होता. उच्चनीचतेची श्रेणी त्याच्या मनातही कधी नव्हती. तो हिंदूही नव्हता की मुसलमानही नव्हता. जात आणि संप्रदाय यांची कुंपणं त्यानं केव्हाच पार केली होती. कबीर केवळ 'माणूस' होता. माणूसच राहिला. ज्या काळात साधुसंतांनाही जातीपातींच्या वर्तुळात ढकलले जात होते, (खरंतर आजही संतांची जात भलेभले लोक विचारात घेतात.) त्या काळात कबीरानं गर्जून सांगितलं होतं.

जाति न पूछो साधुकी पूछ लिजिए ग्यान
मोल करो तलवार का, पडा रहन दो म्यान

संतांची योग्यता ज्ञान आणि तपस्या यावर अवलंबून असते. कुळाशी आणि जातीशी संतत्वाचा काय संबंध असतो ? पण संत चोखामेळ्याला अस्पृश्यत्वामुळं विठ्ठलमंदिरात प्रवेशच मिळाला नाही. देवाच्या दर्शनाला सुद्धा जातीचं भांडवल लागावं हा वस्तुतः भक्ताचा नव्हे तर देवाचाच अपमान आहे. राम आमचा आहे असं म्हणून रामदर्शनाला निघालेल्या दलितांना विसाव्या शतकात मंदिराचे दरवाजे बंद करण्यात आले. काही शतकांपूर्वीची परिस्थिति यापेक्षा भीषण होती. चोखामेळा जन्मभर विठ्ठलदर्शनासाठी रात्रंदिवस पाण्याबाहेर काढलेल्या माशासारखा तडफडत राहिला. पण दुरून मंदिराचा कळस पाहाण्यापलिकडं त्याच्या पदरात काहीच पडलं नाही. पण आश्चर्याची गोष्ट अशी की, भक्तीनं ओथंबलेली आणि कारुण्यानं ओसंडणारी आर्त कविता या अस्पृश्य संतानं लिहिली. कवित्वाची शक्ती व संतत्वाची वृत्ती जातीला महत्त्व देत नाही. अनेक ज्ञानवंत दुष्टप्रवृत्तीचे असतात. कबीरासारखे निरक्षर संत संतत्वाचा आदर्श होऊन बसतात. कबीर हा जीवनाचा, जीवनातल्या परम तत्त्वांचा, माणुसकीचा महान उपासक होता. स्पर्शास्पर्शभेद मानणाऱ्या, उच्चनीचत्वाची जाणीव ठेवणाऱ्या पंडितांचा उपहास करून कबीरानं म्हटलं आहे,

पंडित, देखहु मनमह जानी।
कहुधौ छूति कहांते उपजी तबहिं छूति तुम मानी।
बादे, बंदे, रुधिरके संगे घटही मह छट सपचै।
अस्ट कंवल होय पुहुमी आया छूति कहाते उपजै।

लख चौरासी नाना बासन सो सभ सरि भौ माटी।
एकै पाट सकल बैठाये छूति लेत धौंकाकी।

'पंडितवर्या ! नीट विचार करून पहा, हे स्पर्श-अस्पर्श भेद कुठून निर्माण झाले ? साऱ्यांची उत्पत्ती एकाच पद्धतीनं होते. शरीराची मातीही अखेर मातीला मिसळून जाते. मग असं असून ही शिवाशीव कुठून आली ? त्या परमेश्वरानं तर सर्वांना एकाच पाटावर बसवलं आहे. पंडिता, विचार करून पहा.'

कबीरांच्या या काव्यात तर्कशुद्ध विचाराची शक्ती आहे. जन्मसिद्ध श्रेष्ठ-कनिष्ठत्वाची कल्पना किती अज्ञानपणाची आहे हे सिद्ध केलं आहे. या विचारातली शास्त्रीयता आणि क्रांतिकारकता आजही पुराणमतवादी कर्मठांना पटणार नाही. पण जे आपल्या मनाला तत्त्वशुद्ध वाटलं ते निःशंकपणानं, सडेतोड भाषेत सांगून टाकणं हा कबीराचा स्वभाव होता. कबीर आणि तुकाराम यांच्यात अनेक साम्यस्थळं सापडतात. दोघेही वरिष्ठ समजल्या जाणाऱ्या वर्गातले नव्हते. 'खालच्या' वर्गातले होते. पण आपली तर्कबुद्धी त्यांनी कोणत्याही शास्त्राकडं गहाण टाकली नव्हती. निर्भय विचारांचं रोखठोक शब्दांत प्रतिपादन करणं ही दोघांचीही विशेषता आहे. कबीराचा प्रभाव उत्तर हिंदुस्थानात अधिकांशानं जाणवतो. आपल्याकडं ज्याप्रमाणं तुकारामांची सुभाषितं घरोघर माहीत आहेत त्याप्रमाणं कबीरांची कित्येक वचनं लोकांना तोंडपाठ झाली आहेत. कबीर तुकारामांनी हिंदी आणि मराठी भाषा संपन्न केली यात कसलाच संदेह नाही. कुळ, जाती आणि वर्ण हे सारं निरर्थक आहे. मनुष्य आपल्या तपस्येनं व ज्ञानानं महान होतो. बापजाद्याचं नाव वापरून मोठेपण मिळू शकत नाही. मोठेपणासाठी काहीतरी कर्तृत्व केलं पाहिजे हा सिद्धांत कबीर-तुकारामांनी सिद्ध केला.

संत कबीर निःस्पृह असावेत यात आश्चर्य नाही. संताला कोणताच स्वार्थ साधायचा नसतो. त्यामुळं दांभिकतेवर अन्यायावर, आपल्या स्पष्ट वाणीचा प्रहार कबीरांनी अनेक वेळा केला आहे. याबाबतीत तुकोबांशी त्याचं साम्य आहे. मिथ्याचारात आणि बाह्य देखाव्यात रंगलेल्या तथाकथित संतांबद्दल कबीरांचे उद्गार जितके फटकळ तितकेच वास्तव आहेत. त्यांनी म्हटलं आहे 'जोगी फक्त कपडे रंगवतात त्याचं मन ईश्वरचिंतनात रंगलेलं नसतं. ब्रह्म सोडून धोंड्याची पूजा करतात. आसन ठोकून मंदिरात बसतात. दाढी आणि जटा वाढवतात. डोक्याचं मुंडन करतात. पण अंतःकरण मात्र शुष्क राहातं.' अध्यात्माच्या क्षेत्रात असल्या अज्ञानी, भ्रष्टाचारी

आणि दांभिक जोग्यांची एक परंपरा चालत आलेली आहे. सामान्य माणसाची नागवणूक करण्यापलीकडं या जोग्यांनी काहीच केलेलं नसते. आजच्या वैज्ञानिक प्रगतीच्या कालखंडातही ढोंगी साधुसंतांची कमतरता दिसत नाही. कोणी होमहवन करण्याचं कपटनाटक रचून आपला स्वार्थ साधतो. कोणी ग्रहशांती करतो, देवी प्रसन्न होण्यासाठी कर्मकांड केलं पाहिजे असं सांगून समाजाला लुबाडतो. या दांभिकांच्या फसव्या जाळ्यात अनेक उच्चपदस्थ अधिकारी, विद्वान समजले जाणारे लोकही सापडलेले असतात. कबीरांनी आपल्या काव्यातून या सोंगाड्या साधूंचे वाभाडे काढले आहेत. चोर आणि दरोडेखोर राजरोस लूट करतात पण हे जटाजूटधारी भगव्या कपड्यातले जोगी मात्र कुठल्यातरी दैवताच्या नावाखाली समाजाचं शोषण करतात. कबीरांनी कोणत्याही कर्मकांडाला मान्यता दिलेली नाही. तीर्थयात्रा, होमहवन, जपजाप्य हे सगळे प्रकार त्यांनी बाजूला सारून आपल्या मनाची व जीवनाची शुद्धी केली पाहिजे. हाच प्रमुख विचार सांगितला. ते रामभक्त होते. पण त्यांचा राम सगुण नव्हता. अखेर मानसिक शुद्धीमुळेच जीवन अर्थपूर्ण होतं हीच भूमिका त्यांच्या उपदेशाची आहे. दांभिक जोग्यावर टीका करून त्याचं विदारक चित्र त्यांनी रेखाटलं आहे. ते म्हणतात,

मन ना रंगाये, रंगाये जोगी कपरा।
आसन मारि मंदिरमे बैठे, ब्रह्म छाडि पूजन लागे पथरा।
कनवा फडाय, जटवा बढौले, दाढी बढाय जोगी होइ गैले बकरा।
जंगल जाम जोगि धुतिया रमौले, काम जरायजोगी होइ गैले हिजरा
मथवा मुंडाय जोगी कपडा रंगौले, गीता बाचके होय गैले लबरा
कहाहि कबीर, सुनो भाओ साधो, जमदर बजवा बांधल जैबे पकरा

परमेश्वराची प्राप्ती असल्या सोंगढोंगांनी होत असेल तर त्या परमेश्वरालाही काही अर्थ उरला नसता. कबीरांना ईश्वरभक्ती सांगितली. त्याबरोबरच ईश्वर या शक्तीचं त्यांनी जे स्वरूप विवरण केलं ते महत्वाचं आहे. हा ईश्वर-प्रत्येक प्राणिमात्राच्या हृदयात असतो. पण ज्याची दृष्टी अंतर्मुख आहे, जो स्वतःच्या अंतरंगात न्याहाळू शकतो. त्यालाच त्याचं दर्शन घडू शकतं. असे अंतर्मुख वृत्तीचे, स्वतःच्या ठायी असलेल्या परमात्म्याला पाहू शकणारे भक्त अत्यंत थोडे असतात. आपल्याच नाभीत कस्तुरी असताना वेडा कस्तुरीमृग त्या सुगंधाचं मूळ शोधण्यासाठी रानावनातून वणवण भटकत असतो. तशी अवस्था अज्ञानी लोकांची आहे. कुणी परमेश्वराला

तीर्थयात्रा करीत राहातो. कोणी त्याचं निवासस्थान मशिदीत आहे असं समजतो. कोणाला तो परमात्मा कर्मकांडातच सामावला आहे असं वाटतं. स्वतःला सोडून ती परमेश्वरी शक्ती दुसरीकडे कुठंतरी आहे ही समजूत हजारो वर्षांपासून लोकांनी करून घेतली. 'तुझे आहे तुजपाशी । परि तू जागा चुकलासी ।' असं तुकोबांनी सांगितलं तरी यात्रा-जत्रांतून, तीर्थक्षेत्रांतून ईश्वराचा शोध चालूच आहे. कबीरांनी या वेडेपणाला दिलेलं उत्तर चिंतनीय आहे. बुद्धीच्या कसोटीवर हे कबीरवचन घासून पाहाण्यासारखं आहे. ज्याला लिहिता वाचता येत नव्हतं, जो केवळ चादरी विणणारा कोष्टी होता, पांडित्याच्या वाटेला जो चुकून कधी वळला नाही तो एक साधासुधा कष्टकरी 'सुनो भाई साधो !' अशी साद घालून जे सांगतो ते अत्यंत अर्थपूर्ण आहे. कबीराच्या शब्दांत काव्याची सजावट नाही. कल्पनेची चमत्कृती नाही. अलंकारांची खुलावट नाही. पण त्यांत तत्त्वज्ञान आहे. सत्याचा शोध आहे. पराकोटीची प्रामाणिकता आहे. त्यामुळंच कबीरवाणीला स्वच्छ सौंदर्याचं अधिष्ठान आहे. चिंतनशील मनाचं त्यात स्पष्ट प्रतिबिंब पडलं आहे. कित्येक कवींचे शब्द कागदी फुलांसारखे असतात. त्यांचा रंग नैसर्गिक फुलांपेक्षाही अधिक आकर्षक असू शकतो. पण कागदाच्या फुलांत गंध कुठून येणार ? ज्याला गंध नाही त्याच्याकडं भ्रमर ढुंकूनही पाहात नाहीत. साहित्याच्या क्षेत्रात कागदी फुलं निर्माण करणारे कारागीर कमी नसतात. कबीरांच्या काळात असले कवी पैशाला पासरी असतीलही. पण आज त्यांची ती कारागिरी आणि त्यांची नावं दोन्हीही पार वाहून गेली. निरक्षर कबीराची कविता मात्र आपल्यास्वाभाविक सुगंधानं दरवळत राहिली आहे. हृदयातला सुवास जेव्हा शब्दांत प्रकट होतो तेव्हा त्या शब्दाला 'सारस्वत' ही संज्ञा मिळते. कबीराचं साहित्य हे एक काव्यतीर्थ आहे.

परमात्म्याच्या निवासस्थानाबद्दल त्यानं म्हटलं आहे,

मोको कहाँ ढूंढे बन्दे, मै तो तेरे पासमे ।
ना मै देवल, ना मै मसजिद, ना काबे कैलासमे ।
ना तो कौन क्रिया कर्ममे, नही योग बैरागमे ।
खोजी होय तो तुरतै मिलि हों, पलभरकी तालासमे ।
मै तो रहौ सहरके बाहर मेरी पुरी मवास मे ।
कहै कबीर सुनो भाई साधो, सब स्वासोंकी स्वासंमे ।

'अरे! कुठं शोधतोस तू मला ? मी देवळात नाही. मशिदीत नाही. काब्यात किंवा कैलासातही नाही. क्रियाकांडात, योगात किंवा वैराग्यात नाही. जगाच्या या

गडबडीत, धावपळीत मी तुला कसा सापडेन ? खरंतर मी तुझ्या हृदयातच आहे. सर्वांच्या श्वासात मी सामावलो आहे.' ईश्वराचं हे सर्वव्यापकत्व कमालीच्या सहज भाषेत कबीर स्पष्ट करतात. दुसऱ्या एका कवितेत हाच आशय त्यांनी वेगळ्या शब्दांतून सांगितला आहे. 'साहब तुममे, जैसे प्राना बीजमे' तो परमात्मा तुमच्या आमच्यातच, ज्याप्रमाणं बीजात प्राण असतो त्याप्रमाणं आपल्यात आहे. कबीरांचा दृष्टिकोन कोणत्याही अर्थानं आंकुचित नाही. परमेशाचा व्यापकपणा त्यांनी आपल्या आंतरिक शक्तीनं जाणला आहे. अनुभवला आहे. ज्याला सारं जगत् परमात्म्याच्या अस्तित्वानं व्यापलेलं दिसतं त्याची दृष्टी आणि सृष्टी विशाल व्हावी यात आश्चर्य कसलं ? कोणत्याही सांप्रदायिक किंवा जातिक आधाराची त्यांना कधी जरूर भासली नाही. या जीवनाच्या सामर्थ्याबरोबरच त्याच्या दुर्बलतेचं आणि नश्वरतेचं त्यांनी दर्शन घेतलेलं होतं. त्यामुळं एखाद्या क्षणभंगुर भौतिक सुखाच्या मागं हा घाम गाळून पोट भरणारा प्रामाणिक कष्टकरी कधीच धावला नाही. सारं भौतिक वैभव चंचल असतं. ते केव्हा हुलकावणी देऊन निघून जाईल हे सांगता येत नाही. याची त्यांनी परिपूर्ण कल्पना होती. म्हणूनच एका कवितेत त्यांनी म्हटलं आहे,

'माती कुंभाराला म्हणते, आज तू मला तुडवतो आहेस. पण एक दिवस असा येईल की त्या दिवशी तुला मी माझ्यातच गाडून टाकीन.' या शब्दातलं सत्य दाहक आहे. पण ते मान्य केलंच पाहिजे. हे सत्य सांगितलं म्हणून कबीर निराशावादी ठरत नाहीत. खोट्या आशावादापेक्षा खरी निराशा स्वीकारायला मानसिक धैर्य लागतं. अनेक संतांच्या काव्यात जीवनाच्या असारतेचं चित्र रेखाटलेलं दिसतं. पण कबीर आणि तुकाराम जितक्या घणाघाती शब्दांतून ही असारता सांगतात तितक्या तीव्रतेनं इतरांनी सांगितलेलं नाही. तुकाराम म्हणतात,

धन मेळवूनि कोटी। सवे नये रे लंगोटी।
पाने खाशील उदंड। अंती जासी सुकल्या तोंडे।
पलंग न्याहाल्या सुपती। शेवटी गोवऱ्या संगाती।
तुका म्हणे राम। एक विसरता श्रम॥

हा अभंग वाचल्यानंतर मन उदास झाल्याशिवाय राहात नाही. अखेर आपल्या संगतीला तुच्छ गोवऱ्या असतात. कबीरही याच धर्तीवर म्हणतात, 'कुठले महाल ? कुठली दारे ? सोन्याचा राजवाडा आणि चांदीच्या माड्या सोडून राजालाही निघून जावं लागतं.'

आवत संग नं, जात संगाती।
कहा भए दल बांधे हाथी।
कहै कबीर, अंतकी बारी।
हाथ झारि ज्यों चला जुग़ारी।

सर्वस्व हरवलेला जुगारी जसा अखेर हात झटकून जातो त्याप्रमाणं आयुष्याच्या जुगारातून असंच सर्वांना हात हलवीत-हात झटकीत जावं लागतं. चंचल जीवनावरचं हे भाष्य दुःखद असलं तरी ते संपूर्ण सत्य असल्यामुळं प्रत्येकालाच पदरात घ्यावं लागतं. जीवनाचा आणि परमेश्वराचा शोध संतांनी आपल्या अंतरंगनेत्रांनी केला. परमेश्वराच्या प्राप्तीत चिरंतन जीवनाचा मनुष्याला लाभ होतो ही त्यांची भूमिका कदाचित आजच्या अश्रद्ध जगाला पटण्यासारखी नसेल पण श्रद्धेच्या वाटेनं जाताना ईश्वराचं जे विराट सामर्थ्य संतांना जाणवलं ते त्यांनी आपल्या काव्यातून मांडलं आहे. कबीरांनी तर मशिदीत मोठ्यानं ओरडून बांग देणाऱ्या मुल्लाचा उपहास केला आहे. जपमाळा घेऊन बसणाऱ्या पंडिताबद्दलही उपरोधिक उद्‌गार काढले आहेत, ते विचारतात,

ना जाने तेरा साहब कैसा है।
मसजिद भीतर मुल्ला पुकारै, क्या साहब तेरा बहिरा है।
चिउंटीके पग नेवर बाजे, सो भी साहब सुनता है।
पंडित होयके आसन मारै, लंबी माला जपता है।
अन्तर तेरे कपट कतरनी, सौ भी साहब लखता है।

परमेश्वर बहिरा नाही. मुंगीच्या पायातल्या घुंगराचाही आवाज त्या स्वामीच्या कानावर सहजपणे जातो तू मात्र व्यर्थ ओरडत आहेस. जपमाळ जपणाऱ्या पंडिताच्या हृदयातली कपटाची कात्री त्या परमेशाला दिसू शकते. तो सारी दृश्यं पाहू शकतो. सतीला गजभर वस्त्रं मिळत नाही वेश्येला मात्र ऊंची शालू, पैठणीची कमतरता नसते. ज्या घरी साधूला भीक मिळत नाही त्या घरात भडवा मात्र पक्वान्नांवर ताव मारतो.'

या उपहास शैलीबद्दल लिहावं तितकं थोडं आहे. कबीराच्या मनातला उद्वेग आणि दुःखभाव उपहासाच्या माध्यमातून व्यक्त झाला आहे. जगात क्षुद्र मूल्यं विजयाच्या शिखरावर चढून बसतात आणि श्रेष्ठ मूल्यं मात्र विटंबित होत जातात. याचं तीव्र शल्य सर्वच सज्जनांच्या अंतःकरणात सदैव खुपत असतं त्याप्रमाणं कबीरांचं चित्तही व्याकुळ झालेलं होतं. शील आणि चारित्र्य यांच्या ठिकऱ्या ठिकऱ्या होतात.

तपस्या आणि ज्ञान यांची कुणाला किंमत नाही अनैतिकता व अधार्मिकता यांची मात्र मिरवणूक निघते. हे पाहणाऱ्या संताला या दांभिक समाजाची घृणा आल्याशिवाय राहात नाही. कबीरांच्या वाणीत आलेला सडेतोडपणा व फटकळपणा या प्रवृत्तीचा द्योतक आहे. पण कबीरांनी जगाचा तिरस्कार मात्र केला नाही. तिरस्कारातून काहीच साधणार नव्हतं. विकृती दूर करायची असेल तर त्यासाठी वात्सल्यानं योग्य उपाययोजना केली पाहिजे. रोग्याचा द्वेष करण्यापेक्षा रोगाचा द्वेष करणं हेच उचित असतं. कबीरांच्या काव्यात समाजाविषयीचं प्रेम त्यामुळंच जाणवत राहातं. समाजसुधारणा प्रेमातूनच होऊ शकते. उपेक्षेतून किंवा तिरस्कारातून ती करता येणार नाही. अभद्र प्रवृत्तीवर कठोर फटकारे मारणारे संत 'बुडता हे जन न देखवे डोळां। म्हणुनि येतो कळवळा फार' अशा स्वभावाचे असतात. कबीर-काव्यालाही व्यापक सामाजिक करुणेची बैठक आहे. त्यांच्या उपदेशात करुणा आणि प्रेम या मूल्यांना विशेष स्थान आहे. जो आपल्याला काटे देतो त्याला आपण फूल द्यावं हाच उपदेश जगातल्या सर्व संतमहंतांनी आजपर्यंत केला. कबीर म्हणतात,

जो तोकू कांटा बुवै ताहि बोइ तू फूल
तोको फुलके फूल है वाको है तिरसूल

आपल्यासाठी काटे पेरणाऱ्या माणसालाच आपण फूल देऊ शकलो, वैराला आणि वैऱ्याला मित्रत्वानं जिंकू शकलो तर जगाचं आजचं कुरूपपण पार बदलून जाईल.. पण अज्ञान व अहंकार यांच्या मगरमिठीत सापडलेल्या माणसाला हा उपदेश रुचत नाही. खूनका बदला खून ही या वेड्या जगाची घोषणा आहे. म्हणूनच कबीर प्रश्न विचारतात की, 'बाभळीचं झाड लावून त्यापासून आंब्याची अपेक्षा करण्यात काय अर्थ आहे?' कबीर आले आणि गेले. ज्ञानेश्वर-तुकाराम असेच आले आणि निघून गेले. महात्म्यांनी पुन्हा पुन्हा सुविचारांचा सुगंध निर्माण करण्याचा प्रयत्न करावा आणि क्षुद्र लोकांनी दुर्गंधीचा डोंगर उभारावा हा पारंपरिक कार्यक्रम केव्हा संपणार कुणास ठाऊक ?

शुद्ध आणि स्वच्छ मनातून उचंबळून आलेली संताची वाणी विचारशील मनाला अस्वस्थ करते. जागृतीची साद घालते. विकारांचा कोलाहल थोडावेळ तरी खाली बसतो. मनाला धीर येतो. संत साहित्य माणसाच्या शाश्वत सुखाची चिंता वाहतं. संतांनी स्वतःबरोबर समाजाला घडवण्याचा जो प्रयत्न केला तो म्हणूनच रचनात्मक आहे. एका कवितेत कबीरांनी रूपकात्मक पद्धतीनं मांडलेला विचार

लक्षणीय आहे. ते म्हणतात,

मोरि चुनरिमे परि गयो दाग पिया।
पांच तत्तकी बनी चुनरिया, सौरह सैबंद लागे जिया।
यह चुनरी मेरे मैके ते आई, ससुरामें मनुआं खोय दिया।
मलि मलि धोई दाग न छूटै, ग्यानको साबुन लाय लिया।
कहै कबीर, दाग न छूटि है, जब साहेब अपनाय लिया।

या कवितेतलं रूपक जितकं अन्वर्थक तितकंच परिणात्मक आहे. पंचतत्त्वांची ही अमोलिक ओढणी माहेराहून आणली होती. इथं सासरी मात्र तिला डाग लागला. स्वच्छ करण्याचा प्रयत्न केला तरीही तो डाग निघत नाही. कबीराचं म्हणणं असं की, ज्या दिवशी तो प्रियतम-परमेश्वर तुला प्रसन्न होईल. त्या दिवशी चुनडीचा डाग नाहीसा होईल. जीवनाचं वस्त्र आपण आपल्या आयुष्यात कसंही वापरून मळवतो, डागाळतो. ज्ञानाचा साबण लावल्याशिवाय ते स्वच्छ होणं शक्य नसतं. कबीरांनी या काव्यातून मानवी जीवनाच्या अवस्थेवर स्पष्ट प्रकाश टाकला आहे. जीवनाचं जरतारी वस्त्र प्रपंचात डागाळलं आणि ते पुन्हा निष्कलंक करणं ही अत्यंत हृदयंगम कल्पना कबीरांनी मांडली आहे. आपल्याला मिळालेली रंगीबेरंगी चुनडी कलंकित झाल्याची वेदना ज्या स्त्रीला अस्वस्थ करते ती एका अर्थानं ज्ञानीच म्हटली पाहिजे. आयुष्याला वस्त्राची उपमा अनेकांनी दिली आहे. कबीरांनी या सांकेतिक उपमेत जे आशयपूर्ण सौंदर्य भरलं ते अनुपम आहे. या स्त्रीची केवळ ओढणी मळलेली आहे. पण असंख्य लोकांच्या आयुष्याची घाणेरडी लक्तरं बनलेली असतात. आपलं आयुष्य अस्वच्छ झालं आहे हे देखील त्यांच्या लक्षात येत नाही. या लोकांची काय गती होत असेल याची कल्पनाच केलेली बरी !

साहित्यांच्या इतिहासात कबीरांची कविता नव्या युगाचं सृजन करणारी, स्वयंतेजानं प्रकाशित झालेली आशयसमृद्ध कविता आहे. कबीरांचा गुरू कोण ? या प्रश्नाचं उत्तर कबीरांच्या अस्पष्ट चरित्रात कुठंतरी मिळेल. कोणी म्हणतो स्वामी रामानंद हे त्यांचे गुरू होते. सुरुवातीला कबीराला म्हणजे एका मुसलमानाला शिष्य म्हणून स्वीकारायची रामानंदाची तयारी नव्हती. पण पुढे त्याची निष्ठा पाहून त्याला गुरूंनी स्वीकारलं अशी आख्यायिका आहे. मला वाटतं कबीर आपल्या अनुभवांच्या शाळेत शिकत गेले. त्यांचं निरीक्षण आणि ग्रहण अत्यंत सूक्ष्म असलं पाहिजे. या संवेदनशील संतानं हिंदू आणि मुस्लिम या दोन्ही धर्मांचा सर्वार्थानं स्वीकार केलेला दिसत नाही.

दोन्ही धर्मातील विसंगतींवर वैगुण्यांवर ते तुटून पडले आहेत. स्वतंत्र बुद्धीचा एखादा मनस्वी तत्त्वचिंतक कोणत्याही मळलेल्या वाटेनं चालत नाही. हिंदुत्वाचा अधिकांशाने त्यांच्या काव्यावर प्रभाव पडला असं काही अभ्यासकांचं मत आहे. पण कर्मकांड, अवतारवाद, मूर्तिपूजा, उपासतापास व मंदिर मशीद या गोष्टी त्यांना कधीच मान्य नव्हत्या. ते एकेश्वरवादी होते. राम आणि रहीम या दोन्ही नावांचा ते उल्लेख करतात. वर्णाश्रम् धर्म, कर्मकांड आणि प्रतिमापूजन यावर कबीरांनी आपल्या विचारातून प्रखर हल्ले चढवले. जे स्वतःच्या बुद्धीला पटलं ते निःशंकपणानं समाजाला सांगितलं हे या संतकवीचं महनीय कार्य आहे.

कबीरांची काव्यवाणी उपनिषदांच्या वाणीसारखीच सरळ व स्पष्ट आहे. अनेकवेळा माझं मन संभ्रमित होतं, अस्थिर होतं. एक प्रकारचं चमत्कारिक औदासीन्य आणि दुःख यांनी ते भरून जातं. अशा वेळी ज्या साहित्यकृती मनाला आपला प्रेमळ पण समर्थ आधार देतात त्यांत कबीरांच्या काव्यकृतींचा मला आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. कबीरवाणीची मुलायम चादर अंगावर ओढून घेतली की मग प्रापंचिक दुःखांचं हिव नाहीसं होतं, मनाला उबदार स्पर्श होतो. कबीरांनी आपली चादर मलिन होऊ दिली नाही असं ते आत्मविश्वासानं सांगतात. ते म्हणतात,

झीनी झीनी बीनि चदरिया।
सो चादर सुर नर मुनि ओढे मैली कीनि चदरिया।
दास कबीर जतनसे ओढी ज्योंकी त्यों धरदीनि चदरिया।

○○○

# गोमटेश्वर

एखादा अभिजात कलावंत अशी विलक्षण कलाकृती निर्माण करतो की, ती साऱ्या मानवजातीची अक्षय संपत्ती ठरते. शतके येतात आणि जातात सहस्त्रके येतात आणि तशीच निघून जातात. काळ कितीही विध्वंसक प्रवृत्तीचा असला तरी अशा कलाकृतीला तो आपला संहारक स्पर्श करीत नाही. मूर्तिमंत काळानंही स्तिमित होऊन जिला वंदन करावं अशा फार थोड्या कलाकृतीत श्रवणबेळगोळच्या डोंगरावर उभी असलेली बाहुबली गोमटेश्वराची नयनरम्य मूर्ती आहे. कदाचित 'नयनरम्य' हे विशेषण अपुरेच पडणार आहे. कारण कोणत्याही दिव्य कलाकृतीचे रसग्रहण आपण केवळ डोळ्यांनी करीत नाही. सर्व इंद्रियांना आणि मनाला तृप्त करण्याची विशिष्ट शक्ती श्रेष्ठ कलाकृतीत असते. मग ती कलाकृती शब्दांतून व्यक्त झालेली असो, पाषाणातून प्रकट झालेली असो, स्वरांतून मुखरित झालेली असो. अशी कलाकृती रसिकाला काहीतरी आगळा, काहीसा अस्वस्थ करणारा आनंद देऊ शकते. त्या आनंदात सुगंध असतो. त्या आनंदात उदात्त चिंतनाच्या काही रंगछटाही मिसळलेल्या असतात. कोणत्याही पार्थिव आनंदापेक्षा हा आनंद उन्नत स्वरूपाचा असतो. मी प्रथमच श्रवणबेळगोळची ही महाकाय मूर्ती पाहिली तेव्हा केवळ तिच्याकडे पाहतच राहिलो. नंतर मनात विचार आला की ही मूर्ती म्हणजे कुण्या प्रतिभावंताने पाषाणात खोदलेले महाकाव्य आहे. ही मूर्ती म्हणजे शिल्पसौंदर्याच्या सागरावर उचंबळून आलेली एक प्रमाथी लाट आहे. तपस्येतले, चिंतनातले आणि शांतीतले, विरक्तीतले आणि ज्ञानातले शीतल चांदणे जणू या मूर्तीच्या मुखमंडलावर फुलले आहे. बराच वेळ ती मूर्ती पाहिली, तिच्यातल्या अनाकलनीय गूढ सौंदर्याने मन मोहरून गेले.

विशाल आकाशाच्या पार्श्वभूमीवर, एका उंच डोंगरावर उभी असलेली ही उत्तुंग मूर्ती केवळ आशिया खंडातच नव्हे तर जगातली सुंदर कलाकृती मानली जाते. हे सुंदरत्व नेमके कोणत्या घटकात सामावले आहे ते मात्र नीटसे सांगता येणार नाही. प्रतिभेचा हा एक चमत्कार आहे इतकेच म्हणावे लागेल. अनातोले फ्रान्स नावाच्या

एका समीक्षकाने म्हटले आहे की, 'एखादी वस्तू सुंदर का आहे याचे आकलन सर्वार्थाने कधीच होत नाही. खरे तर सौंदर्य शब्दांच्या किंवा तर्काच्या चिमटीत कधीच पकडता येणार नाही. कारण शब्द जड असतात आणि सौंदर्य तर अति तरल आणि गूढत्वाच्या धूसरतेने वेढलेले असते. सौंदर्याचे अनेक प्रकार असतील पण गोमटेश्वराच्या सौंदर्याला भव्यतेचे अधिष्ठान आहे. सुंदर आणि भव्य पाहिले की मनातले क्षुद्र विचार विकार वितळायला लागतात. असे सौंदर्य आपल्याला जीवनाच्या आणि सृष्टीच्या चिंतनाकडे घेऊन जाते. आयुष्याच्या ज्या कलहात आपण आकंठ बुडालो आहोत. तो कलह गोमटेश्वरासारख्या भव्य कलाकृतीच्या दर्शनामुळे व्यर्थ वाटू लागतो. सामान्य स्वार्थातून मन उंचावर आले की होणारा आनंद अधिक अर्थपूर्ण असतो. बाहुबलीच्या या अतिभव्य मूर्तीची घडण करताना त्या अज्ञात कलावंताच्या मनात कोणते स्वप्न असेल? मला वाटते, बाहुबलीच्या व्यक्तिमत्वातले उदात्त सौंदर्य त्याला मोहवून गेले असेल. मीरेला जसा कृष्णाचाच ध्यास लागला होता आणि तिचे सारे आयुष्य कृष्णमय झालेले होते त्याप्रमाणे हा कलावंतही बाहुबलीमय बनला असेल. त्याच्या श्वासनिःश्वासात तो गोमटेश्वरच वस्तीला आला असेल. गोम्मट या शब्दाचा अर्थच सुंदर असा आहे. बाहुबलीचे जीवन ही सौंदर्याची, पराक्रमाची, त्यागाची आणि तपस्येची नाट्यमय कहाणी आहे. जैन पुराणात ऋषभनाथ तीर्थंकराच्या या बाहुबलीनामक पुत्राला 'कामदेव' असे संबोधले आहे. मदनाप्रमाणे देखणा असलेला हा बाहुबली राज्यलक्ष्मीचा सुखेनैव उपभोग घेत होता. पण सर्व सत्ताधीश होण्याच्या अभिलाषेने आपल्या वडील भावाला पछाडले असून तो आपल्या सत्तेला आव्हान देत आहे हे पाहून बाहुबलीने दंड थोपटले. द्वंद युद्धात त्याने वडील भावाला पराभूत केले. पण सत्तेच्या आणि वैभवाच्या आसक्तीनं लढाया करणं, आक्रमण करणं, रक्ताचे पाट वाहवणं या साऱ्याच गोष्टीबद्दल बाहुबलीच्या मनात तीव्र घृणा उत्पन्न झाली. त्याचं मन विरक्तीनं भरून गेलं. क्षणार्धात सारं राजवैभव बाजूला सारून तो तपस्वी झाला. वस्त्राचीही उपाधी न ठेवता त्यानं दिगंबर होऊन मुक्तीचा मार्ग स्वीकारला. बाहुबलीच्या मूर्तीवर शांती, विरक्ती आणि प्रसन्नता जी दिसते ती त्या कलावंताने बाहुबलीची पुण्यमय जीवनगाथा नीटपणे अभ्यासली होती म्हणूनच. मनुष्यांला क्षमेचा आणि शांतीचा संदेश देत हा बाहुबली गेली दहा शतके डोंगरमाथ्यावर उभा आहे. बाहुबली घडवताना बाहुबलीच्याच व्यक्तित्वात त्या कलावंताला बुडी मारावी लागली असेल. कारण बाहुबली निर्माण करणे म्हणजे

केवळ पाषाणाला आकार देणे नव्हे. सुंदरता, पवित्रता आणि भव्यता यांच्या रसधारांचा त्रिवेणी संगम बाहुबलीच्या जीवनात झाला होता. त्याचा साक्षात्कार झाल्याशिवाय शिल्पकाराला ही शिल्पकृती घडविता येणार नाही. डोंगरमाथ्यावर गेल्यानंतर त्या कलावंताचा दृष्टिकोन विशाल आणि व्यापक होणे अपरिहार्य होते. त्याला देखील या मूर्तीची घडण करताना आपल्या पार्थिव वासनांचा त्याग करावा लागला असेल. रात्रंदिवस बाहुबलीच्या पुण्यकथेची त्याने पारायणे केली असतील. 'गिरीधर गोपाल हेच माझे सर्वस्व त्या व्यतिरिक्त मी दुसरे काहीच जाणत नाही.' असे म्हणत ज्याप्रमाणे मीरा कृष्णरूपात बुडून गेली आणि तिच्या हृदयातून कृष्णभक्तीचीच गीते पाझरू लागली. त्याप्रमाणे या कलावंताच्या छिन्नीलाही बाहुबलीचेच स्वप्न सतत पडत असले पाहिजे. कलाकृतीचे स्फुरण आणि प्रकटन अशा उत्कट साक्षात्काराशिवाय होऊ शकत नाही. वाल्मिकीने राम घडवला, व्यासांनी कृष्ण निर्माण केला या अज्ञात कलावंताने बाहुबली पाषाणातून जिवंत केला. त्याने पाषाणातही आपला हृदयस्थ सुगंध ओतला आणि मग त्या प्रचंड शिळेने बाहुबलीचे रूप धारण केले. आम्ही बाहुबलींना वंदन करतो याचा अर्थ त्या कलावंताच्या विलक्षण, अभिनव प्रतिभेलाही आमचा नमस्कार असतो. कारण त्या कलावंतामुळे आम्हाला भव्यत्वातील वैराग्य आणि शांती यांच्यातले ऐश्वर्य दिसले.

गोमटेश्वराच्या मनोज्ञ, भव्य मूर्तीकडे पाहताना मनुष्याला आपल्या खुजेपणाची, मळखाऊपणाची विदारक जाणीव होते. सारा अहंकार गोठून जातो. आम्ही सामान्य माणसे मोहाच्या आणि लोभाच्या रस्त्याने पावलोपावली ठेचा खात निघालो आहोत. एखाद्या सामान्य वस्तूवरची सुद्धा आमची मालकी आम्ही सोडायला तयार नसतो. या मोहाच्या बाजारात जिभल्या चाटीत सारखे चालत राहतो. जीवघेण्या स्पर्धेत द्वेष आणि मत्सराची शिदोरी घेऊन धावपळ करीत असतो. ओंजळीत आलेले पाणी काही क्षणातच गळून जाते आणि ओंजळ रिकामीच राहते. हे समजूनसुद्धा मोठ्या सुखाचे लटके निमंत्रण आम्हाला नाकारता येत नाही. लोचटपणे लांगूलचालन करीत फसव्या सुखाच्या मागे फरफटत जातो. असल्या बुळबुळीत आयुष्यात भव्यता आणि सौंदर्य कुठून असणार? येथे सहस्त्रवर्षे उभा असलेला बाहुबली निर्मोही, निःस्वार्थी वृत्तीचे एक महान प्रतीक आहे. आपणच आपल्या जीवनाचे शिल्पकार असतो. हेच बाहुबलीच्या जीवनातून शिकायचे आहे. या प्रचंड मूर्तीचा महामस्तकाभिषेक म्हणजे केवळ पाषाणाचा अभिषेक अशी ज्यांची अज्ञ सा"जूत

आहे त्या पामरांना काय सांगावे? एखाद्या पाषाणावर दूध,तूप ओतले म्हणजे परमेश्वर प्रसन्न होतो असे कोणीच म्हणत नाही. मूर्तीचा अभिषेक हा वस्तुतः गुणाचा आणि सत्प्रवृत्तींचा व उदात्त विचारांचा अभिषेक असतो.

प्रत्येक श्वासाबरोबर काही विषारी जंतू आमच्या फुफ्फुसात जाण्याचा दाट संभव आहे. बाहुबलीचे जग उंचावरचे आहे. तेथील हवेत शुद्धतेचा आणि पावित्र्याचा सुवास मिसळलेला आहे. त्या जगातला प्राणवायू सामान्य माणसांच्या जगात जर आणता आला तर केवढा चमत्कार होईल, याचा मी विचार करीत आहे. बाहुबलीचा मस्तकाभिषेक करण्याच्या मागे अंधश्रद्धा नसून बाहुबलीची प्रतिष्ठापना आजच्या अन्यायग्रस्त, अशांत, विषमय वातावरणात करून हे वातावरण बदलण्याचा हा एक प्रयत्न आहे. पूजा आणि अभिषेकालाही सांकेतिक व सांप्रदायिक स्वरूप येते. ही गोष्ट खरी असली तरी संकेताच्या पलीकडे जाऊन माणूस बाहुबलीची आराधना करू लागला तर एक दिवस त्याच्यातही अंगुष्ठमात्र असलेला बाहुबली सर्वांगानी विकसित झाल्याशिवाय राहणार नाही. मी माझाच एक अनुभव नमूद करतो.

मूर्तीच्या मुद्रेवरची गंभीरता आणि मंद स्मित पाहिल्यावर मला माझ्या वेदना, व्यथा फारच क्षुद्र वाटू लागल्या. तिमिर ओसरून गेले. अंतःकरणात आनंदाचे आणि उत्साहाचे सूर उमटू लागले. हा बदल म्हणजे अकल्पित चमत्कार नव्हता. उदात्ततेच्या व सौंदर्याच्या सान्निध्यात मनुष्याची चित्तवृत्ती पालटते हा अनुभव सर्वांनाच येऊ शकतो. जीवनावर चिडलेल्या आणि आत्मघाताचा विचार करणाऱ्या एका माणसानं डोंगरमाथ्यावरून सूर्योदयाचे दृश्य पाहिले आणि त्या दर्शनाने त्याच्यात पुन्हा जीवनप्रेमाची ऊर्मी उचंबळून आली. 'सतारीचे बोल' ही केशवसुतांची कविता स्वरसौंदर्याची महती गाते. आयुष्यावर रुसलेला कवी पुन्हा जीवनाकडे वळतो. तो केवळ सतारीचे मधुर झंकार ऐकल्यामुळे. येथे तर डोंगरावर शिल्पकलेचा अद्भुतरमणीय चमत्कार बाहुबलीच्या रूपात उभा आहे आणि तो अस्वस्थ जगाला जणू स्मितपूर्वक संदेश देत आहे.

तो म्हणतो, 'निर्भय हो! वासनांच्या जंजाळातून बाहेर पड. अज्ञान हेच विकारांचं मूळ.आहे. विकारांची कात टाकून दिल्याशिवाय मानसिक शांती मिळणेच शक्य नाही. जीवनातील भोग घेताना विवेकाचे आणि संयमाचे अधिष्ठान कधी ढळू नये याची दक्षता घेतली तर जीवनाच्या सुंदरतेची आणि तुझ्यातल्या आंतरिक सामर्थ्याची तुला प्रचीती अवश्य येईल. मोलाचे आयुष्य मोहाच्या वाऱ्यावर

पालापाचोळ्यासारखे उधळून देण्यात पुरुषार्थ नाही. मी सत्ता भोगली, राज्यलक्ष्मी स्वीकारली पण तिच्या सहवासात मी स्वतःला हरवून बसलो नाही. राज्यवैभवाच्या माध्यमातून, सत्तेच्या सहाय्यानं माझी प्रजा सुखी करण्याचा मी प्रयत्न केला. आजचा माणूस दुसऱ्याला दुःखी करण्यासाठी आणि दुसऱ्यावर आक्रमण करण्यासाठी आपली बुद्धी वापरीत आहे. दुसऱ्यांच्या दुःखाने ज्याला आनंद वाटतो तो महाभयानक रोगाने पछाडलेला मानसिक रुग्ण आहे. त्याच्या मनात परिवर्तनाची पहाट उमलली पाहिजे. आपल्या वासनांवर आणि विकारांवर विजय मिळवीत एकेक पायरी वर चढलास तर एक दिवस तू स्वतःच बाहुबली होशील. खरा बाहुबली तुझ्यातच आहे. पण अजून तू त्याला ओळखलं नाहीस स्वतःचा शोध घे. श्रेष्ठ मूल्यांच्या वाटेनं चालत रहा. शाश्वत सुख आणि आनंद तुझ्या पाठोपाठ धावत येईल.'

आजच्या युगाचे मुख्य दुखणे जर कोणते असेल तर अज्ञान हेच आहे. रक्त सांडण्यात, प्रदेश बळकावण्यात, सत्तेची स्थाने अटीतटीने काबीज करण्यात, दुबळ्यांचे शोषण करण्यात आणि केवळ इंद्रियसुखाच्या मिठीत बंदिस्त होण्यात सुखाची परमावधी आहे. यातच आपला बौद्धिक विजय आहे, असे समजणारी ही मनुष्यजात सुखी कशी होणार? अखेर आपल्याला बाहुबलीच्या पाऊलखुणांचा मागोवा घेत चालण्याशिवाय गत्यंतर नाही. अजून आमच्यात माणूसच नीट साकार झालेला नाही. अशा स्थितीत माणसाचा महामानव केव्हा होणार? पण इतके निराश होण्याचे कारण नाही. साऱ्याच ज्योती पार विझलेल्या नसतात आणि विझून गेल्या तरी त्या पेटवण्यासाठी बाहुबली नावाची एक शुभंकर, समर्थ ज्योत शेकडो वर्षे अखंडपणे वाऱ्या-वादळात आणि ऊन-पावसातसुद्धा तेवत आहे. या ज्योतीचे चिंतन करताना आमच्याही हृदयातील ज्योत उजळून लागेल, असा आत्मविश्वास वाटतो. सर्वनाशाच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या, अंधाराने माखलेल्या जगाला अशाच काही ज्योती प्रकाश देत उभ्या आहेत. आम्ही हीच प्रार्थना करतो की, हे बाहुबली, 'तमसो मा ज्योतिर्गमय!'

ooo

# भ. महावीर : एक प्रकाश

आज साऱ्या जगात हिंसेचे वणवे पेटलेले दिसतात. अन्याय आणि अत्याचार यांच्या प्रचंड वादळी लाटांनी जगात भयाचं, अविश्वासाचं जीवघेणं वातावरण निर्माण झालं आहे. निरपराध माणसांच्या रक्ताचे प्रवाह वाहात आहेत. त्यांच्या किंकाळ्यांनी असमंत कोंदून गेला आहे. या विलक्षण, विपरीत परिस्थितीची जबाबदारी कुणावर टाकावी? एकमेकांच्या साहाय्यानं जगत राहण्यापेक्षा एकमेकांना नष्ट करण्याचीच स्पर्धा वाढीला लागलेली दिसते. ही भयानक विकृती दूर करण्याचा केवळ एकच मार्ग असू शकतो. कित्येक महापुरुषांनी या मार्गाची जन्मभर खपून रचना केली आहे. पण त्या महापुरुषांची जपमाळ ओढीत आजचा माणूस मात्र रक्ताची रंगपंचमी साजरी करताना दिसत आहे. राम आणि कृष्ण, महावीर आणि बुद्ध या युगंधर महात्म्यांची नावंसुद्धा उच्चारण्याचा आम्हाला अधिकार आहे काय? केवळ स्वार्थाच्या मागे धावत सुटलेल्या आजच्या मनुष्यजातीनं जगातल्या साऱ्याच धर्मसंस्थापकांची आणि संतमहंतांची निर्लज्ज विटंबना केली आहे. अशा परिस्थितीत एखाद्या असामान्य 'महावीरांची' जयंती केवळ औपचारिकपणे साजरी करण्यात काय स्वारस्य आहे?

महात्मे येतात आणि जातात. पण त्यांच्या पावलांचा मागोवा घेत जाण्याऐवजी केवळ कर्मकाण्डात्मक पूजाअर्चा करीत बसलेल्या लोकांना महात्म्यांच्या जीवनाचे मर्म कळत नाही. त्यांच्या ठायी असलेली क्रांतिकारकता भाबड्या लोकांना ओळखता येत नाही. आपल्याला जयघोष करण्यासाठी एक महापुरुष मिळाला. पूजनासाठी एक देव सापडला. त्या देवाच्या भोवती केवळ प्रदक्षिणा घालाव्यात म्हणजे आपले कर्तव्य संपले, या समाधानात राहणाऱ्या माणसाला रामकृष्णही कळला नाही आणि महावीर, बुद्ध, ख्रिस्त, झरतुष्ट्र कुणीच कळले नाही. अखिल मानवतेचा विचार करणाऱ्या आणि साऱ्या जीवसृष्टीवर आपल्या प्रेमाची पाखर घालणारे हे महापुरुष एकेका धर्माचे आणि संप्रदायाचे संस्थापक किंवा प्रवर्तक ठरले. जे सर्वांचे आहेत, अशा विश्वपुरुषांना

आम्ही एकेका जातीचे आणि संप्रदायाचे सिंहासन दिले. एका आकुंचित वर्तुळात त्यांना बद्ध करून टाकले. जे आमच्या मुक्तीसाठी-मानवजातीच्या मुक्तीसाठी जन्मभर झगडले, त्यांना संप्रदायाच्या कुंपणात बंदिस्त करून टाकले. त्याचा परिणाम असा झाला की, रामकृष्ण केवळ वैदिकांचे, महावीर केवळ जैनांचे, गौतम बुद्ध फक्त बौद्धांचे, बसवेश्वर केवळ शैवांचे, येशू ख्रिस्त फक्त ख्रिश्चनांचे अशी शिस्तबद्ध वाटणी देखील व्यवहारी जगाने करून ठेवली. या महनीय धर्मपुरुषांच्या समग्र जीवनाची आणि विचारधारेची 'आपुलकीनं' आणि 'तटस्थपणानं' कुणी चिकित्साच करीत नाही. सांप्रदायिक अहंकार जागे होतात. महापुरुष कुणाच्या मालकीचे या बाबतीत ओढाताण सुरू होते आणि मग शांतीचा उपासक असलेला महापुरुष केवळ आपल्या कब्जात रहावा म्हणून अशांतीचा आणि हिंसेचा मार्ग स्वीकारला जातो.

हे विचार मनात येण्याचं एक निमित्तकारण असं की ज्यानं भारतीय संस्कृतीलाच नव्हे तर मानवी संस्कृतीला आपल्या प्रतिभेनं शृंगारलं आणि समृद्ध केलं त्या भगवान महावीरांची आज जयंती आहे. इ. स. पूर्वी सहाव्या शतकात ५९९ या वर्षी महावीरांचा जन्म झाला. आता त्यांच्या जन्माच्या आणि निर्वाणाच्या घटनेला पंचवीस शतकं उलटून गेली. पण अजूनही अनेक महापुरुषांचे जन्मोत्सव आणि निर्वाणोत्सव या जगात साजरे होतात. याचा अर्थ या महापुरुषांनी पेरलेली सारीच बीजे करपून गेली नाहीत. वासना-विकारांचे ढोल वाजत असतानाही आणि क्षुद्र लोभ व मोह यांच्या मागे धावण्याची तामसी प्रवृत्ती सर्वत्र दिसत असली तरीही या जगात कुठेकुठे अहिंसेची, करुणेची, प्रेमभावनेची मधुर सुरावट ऐकायला मिळते. दुर्गंधीच्या लाटेबरोबर वाहात असताना कुठून तरी केशरी सुगंधी वाऱ्याची झुळूक यावी त्याप्रमाणे महात्म्यांच्या आठवणी आणि त्यांचं कार्य सुखाची अनुभूती देतं.

भ. महावीरांच्या वैयक्तिक चरित्राबद्दल काही लिहीत नाही. पण राजकुलात जन्मलेल्या महावीरांनी लोकजीवनाचं चित्र अत्यंत सूक्ष्म दृष्टीने न्याहाळलं. दुःखाच्या काटेरी जळत्या वाटेनं जाणाऱ्या मानवतेला योग्य मार्ग दाखवण्यासाठी त्यांनी वर्षानुवर्षे अखंड प्रयत्न केले. वयाच्या तिसाव्या वर्षी राज्यवैभवाकडं पाठ फिरवणारे महावीर श्रमण बनले. 'चिंतन', 'मनन, 'तपश्चरण' यातून जीवांच्या सुखदुःखाचं रहस्य त्यांनी उलगडलं. ते 'तीर्थंकर' झाले. 'तीर्थंकर' हा जैनांच्या परिभाषेतला एक महत्त्वाचा शब्द. 'तीर्थ' याचा मूळ अर्थ 'घाट' असा आहे. ज्या ठिकाणी नदी पार करण्यासाठी साधने मिळतात, त्याला 'तीर्थ' ही संज्ञा आहे. हे तीर्थ बांधणारा रचनाकार किंवा

कर्ता म्हणजे तीर्थंकर होय. रूपकाच्या भाषेत बोलायचे झाल्यास संसाररूपी नदी पार करण्यासाठी धर्मरूपी तीर्थाची (घाटाची) निर्मिती करणारा तीर्थंकर मानला जातो. अडीच हजार वर्षांपूर्वीच्या भारतात ही नवनिर्मिती महावीरांनी केली. या निर्मितीच्या मागे क्रांतिकारक विचार आहेत, हे लक्षात घेतले जात नाही. महावीरांनी भारताची यज्ञप्रधान संस्कृती बदलली. हिंसक आणि तामसी वृत्तीचे यज्ञ त्या काळात भारतात सर्वत्र प्रतिष्ठित मानले जात होते. अशा हिंसाप्रधान वातावरणात सात्त्विक, अहिंसक विचारांची धारा सोडून भारताच्या आध्यात्मिक प्रवाहाला नवीन वळण लावण्याचे कार्य महावीरांचे आहे. यज्ञसंस्कृतीची प्रतिष्ठा महावीरांमुळे ओसरून गेली. जीवनाकडे पाहाण्याची रचनात्मक दृष्टी या महापुरुषाने दिली. महावीरांना नव्या युगाचा-अहिंसा युगाचा प्रणेता मानण्यात येते. सांप्रदायिक दृष्टिकोनातून कोणत्याही महनीय व्यक्तीच्या व्यक्तित्वाची व कार्याची चिकित्सा होऊ शकत नाही.

महावीरांनी मानव जातीला ज्या श्रेष्ठ मूल्याची देणगी दिली आणि ज्याबद्दल इतिहास त्यांचा सदैव ऋणी राहील, असं मूल्य म्हणजे अहिंसा. व्यक्तीचं आणि समाजाचं, साऱ्या विश्वाचं जीवन अहिंसेवरच आधारलेलं असलं पाहिजे, असं त्यांनी आग्रहपूर्वक सांगितलं. प्रत्येक जीवाला जगण्याचा मूलभूत अधिकार आहे, असे प्रतिपादन करून जीवनस्वातंत्र्याचा त्यांनी सतत पुरस्कार केला. संस्कृतीची रचना, तिचं सौंदर्य आणि सामर्थ्य, अहिंसा आणि ममता व सहिष्णुता यातूनच घडू शकते. रक्त सांडणाऱ्यांनी नगरे आणि राष्ट्रे बेचिराख करणाऱ्यांनी माणसांची संस्कृती आजपर्यंत केवळ उद्ध्वस्त करण्याचंच कार्य केलं आहे. माणुसकी आणि प्रेम यातून प्रगत माणसांची सुंदर संस्कृती निर्माण केली पाहिजे अशी उत्कट साद त्यांनी साऱ्या मानवतेला घातली. याचा अर्थ माणसाच्या मनोवृत्तीतच मूलभूत क्रांती झाली पाहिजे. आपापली शस्त्रे परजीत बसलेल्या आजच्या विज्ञानसंपन्न राष्ट्रांनी आणि प्रवृत्तींनी माणसांची संस्कृती मात्र कंगाल करून टाकली आहे. हिंसेतून अविश्वास आणि भय आणि त्यातून द्वेष, सूडबुद्धी आणि त्यातून विनाश. या दुष्टचक्राला भेदण्यासाठी माणसाच्या अंतःकरणातच प्रेमाचा झरा निर्माण करण्याची आवश्यकता आहे. महावीरांनी, बुद्धांनी आणि त्यानंतर अनेक संतमहंतांनी अहिंसाधर्माचा उत्कट प्रचार केला पण तरीही हिंसेची संहारक वादळं भारतात आणि जगात वेगानं घोंगावताना दिसतात. याचा अर्थ महापुरुषांच्या जीवनसौंदर्याचा आत्मा अद्यापी नीट अभ्यासिला जात नाही. आमच्या देशाच्या इतिहासाची पानं अजूनही निष्पाप जीवांच्या रक्तानं

रंगवली जात आहेत. पण हिंसेचा रस्ता केव्हातरी बंद करावाच लागणार आहे. सौंदर्यपूर्ण, प्रेममय, शांत आणि सुसंस्कृत जीवन जगण्यासाठी अहिंसेचा ऑक्सिजन आवश्यक आहे. पंचवीस शतकापूर्वीच्या जगाचं आशास्थान ज्याप्रमाणं 'महावीर' हे होतं. त्याप्रमाणेच आजच्या आणि उद्याच्या जगालाही महावीरांच्या विचारधारेशिवाय तरणोपाय नाही. बुद्ध, ख्रिस्त, गांधी या साऱ्याच धर्मपुरुषांनी अहिंसेवर भर दिला. या घटनेचं महत्त्व केवळ 'व्यवहारवादी' लोकांना अजून समजत नाही. शस्त्रास्त्रांच्या सहाय्यानं एका रात्रीत प्रचंड हिंसा घडवून आणता येईल, जाळपोळ करता येईल, वीरतेचा आणि विजयाचा झेंडा नाचवता येईल. ही घटना इतिहासात अनेक वेळा घडली आहे. पण यातून स्थायी स्वरूपाचा, सर्वांच्या सुखशांतीची ग्वाही देणारा विजय मिळतो काय? रक्ताने माखलेला हात रक्तानेच धुता येत नाही. हृदयातल्या, प्रेमरूपी गंगाजलानं तो हात स्वच्छ करता येतो, हा एक अटळ सिद्धांत आहे.

भ. महावीरांच्या जीवनदृष्टीचा आणखी एक महत्त्वपूर्ण विशेष येथे नोंदला पाहिजे. कोणताही विषमतावादी विचार महावीरांनी स्वीकारला नाही. जातींची आणि वर्णांची कृत्रिम तटबंदी त्यांनी पाडून टाकली. माणसांतल्या निखळ माणुसकीवर त्यांनी भर दिला. परंपरेनं चालत आलेली तर्कदुष्ट जातिव्यवस्था त्यांनी बाजूला सारली. व्यक्तीच्या कर्तृत्वाचा आणि श्रेष्ठतेचा जात आणि वर्ण यांच्याशी कोणताही संबंध नाही अशी घोषणा करून त्यांनी माणसा-माणसांत एकत्वाची जाणीव निर्माण केली. होमहवन, नवससायास, यज्ञयाग या साऱ्या कर्मकांडांचा त्यांनी उपहास केला. जातीच्या आधाराशिवाय ज्यांना आपल्या श्रेष्ठपणाचा दुसरा पुरावाच देता येत नाही, अशा लोकांना उद्देशून त्यांनी म्हटले आहे- 'मुंडन केल्याने कोणी श्रमण होत नाही, ओंकाराचा उच्चार करून ब्राह्मण होता येणार नाही. अरण्यात राहिल्यामुळे मुनी होता येत नाही. किंवा वल्कले नेसून तपस्वी होता येत नाही.' अशा प्रकारचा स्पष्ट, तर्कशुद्ध उपदेश लोकांच्या भाषेतून लोकांच्या अंतःकरणाला स्पर्श करीत महावीरांनी साऱ्या भारतात तीस वर्षे पदयात्रा करीत केला. ते निवृत्तिवादाचे पुरस्कर्ते होते किंवा ते पलायनवादी होते असले आक्षेप त्यांच्या विरोधकांनी घेतले. पण ज्यांनी महावीरांचं तत्त्वज्ञान कधीच समजून घेतलं नाही, त्यांच्या अज्ञानी आक्षेपांना महत्त्व देण्याचे कारण नाही. इतिहास असं सांगतो की, भ. महावीर आणि भ. बुद्ध हे दोन युगप्रवर्तक धर्मपुरुष काही काळ एकत्र वाटचाल करीत होते. पुढे त्यांचे मार्ग भिन्न झाले. पण या

दोन्ही महामानवांनी वैश्विक संस्कृतीवर आपला ठसा उमटवला. भारतीय संस्कृतीत तर वैदिक, जैन आणि बौद्ध अशा तीन स्वतंत्र विचारधारा मिसळून गेल्या आहेत. या तिन्ही विचारधारांचा परस्परांवर परिणाम झालेला आहे. अजंठा-वेरूळच्या लेण्यात या त्रिविध धारांचे दर्शन होते. प्रत्येकीने दुसऱ्या धारेला आपल्यात काही प्रमाणात सामावून घेतले आहे. म्हणूनच भारतीय संस्कृती समन्वयवादी आणि समावेशक झाली, असे म्हणता येईल.

भ. महावीरांच्या निरीश्वरवादी भूमिकेचा विपर्यास करून त्यांना नास्तिक ठरविण्यात येते. ईश्वर हाच कर्ता आणि करविता व सर्व जगाचा नियंता आणि हंता आहे. या विचाराची पकड भारतीय मनुष्यावर दृढ असल्यामुळं तो प्रारब्धवादी झाला. खरं तर आपणच आपल्या व्यक्तित्वाला आकार दिला पाहिजे. आपल्यातील 'सत्' अधिक विकसित करण्यासाठी आपल्यालाच झगडत राहावे लागेल. परमेश्वर नावाची कोणी एक वेगळी शक्ती आपल्याला निर्माण किंवा नष्ट करीत नाही. आपणच आपल्या भाग्याचे आणि सुखदुःखाचे शिल्पकार आहोत या पुरुषार्थवादी भूमिकेचा महावीरांनी पुरस्कार केला. माझा आत्मा हीच कामधेनू, माझा आत्मा हाच कल्पवृक्ष. तेच असीम ज्ञानाचे आणि शक्तीचे निधान आहे. म्हणूनच आपण साऱ्या समाजाशी सह्कंप पावून आत्मा आणि विश्व यांना एकरस बनवले पाहिजे. हा बुद्धिनिष्ठ विचार ही महावीरांच्या पुरुषार्थी, प्रयत्नवादी भूमिकेची ग्वाही आहे.

मनुष्य आपलं जीवन उदात्त व सुंदर बनवू शकतो. आपल्या आत्म्याला तो परमात्मा करू शकतो. हा विचार सामर्थ्यपूर्ण आहे. स्वतःतला परमेश्वर जाणून घेण्याची ही भूमिका नास्तिकतेची कशी ठरते? जैन धर्माने ज्या मूल्यांवर सर्वाधिक भर दिला, त्यात अहिंसा, अपरिग्रह आणि अनेकान्तवाद ही आहेत. अमर्याद वासनांचे संयमाने आणि विवेकाने नियंत्रण करणे आणि हळूहळू बाह्य साधनांवर, त्यांच्या संग्रहावर लक्ष न ठेवता आपल्या आत्मशक्तीला साद घालून तिचा विकास करणे यासाठी ही सारीच मूल्ये आवश्यक आहेत. जैनांची विश्वसंस्कृतीला कोणती मौलिक देणगी आहे असा प्रश्न विचारला तर 'स्याद्वाद' किंवा 'अनेकांतवाद' हा विचार हे उत्तर द्यावं लागेल.

वस्तू अनेक पदरी असते. अनंत धर्मात्मक असते. संपूर्ण सत्य केवळ एकाच पैलूत सामावलेले नसते. केवळ मीच सत्य सांगतो, माझाच शब्द अंतिम आहे ही भूमिका अज्ञान आणि अहंकार यांची द्योतक असते. माझ्याप्रमाणेच इतरांच्या

विचारातही सत्य असू शकते. विरोधी कल्पनेतही ते असते हे लक्षात आले की, अकारण अभिनिवेशाची कात गळूनपडते. सांप्रदायिक अहंकार ओसरून जातात. सत्याचा शोध मग.योग्य दिशेने सुरू होतो. सहिष्णुता, समंजसपणा वाढीला लागतो. एकांगी आत्यंतिकता चुकीची आहे हे ध्यानात येतं. आज जगात नाना प्रकारचे इझमस् किंवा पंथ एकान्तिक अभिनिवेशातून निर्माण झाले आहेत. हे सारे वितंडवाद आणि त्यातून उत्पन्न झालेलं शत्रुत्व टाळायचं असेल तर अनेकान्तवादी दृष्टिकोनाची आवश्यकता आहे. या संक्षिप्त लेखात अनेकान्तवादाची याहून अधिक चर्चा अशक्य असल्यामुळं बुद्धीला संतुलित बनवणारा हा अनेकान्तवाद ही जागतिक विचाराला समृद्ध करणारी एक शक्ती आहे इतकेच म्हणतो. अधिक विवेचन करीत नाही.

भगवान महावीरांचे व्यक्तिमत्व आणि कार्य मानवी संस्कृतीला चिरंतन समर्थ बनवणारं आहे. ज्या महावीरांनी माणूस सर्वत्र एक आहे असं सांगितलं त्यांच्या अनुयायांनी कृत्रिम भेदकल्पना मनात ठेवू नयेत. महापुरुषांच्या प्रतिमेची पूजा भक्तिभावनेचं समाधान करणारी असू शकेल. पण भक्तीनं ज्ञानशक्तीकडं जाता आलं पाहिजे. भक्ती जर केवळ अंधश्रद्धेकडे आणि कर्मकाण्डाकडे नेत असेल तर तिला सम्यक् विवेकाचे अधिष्ठान दिले पाहिजे. प्रतिमापूजनापेक्षा विचारांची उपासना हीच महत्त्वाची अडीच हजार वर्षापूर्वी जगाच्या कल्याणासाठी आपल्या साऱ्या आयुष्याची मशाल पेटवणारा आणि जीवमात्राला प्रकाश देणारा तीर्थंकर महावीर आणि त्याचं तत्त्वज्ञान चिकित्सक वृत्तीनं अभ्यासिलं पाहिजे. महापुरुषांवर फुलं उधळावीत पण या फुलांतून येणारा गंध जाणिवेचा, ज्ञानाचा असावा.

'तुलाच या आत्मज्योतीवर आलेली काजळी दूर केली पाहिजे. तुझ्यातली एक चिरंतन ज्योत तूच तेवत ठेवली पाहिजे. तूच स्वतःच ती ज्योत आहेस. तू ती पालवू शकतोस आणि अज्ञानानं मालवूही शकतोस. तूच घडवू शकतोस. उद्ध्वस्त करण्याची शक्तीही तूच आहेस. हा साधक-बाधक अनेकांगी विचार करून अमंगलातून मंगलाकडे, अज्ञानातून ज्ञानाकडे आणि कधीच न मावळणाऱ्या आनंदस्वरूप प्रकाशाकडे तुझी वाटचाल व्हावी.'

OOO

# संतकाव्यातील सौंदर्यस्थळे

मराठी साहित्याच्या प्रवाहात सौंदर्याची आणि सामर्थ्याची 'अक्षरधारा' सोडण्याचं कार्य संतांच्या रसमय वाणीनं केलं यात संशय नाही. मराठी साहित्याच्या विकासाला आणि समृद्धीला ही संतवाणी विशेषत्वानं कारणीभूत झाली. खरोखर संतांची कविता हा एक चमत्कार नव्हे काय? शेकडो वर्षे उलटून गेल्यावरही या कवितेचं अंगभूत सौंदर्य फुलासारखं ताजं टवटवीत आहे. भक्तीच्या सुगंधानं न्हालेली संतांची कविता अश्रद्ध माणसालाही आनंद देऊ शकते. काही संतकवितेचं इंग्रजीत भाषांतर झालं आहे. ग्यानबा-तुकारामांचे अभंग पाश्चात्य लोकांनाही आवाहन करतात साहित्याची भाषा कोणतीही असली तरी भाव उत्कट असेल तर त्याचा प्रभाव पडल्याशिवाय राहात नाही. चंद्रभागेच्या पाण्यावर उठलेले संतवाणीचे तरंग आता दूरदेशात पोहोचले आहेत. ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम हे कवी केवळ महाराष्ट्राचे आणि मराठी भाषेचेच राहिले नाहीत. ते मानवतेचे कवी झाले. मराठी संतकविता ही मानवतावादी विचारांची उचंबळून आलेली एक लाट आहे.

साहित्याचं श्रेष्ठत्व त्यात प्रकट झालेल्या विचारांवर आणि लेखकाच्या व्यक्तित्वावर ठरत असतं. ज्ञानेश्वरी वाचताना एका शांत, प्रसन्न, आनंदवादी कवीची धीरगंभीर मूर्ती आपल्यासमोर उभी राहते. नामदेव-तुकारामाचं अभंगसाहित्य वाचताना हाच सुखद अनुभव येतो. चोखामेळा, जनाबाई, एकनाथ इत्यादी साऱ्याच संतांच्या वाणीतून त्यांची सोज्वळ, सुंदर व्यक्तिमत्त्वं साकार होतात. साहित्य वाचताना ते निर्माण करणाऱ्या प्रतिभावंताच्या व्यक्तित्वाला आपला स्पर्श होत आहे, आपण त्या व्यक्तित्वाच्या सहवासात वावरत आहोत हा अनुभव येणं ही सर्वांत महनीय आनंदाची देणगी असते. 'दुरिताचे तिमिर जावो' किंवा 'कन्या सासुऱ्यासी जाये' अथवा 'नाचू कीर्तनाचे रंगी' यासारख्या काव्यपंक्ती वाचताना किंवा ऐकताना आपल्या मनातली क्षुद्र स्वार्थभावना थोडावेळ का होईना पण क्षीण होत जाते. भक्तीच्या रसानं ओतप्रोत भरलेला जनाबाईचा किंवा कान्होपात्रेचा एखादा अभंग आपल्याही मनात भक्तीच्या रंगाचं सिंचन करू शकतो. संतकविता आपले विशिष्ट प्रामाणिक उत्कट अनुभवपुष्प घेऊन रसिकांच्या पुढ्यात शेकडो वर्षं उभी आहे. संत कवितेची एक प्रतिमा आपल्या

दृष्टीसमोर येते ती अशी की, भावभक्तीचं शुभ्र वस्त्र तिनं परिधान केलं आहे. तिच्या मुखमंडलावर सात्त्विक हास्याचं चांदणं पसरलं आहे. नेत्रांतल्या वत्सल ज्योतीचा प्रसन्न प्रकाश या चांदण्यात मिसळून गेला आहे. तिच्या हातात विश्वप्रेमाची एकतारी आहे. तिचा मंदमधुर झंकार निनादत आहे. कंठातून उमटणाऱ्या भक्तीच्या सुरांतून, माणुसकीच्या शब्दांतून जणू अमृताचे बिंदू झरत आहेत. हीसंतकवीच्या आपुलकीचा इतका दृढ अनुभव देऊ शकते की तिला विसरणं अशक्य आहे. साहित्याचं उत्तमत्व अखेर ते साहित्य आपल्याला कोणता अनुभव देऊ शकतं यावरच मोजायचं असतं. कुणी काहीही म्हटलं तरी संतांची कविता अगदी सहजपणानं माणसांच्या आणि माणुसकीच्या जवळ जाते. ती प्रेमभावनेचं आमंत्रण देत राहते. तिच्या वृत्तीत साधेपणातलं विलक्षण सौंदर्य सामावलेलं आहे. ती दिपवून टाकीत नाही. ती हळुवारपणे काळजाला हात घालते. 'वेडेवाकुडे गायिन, परि तुझाचं म्हणवीन' ही तिची प्रतिज्ञा आहे. त्यामुळंच ती 'अंतरीची निर्मळ' आणि 'वाचेची रसाळ'आहे. या प्रकारची कविता काळावर मात करू शकली तर त्यात आश्चर्य तरी कसलं?

तेराव्या शतकापासून सतराव्या शतकाच्या अखेरपर्यंत या संतकवितेची जोमदार निर्मिती होत राहिली. आधी संत व्हावं आणि मग हाती लेखणी घ्यावी अशी त्या काळी पद्धती होती. ईश्वराचा ध्यास लागला की वाणीला व्याकुळतेचं सौंदर्य सहजरीत्या येत असे. त्यासाठी काव्यशास्त्र वाचण्याची जरूर नव्हती. संत आणि कवी अनुभवातून घडत असतात. साधनेतून विकसित होतात. मनाच्या मातीत भक्तीचं आणि प्रीतीचं बीज रुजवून घ्यावं लागतं. फुटणाऱ्या अंकुराला ऊन सोसावं लागतं. आपण फुलत जावं ही तीव्र इच्छा असल्याशिवाय संतत्वाला काय किंवा कवित्वाला काय फुलताच येत नाही. फुलण्यासाठी आतून उलावं लागतं. हाताला चटके बसल्याशिवाय ज्याप्रमाणं भाकरी तयार होत नाही त्याप्रमाणं तीव्र अनुभवांच्या चाबकाचे फटके बसल्याशिवाय संतत्वालाही आकार येत नाही. आमची मराठी संत–कविता काळालाही नमवू शकली याचं कारण ती लिहिणाऱ्या संतांनी कडवट आणि दाहक अनुभूती घेतल्या होत्या. कोणत्याही संतकविता चरित्रात हेच दिसेल की वेदना आणि व्याकुळता केवळ व्यक्तिगत पातळीवरची नव्हे सामाजिक आणि वैश्विक पातळीवरची अनुभवण्याची शक्ती आल्यावर त्यांनी साहित्याची निर्मिती केली. साहित्याच्या वेलीत फुलणाऱ्या एखाद्या चिमुकल्या फुलासाठीही मातीला अपार कष्ट भोगावे लागतात. संतांचं काव्य हा त्यांच्या अस्सल अनुभवांचा अर्क आहे.

त्यांच्या अश्रूंचा आणि त्यांनी घेतलेल्या आनंदाचा हा आविष्कार आहे. 'ज्ञानेश्वरी' म्हणजे ज्ञानेश्वरांचं चैतन्यमय रूप. 'तुकारामांची गाथा' म्हणजे तुकोबांचं मूर्तिमंत जीवन. हे विधान साऱ्याच संतकाव्याविषयी करता येईल. श्रेष्ठ साहित्यात लेखकांचं व्यक्तित्व आणि त्याचे विचार व शब्द परस्परांत इतके मिसळून गेलेले असतात की ते वेगळे काढता येत नाहीत.

संतांची कविता काव्यरसिकांना एक आगळा आनंद देऊ शकते. ईश्वरावर श्रद्धा नसलेल्या नास्तिकालाही ही कविता अवीट रसानुभव देते याचं कारण संतकवी अंतःकरणानं भावसंपन्न असल्यामुळं ते कवी आहेत. चंदनाला अंगभूत सुवास असावा त्याप्रमाणं या संतांच्या हृदयातून अभिजात कवितेची धारा वाहात आहे. साहित्याच्या दृष्टीनं या काव्याला अक्षरत्व प्राप्त व्हावं असं सौंदर्य आहे. वाक्‌सौंदर्याची, कल्पनारम्यत्वाची, अर्थचमत्कृतीची, भावनोत्कटतेची, विचारसामर्थ्याची अनेक उदाहरणं सहजपणानं देता येतील. महाभारताचं अपूर्वत्व स्पष्ट करताना ज्ञानेश्वरांच्या भाषावैभवाला सुंदरतेची कशी भरती येते ते पाहाण्यासारखं आहे. ज्ञानेश्वर म्हणतात,

'आता कलाकौतुकाचं जन्मस्थान असलेली आणि विवेकरूपीवृक्षांचं अभिनव उपवन असलेली गहनकथा ऐका. सर्वसुखांची ही आदिधारा आहे. प्रमेयांचं महाभांडार आहे. नाना प्रकारच्या नवनवीन रससुधेचा हा परिपूर्ण सागर आहे. हे विद्यांचं मूळपीठ आहे. सर्वधर्मांचं माहेरघर आहे. सज्जनांचं अंतःकरण आहे. श्री शारदेच्या लावण्याचं हे रत्नभांडार आहे. महाभारत हे महाकाव्याचा स्वामी आहे. रसांना रसाळपणा इथूनच प्राप्त झाला. येथेच चातुर्याला शहाणपणा आला. प्रेमाला रुची प्राप्त झाली. सुखाला सौभाग्य मिळाले. माधुर्य मधुर झाले. शृंगार सुरेख बनला. कलांना कलात्मकता आली. पुण्य पराक्रमी झालं. रंगांचे सुरंग झाले. किशोरीच्या अंगोपांगांवर तारुण्याच्या आगमनाबरोबर लावण्याची नव्हाळी निर्माण व्हावी त्याप्रमाणं व्यासांच्या प्रतिभेनं सारं जग उजळून निघालं.'

मूळ ओव्यांचा हा गद्यानुवाद वाचतानाही रसिकांच्या अंगावर रोमांच उभे राहातात. ज्ञानेश्वर हे सौंदर्याचे कवी आहेत. जगातलं कोणतंही सौंदर्य त्यांनी नाकारलेलं नाही. त्यांच्या विरागतेतही अनुरागाच्या विलोभनीय छटा आढळतात. जीवनातल्या पराक्रमावर, भक्तीवर, नीतीवर, प्रेमावर आणि शृंगारावर लुब्ध झालेल्या या कलावंतांची कित्येक सुवचनं मी येथे देऊ शकेन. पण विस्तार करण्यापेक्षा एकदोन अवतरणेच देत आहे. त्यावरून ज्ञानेश्वरांच्या संपन्न प्रतिभेची जाणीव होईल. खरं तर

ज्ञानेश्वरी हे मराठी साहित्याच्या बागेत वाढलेले आणि चिरंतन सुवासाचे वरदान लाभलेले, कधीही न सुकणारे, सदैव बहरलेले असे पारिजातकाचे झाड आहे. या झाडावरच्या फुलांचा मत्त सुवास ज्यानं मनसोक्त हुंगला नाही त्याच्या रसिकतेला अजून खरा बहर आला नाही असंच मी म्हणेन. कलाकृतीचा मनोमन कसा सूक्ष्म आणि सर्वांगीण उपभोग घ्यावा हे ज्ञानेश्वर सांगतात.

जैसे शारदियेचिये चंद्रकळे । माझि अमृतकण कोवळे ।
ते वेचिति मने मौआळे । चकोरतलगे ॥
तेयांपरी श्रोतां । अनुभवावी हे कथा ।
अति हळुवारपण चित्ता । आणूनियां ॥

'शरद ऋतूच्या चंद्रकिरणातून पाझरणारे अमृताचे कोवळे कण चकोराची पिलं ज्या हळुवार मनानं टिपून घेतात त्याच हळुवारपणानं आपल्या अंतःकरणानं ही कथा श्रोत्यांनी आस्वादावी. शब्दांशिवाय संवाद व्हावा, इंद्रियांना नकळत भोग मिळवावा. भ्रमर कमलातून पराग नेतात पण कमळपाकळ्यांना ते कळतही नाही. इतका हळुवारपणा असेल तरच साहित्याचा-कलेचा आस्वाद घेता येईल.' हा साहित्य-सेवनाविषयीचा सूक्ष्म विचार सांगून ज्ञानेश्वर एका शृंगारसुंदर दृष्टांताकडं वळतात. शृंगारातली आणि उपभोगातली उत्कटता किती रसिकपणानं ते प्रकट करतात!

कां आपुला ठावो न संडितां । आळंगिजे चंद्रु प्रकटतां ।
हा अनुरागु भोगितां । कुमुदिनी जाणे ॥

चंद्रविकासी कमलिनी चंद्रोदय होताच आपलं स्थान न सोडता त्याच्या किरणस्पर्शांचा प्रेमानं उपभोग घेते. तितका हळुवारपणा कलास्वादासाठी आवश्यक आहे. ज्ञानेश्वरांचं हे रसास्वादासंबंधीचं विश्लेषण केवळ अपूर्व आहे. 'अपूर्ववस्तुनिर्माणक्षमाप्रज्ञा' हे त्यांच्या प्रतिभेचं मुख्य वैशिष्ट्य आहे. आकाश, सागरावरील उचंबळत्या लहरी, कमळावरील जलबिंदू, चंद्रसूर्यांची चित्रे, सृष्टीतले रंग आणि गंध, मृत्यूतली विध्वंसकता, भक्तीतलं पावित्र्य, प्रणयातला कोमलपणा, निरनिराळ्या ऋतूंचं सौंदर्य, साधूंची वत्सलता, किंबहुना साऱ्या जीवनाचं जिवंतपण ज्ञानेश्वर संवेद्य मनानं टिपतात. ज्ञानेश्वर हे कवीश्वर आहेत. आणि ज्ञानेश्वरी ही रसेश्वरी आहे. इतकंच मी म्हणेन. अधिक काय सांगणार?

ज्ञानेश्वर आणि नामदेव हे समकालीन संत. नामदेवांच्या अभंगांतील आर्त

भक्तीमुळं त्यांच्या कवितेला एक वेगळाच रंग आला आहे. रसाळ कीर्तनकार असलेल्या या कवीची शब्दकळा आकर्षक आहे. वत्सल आणि करुण रसांना नामदेवांनी काव्यात प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. मराठीतला पहिला भावगीत कवी म्हणूनच नामदेवांचा उल्लेख करणं योग्य होईल.

घालीन लोटांगण वंदीन चरण। डोळ्यांनी पाहीन रूप तुझे ॥
प्रेमे आलिंगीन, आनंदे पूजीन। भावे ओवाळीन म्हणे नामा ॥

या ओळी तर आर्तभक्तीची परिसीमा दाखवतात.

'नामयाची वाणी अमृताची खाणी।' ही उक्ती सार्थ करणारी त्यांची कविता आहे. विठ्ठलाच्या मूर्तीचं चित्र नामदेवांनी किती तन्मयतेनं रंगवलं आहे, आणि ते रंगवताना त्यांच्या हृदयातले भक्तीचे रंगतरंग कसे उमटले आहेत हे पाहण्यासारखं आहे. मूर्तीच्या ध्यानातील वेगवेगळ्या छटाही येथे जिवंत झाल्या आहेत.

कस्तुरी कुंकुम रेखे लाल टिळा। केशराची उटी सर्वांगासी ॥
पाहिला माझा पांडुरंग। जिवी जिवलग डोळे भरी ॥
हार शोभे गळां मंजुरीचा तुरा कर्ण रत्नफळा झळाळित ॥
विटेवरी नीट गोमटी पाउले। त्यावरी ठेविले मस्तक म्यां ॥
नामयाची धणी भुकेली ते घाली। आनंद दिवाळी आजी झाला ॥

हास्य आणि शृंगार या रसांचाही आविष्कार नामदेव करतात. ज्ञानेश्वरांप्रमाणं कल्पनेचं आणि अलंकारांचं झगमगीत वैभव त्यांच्या काव्यात नाही. पण समुचित अलंकारातून व दृष्टांतांतून आपला भाव ते प्रकट करतात. उदाहरणार्थ 'विद्युल्लते ऐसी झळकती कुंडले। अधर कोवळे अरुणोदय।' किंवा दृष्टांतादाखल ते म्हणतात, 'कोळशासी दूध मर्दोनीया धुतां। न पावे शुद्धता काही केल्या' ॥ साधी, गोड, रसमय सौम्यआणि पहाटवाऱ्यासारखी शीतल कविता नामदेवांनी लिहिली. हिंदीतून आणि पंजाबीतूनही लिहिली. त्यांच्याच प्रभावळीत असलेले चोखामेळा, सावतामाळी आणि जनाबाई हिनं तर भक्तीच्या लाटेवर आपलं जीवनसर्वस्व झोकून दिलं. नामदेवाच्या घरात राहून तिनंही कवितेच्या माध्यमातून विठ्ठलाची आराधना केली. पांडित्याचा वासही न लागलेल्या या कवितेतलं शहाणपण लक्षणीय आहे. जिवाभावानं जिनं आपलं आयुष्य विठ्ठलचरणी समर्पित केलं, त्या जनाबाईच्या काव्यात एक प्रकारचं नेटकं, रेखीव सौंदर्य दृष्टीला पडतं. खरं तर हा तिच्या व्यक्तित्वाचाच

आविष्कार आहे. संत मीरेप्रमाणे संत जनाबाईनं लौकिकाची लाज सोडून अलौकिकाची संगत धरली आहे. ती धीटपणानं म्हणते,

डोईचा पदर आला खांद्यावरी । भरल्या बाजारी जाईन मी ॥
हाती घेईन टाळ खांद्यावरी वीणा । आता मज मना कोण करी ॥
पंढरीच्या पेठे मांडियेले पाल । मनगटावर तेल घाला तुम्ही ॥
जनी म्हणे देवा मी झाले येसवा । रिघाले केशवा घर तुझे ॥

जनाबाईचा आत्मप्रत्यय विलक्षण आहे. तिच्या काव्यात स्त्रीसुलभ हळुवारपणा आणि वात्सल्य अधिकांशानं आहे. 'सखा माझा ज्ञानेश्वर' 'सख्या माझ्या ज्ञानदेवा' असं म्हणत ज्ञानेश्वरांविषयी पराकोटीचा आत्मीय भाव तिनं प्रकट केला आहे. तिचा विठ्ठल निर्गुण, निराकार नाही. तो तिच्याबरोबर दळणकांडण करतो. सखीच्या भूमिकेतून तिच्याशी बोलतो. या विठ्ठलाशी तिच्या हृदयाचे बंध जुळलेले आहेत. साहजिकच जनाबाईची कविता प्रेमळ, कौटुंबिक जिव्हाळ्यानं ओथंबलेली, प्रेमात चिंब भिजलेली आणि अद्वैत तत्त्वज्ञानाला स्पर्श करणारी आहे.

समाजाच्या वेगवेगळ्या थरांतून आलेल्या संतकवींची भाषा त्यांच्या मनाशी, व्यवसायाशी आणि व्यक्तित्वाशी निगडित आहे. प्रत्येकाच्या सुखदु:खात निराळेपणा असल्यामुळं या कवितेची अभिव्यक्ती एकसुरी झालेली नाही. प्रत्येक कवितेचा गंध वेगळा आहे. प्रत्येक कवितेच्या रुचीत आणि स्पर्शात भिन्नता आहे. काही संतांच्या कविता सामाजिक दुखण्यानं व्याकुळ झालेल्या आहेत. चोखामेळ्याची काव्यवाणी अश्रूंनी, दु:खानी आणि न्यूनत्वाच्या जाणिवांनी कंपित झालेली दिसते. या अश्रूतूनही आत्मतृप्तीकडं चोखामेळ्यांचा प्रवास चालू आहे. म्हणूनच तो म्हणतो, 'अरे, ऊस वाकडा असला म्हणून काय रस वाकडा असतो? नदीचं वळण वाकडं असलं म्हणून काय पाणी तसं असतं? हा चोखामेळा कदाचित डोंगा असेल (सामाजिक दृष्ट्या हीन असेल) पण त्याची भावना तशी नाही. ती उत्कट आणि उच्च आहे. वरवरच्या रंगढंगाला भुलण्यात काय बरं अर्थ आहे? म्हणूनच त्याच्याविषयी संत बंका म्हणतो,

चोखा चोखट निर्मळ । तया अंगी नाही मळ॥
चोखा सुखाचा सागर । चोखा भक्तीचा आगर ॥
चोखा प्रेमाची माऊली । चोखा कृपेची साऊली ॥
चोखा मनाचे मोहन । बंका घाली लोटांगण ॥

केवढा सुंदर साधेपणा! कृत्रिमतेचा लेशही नाही. प्रांजल अंतःकरणाचे प्रामाणिक सहजोद्‌गार या कवितेतून किती प्रेमळपणानं : उमटले आहेत. अंतःकरणाची प्रीती आणि विठ्ठलाची भक्ती हीच संतकाव्याची शक्ती. म्हणूनच ही कविता गोमटी झाली. रसभाव फुली फुलून आली. हे सारस्वताचं गोड झाड आमच्या महाराष्ट्र भाषेत संतांच्या हातून लावण्यात आलं. अनेकांनी आपल्या हृदयीचं पाणी घातलं. त्यात एकनाथांसारखा पंडित आणि संत असलेला श्रेष्ठ कवीही आहे. एकनाथ म्हणजे संतकाव्याचा आणि भागवत धर्ममंदिराचा भरभक्कम खांब आहे. नाथांनी तर आपल्या साहित्यातून सर्व रसांचा खेळ करून दाखवला. त्यांच्या भारूडातही काव्य आहे. आणि काव्यात समाजाचं चित्र आहे.

संत तुकारामांच्या अत्यंत प्रभावी काव्याचा उल्लेख केल्याशिवाय मराठी कवितेचा इतिहास सिद्ध होणार नाही. 'तुका झालासे कळस' असं संत बहिणाबाईनं म्हटलं ते सार्थ आहे. 'ग्यानबा तुकाराम' हा घोष एका अर्थानं मराठी काव्याच्या दोन उन्नत शिखरांचा जयघोष आहे. तुकारामांची कविता मराठी माणसांच्या जीवनात आणि संस्कृतीत रुजून बसली आहे. कवित्वाचा हा निर्मळ झरा आपल्या स्वयंसामर्थ्यानं अखंड झुळझुळत आहे. 'तुका म्हणे झरा, आहे मूळचाची खरा'. आकाशाएवढा हा तुका त्याच्या कवित्वाच्या रूपानं आपल्याला सोबत करीत राहातो. तुकोबांची रूपकं विराण्या, त्यांचे रसरशीत दृष्टांत इतके खणखणीत आहेत की त्यांचा विसर पडणं ही एक अशक्य गोष्ट आहे. ज्ञानेश्वरांचं विदग्ध पांडित्य आणि एकनाथांचं विस्तृत ग्रंथाध्ययन तुकोबांपाशी नव्हतं. पण जीवनाचा जळता अनुभव, खोल सर्वस्पर्शी चिंतन, भेदक निरीक्षणशक्ती, विलक्षण समाजनिष्ठा, श्रेष्ठ मूल्यांविषयी प्रगाढ श्रद्धा, अन्यायाची आत्यंतिक चीड, विठ्ठलाविषयीचा पराकोटीचा भक्तिभाव या गुणवैशिष्ट्यामुळं त्यांची अभंगवाणी बुडवूनही बुडाली नाही. श्रेष्ठ कविता बुडत नसते. बुडणाऱ्याला ती तारू शकते हेच सिद्ध झालं. या कवीची अनेक वचनं आणि सुभाषितं मराठी भाषेत खोलवर रुजली आहेत. मराठी भाषेला आणि माणसाला जीवनसत्त्वांचा पुरवठा करणारी तुकारामांची कविता ही महाराष्ट्राच्या मर्मबंधातली ठेव आहे. कमीतकमी शब्दांत अधिक आशय सांगणारी आणि अन्यायावर तुटून पडणारी ही कविता अद्‌भुत आहे. 'लाभाविण प्रीती करणारा एक कळवळ्याचा साधुपुरुष' ही तुकारामांची प्रतिमा आहे. खरं तर त्यांची अभंगगाथा म्हणजे त्यांचं आत्मकथन आहे. तुकोबांच्या सुखदुःखांची ही एक कहाणी आहे. 'तुका म्हणे

आपुलाचि वाद आपल्यासी' मनाशी वाद-संवाद करीत हा कवी मनस्वीपणे आपली वाट चालत राहिला आणि मनात येतील ती गाणी गात राहिला. हे त्याचं विशेषत्व आहे. 'मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास, कठीण वज्रासि भेदू ऐसे' ही त्यांची प्रवृत्ती. शब्दांच्या माध्यमातून लोकजागृतीचं कार्य ते करीत राहिले.

आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दांचीच शस्त्रे यत्न करू ॥
शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन । शब्दे वाटू धन जनलोकां ॥
तुका म्हणे पहा शब्दचि हा देव । शब्देचि गौरव पूजा करू ॥

तुकारामांची प्रतिभा जन्मजात आहे. दुःखांच्या सान्निध्यात, संकटांच्या सहवासात ती फुलून येते. या दुःखातूनच आनंदाकडं त्यांनी केलेला एक विलक्षण प्रवास त्यांच्या काव्यातून मुखरित झाला आहे. काव्याच्या आणि साहित्याच्या मोठेपणाचे निकष केवळ वाङ्मयात नसतात. श्रेष्ठ कविता माणसाच्या माणुसकीला जाग आणते. तुकारामांची आणि सर्वच संतांची काव्यवाणी ही सामर्थ्याची व सौंदर्याची गाणी आहेत, जगात सर्वत्र पसरलेल्या ईश्वररूप सौंदर्याचा साक्षात्कार झाल्यावर तुकोबांनी आनंदनिर्भर होऊन जे काव्योद्गार काढले. ते लक्षणीय आहेत. ते म्हणतात,

आनंदाचे डोही आनंद तरंग । आनंदचि अंग आनंदाचे ॥
काय सांगो झाले काहीचिया बाही । पुढे चाली नाही आवडीने ॥
गर्भाचे आवडी मातेचा डोहाळा । तेथीचा जिव्हाळातेथे बिंबे ॥
तुका म्हणे तैसा ओतलासे ठसा । अनुभव सरिसा मुखा आला ॥

सारांश, संतकाव्यातलं सौंदर्य विविधस्वरूपी आहे. ही केवळ भक्तीची कविता नसून ती संतांच्या सुखदुःखात्मक अनुभूतींची कहाणीही आहे. भावनेचा उमाळा, माणुसकीचा जिव्हाळा, दुःखितांविषयीचा कळवळा याचे रंग या काव्यात ठायीठायी उमटले आहेत. साधारण माणसांची असाधारण कविता असं या काव्याला म्हणता येईल. कारण हे काव्य लिहिणारे कवी एकदोन अपवाद सोडल्यास सर्वसामान्य स्तरांतून आलेले कवी आहेत. संतकाव्याची चंद्रभागा विठ्ठल नामाचा जयघोष करीत मराठी माणसांच्या मनातून शेकडो वर्षे वाहात आहे. आणि आणखी कित्येक शतके ती अशीच वाहणार आहे. कारण तिचं नातं जीवनातल्या सत्याशी, शिवाशी आणि सुंदराशी आहे. शाश्वताला आवाहन करणारं हे संतकाव्य अक्षय, अभंग आहे असं म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

# पसायदानातील भावसौंदर्य

सौंदर्य आणि तारुण्य चंचल असते. हातात घेतलेली पारिजातकाची कोवळी फुलं स्पर्शसुंदर असतात. ताजी टवटवीत असतात. पण थोड्याच वेळात ती कोमेजून जातात. पावसाळ्यात दिमाखानं दुथडी भरून वाहणाऱ्या नद्या उन्हाळ्यात कोरड्या पडतात. युवतीचं लावण्य काही वर्षातच ओसरून जातं. सुंदरतेला आणि यौवनाला विनाशानं वेढा घातला आहे. पण जगातल्या काही कलाकृती मात्र अक्षय तारुण्याचा ताम्रपट घेऊन रसिकांसमोर उभ्या आहेत. साहित्यकृतींबद्दल बोलायचं झालं तर शतकं आली आणि निघून गेली तरी रामायण-महाभारताचा रंग अजूनही पूर्वी इतकाच आकर्षक आहे. मराठी साहित्यात 'ज्ञानेश्वरी' विषयी असंच म्हणता येईल. कोणत्या रसायनानं 'ज्ञानेश्वरी' चं सौंदर्य आणि यौवन इतकं रसरशीत बनलं आहे हे कळत नाही. कलाकृतींच्या मोहकतेत एक प्रकारची गूढता असते. एखादी सुंदर वस्तू नेमकी कोणत्या कारणामुळं सुंदर दिसते ते निश्चयानं सांगता येत नाही. याचा अर्थ सौंदर्यात काहीतरी अद्‌भुतता असू शकते.

समग्र 'ज्ञानेश्वरी' ही चैतन्याची न सुकणारी वेल आहे. यात शंका नाही. पण हे चैतन्य स्वतः संतकवी ज्ञानेश्वरांच्या व्यक्तिमत्वातलं आहे. फुलाचा सुगंध हा अखेर ज्या मातीत वेल फुललेली असते त्या मातीचाच तो अपरिहार्य गुणधर्म असतो. 'ज्ञानेश्वरी' सुंदर झाली याचं एकमेव कारण ज्ञानेश्वरांचं मन सुंदर होतं. त्यांचे भाव आणि विचार सुंदर होते. त्यांच्या अंतःकरणातच एक चिरसुंदर विश्व सामावलेलं होतं. जे हृदयात असतं ते काव्यात उमटल्याशिवाय कसं राहील? ज्ञानेश्वरीतली सौंदर्यस्थळं वेचताना आपल्याला हात टेकावे लागतात. शब्द, अर्थचमत्कृती, अलंकार, रसात्मकता, चिंतन-शीलता इत्यादी विविध स्वरूपाची भिन्न भिन्न पातळ्यांवर विहार करणारी सुंदरता जाणवत राहते. आणि ज्ञानेश्वरांचा प्रत्येक श्वास-निःश्वास या ग्रंथात आगळ्या सुवासाची बरसात करतो असा अनुभव येतो.

या लेखात ज्ञानेश्वरीतल्या सौंदर्याची मी चर्चा करणार नाही. केवळ 'पसायदानाचा' विचार करणार आहे. पण अडचण अशी आहे की संपूर्ण 'ज्ञानेश्वरी'चं

सारसर्वस्व पसायदानात सामावलं आहे. त्यामुळं पसायदानाबद्दल बोलताना 'ज्ञानेश्वरी' बद्दल बोलणं क्रमप्राप्त आहे. शिखराच्या सौंदर्याचं अवलोकन करताना मंदिराचा विचार, त्यातल्या देव्हाऱ्याचा आणि मूर्तीचा विचार अपरिहार्य ठरतो. पण या मर्यादित लेखात माझी लेखणी केवळ 'पसायदाना' लाच प्रदक्षिणा घालणार आहे. पसायदान हे उत्कृष्ट भावगीत आहे. ते वाचताना किंवा ऐकताना कवीच्या उचंबळून आलेल्या भावस्थितीचं रुचिर दर्शन होतं. खरं तर पसायदानात ज्ञानेश्वर नावाचा एक नवयुवक आपल्या हृदयातलं एक अतिभव्य, विश्वव्यापक स्वप्न घेऊन आश्वासक वृत्तीनं उभा आहे. या संताच्या आणि कलावंताच्या टपोऱ्या डोळ्यांत आशेच्या ज्योती पेटलेल्या आहेत. त्याच्या वृत्तीतली अभिजात सुजनता आणि रसिकता यांचं मधुर मीलन त्याच्या मुद्रेत प्रतिबिंबित झालेलं दिसतं. 'पसायदान' ही केवळ ज्ञानेश्वरांसारख्या श्रेष्ठ प्रतिभावंताचीच निर्मिती असू शकते. हे 'पसायदान' ज्ञानेश्वरांपासून कधीच पृथक् होऊ शकणार नाही. कारण हे दोघेही परस्परात पूर्णपणे समरसून गेले आहेत. पौर्णिमेनं चंद्राला आलिंगन द्यावं आणि त्याच्यात विलीन व्हावं तसं या भावगीतात ज्ञानेश्वर तद्रूप झाले आहेत. मी जेव्हा जेव्हा हे गीत ऐकतो तेव्हा तेव्हा जणू माझ्या मनाला आणि जाणिवेला ज्ञानेश्वरांच्या वत्सल व्यक्तित्वाचा स्पर्श होतो. जणू हा महाकवी आपल्या मृदुमधुर वाणीनं मला सांगू लागतो,

'जीवनात अंधार आहे, काटेकुटे आहेत, दुष्टपणा आहे म्हणून हताश होऊ नकोस. या जीवनातला अंधार लवकरच धर्मरूपी सूर्याच्या प्रकाशात वितळून जाणार आहे. अरे, अंधाराची काय कथा? एक लहानसा सुविचाराचा किरण त्याला पळवून लावतो. हे जीवन अंतर्बाह्य उज्ज्वल व्हावं यासाठी आपण धडपडलं पाहिजे. दुष्ट प्रवृत्ती आणि अज्ञान यांचा विध्वंस झाल्याशिवाय जग सुंदर होणार नाही. जगाला नवं तारुण्य आणि सौंदर्य देण्यासाठी आपण अखंड धडपड करीत राहिलो तर एक दिवस 'अवघाचि संसार, सुखाचा करीन। आनंदे भरीन, तिन्ही लोक॥' ही माझी प्रतिज्ञा सफल होऊ शकेल. काटे संपून जातील. फुलांचा गंध सारा आसमंत उजळून टाकील. माझ्या या सृष्टीत चंद्रावरं कलंक असणार नाही. आणि सूर्य आगीचा वर्षाव करणार नाही. अमृताचा सागर सर्वत्र हेलावत राहील. 'ईश्वरनिष्ठांची मांदियाळी' उत्पन्न होईल. मला विश्वास वाटतो, मी कधीच निराश होणार नाही. हे जग मला बदलायचं आहे. धार्मिक परिवर्तनाची पहाट उदयाला यावी ही माझी उत्कट इच्छा.'

'पसायदान' हे माझ्या मते मानवतेचं पावन गीत आहे. मानवतावादाचा ध्वज

ज्ञानेश्वरांनी किती उंच फडकावला त्याचीच कथा यात ग्रथित झाली आहे. यातला देव 'विश्वात्मक' आहे. त्याला सांप्रदायिकतेचा किंवा संकीर्णतेचा लेपही लागलेला नाही. हा 'विश्वात्मक देव' नेमका कुठे आहे? तो तर प्रत्येक प्राणिमात्राच्या अंतःकरणात घर करून बसला आहे. त्या घराचा पत्ता अज्ञानी माणसाला लागत नाही. तो वेडा माणूस ते घर सोडून बाकी सर्व ठिकाणी शोध घेत राहतो. ज्ञानेश्वरांचा हा 'देव' साऱ्या विश्वात भरून उरलेला आहे. पाहाण्यासाठी हृदयाचे डोळे मात्र उघडावे लागतील. या 'पसायदानात' तत्त्वज्ञानाचे, भावनेचे आणि कल्पनेचे व शब्दसामर्थ्याचे अथांग सौंदर्य प्रकट झाले आहे. मी विचार करू लागतो. नऊ हजार ओव्यांचे गीताभाष्य लिहिल्यानंतर, आपला 'वाग्यज्ञ' संपल्यावर कृतार्थ झालेले ज्ञानेश्वर देवाकडं कोणतं प्रसाददान मागतात? स्वतःसाठी या कवीनं आणि संतानं काहीच मागितलं नाही काय? संताला त्याचा स्वतःचा स्वार्थ नसतो. कारण तो गळून गेल्यामुळंच त्याचं संतत्व विकसित झालेलं असतं. ज्ञानेश्वर निरासक्त, निरामय आहेत. त्यांच्या मनोभूमीत कोणत्याही स्वार्थी इच्छेचं तण राहिलेलं नाही. ही भूमी शुद्ध स्वच्छ आणि मृदुल बनलेली आहे. असा निर्विकार, निर्मल मनाचा संत देवाला स्वतःसाठी काय मागणार? 'स्व' चं तर विसर्जन झालं. नाना प्रकारच्या आपदा-विपदांनी भरलेल्या या जगातला माणूस सुखी व्हावा, स्नेह संपन्न व्हावा, ईश्वरनिष्ठ व्हावा या पलिकडं ज्ञानेश्वरांना काहीच नको. साऱ्या पृथ्वीचं राज्य मिळालं तरी त्यांना ते मोह घालू शकत नाही. ते म्हणतील, 'अगा, पंढरीच्या राया, मागणे लई नाही.'

न त्वहं कामये राज्यं न सुखं न पुनर्भवम् ।
कामये दुःखतप्तानाम् प्राणिनाम् आर्तिनाशनम् ॥

(मला राज्याची इच्छा नाही. मला सुखाची आणि पुनर्जन्माचीही इच्छा नाही. माझी इतकीच कामना आहे की, दुःखपीडित प्राण्यांची दुःखं नाहीशी करावीत.)

या श्लोकात प्रकट झालेला भावविचार आणि पसायदानातून व्यक्त झालेली भावना एकाच प्रकारची आहेत. साऱ्या विश्वात धर्म प्रकाश, सुखशांती, आकांक्षाची पूर्ती आणि निःस्वार्थ प्रेम यांचा संचार व्हावा असं ज्ञानेश्वरांना हृदयाच्या गाभ्यापासून तीव्रतेनं वाटतं आणि त्यासाठीच ते विश्वाच्या देवाकडं मागणी करीत आहेत, हे माझ्या दृष्टीनं एक मंगल दृश्य आहे. समग्र ज्ञानेश्वरीवर आणि पसायदानावर अहिंसा आणि प्रेम या मूल्यांचा प्रभाव सर्वाधिक पडलेला दिसतो. शत्रुत्व, कपट, सूड आणि

द्वेष, हिंसा व रक्तपात यांचा ज्ञानेश्वर निषेध करतात. 'खळांची व्यंकटी सांडो । तेयां सत्कर्मी रति वाढो' या ओळीतून ज्ञानेश्वरांचं मन स्वच्छपणानं दिसतं. दुष्टांना नाहीसं करणं याचा अर्थ त्यांची हत्या करणं असा ते करीत नाहीत. दुर्जनाच्या ठायी असलेली दुर्बुद्धी निरसून जावी व शुभकर्माविषयी त्यांच्या मनात आवड निर्माण व्हावी हा विचार हृदयपरिवर्तनाचा आहे. माणसाच्या अंतःकरणात परिवर्तन व्हावं, माणूस मुळातच सत्प्रवृत्त व्हावा ही त्यांची तीव्र इच्छा आहे. या आत्यंतिक मंगल भावनेच्या शतावधी धारा पसायदानातून वाहात आहेत. इमर्सन या तत्त्वचिंतकानं काव्याविषयी काढलेल्या उद्‌गारांची इथं मला आठवण होते. तो म्हणतो, **'Only that is poetry which mans and cleanses me.'** 'शुद्ध व समर्थ बनवते तीच खरी कविता' या दृष्टीनं 'पसायदान' ही एक रम्योज्ज्वल कविता आहे, असं म्हणता येतं. कवीच्या सुंदर स्वच्छ अंतःकरणात सामावलेल्या उदात्त स्वप्नांना मिळालेली अभिव्यक्ती म्हणजे कविता असं विधान करता येईल. **'The best and the happiest moments of the happiest and best minds'** अशी काव्याची व्याख्या केलेली आहे. काव्य हेच कवीचं व्यक्तित्व आणि जीवन. ज्ञानेश्वरांच्या मनीमानसी साऱ्या विश्वाविषयीचं प्रेम रुजलेलं असल्यामुळंच ते कवी आणि संत म्हणून अलौकिक ठरले असं मला वाटतं. कोलरिज या कवीचं आणि टीकाकाराचं मत असं आहे. **'No man was ever yet a great poet without being at the same time a profound philosopher'** कवी आणि तत्त्वज्ञ या दोन्ही भूमिका ज्ञानेश्वरांच्या व्यक्तित्वात एकटवल्या आहेत.

ज्ञानेश्वरांच्या प्रतिभासंपन्न वाणीचे नवनवीन उन्मेष पसायदानातही सहजपणे व्यक्त झाले आहेत. वाणीचा सुगंधी मोहोर, शब्दांचा मोरपंखी स्पर्श, कल्पनेतली उत्तुंगता, विचारातली सुसंगती आणि सखोलता, शब्दात असलेली नादमयता आणि चित्रदर्शिता यांचं एक विलक्षण संमेलन पसायदानात झालेलं आहे. केवळ रचनेच्या दृष्टीनं बोलायचं झालं तर शब्द आणि कल्पना यांचं एक अभिनव शिल्प कवीनं उभं केलं आहे. 'ईश्वरनिष्ठांची मांदियाळी' या भूमंडळावर सर्व जीवांना भेटावी आणि त्यांनी त्यांच्यावर मांगल्याचा वर्षाव करावा ही इच्छा व्यक्त करताना त्या 'ईश्वरनिष्ठांना' जी अभिनव विशेषणं ज्ञानेश्वरांनी दिली ती प्रमत्त समर्थ प्रतिभेची द्योतक आहेत. अपूर्ववस्तुनिर्मिती करण्याची प्रज्ञा म्हणजे प्रतिभा. ज्ञानेश्वर जे 'अपूर्व' आहे ते निर्माण करतात.

कल्पतरू ही एक सांकेतिक कल्पना असली तरी 'कल्पतरूंचे उद्यान' ही मात्र नवीन कल्पना वाटते. 'चेतनाचिंतामणीचे गाव' आणि 'अमृताचे चालते बोलते समुद्र' या प्रतिमा ज्ञानेश्वरांच्या वाग्विलासातलं वैभव कसं अनुपम आहे हे दाखवून देतात. आनंदित झालेल्या आपल्या वाचकांच्या मनात ज्ञानेश्वर आणखी काही अभूतपूर्व प्रतिमांची पेरणी करतात. 'अलांछित चंद्रमे' आणि 'तापहीन मार्तंड' ही त्यांची निर्मिती सुंदर, भव्य आणि उदात्त यांचा साक्षात्कार घडवते. सूर्याचा तेजस्वी प्रकाश विश्वात पसरला आहे. पण त्यात तापदायक प्रखरता नाही. शीतलता आणि प्रसन्नता यांची आभरणे लेवून सूर्याचे किरण जमिनीवर उतरले आहेत ही अनुभूती खरोखरच अनन्यसाधारण आहे. चंद्राच्या धवलसुंदर रूपात कुठेही कसलाही कलंक दिसत नाही. आणि त्यांच्या किरणांनी सारं विश्व शुभ्र, शामक, शांत व तृप्त प्रकाशात न्हाऊन निघालं आहे. या कल्पनेतलं नावीन्य कल्पनेच्या पलीकडचं आहे. एका अर्थानं 'पसायदान' ही ज्ञानेश्वरांच्या काव्यसौंदर्याची पौर्णिमा आहे.

'पसायदान' हे उच्च व उन्नत भावसौंदर्याचे गगनचुंबी शिखर आहे असं मी म्हणतो. पर्वताच्या माथ्यावर गेल्यानंतर सर्वत्र निळ्याभोर आकाशाचं दर्शन घडतं. कोणताही 'पार्थिव' क्षुद्र विचार मनात उरत नाही. मन निखळ बनतं. वैर, द्वेष, मत्सर गळून जातात. पसायदानाच्या चिंतनानं उदात्ताच्या पातळीवर आपण जाऊ शकतो. वासनेची आणि स्वार्थाची अंधारी रात्र विरळ होत जाऊन प्रसन्नतेचा कोवळा किरण मनाला उजळू लागतो. एक नवी पहाट उमलते. हा अनुभव खरोखरच प्रत्येकाच्या अंतःकरणात अंकुरतो. ही भावप्रतीती देण्याची क्षमता असलेले पसायदान कसे आहे हे ज्ञानेश्वरांच्याच शब्दात सांगतो,

सकळ धर्मांचे माहेर। सज्जनांचे जिव्हार।
लावण्यरत्नभांडार। शारदेचे ॥

आता ज्ञानेश्वरांच्या शब्दांना माझ्या पामर शब्दांनी वंदन करतो. 'पसायदान' म्हणजे एका परम संताच्या कारुणिक वृत्तीचा सुवासिक आविष्कार. 'पसायदान' ही ज्ञानेश्वरांच्या प्रतिभासागरावर उचंबळून आलेली सौंदर्याची व सुजनतेची प्रचंड लाट आहे. ज्ञानेश्वर 'माऊली' च्या वात्सल्याचं हे दर्शन आहे. मानवी संस्कृतीतील हे सारतत्त्व आहे. यापेक्षा अधिक काय सांगायचं?

○○○

# धम्मपद : भ. बुद्धाची भावमूर्ती

मानवी संस्कृतीला आकार देणाऱ्या प्रतिभावंतांत भ. गौतम बुद्धाचं स्थान महत्त्वपूर्ण आहे. बुद्ध म्हणजे ज्ञान आणि करुणा यांचा संगम. शांती आणि प्रसन्नता यांचं मीलन. बुद्धांचं व्यक्तित्व मनाला आनंदविणारं आहे. या महापुरुषाची कुठलीही मूर्ती पहावी. त्या मूर्तीच्या मुद्रेवरचा प्रसादपूर्ण भाव आपल्या चित्तातली आकुलता शांत करीत जातो. बुद्ध मूर्तीकडं पाहिलं की मनातले द्वेषमत्सराचे वारे विरून जाऊ लागतात. वासना बोथट होतात. अनेक वर्षांच्या तपस्येनं आणि चिंतनानं जी ज्ञानयुक्त शांती बुद्धांनी मिळवली ती त्यांच्या मुखमंडलावर प्रकट झाली आहे. बुद्ध आणि महावीर हे दोघेही अहिंसेचे उत्कट पुरस्कर्ते आणि प्रसारक. योगायोग असा की अडीच हजार वर्षांपूर्वी दोघेही बिहारच्या भूमीत उदयाला आले. त्यावेळी त्या प्रदेशाला 'बिहार' हे नाव नव्हतं. या दोन महात्म्यांनी त्या भूमीवर सर्वत्र विहार केला. अहिंसा विचाराचा प्रसार केला. त्यांच्या विहारामुळं त्या प्रदेशाला 'विहार' हे सार्थ नाव पडलं. आश्चर्य असं की, अहिंसा आणि करुणा यांचे महावृक्ष ज्या भूमीत विकास पावले त्या भूमीत आज मात्र हिंसेचे वणवे पेटलेले दिसतात. एकेकाळची ही विचारसमृद्ध भूमी आज असत्य, लाचलुचपत, चोऱ्या आणि अनेक अनैतिक कृत्ये यांनी उखडून निघालेली आहे. खरं तर एक बुद्ध किंवा एक महावीर आम्हाला पुरत नाही. त्यांच्या केवळ मूर्तिपूजेत धन्यता मानणारा माणूस-रानटी माणूस आज देशात ठायी ठायी दिसत आहे. भारत ही बुद्धाची जन्मभूमी, कर्मभूमी आणि धर्मभूमी. आज मात्र तिला निर्बुद्धांनी आणि भ्याडांनी अवकळा आणली आहे. बुद्धाला विसरणं भारतालाच काय पण साऱ्या जगाला परवडणारं नाही. 'बुद्धं सरणं गच्छामि' ही भूमिका सुखी जीवनासाठी घ्यावीच लागेल.

भ. बुद्धांची मानवतावादी विचारधारा विशद करणारे अनेक ग्रंथ अभ्यासकांनी लिहिले आहेत. नैतिकतेच्या व धार्मिकतेच्या क्षेत्रांत जेव्हा अराजक निर्माण झालं तेव्हा धर्मनीतीची ज्योत नव्यानं पेटवण्याचं ऐतिहासिक कार्य त्यांनी केलं. भारतात

उदयाला आलेला बुद्धधर्म जगात अनेक ठिकाणी पसरत गेला. याचं श्रेय गौतमबुद्धांच्या विचारधारेत आणि प्रसार यंत्रणेत आहे. भारतातच बौद्धधर्म क्षीण झाला होता. त्याला पुन्हा गतिमान करण्याचं कार्य डॉ. आंबेडकरांनी केलं. आपल्या लक्षावधी अनुयायांसह १९५६ साली त्यांनी या धर्माचा स्वीकार करून अस्पृश्यतेच्या मजबूत भिंती पाडून टाकल्या आणि बुद्धांच्या समतावादी विचारांचा बाहू उभारून जयघोष केला. देशाच्या सामाजिक व धार्मिक इतिहासातली ही क्रांतिकारक घटना आहे. बुद्ध धर्माचा डॉ. आंबेडकरांनी चिकित्सक अभ्यास केला. जन्मभर विषमतेच्या वातावरणात अस्वस्थ मनानं राहिलेल्या आंबेडकरांना बुद्धाचं व्यक्तित्व आणि त्याची विचारधारा सर्वार्थानं स्पृहणीय वाटली. बुद्ध विचाराला डावलणं वैदिकांनाही शक्य नव्हतं. म्हणून त्यांनी बुद्धाला परमेश्वरी अवतार मानून त्याचा स्वीकार केला. गौतम बुद्धांचे विचार अनेक ग्रंथांतून विखुरलेले आहेत. 'धम्मपद' हा त्यातला एक महत्त्वपूर्ण ग्रंथ मानला जातो.

गौतम बुद्धांची बोलण्याची शैली दृष्टांतपूर्ण, सारगर्भ आणि संक्षिप्त असायची. त्यांच्या एकेका विधानात जीवनाचं तत्त्वज्ञान भरलेलं असतं. आपल्या अपत्याच्या मृत्यूनं दुःखात बुडून गेलेल्या किसागौतमी नावाच्या स्त्रीला भानावर आणण्याचं काम त्यांनी सहजपणानं केलं. ती स्त्री आक्रंदन करीत बुद्धाला म्हणाली,

'भगवान, माझ्या मुलाला तुम्ही जिवंत करा. तुम्हीच त्याला जीवन देऊ शकाल'. बुद्धांनी सांगितलं, 'ज्या घरात आजपर्यंत कुणाचा मृत्यू झाला नाही त्या घरातून मला थोड्याशा मोहऱ्या आणून दे. मी मुलाला जिवंत करतो.' किसा गौतमी दिवसभर अशा घराचा शोध घेत फिरली. हळूहळू तिचा दुःखभ्रम दूर झाला. बुद्धांच्या चरणांवर मस्तक ठेवून तिनं दीक्षा घेतली. बाण लागून घायाळ झालेल्या एका पक्ष्याचे प्राण गौतमबुद्धानं वाचवले. बाण मारणारा शिकारी त्या पक्ष्यावर आपला अधिकार सांगू लागला तेव्हा त्यांनी उत्तर दिलं, 'जीव घेणाऱ्यापेक्षा वाचवणाऱ्याचा अधिकार अधिक महत्त्वाचा असतो.' आपल्या हृदयाशी प्रेमानं धरलेल्या त्या पक्ष्याच्या जखमी शरीरावरून हलुवार हात फिरवून त्यांनी पुढं म्हटलं, 'ओरबाडणारा स्पर्श आणि कुरवाळणारा स्पर्श पक्षीही ओळखतात. तू प्राण घेणारा हिंसक आहेस. तुझ्याकडं तो पक्षी कधीच येणार नाही.'

गौतम बुद्ध हे दयेचं, प्रेमाचं आणि परम उदार धर्मभावनेचं प्रतीक आहे. ज्ञानाची साधना करणारे पुष्कळ ज्ञानवंत असतात. पण बुद्धांच्या ज्ञानाला प्रेमभावनेची

विशाल बैठक होती. त्यामुळं त्यांच्या व्यक्तित्वाला उदात्त सौंदर्य लाभलेलं आहे. 'धम्मपद' या ग्रंथात व्यक्त झालेल्या विचारातून ज्ञान आणि करुणा यांचा स्वामी असलेला भगवान बुद्ध जाणवत राहतो आणि 'धम्मपद' हा ग्रंथ आपल्याही जीवनावर परिणाम करतो. 'उत्तराध्ययनसूत्रात' भ. महावीरांचं आणि 'धम्मपदात' भ. बुद्धांचं मंगल ज्ञानसंपन्न व करुणामय व्यक्तिमत्व दिसतं. कोणतेही धर्मग्रंथ जेव्हा जात आणि संप्रदाय आणि नाना प्रकारचे भेद यांच्या कृत्रिम कुंपणांना ओलांडून समता व स्वातंत्र्याच्या आकाशात झेप घेतात तेव्हा ते ग्रंथ विशिष्ट धर्माचे न राहाता मानव-धर्माचंच प्रतिपादन करतात. 'धम्मपद' हा म्हणूनच मानवधर्माचा आधारभूत ग्रंथ आहे, असं म्हणता येईल. यातलं विचारसौंदर्य निखळ आहे. आयुष्यावर परिणाम करणाऱ्या श्रेष्ठ साहित्यकृतींत 'गीता', 'धम्मपद' 'उत्तराध्ययनसूत्र', 'समयसार', 'बसवेश्वरांची वचने', 'ज्ञानेश्वरी' आणि तुकारामांची गाथा यांचा उल्लेख अटळ आहे. शब्दांचं सौंदर्य कल्पनांच्या भराऱ्या, अर्थालंकारांचं वैभव या घटकांमुळं साहित्याला रसाळपणा प्राप्त होतो यात शंका नाही. पण साहित्यकृती एखाद्या सजीव तरुण लावण्यवतीसारखी असावी. तिचे वस्त्रालांकार तिच्या लावण्यात भर टाकतील हे खरं! पण ती आरोग्यसंपन्न नसेल, एखाद्या रोगामुळं निस्तेज दिसत असेल तर कितीही उंची वस्त्रालंकार तिला खरं सौंदर्य देऊ शकत नाहीत. साहित्याचा प्राण त्याच्या समर्थ आशयात असतो. अभिव्यक्ती हा काही झालं तरी गौण घटक आहे. कित्येक पुस्तकं बाह्य घटकांनी परिपूर्ण असतात. पण त्यातून जीवनाचं सत्यस्वरूप प्रकट होत नाही. काही वेळ हलकं-फुलकं रंजन करण्यासाठी या प्रकारचं साहित्य उपयोगी पडतं. वर उल्लेखिलेले ग्रंथ अनेक शतकांपासून उच्च प्रतीचा आनंद देत आहेत. महान ज्ञानी तत्त्वचिंतकांच्या अनुभवांचा त्यात आविष्कार झालेला आहे. ज्यांचा प्रकाश कधी ओसरत नाही असे हे दीपस्तंभ आहेत.

'धम्मपदा'तील काही विचारसुंदर स्थळांचा मागोवा घेणं आणि त्यातून भ. बुद्धांच्या व्यक्तित्वाचा वेध घेणं हा या लेखाचा हेतू आहे. 'आत्मविजय' नावाच्या प्रकरणात म्हटलं आहे,

> यो सहस्सं सहस्सेन संगामे मानुसे जिने
> एकं च जेय्यमत्तानं स वे सङ्गमजुत्तमो
> अत्ता ह वे जितं सेय्यो या चायं इतरा पजा
> अत्तदन्तस्स पोसस्स निच्चं संयतचारिनो

सहस्रावधी माणसांना जो युद्धात जिंकतो त्यापेक्षा जो स्वतःला जिंकतो तो उत्तम संग्रामाविजयी असतो. इतरांना जिंकण्यापेक्षा आत्मजय श्रेष्ठ आहे. जो संयमी आहे, आत्मदमन करू शकतो तो आत्मविजयी होतो.

रणांगणात शत्रुसैनिकांना ठार करून विजय मिळवणाऱ्या योध्याला सन्मानपत्र दिलं जातं, त्याचा महावीर, परमवीर म्हणून गौरव केला जातो. हे विजय कमी महत्त्वाचे आहेत असं नव्हे. राष्ट्रसंरक्षणासाठी किंवा अन्याय नष्ट करण्यासाठी शस्त्रांची कास धरणं हे वीराचं कर्तव्यच असतं. पण प्रत्येकांच्याच मनात एक रणांगण असतं. नाना प्रकारच्या वासनाविकारांनी मनुष्य दुबळा होत असतो. अशा वेळी आपल्यातल्या दुष्ट शक्तींच्या विरुद्ध लढा करणं अत्यंत कठीण असतं. बहुतेक जण वासनेच्या प्रवाहाबरोबर वाहवत जातात. कोणत्या तरी खडकावर आपटून त्यांचा कपाळमोक्ष होतो. म्हणूनच स्वतःला जिंकण्याचं आवाहन भ. बुद्धांनी केलं. स्वतः बुद्धांनी दीर्घ तपस्या करून आपल्यातील विकार जिंकले होते. त्यामुळेच ते अर्हतपदाला पोचले. भ. महावीरांना 'जिन' अशी संज्ञा आहे. या शब्दाचा अर्थ विजेता, जिंकणारा असाच आहे. सर्वच साधुसंतांनी स्वतःच्या ठायी असलेल्या विकारशक्तीला सयंमानं तपश्चर्येनं जिंकण्याचा अखंड प्रयत्न केला. तुकारामांनी ''रात्रंदिन आम्हां युद्धाचा प्रसंग। अंतर्बाह्य जग आणि मन।' असं म्हणून आपल्या अंतरंगातला तीव्र संघर्ष स्पष्ट केला. सोनं शुद्ध करण्यासाठी त्याला अग्निपरीक्षा द्यावी लागते. बहुसंख्य माणसं या परीक्षेला बसतच नाहीत. काही परीक्षागृहापर्यंत जातात आणि परत येतात, फार थोड्या व्यक्ती यशस्वी होतात. भ. बुद्धानं मार-विजय मिळवला. हे त्याच्या जीवनातलं विलक्षण उज्ज्वल पर्व आहे. असंख्य मोहांच्या, वासनाविकारांच्या चक्रव्यूहात मनुष्य सापडलेला असतो. काम, क्रोध, माया, लोभ, द्वेष, मत्सर यांच्या पोलादी भिंती तोडून स्वतःची मुक्तता करून घेणं त्याला शक्य नसतं. पांडित्यानं हे पाश तुटत नाहीत. संयमाची मजबूत मूठ विकारांना हतबल करते. म्हणूनच आत्मविजयाचं माहात्म्य बुद्धांनी सांगितलं. ते म्हणतात, 'उत्तम रीतीनं बांधलेल्या आणि शाकारलेल्या घरात ज्याप्रमाणं पाऊस शिरत नाही, त्याप्रमाणं संयम असलेल्या चित्तात विषयासक्ती शिरू शकत नाही.'

भ. बुद्धाचं हे प्रतिपादन खरं तर सर्व काळात सर्व परिस्थितीत, सर्वांसाठी मार्गदर्शक आहे. बुद्धकाळात माणूस जेवढा व्यसनी आणि अधःपतित असेल त्यापेक्षा सहस्रपटीनं तो आज पतित झालेला दिसतो. विचार आणि आचार दोन्हीही अशुद्ध

व अपवित्र बनलेले दिसतात. भोगवादाची एक महाप्रचंड हिंस्र लाट माणसाला गिळण्यासाठी जगावर आली आहे. कोणतंहीभौतिकशास्त्रत्याचं संरक्षण करू शकणार नाही. कारण या लाटेबरोबर आपण स्वैरपणानं वाहवत गेलं पाहिजे असा वेडा उन्माद माणसांच्या डोक्यात झंझावाती वेगानं लहरत आहे. बुद्ध आणि महावीर ही नावं देखील विस्मरणाच्या अंधारात नाहीशी होतात की काय याची भीती वाटावी अशीच परिस्थिती आहे. सत् आणि असत् यांचा विवेक भोगाच्या विराट वादळात केव्हाच नाहीसा झाला. माणसाच्या रक्ताच्या प्रत्येक थेंबात भरून राहिलेला वासनेचा क्षोभ त्याला विनाशाकडं घेऊन जात असताना बुद्धाचा हा विचार खरं तर त्याला सोबत करू शकेल. त्याला संरक्षण देऊ शकेल.

'धम्मपदात' विचारांचं अमूप भांडार आहे. भ. बुद्धानं वेळोवेळी केलेल्या प्रवचनांतून, संभाषणातून व्यक्त झालेले हे मौलिक विचार पंचवीस शतकांनंतरही आपल्या सामर्थ्यावर ठामपणानं उभे आहेत. ज्ञान प्राप्त झालं म्हणजे मनुष्य सुखी होतो या कल्पनेतला विरोध करून बुद्ध म्हणतात,

बहुं पि चे सहितं भासमानो
न तक्करो होति नरो पमत्तो
गोपो व गावो गणयं परेसं
न भागवा सामञ्ञस्स होति

अनेक ग्रंथसंहिता वाचत असला किंवा बोलत असला तरी जो प्रमत्त माणूस प्रत्यक्ष आचरण करीत नाही तो दुसऱ्यांच्या गायी मोजणाऱ्या गुराख्याप्रमाणं असतो. पुढं त्यांनी म्हटलं आहे, सुंदर रंगाचं फूल सुगंध नसेल तर ज्याप्रमाणं निरुपयोगी आहे त्याप्रमाणं आचरण न करणाऱ्याचे सुभाषितही निष्फळ असतं. केवळ पांडित्याला अर्थ नाही. प्रत्यक्ष जीवनात जर पांडित्याचा गंध आचरणाच्या रूपानं उतरला नाही तर त्या निष्फळ विद्वत्तेला काहीच मोल नाही. समतेचा आणि अहिंसेचा उपदेश करणारे पंडित व्यवहारात मात्र विषमतेचीच पूजा करीत असतील, किंवा हिंसाचार करीत असतील तर त्यांच्यां वांझ उपदेशाला कोण विचारणार? पुस्तकी पांडित्य आणि प्रत्यक्ष सदाचरण यात जमीन अस्मानाचं अंतर आहे. फुलाला रंग नसला तरी चालेल पण त्याला गंध मात्र असलाच पाहिजे. हे जगात दुर्मिळ असतं, म्हणून तर 'बोल तैसा चाले । त्याची वंदावी पाऊले' असं संतांना म्हणावं लागलं. भ. बुद्ध

यांच्या विचारात, आचारात आणि उच्चारात अंतर्बाह्य सुसंगती होती. ते जेव्हा,

अक्कोधेन जिने कोधं असाधुं साधुना जिने।
जिने कदरियं दानेन सच्चेन अलीकवादिनं॥

अक्रोधानं क्रोध जिंकावा, साधुतेनं दुष्टत्वाला जिंकावं, कृपणतेला दानानं जिंकावं आणि असत्याला सत्यानं जिंकावं. असं म्हणतात तेव्हा बुद्धांचं प्रत्यक्ष जीवन हेच होतं याची जाणीव होते. कोणी त्यांची निंदा केली, अपशब्दांचा त्यांच्यावर वर्षाव केला तरी त्यांच्या मुद्रेवरची प्रसन्नतेची रेषा कधी ढळली नाही. क्रोधाला अक्रोधानंच त्यांनी जिंकलं, निंदा-नालस्तीला प्रत्युत्तर केलं नाही. परिणाम इतकाच झाला की ज्यानं निंदा केली त्याला अखेर लज्जित व्हावं लागलं. भडकलेल्या अग्नीत आणखी इंधन टाकण्याचं कार्य आपण सामान्य माणसं करतो. शिवीला शिवी दिली तर शिव्यांचीच निपज होते. पण अपशब्दांना उत्तरच दिलं नाही तर ती ठिणगी विझून जाते. बुद्धांनी हा मार्ग स्वीकारलेला होता. त्यांच्यावर शिव्यांचा वर्षाव करणारे त्यांचे विरोधक पुढे त्यांचेच शिष्य बनले, अशा कथा बुद्धचरित्रात आढळतात. सर्वांवर समदृष्टीनं प्रेम करणं हा महात्म्यांचा सहजधर्म असतो. वरच्या श्लोकात जे सांगितलं ते परमसत्य नव्हे काय? आजच्या जगाच्या चित्रात ठिकठिकाणी भीषण हिंसेचं तांडव चालू असलेलं दिसतं. जगाच्या इतिहासात आजपर्यंत कधी निर्माण झाली नव्हती इतकी भयानक संहार करणारी शस्त्रास्त्रं सध्या प्रत्येक राष्ट्राजवळ आहेत. बुद्ध आणि खिस्त या अहिंसा सम्राटांची पूजा करणाऱ्या राष्ट्रांतच अण्वस्त्रं, क्षेपणास्त्रं तयार होत आहेत. ओठात बुद्ध आणि पोटात युद्ध असा सारा दांभिकतेचा घृणास्पद व्यवहार. 'अक्कोधेन जिने कोधं' याच्या नेमका उलट प्रकार इथं दिसतो.

'धम्मपदातलं' प्रत्येक प्रकरण, त्यातला प्रत्येक श्लोक विचारांच्या दृष्टीनं अत्यंत सुस्पष्ट आणि स्वच्छ आहे. बुद्धजीवन आणि व्यक्तिमत्व असंच सोज्ज्वल व निरामय होतं. एकदा कुणीतरी भ. बुद्धाला विचारलं.

'भदंत, रात्री तुम्हाला शांत झोप लागते का? तुम्ही वाळलेल्या पानांवर झोपता, रात्री थंडी कडक असते.'

बुद्धांनी उत्तर दिलं.

'समज, झोपायला मृदुमृदुल शय्या आहे. थंडीपासून रक्षण व्हावं म्हणून उबदार पांघरूण आहे. पण मनात अनेक विवंचना आणि वासना उफाळत आहेत

अशा अवस्थेत झोप लागेल का? ती शय्या आणि उबदार वस्त्रं निरुपयोगी आहेत. माझं मन स्थिर असतं. शांत आणि प्रमुदित असतं. मला कुणाचा द्वेष वाटत नाही. कोणताही लोभ किंवा मोह माझ्यावर स्वार होऊ शकत नाही. वाळलेल्या पानांवरही मी गाढ झोपी जातो. मनाच्या शांतीवर झोपेचं सुख अवलंबून आहे.' बुद्धांचे हे उद्‌गार प्रत्येकानं मनन करावेत असे आहेत. नाना विकारांची जळमटं ज्यांच्या मनात साचलेली आहेत त्यांना सुखाची झोप कशी मिळणार? मद्याचे घोट पिऊन आलेली ग्लानी किंवा झोपेच्या गोळ्या खाऊन आलेली मरगळ म्हणजे झोप नव्हे. विज्ञानानं शास्त्रांचा विकास केला पण विज्ञान बुद्धासारखं शांत आणि प्रसन्न मन मात्र घडवू शकत नाही. 'धम्मपदातला' आणखी एक श्लोक-

नत्थि रागसमो अग्नि नत्थि दोससमो गहो ।
नत्थि मोहसमं जालं नत्थि तण्हासमा नदी ॥

आसक्तीसारखा अग्नी नाही, द्वेषासारखी सुसर नाही. मोहासारखे जाळे नाही आणि तृष्णेसारखी नदी नाही. एकेक विधान संक्षिप्त पण अर्थपूर्ण आहे. आणि म्हणूनच ते मनावर ठसठशीत परिणाम करतं. या वचनांचा ज्याच्यावर परिणाम होणार नाही असा कोणी करंट्या वृत्तीचा माणूस असेल काय? पण अशी माणसं बहुसंख्य असतात. कृष्णवचन ऐकून संजयावर परिणाम झाला पण धृतराष्ट्राच्या मुद्रेवरची सुरकुतीसुद्धा हलली नाही त्याला काय करायचं?

तृष्णेसारखी भयानक नदी नाही हा विचार बुद्धाप्रमाणं साऱ्याच धर्मपुरुषांनी विवरून सांगितला आहे. आपल्या तृष्णेवर विजय मिळवणं अतिकठीण आहे. म्हणूनच सतत आत्मपरीक्षण करणं आवश्यक आहे असं त्याचं प्रतिपादन आहे. 'धम्मपदात' ज्या अनेक विषयांचं विवरण केलं त्यात निर्वैरता, शील, आत्मदमन, नीती, पंडितलक्षण इत्यादींचा समावेश आहे. सर्व मृत्युवश आहे हा विचारही स्पष्ट मांडला आहे. देहाचं नश्वरपण सांगताना म्हटलं आहे,

'तू पिकल्या पानाप्रमाणे झाला आहेस. यमदूत तुझ्याजवळ उभे आहेत. यमपुरीला जाण्यासाठी तुला निघावं लागेल आणि तुझ्याजवळ तर काहीही शिदोरी नाही. म्हणून तू स्वतःला द्वीप बनव. ज्ञानी हो, सारा चित्तमळ धुवून टाक' या विचारात निराशावाद नाही. मरण येणार म्हणून दुःख नाही. उत्तम विचारांची शिदोरी बांधून घेतली तर अज्ञाताचा प्रवास सुखाचा होईल असं आश्वासन आहे. आपला शेवटचा

दीस गोड करायचा असेल तर प्रत्येक क्षण सुंदर आणि शिव या मूल्यांच्या सुगंधानं दरवळू द्यावा ही कल्पना इथं विशद केली आहे.

'धम्मपदाचं' चिंतन करताना बुद्धाचं चरित्र आणि चारित्र्य, त्यांचं सारं व्यक्तिमत्व दृष्टीसमोर येतं. बहुजन हिताय, बहुजन सुखाय अखेरपर्यंत धडपडणाऱ्या या महात्म्यानं सांगितलं होतं.

'मी शेतकरी आहे. श्रद्धेची बीजं पेरतो. त्यावर प्रयत्नांची वृष्टी करतो. प्रज्ञा हा माझा नांगर. सत्याची कास धरून मी खुरपणी करतो. उत्साह हे माझे बैल आहेत.' बुद्धाची ही नैतिक आणि धार्मिक शेती मानवतेला संपन्न करणारी आहे. या महात्म्याच्या विचारांचं आणि व्यक्तित्वाचं 'धम्मपदात' पडलेलं प्रतिबिंब मनःपूर्वक पाहाताना मनाला सुखाचा परिमळ लाभतो. हा गंध अखंड दरवळत राहातो.

○○○

# संतांचा जीवनवाद

मराठीतले संतसाहित्य वैशिष्ट्यसंपन्न आहे. या साहित्याची रचना करणारे संतकवी सदैव लोकसंपर्कात राहिलेले होते. लोकांच्या सुखदुःखाकडे पाठ फिरवून आपल्या अभ्यासिकेत बसून त्यांनी साहित्यनिर्मिती केली नाही. त्यांचे काव्य म्हणजे खऱ्या अर्थाने 'लोकसंवाद' होता. ते केवळ आत्मसंवादात, आत्मचिंतनात गुंतून पडले असते तर लोकसमुदायाचे हृदय हलविण्याची शक्ती त्यांच्या लेखनात आली असती काय? संतांनी केवळ देवभक्तीचे, निवृत्तीचे आणि वैराग्याचे तुणतुणे वाजवले असा एक आक्षेप अनेक वर्षांपासून घेण्यात येतो. प्रपंचतल्या आपत्तींशी दोन हात करण्याची कुवत नसणाऱ्या या साधुसंतांना पुरुषार्थी विचार सुचलाच नाही. 'विठ्ठल विठ्ठल' करीत टाळ कुटणाऱ्या या मंडळींनी निष्क्रियता आणि पराभूत वृत्ती या पलीकडे समाजाला काही दिले नाही. आक्रमकांनी या देववादी आणि दैववादी बनलेल्या लोकांना सहज गुलाम केले आणि तरीही 'ठेविले अनंते तैसेचि रहावे, चित्ती असू द्यावे समाधान' असला भित्रेपणाचा पलायनवादी विचार संतकाव्यात पुन्हा पुन्हा येत राहिला. एखाद्या भव्य आदर्शाकडे या समाजाला घेऊन जाण्याचे स्वप्न संत पाहू शकले नाहीत. दुःखवाद आणि निराशावाद हाच संत साहित्यातला मध्यवर्ती विचार आहे, अशा आशयाची तीव्र स्वरूपाची टीका अनेक वेळा संत वाङ्मयावर होत असते. पण ही टीका पचवून आजही हे साहित्य आपल्या संस्कृतीचा एक आधार होऊन बसले आहे हे नाकारता येणार नाही.

संतवाणीचे पाणी मिळाले म्हणून तर आमच्या मराठी वाङ्मयाची बाग बहराला आली. या विधानात माझ्या मते अतिशयोक्ती नाही. विज्ञानपूर्व काळात आकाराला आलेले हे वाङ्मय आजच्या शास्त्रसंपन्न जगातही मनाला प्रसन्न करते. काळ आणि परिस्थिती यांच्या ओघात या साहित्यातला जो भाबडेपणाचा, अशास्त्रीयतेचा विचार असेल तो वाहून गेला; तसा तो जायलाच हवा. त्या भागाचे केवळ भाविकतेने कोणी समर्थन करीत असेल तर ते संयुक्तिक नाही. कवी हा जीवनाचा भाष्यकार

असतो. आपल्या काळातील लोकजीवन तो पाहातो, अनुभवतो आणि त्यावर तो आपली प्रतिक्रिया साहित्यातून नोंदवतो. याच अर्थाने संतकवींनीही समाजजीवनाचा वेध आपल्या काव्यातून घेतलेला आहे. कवी कितीही प्रतिभावंत असला, विचारवंत असला तरी त्याच्या काव्याला तत्कालीन विचारसरणीच्या मर्यादा अपरिहार्यपणे पडतात, मध्ययुगीन वातावरणात ज्ञान आणि विज्ञान यांची आजच्या इतकी वाढ झालेली नव्हती. ते श्रद्धेचे आणि भक्तीचे युग होते. अनेक प्रकारच्या अंधश्रद्धाही त्या काळात रुजलेल्या होत्या. या प्रकारचे काही संदर्भ संतकाव्यात मधूनमधून प्रकट होतात. ते आज अमान्य करण्याचे काहीच कारण नाही. सनातन जातिव्यवस्था, वर्णाश्रमधर्म इत्यादी गोष्टींचे समर्थनपर उल्लेखही संतकाव्यात कोठे कोठे सापडतात. हा सारा भाग आता कालबाह्य झालेला वाटतो. संतांच्या साहित्याची आणि कार्याची थोरवी या गतार्थ झालेल्या भागात तेव्हाही नव्हती आणि आजही नाही. संत साहित्याची वस्तुनिष्ठ दृष्टीने चिकित्सा करताना असे आढळतेकी, संतांना संन्यासधर्माची महती गायची नव्हती. त्यांनी अष्टौप्रहर अर्थहीन कर्मकांडात गुंतून पडलेल्या आणि आपल्या दैनंदिन कर्तव्यापासून विन्मुख झालेल्या कर्मठ लोकांवर टीका केली आहे. कर्तव्यपरायण, ईश्वरनिष्ठ, सर्वांविषयी सद्भाव ठेवणारा एक 'आदर्श माणूस' निर्माण व्हावा, समाजमन नैतिक मूल्यांचा आदर करणारेअसावे, जगातले हिंसेच, अत्याचाराचे, स्वार्थाचे वणवे विझून जावेत ही संत साहित्यात व्यक्त झालेली उत्कट इच्छा आहे. असे आदर्श जीवन निर्माण करण्यासाठी संतांनी आपली प्रेमशक्ती पणाला लावली. कर्मयोगातला आनंद त्यांनी विवरून सांगितला. संत सावता माळी आपल्या एका अभंगात म्हणतात-

> कांदा, मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी ॥
> लसूण, मिरची कोथिंबिरी । अवघा झाला माझा हरी ॥
> मोट नाडा विहीर दोरी । अवघी व्यापिली पंढरी ॥
> सावता म्हणे केला मळा । विठ्ठल पाया गोविला गळा ॥

आपल्या मळ्यातच विठ्ठलाचे वास्तव्य आहे, आपल्या कर्तव्यातच परमेश्वर सामावलेला आहे. त्याच्या दर्शनासाठी पंढरीला जाण्याचे कारण नाही. आपण आपल्या कर्तव्यकर्मात सर्वस्व ओतावे हा भावार्थ या संताने सांगितला. आश्चर्याची गोष्ट अशी की सावतामाळी हे पंडित नव्हते. शास्त्रांचे अध्ययन त्यांनी केले नव्हते.

पण कर्तव्याची पूजा हीच ईश्वराची खरी भक्ती हा विचार त्यांच्या अंतःकरणात रुजलेला आहे. कर्तव्य सोडून तीर्थयात्रा करण्यात किंवा केवळ टाळ कुटण्यात स्वारस्य नाही; तो परमेश्वर आपल्या जीवनातच आहे. आपल्या कर्तव्यातूनच त्याचे भजनपूजन होऊ शकते हा जीवनवादी विचार आपल्या जीवनाचा मळा फुलवणाऱ्या एका संताने सांगितला.

सावता माळी, गोरा कुंभार, चोखामेळा, सेना न्हावी, कान्होपात्रा, जनाबाई ही संतांची मालिका तेराव्या चौदाव्या शतकात निर्माण झाली आहे. ज्ञानेश्वर एकनाथांसारखे उच्चवर्णीय, विद्यासंपन्न संत संत मालिकेत फार थोडे आहेत. खालच्या समजल्या जाणाऱ्या जाती-जमातीतून हे कवी आणि उपदेशक अधिक निर्माण झाले. याचा अर्थ संतांची चळवळ आणि त्यांचा वारकरी पंथ सामान्य माणसाच्या क्रियाशक्तीला, मन:शक्तीला चालना देत होता. हा मूठभर उच्च वर्णियांचा पंथ नव्हता. ब्राह्मण्याचे देव्हारे माजवून ब्राह्मणाला भूदेव मानणारा हा संप्रदाय मुळीच नव्हता. चोखामेळ्यासारखा एक महान भक्त आणि कवी आपल्या दुःखाचा, आपल्या मानसिक कोंडमाऱ्याचा अर्थपूर्ण आविष्कार करतो आणि उच्चनीचपणाच्या कल्पनेवर आघात करतो हा त्या काळातला प्रगतिवादी विचार नव्हे काय? पढीक पांडित्याला अर्थ नाही, आंतरिक निष्ठेला ईश्वराच्या दरबारात महत्त्व आहे, असेच या संतांनी सिद्ध केले. तुकोबांच्या काळातही एकापेक्षा एक विद्वान बौद्धिक प्रदर्शन करीत होते. तुकोबांवर निंदेचा चिखल उडवीत होते. पण 'भेदाभेदभ्रम अमंगळ' अशी घोषणा करून त्यांनी समतेचा आणि ममतेचा संदेश दिला. रामेश्वर भट्टासारखा कर्मठ पंडित अखेर तुकोबांचे शिष्यत्व स्वीकारतो ही समाजमनात झालेली एक प्रकारची क्रांतीच म्हणावी लागेल. समाज केवळ पांडित्यामुळे मोठा होत नाही. त्याला माणुसकीचा आधार नसेल तर तो असंस्कृतच राहणार. प्रेम, करुणा, माणुसकी आणि नैतिकता यांच्या पायावर समाजाची उभारणी व्हावी ही संतांची भूमिका कोणत्याही काळात आपल्याला स्वीकारावीच लागेल. कारण ही मूल्ये क्षीण झाली तर माणसाचं जीवनच उद्ध्वस्त होऊ शकतं याचा अनुभव आज आपण घेत आहोत. ज्ञानाची प्रगती होत असताना हृदयातली प्रेमभावना जर आटत चालली तर हिंसा आणि अत्याचार यांच्या दबावाखाली माणूस सदैव दुःखीच राहील, संत कबीर यांनी म्हटले आहे-

पोथी पढि पढि जग मुआ पंडित भया न कोय
ढाई आछर प्रेम का पढे सो पंडित होय

ज्ञानवंतांची ही कबीरप्रणीत व्याख्या खरोखरच महत्त्वाची आहे. ग्रंथातून उत्पन्न झालेल्या पांडित्यापेक्षा अंत:करणातला प्रेमभाव अधिक आवश्यक असतो. याच संदर्भात रसेलने म्हटले आहे, **'A Good life is inspired from love and guided by knowledge'**. उत्तम जीवनासाठी प्रेम आणि माणुसकी यांची सर्वप्रथम जरूर आहे. खरे तर संतमार्ग हा प्रेममार्गच आहे. ईश्वराचे प्रेम आणि भक्ती म्हणजे एखाद्या मंदिरात केलेली मूर्तीची पूजा नव्हे हे संतांनी वारंवार सांगितले आहे. परमेश्वर ही संकल्पना त्यांच्या दृष्टीने आकुंचित नाही. सर्वव्यापकत्व आणि सर्वस्पर्शित्व हे परमेश्वराचे गुण आहेत असे मानून संतांनी 'जेजे भेटे भूत ते ते जाणिजे भगवंत' हा विचार मांडला. विश्वाच्या मुळाशी जी एक चैतन्यशक्ती आहे त्याच शक्तीचे पाझर प्रत्येक जीवनमात्राच्या ठिकाणी आहेत ही भावना संत साहित्यात आढळते. म्हणूनच मनुष्याने आपल्या आंतरिक प्रेमशक्तीचा आणि ज्ञानदृष्टीचा विकास करून समाजजीवनाशी समरस व्हावे म्हणजेच त्याला ईश्वरत्वाचा साक्षात्कार होऊ शकेल; ही विचारधारा मानवतावादाला सर्वार्थांनी पोषक आहे. संतांनी कोणते चमत्कार केले याचे तथाकथित दाखले देत बसण्यापेक्षा मानवतावादाची गुढी उभारण्यासाठी त्यांनी जे योगदान दिले ते नीटपणे समजून घेतले पाहिजे. संत तुकोबा म्हणतात,

विश्वचैतन्यी पडली मिठी
झाली हरिरूप अवघी सृष्टी

या उद्गारात प्रेमदृष्टीचा अत्यंत व्यापक प्रभाव दिसतो. आपण विश्वजीवनाचे एक घटक आहोत. सारे विश्व आपल्याच व्यक्तित्वाची आविष्कृती आहे अशी उत्कट अनुभूती ज्याला येते त्याला भेदबुद्धी कधीच स्पर्श करू शकत नाही. समता, अभेद भावना हे मानवतावादाचेच विशेष आहेत. संतांनी मानवी मूल्यांचा केलेला विचार आणि आचार यातून महाराष्ट्राच्या लोकजीवनावर काही चांगले संस्कार घडले असे म्हणता येते. आजच्या जगात संतांच्या जुनाट विचारांना स्थान नाही असे मानणाऱ्या टीकाकारांना इतकेच म्हणावे लागेल की, जे विचार कालोचित नसतील ते जरूर बाजूला सारावेत. पण संत साहित्याला आधारभूत असलेली विचारधारा उदार मानवतावादाची आहे. जनजीवनांच्या उभारणीत ती स्वीकारल्याशिवाय पुढे पाऊल टाकता येणार नाही. संतांचा हा मानवतावाद आणि आगरकर, फुले, आंबेडकर यांनी सांगितलेला मानवतावाद यात काही अंतर असले तरी त्यातली साम्यस्थळे

खरोखरीच लक्षणीय आहेत. अध्यात्मनिष्ठ मानवतावाद ही संतांची देणगी आहे. 'भूतांपरस्परे पडो मैत्र जीवांचे' ही त्यांची उत्कट आकांक्षा सुखी जीवनासाठी आवश्यक आहे. विरोध, संघर्ष, हिंसा यातून समाज आकाराला येत नाही हा विचार त्यांनी पुन्हा पुन्हा विवरून सांगितला.

संत साहित्यात कर्मकांड, तीर्थयात्रा, यज्ञयाग, हिंसात्मक आचरण यावर अनेक ठिकाणी तीव्र प्रहार केलेले आढळतात. या बाबतीत तुकारामांचा हल्ला अधिक भेदक स्वरूपाचा आहे. तीर्थाच्या ठिकाणी धोंडा आणि पाणी असते तेथे देव नसतो. देव हा सज्जनांच्या जीवनातच सापडतो असे सांगून तीर्थयात्रा करणाऱ्या भाविकांचा त्यांनी उपहास केला आहे. अशाच एका तथाकथित भाविकाला ते परखडपणाने विचारतात,

जाऊनीया तीर्था काय तुवां केले ।
चर्म प्रक्षाळिले वरी वरी ॥
अंतरीचे शुद्ध कासयानेजाले ।
भूषण त्वां केले आपण या ॥
वृंदावन फळ घोळिले साकरा ।
भीतरील थारा मोडेचिना ॥
तुका म्हणे नाही शांति क्षमा दया ।
तोवरी कासया फुंदा तुम्ही ॥

शांती, क्षमा आणि दया जोपर्यंत अंतःकरणात नाहीत तोपर्यंत असल्या शेकडो तीर्थयात्रा कधीच परिवर्तन घडवू शकत नाहीत. आपले मन हेच खरे तीर्थक्षेत्र आणि या क्षेत्रातच तो वैकुंठीचा राणा निवास करतो असे तुकोबांचे मत आहे, थॉमस पेन यांच्या एका विधानाची आठवण होते: **'My own mind is my own church'** मन हेच प्रार्थनामंदिर. शुद्ध मन आणि शुद्ध जीवन जोपर्यंत नाही तोपर्यंत सारे व्यर्थ, हा विचार कोणत्याही श्रेष्ठ तत्त्वचिंतकाच्या साहित्यात सापडतो. गांधीजींनी तर स्वातंत्र्याची लढाई लढतानाही द्वेष आणि मत्सर, वैयक्तिक शत्रुत्व या प्रवृत्तीला आपल्या चळवळीत थारा दिला नाही. म्हणूनच कोणत्याही इंग्रज माणसाशी त्यांचे शत्रुत्व नव्हते. तुकारामांच्या काव्यपंक्ती पुन्हा उद्धृत कराव्याशा वाटतात, 'नाही निर्मळ जीवन । काय करील साबण'. शुद्ध आणि स्वच्छ जीवनाचा व प्रवृत्तींचा जितका वैयक्तिक जीवनात प्रभाव पडतो तो कितीतरी अधिक प्रमाणात सामाजिक

आणि राजकीय जीवनात पडत असतो. साध्य आणि साधन दोन्हीही शुद्ध असावे लागतात हा संतांचा आग्रह आजच्या बाजारी वातावरणात कुणाला जुनाट वाटला तर ते त्याचे दुर्दैव म्हटले पाहिजे. आजचे आमचे दैनंदिन जीवन आणि राजकारण नासून गेलेले दिसते. याचे कारण शुचिता, संयम आणि विवेक या गुणांना हद्दपार करून व्यक्तिगत स्वार्थ आणि स्वैर भोग यांच्या आहारी आपण गेलो आहोत. भ्रष्ट आचारविचारांची बौद्धिक समर्थनिकरण्यात आजचे पांडित्य खर्ची पडत आहे. मला वाटते आदर्श गृहस्थाची जी संकल्पना संत साहित्यात सापडते ती कधीच जुनी होण्यासारखी नाही.

काही धर्मसंप्रदाय कर्मठपणाला आणि सामाजिक विषमतेला उचलून धरणारे होते. अशा परिस्थितीत वारकरी पंथाने मात्र 'अवधियांपुरते वोसंडले पात्र' ही समतावादी विचारसरणी स्वीकारून माणसाच्या माणुसकीला प्रतिष्ठा मिळवून देण्याचा प्रयत्न केला. तेराव्या शतकात ज्ञानेश्वरांसारखा एक ब्राह्मण (खरे तर ज्ञानेश्वरांनाही परंपरानिष्ठ पंडितांनी ब्राह्मण मानले नाही. ते जातिबहिष्कृतच होते.) आणि चोखामेळ्यासारखा एक तथाकथित अस्पृश्य चंद्रभागेच्या वाळवंटावर उराउरी भेटत होते. भजन-कीर्तनात रंगत होते. ही घटना त्या काळाच्या अपेक्षेने निश्चितच क्रांतिकारक होती. विसावे शतक संपत आलेले असतानाही अजून भल्याभल्यांच्या डोक्यातले विषमतावादी विचारांचे जंतू क्रियाशील असलेले दिसतात. पण तेराव्या शतकात ब्राह्मण, महार, शिंपी, माळी, कुंभार, सोनार इत्यादी अठरापगड जातीची माणसे ईश्वराच्या नावाखाली भक्तीच्या भूमिकेवर एकत्र आणण्याचे कार्य संत चळवळीने केले. इतकेच नव्हे तर भक्तीच्या प्रांगणात उच्चनीच भाव या चळवळीने फेकून दिले. हिला क्रांती हा शब्द लावायचा नसेल तर वाटल्यास लावू नये पण स्थित्यंतराचे परिणाम सामाजिक जीवनावर काही अंशी होणे स्वाभाविकच होते. खालच्या स्तरातला माणूस जागृत होऊन उभा राहतो आणि देवाच्या दारात आपली तक्रार मांडतो हा खरोखरच एक बदल आहे. संत कर्ममेळा परमेश्वराला सरळ सवाल विचारतो,

आमुची केली हीन याती । तुज का न कळे श्रीपती ॥
जन्म गेला उष्टे खातां । लाज न ये तुमचे चित्ता ॥
म्हणे चोखियाचा कर्ममेळा । कासया जन्म दिला मला ॥

ही केवळ कर्ममेळ्याची वेदना नव्हे. साऱ्या दलित समजल्या गेलेल्या, पतित

मानल्या गेलेल्या समाजाच्या मनातले शेकडो वर्षे ठसठसणारे हे दुखणे आहे. देवाला जाब विचारून 'लाज न ये तुमचे चित्ता' असा घणाघाती उद्‌गार काढला जातो याचा अर्थ अस्पृश्यांच्या मनातली खळबळ तेराव्या शतकातच विद्रोहाच्या वाटेने चालत होती. सर्वसाधारण माणूस जेव्हा आपली सुखदुःखे निःसंकोचपणे शब्दबद्ध करू लागतो तेव्हा साहित्यात परिवर्तनाची लाट येते. माझ्या मते या प्रकारचे नवे परिवर्तन संतचळवळीच्या माध्यमातून लोकमनात होऊ लागले. खालच्या समाजातली स्त्रीसुद्धा काव्यांतून आपली भावना व्यक्त करू लागली. या सर्व घटितांना आजच्या अर्थाने क्रांती म्हणता येणार नाही. पण उद्याच्या सामाजिक क्रांतीची ही नांदी महाराष्ट्राच्या रंगभूमीवर संतांच्या साहित्यातून मुखरित झाली असे विधान करण्यास काय हरकत आहे? संत चळवळ ही मुळातच मूठभर पंडितांसाठी नव्हती. ती बहुजन समाजातून 'बहुजनहिताय' निर्माण झालेली आध्यात्मिक चळवळ होती. पण तिला सामाजिक जाणिवांचेही अधिष्ठान होते. ती नुसतीच देवभक्ती आणि परमार्थ यांच्याशी निगडित असती तर तिच्यातून मधून मधून सामाजिक वेदनेचे आणि बंडखोरीचे सूर निघाले नसते. वारकरी पंथाला मुळातच विषमतेचे वावडे होते हे सिद्ध करता येते. या पंथाने महानुभाव पंथाप्रमाणे वर्णव्यवस्थेवर आणि जातीपातीवर विध्वंसक प्रवाह केले नाहीत हे खरे आहे, पण समतेचा उद्‌घोष करीत वारकऱ्यांनी उच्चवर्णीयांचा बडेजाव बऱ्याच प्रमाणात नाहीसा केला. पढीक ज्ञानापेक्षा नैतिक आचरण आणि विशुद्ध भक्ती यांना महत्त्व दिल्यामुळे समाजातल्या खालच्या वर्गातल्या लोकातली न्यूनगंडाची जाणीव निरसून गेली. ही घटना समाजमनातल्या बदलाची द्योतक मानली पाहिजे.

आज आपण ज्या अर्थाने समता आणि क्रांती हे शब्द योजतो तो अर्थ संतांच्या साहित्यात आढळणार नाही. महावीर, बुद्ध, बसवेश्वर आणि चक्रधर यांनी जातिव्यवस्था समूळ उखडून टाकण्याचा प्रयत्न केला. संतांनी मात्र परंपरागत शास्त्रप्रामाण्य झुगारून दिले नाही. त्यांना अभिप्रेत असलेली समता भक्ती आणि अध्यात्म या क्षेत्रांपुरतीच मर्यादित होती. दैनंदिन सामाजिक व्यवहारातल्या जातीपातींच्या भिंती पाडून टाकण्याचा विचार संत करू शकत नव्हते. ज्यांनी हा विचार आणि आचार केला त्या क्रांतिकारकांना परंपरागत हिंदुधर्माच्या चौकटीत राहता आले नाही. कारण जन्मसिद्ध उच्चनीचपणाची विभागणी करणारी वर्णव्यवस्था हा सनातन हिंदुधर्माचा अत्यंत महत्वाचा घटक मानला गेला. संतांना हिंदुधर्म

विस्कळीत करायचा नव्हता. उलट या धर्माला सर्वसमावेशकतेची बैठक देण्यासाठी ते धडपडत होते. शास्त्रप्रामाण्याची चौकट उद्ध्वस्त न करता ती लवचिक करावी, तिच्यातला कर्मठपणा नाहीसा करावा व तिला उदारतेच्या पातळीवर न्यावे ही संतांची भूमिका होती. या बाबतीत संत पुष्कळ प्रमाणात सफल झाले असे विधान करता येईल. वैदिकांच्या समाजशास्त्राविरूद्ध संतांनी बंड पुकारले असते तर हिंदुसमाजाने त्यांना महानुभावाप्रमाणेच बाहेर फेकून दिले असते. भिन्न भिन्न जातीजमातीतली माणसे एकमेकांच्या जवळ आणावीत ही त्यांची आकांक्षा स्थूलमानाने पूर्ण झाली असेच म्हणावे लागेल. १९ व्या शतकापासून सामाजिक समतेचा लढा महाराष्ट्रात जेव्हा उभा राहिला तेव्हा संतांच्या भक्तिमार्गी, प्रेममार्गी चळवळीच्या पार्श्वभूमीमुळे म. फुले, छ. शाहू महाराज आणि डॉ. आंबेडकर यांना लढताना अधिक बळ मिळाले. ज्ञानेश्वर, तुकारामादि संतांनी समतेची वाट आपल्या कल्पनेप्रमाणे तयार केली होती. जेथे हे संत थांबले तेथून पुढील प्रवास समाजसुधारकांना करणे शक्य झाले. उदारमतवादी विचारधारा संतांनी महाराष्ट्राला दिली होती. त्यामुळे पुढील प्रवास समाजसुधारकांना करणे शक्य झाले. उदारमतवादी विचारधारा संतांनी महाराष्ट्राला दिली होती. त्यामुळे पुढील क्रांतिकारकांना वाट चालणे सुकर झाले हा इतिहास आहे. या बाबतीत महाराष्ट्र आणि भारतातील इतर प्रांत यांच्यातला फरक लक्षात येतो. फुले-आंबेडकरांच्या चळवळीला महाराष्ट्रातच चांगला प्रतिसाद मिळू शकला याचे कारण असे देता येईल की, महाराष्ट्रातल्या संत चळवळीने समतेचा काही शतके घोष केला होता. तसा उद्घोष इतर प्रांतात तीव्रतेने आणि सातत्याने झालेला दिसत नाही. सामान्य माणसांचे, खालच्या थरांतल्या जनतेचे प्रतिनिधी आणि प्रवक्ते म्हणूनच संत मध्ययुगात उभे राहिले. तो उदार वारसा १९ व्या शतकात सुरू झालेल्या प्रबोधनवादी चळवळीला मिळाला. म्हणूनच आजचा महाराष्ट्र जितका फुले-आंबेडकरांचा आहे तितकाच ज्ञानेश्वर-तुकारामांचाही आहे.

संत चळवळीचे सामर्थ्य आणि मर्यादा या दोन्ही गोष्टी समजून घेणे आवश्यक आहे. 'या टाळकुट्यांनी देश बुडवला' हे केवळ निवृत्तिवादी आणि पलायनवादी होते असे म्हणून त्यांची हेटाळणी करणे सोपे आहे. पण ही विधाने पूर्णपणे अवास्तव आहेत. भाबडेपणाने पूजन करणेही संयुक्तिक नाही. माणूस हा माणुसकीचा दीपस्तंभ व्हावा या इच्छेतून संतांच्या जीवनाची आणि साहित्याची गंगा वाहात होती. आजही या प्रवाहातले सौंदर्य मोहिनी घालते. हे काव्य आणि त्यातील विचार यांच्यातून प्रकट

होणाऱ्या शाश्वत मूल्यांचा स्वीकार अवश्य केला पाहिजे. काही चिकित्सक म्हणतात त्याप्रमाणे संतकाव्य हे अज्ञानयुगाचे मुळीच अपत्य नाही. त्याच्याकडे रसशोधक दृष्टीने, पूर्वग्रहमुक्त वृत्तीने पाहाता आले पाहिजे.

○○○

# दुरिताचे तिमिर जावो

एकदा एका वाचकाने मला प्रश्न विचारला, 'संत साहित्यात असं काय अपूर्वत्व आहे म्हणून तुम्ही त्याबद्दल अनेक ठिकाणी बोलता? ईश्वराची भक्ती भावडेपणानं करीत राहिलेल्या संतकवींच्या साहित्यात जीवनासंबंधी महत्त्वाचे विचार आढळतात का? विठ्ठल नामाचा गजर करणाऱ्या आणि भजन-कीर्तनात बुडून गेलेल्या या भक्तांना सामाजिक जाणीव होती का? परमार्थ आणि परलोक यांनाच या संतांनी माझ्या मते नको तितकं महत्त्व दिलं. संत हे भक्त होते हे खरं. पण ते विचारवंत होते का? नामसंकीर्तन करायला विचाराची जरूर नसते. श्रद्धा किंवा खरं तर अंधश्रद्धा असली म्हणजे नामसंकीर्तनाची क्रिया होत राहते. समाजाला या संत मंडळींनी काही चिरंतन स्वरूपाचं विचारधन दिलं आहे का? त्यांच्या चमत्काराबद्दल भाविक लोक भरभरून सांगत असतात. आजच्या विज्ञानयुगात त्या चमत्कारांवर आम्ही विश्वास, ठेवणार नाही. म्हणे, विठ्ठल, नामदेवांशी बोलत होता. जनाईबरोबर दळण करीत होता. गोरा कुंभाराचे कापलेले हात परमेश्वरानं त्याला पुन्हा मिळवून दिले. ज्ञानेश्वरांनी तर रेड्याच्या तोंडून वेदवाणी म्हणवून घेतली. या भाकडकथांचा आजच्या युगात काहीच उपयोग नाही. संतांच्या साहित्यात समाज घडविणारे- माणसाला मार्ग दाखविणारे रचनात्मक विचार आहेत काय? विचारवंत म्हणून संतांनी या जगाला काही दिलं आहे का ते सांगा. संतांविषयी नुसती गौरवाची अतिशयोक्तिपूर्ण भाषा आम्हाला नको.'

त्या वाचकाने माझ्यावर प्रश्नांचा वर्षाव केला होता. मला त्याचे प्रश्न आवडले. संत साहित्याचे मोल तर्कशुद्ध निकषावर व्हावे ही भूमिका योग्य होती. संत म्हटल्यावर त्यांच्यासंबंधी गहिवरून बोलणारे आणि अतिशयोक्तीची भाषा बोलणारे बरेच व्याख्याते आणि लेखक मला माहीत आहेत. एकदा तर मी तुकारामांच्या काव्याबद्दल बोलत असताना एका श्रोत्याने माझी अडवणूक केली. मी तुकारामांचा उल्लेख प्रत्येकवेळी 'तुकाराम महाराज' किंवा 'तुकोबा माऊली' असाच केला पाहिजे असा त्याने आग्रह धरला. खरे तर तुकोबा किंवा तुकाराम म्हणण्यात आपुलकी आहे. तुकाराम महाराज म्हटले की एक प्रकारचे अंतर निर्माण होते. या मताचा मी स्वीकार

केलाच पाहिजे नाहीतर मी तुकारामांचा निंदक ठरविला जाईल अशीही धमकी त्याने दिली. संतविषयक प्रेम आणि भक्ती डोळस नसेल तर तिची परिणती तर्कदुष्ट, अंधश्रद्धेत कशी होऊ शकते. याची अनेक उदाहरणे देता येतील. असल्या तर्कशून्य श्रद्धेच्या पार्श्वभूमीवर त्या वाचकाने उपस्थित केलेले प्रश्न निश्चितच चांगले होते. कवी म्हणून संत निश्चितच श्रेष्ठ आहेत. त्यांच्या काव्यप्रतिभेबद्दल शंका घ्यायला तिळमात्रही जागा नाही. उत्कट भावनेतून आकाराला आलेली संतांची कविता काव्य म्हणून प्रथम श्रेणीची आहे हे सांगायला एखाद्या समीक्षकाची जरूर नाही. लक्षावधी माणसांच्या हृदयांत भक्ति प्रेमांची कंपने निर्माण करण्याचे सामर्थ्य संतवाणीत सामावलेले आहे. मराठी सारस्वतातून हे काव्य वगळले तर मराठी साहित्यात फार मोठी पोकळी निर्माण होईल. प्रत्येक संतकवीच्या काव्यात साहित्याचे सौंदर्य उधळलेले दिसते. पारिजातकाच्या फांद्या हलवल्या की जमिनीवर कोवळ्या सुगंधी फुलांचा सडा पडतो, त्याप्रमाणे कोणत्याही संताचे काव्य चाळताना त्यातील साध्या पण उत्कट शब्दांतले भावनेचे वैभव रसिकांच्या मनावर आपली विशिष्ट छाप उमटविते. ज्ञानेश्वर-तुकारामांसारखे कवी तर आपल्या प्रतिभेचे सहजपणे विलास करताना दिसतात. मराठी साहित्याचे उद्यान संतकवितेच्या वेलीवर उगवलेल्या फुलांनी फुलवले आहे. असंख्य उदाहरणे देता येतील. सागरात ज्याप्रमाणे लाटेमागून लाट येते आणि आपण तो प्रमत्त लाटांचा खेळ पाहण्यात देहभान विसरून जातो. त्याप्रमाणे ज्ञानेश्वरीतील प्रत्येक ओवी आणि नामया-तुकयाचा प्रत्येक अभंग जितका श्रवणीय तितकाच रचनादृष्ट्याही संस्मरणीय असतो. एखादा सावता माळी किंवा जनाबाई आपल्या काव्यसौंदर्याचा असा काही चमत्कृतिपूर्ण आविष्कार करतात की त्यांची ती कविता रसिकमनाला मिठीच मारून बसते. एक दोन उदाहरणे देण्याचा मोह आवरत नाही. सावता माळी म्हणतो,

आमुची माळियाची जात । शेत लावू बागाईत ।
आम्हा हाती मोट नाडा । पाणी जाते फुलझाडा ॥
शांती शेवंती फुलली । प्रेम जाई-जुई व्याली ।
सावताने केला मळा । विठ्ठल देखियला डोळा ॥

हा भक्तीचा मळा संत सावता माळी यांनी कसा फुलवला आहे हे त्यांच्या शब्दांतूनच स्पष्ट होते. आपला मळा हेच पंढरपूर. या मळ्यातच विठ्ठलाचे निवासस्थान आहे. ही जाणीव जशी एखाद्या कवीची आहे, तशीच ती विचारवंताचीही नव्हे

काय? परमेश्वर मंदिरात नसतो. तो आपल्या अंतःकरणातच वस्तीला असतो. ही जाणीव श्रेष्ठ पंडितालाही कधी कधी होत नाही. भक्तियुक्त विचारातून हे डोळस भान भक्ताला येऊ शकते. सावता हा माळी होता. तो पढीक विद्वान नव्हता. पण विद्वत्तेलाही अगम्य अशी खोल विचाराची सुंदर भाषा त्याच्या वाणीने प्रकट केली आहे. म्हणून तर सावताच्या मळ्यात-शांतीची शेवंती फुलून आली आणि प्रेमाची जाई-जुई बहरून गेली. काव्यसौंदर्याचे म्हणून हे उदाहरण मी देत असलो तरी त्यात जीवनाचाही तात्त्विक विचार मार्मिकपणे आला आहे. विठ्ठल पाहायचाअसेल तर तो मला माझ्या मळ्यात दिसतो, असे म्हणून मळा फुलवणारा हा माळी एक जीवनवादी विचार आपल्या अनुभूतीतून सांगतो.

जनाबाई ही तर दासी होती. ग्रंथाध्ययनाशी तिचा संबंध आला असेल असे वाटत नाही. ती विठ्ठलाची आर्त भक्त होती. ध्यानी, मनी आणि स्वप्नी विठ्ठलाचीच उपासना ती करीत होती. तिची सारीच कविता प्रसादपूर्ण आहे. पण तिच्याही काव्यात तात्त्विक विचाराचे स्थान जेव्हा दिसते तेव्हा वाचकला आगळा आनंद होतो. तत्त्वज्ञानाने ओथंबलेला जनाबाईचा अभंग वाचल्यावर संतांची प्रतिभा केवळ भजन, कीर्तनातच समाधान मानते हा एक गैरसमज आहे याची जाणीव होते. दळण दळताना जे गीत गाते त्यातला विचार चिंतनीय आहे. ती म्हणते,

'प्रपंचाचे दळण दळून झाले. सत्त्वाचे आधण ठेवले. पुण्य वेरिले आणि पाप उतू गेले. आता विठठला, तू यावे.'

सुंदर माझेजाते गे फिरे बहुतेके।
ओव्या गाऊ कौतुके तू ये रे बा विठठला ॥
जीवाशिव दोनी खुंटे गे प्रपंचाचे नेटे गे।
लावूनी पाची बोटे गे तू ये रे बा विठ्ठला ॥

जनाबाईच्या अभंगातला हा तत्त्वविचार इतक्या सहज सुलभ रीतीने व्यक्त झाला आहे की त्याचे आश्चर्यच वाटावे. आशय आणि अभिव्यक्ती यांचा हा संगम विलोभनीय म्हटला पाहिजे. समाजाच्या खालच्या स्तरातून आलेल्या आणि ग्रंथ - ज्ञानाची ओळख नसलेल्या संतांच्या काव्यात सुद्धा तत्त्वसौंदर्य जर आढळते तर ज्ञानेश्वर, एकनाथ इत्यादी संतकवींच्या साहित्यात विचारांचे अमाप भांडार असले तर त्यात काय आश्चर्य? नामदेव आणि तुकाराम यांच्या अभंगातून जीवनविषयक विचारधारा व्यक्त होताना दिसते. अनुभव आणि चिंतन यांच्या बळावर या संतांनी

समाजाचे प्रबोधन केले आहे. संतांची कविता जितकी आत्माभिव्यक्तीसाठी आहे त्यापेक्षा अधिकांशाने ती सामाजिक उद्‌बोधनासाठी लिहिली गेली आहे. समाज घडवणारी आणि माणसाला उन्नत करणारी विचारसरणी या काव्यातून स्पष्टपणे प्रकट झाली आहे. 'स्वान्तः सुखाय' लिहिण्यापेक्षा 'बहुजन हिताय' हेच उद्दिष्ट दृष्टीसमोर ठेवून संतसाहित्य निर्माण झाले. ज्ञानेश्वरांची तर प्रतिज्ञाच आहे.

वाग्विलास विस्तारू । गीतार्थेसी विश्व भरू ।
आनंदाचे आवारू । मांडू जगा ॥

आपल्या वाणीचा विलास गीतार्थाचे ज्ञान जगाला करून देण्यासाठीच आहे आणि त्यातून एक श्रेष्ठ प्रतीचा आनंद लोकमनात व जगात आपल्याला पेरायचा आहे. ही भूमिका ज्ञानेश्वरांप्रमाणे सर्वच संतांची आहे. वैचारिक मरगळ आलेल्या महाराष्ट्रात ज्ञानेश्वरीने नवविचारांचा ध्वज फडकावला. कर्मयोगाची आणि पुरुषार्थाची रसरशीत शिकवण त्यांनी दिली. ते म्हणतात, 'ज्ञानवंताने आपल्या पांडित्याच्या व्यासपीठावर बसून लोक जीवनाकडे पाठ फिरवू नये. समाजाला मार्गदर्शन करण्याची जबाबदारी त्याला नाकारता येणार नाही. तो स्वतः कृतार्थ असेल पण तरीही आपल्या आजूबाजूचा समाज प्रबोधित करण्यासाठी त्याने अखंड प्रयत्न केले पाहिजेत.'

सामाजिक जाणिवेने संपन्न असलेला हा ध्येयवादी विचार ज्ञानेश्वर विवरून सांगतात. आजच्या परिस्थितीतही या विचाराची नितांत आवश्यकता आहे. सातशे वर्षापूर्वी मांडला गेलेला हा विचार आज कोणत्याही अर्थाने कालबाह्य झालेला नाही. तो सर्वार्थांनी आज देखील अत्यावश्यक आहे. लौकिक ज्ञान मिळाल्यावर बहुसंख्य सुविद्य लोक आपल्या ज्ञानाचे भांडवल करून व्यक्तिगत सुखोपभोगात बुडून जातात. त्यांच्या ठायी सामाजिक जाणीव फारशी नसते. हे स्वार्थी विद्वान व्यापक दृष्टीने विचारच करीत नाहीत. डॉक्टर असो, इंजिनिअर असो किंवा मोठा कारखानदार असो आपल्या पलीकडे पसरलेल्या अफाट जगातल्या दुःख वेदनांची किंचित ही पर्वा करीत नाही अशा लोकांसाठी 'विश्व हे मोहरे लावावे' आणि लोकांत राहून लोकांना अलौकिक होऊन राहू नये असाच जणू स्पष्ट संदेश ज्ञानेश्वर देतात. आजच्या संदर्भात ज्ञानवंत याचा अर्थ मी मर्यादित करतो. ज्याला आत्मज्ञान झाले आहे, अशा ज्ञानवंताला ज्ञानदेवांनी सांगितले आहे. त्यांना अभिप्रेत असलेले 'आत्मज्ञान फार व्यापक होते. आजचा ज्ञानी मनुष्य समाजापासून फुटून जाऊ नये, असा अर्थ घेता येईल.

'हे विश्वचि माझे घर' ही विशाल दृष्टी संतांनी समाजाला दिली. नाना प्रकारच्या क्षुद्र कुंपणांनी आणि भिंतीनी हा समाज विभागलेला होता. आजही तो तसाच फुटकळ अवस्थेत आहे. सारा समाज एकत्र जोडण्यासाठी समतेची आणि एकतेची दृष्टी माणसाला मिळली पाहिजे. पण भौतिक शास्त्रांचा व्यापक विकास होत असताना आणि माणूस चंद्रावर देखील आपल्या पाऊलखुणा उमटविण्याइतका ज्ञानी झालेला असताना तो अजून जातीपातींच्या व संप्रदायांच्या क्षुद्र सीमा ओलांडू शकत नाही. या बुद्धिमान माणसाच्या मनात अजूनही विश्वप्रेमाचा तर राहोच, पण आपल्या सभोवतालच्या मर्यादित समाजाबद्दलही आत्मीय भावाचा उदय होत नाही. मेंदूचा विस्तार होतो. पण अंतःकरण मात्र आकुंचित होत जाते. ही भयानक शोकांतिका टाळण्यासाठी संतांची व्यापक प्रेमाची व सहिष्णुतेची भूमिका आज स्वीकारलीच पाहिजे. 'भूतां परस्परे पडो मैत्र जिवांचे' ही केवळ ज्ञानेश्वरांची कल्पना नव्हे. त्यांच्या प्रज्ञेला आणि प्रतिभेला एकात्म जगाचे, एकमेकांवर प्रेम करणाऱ्या विशाल जगाचे पडलेले स्वप्न आहे. संतांच्या काव्यात जगाला देण्यासारखा विचार आहे काय असा प्रश्न विचारणाऱ्या तथाकथित बुद्धिमंतांनी आपले पूर्वग्रह बाजूला ठेवून संत साहित्य उघड्या डोळ्यांनी वाचले पाहिजे. 'ज्ञानेश्वरी' हा केवळ काव्याचा सुंदर ग्रंथ नसून तो जीवनविचाराने ओथंबलेला ग्रंथ आहे हे लक्षात घेणे आवश्यक आहे. ज्ञानेश्वरीने काय दिले? ही शंका उपस्थित करणाऱ्यांना मी इतकेच सांगेन की, ज्ञानेश्वरीने प्रेमाचा, करुणेचा, शांतीचा आणि भक्तीचा, कर्तव्यांचा व आनंदवादाचा विचार आपल्याला दिला. चालणाऱ्याच्या वाटेत आपल्या हृदयातल्या प्रेमाची फुले टाकावीत पण फुले टाकण्याची क्षमता नसेल तर निदान काटे तरी टाकू नयेत हा श्रेष्ठ विचार जगातल्या साऱ्यांच संतांनी दिलेला आहे. संत हे जितके ईश्वरनिष्ठ होते., तितकेच किंबहुना त्याहून अधिक ते समाजनिष्ठ होते. ही सारीच सृष्टी त्यांच्या प्रेमाचा विषय होती. 'जे जे भेटे भूत, ते ते जाणिजे भगवंत' असे जाणणारे संत सर्वाभूती परमेश्वर पाहू शकत होते. हीच प्रेमदृष्टी जर जगात पसरली तर जगाचे नंदनवन होईल ही संतसाहित्याची प्रमुख वैचारिक भूमिका आहे. माणसे परस्परांचा द्वेष करतात. मत्सराने एकमेकांवर जळतात, सूड भावनेने शत्रुत्वाचा अंगार पेटवीत ठेवतात. यातूनच भीषण लढाया व रक्तपात होतात. यावर माणसाच्या मनातच एक शुभंकर परिवर्तन घडवून आणावे यासाठी धडपडणाऱ्या संतांनी ज्ञान आणि प्रेम या दोन्ही गोष्टी एकच आहेत असे प्रतिपादन केले. प्रेम हाच परमेश्वर हा विचारही मांडला.

संत तुकोबांचे वचन प्रसिद्धच आहे.

जे का रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले ॥
साधू तोचि ओळखावा । देव तेथेचि जाणावा ॥

या साध्या वाटणाऱ्या शब्दांत संतांच्या हृदयातला संजीवक अमृतविचार भरलेला आहे. महावीर, बुद्ध, ख्रिस्त यांच्यापासून वाहात आलेली ही विचारधारा संतांनी आपल्या प्रेमोत्कट भाषेतून पंडितापासून सामान्य माणसापर्यंत नेलेली आहे. संतविचार हा कल्याणकारक असून सुख आणि प्रेम यांचा वर्षाव करणारा आहे. 'देव आहे अंतर्यामी' असे सांगणारे तुकोबा आपल्या एकतारीवर मानवी ऐक्याचे व प्रेमाचे सूर आळवीत राहिलले होते. या प्रकारचा विचार जो देतो तोच महनीय विचारवंत असतो. नुसती घटपटात्मक चर्चा करण्यात गुंतून पडलेला पंडित हा माझ्या मते खरा विचारवंतच नव्हे. पोथ्या पुराणातले आणि शास्त्रग्रंथातले आधार देणारे व त्यांचेच चर्वितचर्वण करीत बसलेले पढीक लोक कधी कधी पढत मूर्खांसारखे वागतात. निवृत्ति ज्ञानेश्वरांसारख्या प्रतिभावंतांना या कर्मठ विद्वानांनी छळले. तुकारामांसारख्या श्रेष्ठ संतकवीच्या काव्यावर या लोकांनीच बहिष्कार घालून ते काव्य नदीत बुडवले. हे कसले विचारवंत? ज्यांचा धर्म माणसांशी फटकून वागणे आणि माणुसकीशी वैर करणे हाच आहे त्यांना विचारवंत म्हणणे ही विचारवंत या शब्दाची कुचेष्टाच नव्हे काय? संत कबीरासारख्या लिहिता-वाचता न येणाऱ्या पण आपल्या अनुभूतीच्या तपस्येच्या बळावर विचारवंत झालेल्या साधूने ज्ञानी माणसाची व्याख्या योग्य रीतीने केली आहे.

पोथी पढि पढि जगमुआ पंडित भया न कोय ।
ढाओ आछर प्रेमका पढे सो पंडित होय।

पोथ्या-पुराणांचे जीवनभर पठण करणारा पंडित होऊ शकत नाही. ज्याला 'प्रेम' ही अडीच अक्षरे वाचता येतात तोच खरा पंडित असतो. पांडित्याची केलेली ही चिकित्सा अत्यंत मार्मिक आहे. ज्याचे हृदय विशाल असते, ज्याच्या दृष्टीत ममता व समता असते तोच खऱ्या अर्थाने ज्ञानवंत असतो. संत याच अर्थाने श्रेष्ठ विचारवंत आहेत. त्यांच्या साहित्यात जीवनाचे समर्पक भाष्य आढळते. सर्व बाजूंनी संतांनी जीवन न्याहाळले होते. त्यातली सुरूपता आणि विरूपता त्यांनी यथार्थपणे समजून घेतली होती. त्यामुळे ते मानवी जीवनावर अर्थपूर्ण टीका करू शकले.

त्यांनी प्रपंच आणि परमार्थ यांचा समन्वय कसा घालता येईल, भोग आणि त्याग यांचे संतुलन कसे साधता येईल याची मीमांसा आपल्या काव्यातून अनेक ठिकाणी केली आहे. संत दुःखवादी आणि पलायनवादी नव्हते. त्यांनी निवृत्तीचा व अध्यात्माचा अतिरेकी पुरस्कार केला नाही. खरे तर ते प्रवृत्तिवादी, पुरुषार्थी विचारांचे पूजक होते हे सहज सिद्ध करता येते. ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे,

तुवा शरीरपरां नोहावे । कामनाजात सांडावे ।
मग अवसरोचित भोगावे । भोग सकळ ॥

रसिकतेने जीवनांचा उपभोग घ्यावा पण रसिकतेचे रूपांतर लंपटपणात होऊ नये, हेच या आनंदवादी विचारवंताने सांगितले आहे. ज्ञानेश्वरांपासून रामदासांपर्यंत साऱ्याच संतांच्या साहित्यात जीवन कर्तव्यपूर्ण आणि रसपूर्ण आनंदमय करण्याच्या विचारावर भर दिलेला आहे. 'आनंदे भरीन तिन्ही लोक' ही या साऱ्यांचीच प्रतिज्ञा होती असे म्हणता येईल. तुकाराम म्हणतात, आंतरिक शुद्धीतूनच आनंद होतो. हा आनंद मिळविण्यातच खरा पुरुषार्थ आहे. 'नाही निर्मळ जीवन, काय करील साबण।' हा मर्मभेदक प्रश्न ते विचारतात. प्रयत्नवादाची शिकवण देताना तुकोबा म्हणतात,

ओले मूळ भेदी खडकाचे अंग । अभ्यासासी सांग कार्यसिद्धी ।
नव्हे ऐसे काही नाही अवघड । नाही कईवाड तोच वरि ॥
दोरे चिरा कापे पडिला कांचणी । अभ्यासे सेवनी विष पडे ।
तुका म्हणे कैचा बैसण्याची ठाव । जठरी बाळा वाव एकाएकी ॥

संतांचा विचार मनुष्यजीवनाला सत्य, शिव आणि सुंदर या मूल्यांची बैठक प्राप्त व्हावी हाच आहे. खळांची व्यंकटी सांडावी, दुरितांचे तिमिर निरसून जावे, कुळ, जाती, वर्ण यांचा अहंकार गळून पडावा ही विचारधारा. 'आधी केले मग सांगितले' या भूमिकेवरून त्यांनी मांडली. विचार आणि कृती, ज्ञान आणि साधुत्व यांचा संगम त्यांच्या जीवनात झालेला होता. जे जे उत्कट आणि भव्य असेल ते ते स्वीकारावे आणि जे मळमळीत कळाहीन असेल ते ते टाकून द्यावे. आपल्या पुरुषार्थाचे चौघडे वाजत राहावेत अशी कृती करावी. हा समाजपोषक आणि मानवतेला आधारभूत असा विचार हेच संतांच्या काव्याचे प्रमुख सूत्र आहे. शब्दांच्या आणि शैलीच्या सौंदर्यापेक्षाही जीवन विचारातली सुंदरता यांनी टिपली. ती जगासमोर ठेवली. या साहित्यातल्या वैचारिक सामर्थ्याकडे चिकित्सेच्या दृष्टीने पाहिले पाहिजे.

बहुसंख्य लोक संतांवर श्रद्धा ठेवतात. त्यांच्या ग्रंथांची पालखीतून मिरवणूक काढतात. पण त्यातल्या विचारांचे योग्य आकलन करून घेत नाहीत. ही खेदजनक घटना आहे. भाबडी पूजा करणाऱ्या पूजकांपेक्षा अभ्यासकाची अधिक जरूर असते.

संत साहित्यातून प्रकट झालेले एकूण एक विचार आज स्वीकारलेच पाहिजेत असे कोणताही विचारवंत म्हणणार नाही.पण त्या विचारांचा शोध मात्र प्रांजळपणे घेतला पाहिजे. काळ आणि परिस्थितीच्या ओघात काही विचार वाहून जातात. पण मानवतावाद, समाजनिष्ठा वासनाविकारांवर नियंत्रण ठेवण्याची गरज, जीवनाला आणि समाजव्यवस्थेला उच्च मूल्यांचे अधिष्ठान मिळावे हा आग्रह वगैरे मौलिक विचार संतांच्या साहित्यात स्पष्टपणे आढळतात. अखेर 'ईश्वरनिष्ठांची मांदियाळी' निर्माण व्हावी हेच संतांचे भव्य स्वप्न होते. याच स्वप्नाच्या पूर्तीसाठी माणसाला, अखंड धडपड करावी लागणार आहे. संत विचारांची परीक्षा आज बुद्धीच्या निकषावर करू लागलो तर त्या विचारांचे समर्थपण आणि सुंदरपण लक्षात आल्याशिवाय राहणार नाही.

ООО

# सुखाचा परिमळ

महात्म्यांच्या जीवनविचारांची,
त्यांच्या सुगंधी व्यक्तित्वांची
ही आनंददायक समीक्षा.
निर्मलकुमार फडकुले यांच्या
प्रसन्न, प्रभावी शैलीतून
साकारलेली.
बुद्ध-महावीरांच्या
बसवेश्वर-ज्ञानेश्वरांच्या
कबीर-तुकारामांच्या
पाऊलखुणांचा रसमय
चिकित्सक शोध घेणारी
ही समीक्षा
चिंतनाच्या सुवासिक
वाटेने घेऊन जाईल.

सुविद्या प्रकाशन